**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमाक २००७/रामाआ/अपील/सिआर/५६२

निर्णय दिनांक- १६-१०-२००७.

| | | |
|---|---|---|
| श्री.नवनाथ काशिनाथअप्पा बिरादार,<br>व्दारा/- बालासाहेब रुगे निवास,<br>श्रीनगर कॉलनी, पठाण मांडवा रोड,<br>मु.पो.ता.अंबाजोगाई जिल्हा-बीड. | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जनमाहिती अधिकारी तथा<br>उपजिल्हाधिकारी रो.ह.यो. तथा<br>सचिव, हजेरी सहायक समावेशन जिल्हा<br>बीड, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड. | : | प्रतिवादी |
| २. | जनअपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हाधिकारी, बीड, तथा<br>अध्यक्ष बीड जिल्हा हजेरी सहायक<br>समावेशन, जिल्हाधिकारी कार्यालय,बीड. | | |

**विवेंचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनाक- १६-१०-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री.नवनाथ काशिनाथअप्पा बिरादार ( यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जनमाहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी,

रो.ह.यो. जिल्हाधिकारी कार्यालय,बीड (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी, बीड (यापुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे तिघेही गैरहजर आहेत.

आज दिनांक- १६-१०-२००७ रोजी अपिलार्थीने उपजिल्हाधिकारी, रो.ह.यो. बीड यांना अपिलार्थीचा अपील अर्ज सदर माहिती मिळाल्याने निकाली काढण्या विषयी विनंती केली आहे. या अर्जाची प्रत त्यांनी राज्य माहिती आयोगास फॅक्सव्दारे सादर केली आहे.

अपिलार्थीने या विनंती अर्जामध्ये त्यांना जनमाहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक-११-१०-२००७ रोजी सदर माहिती मिळाल्याचे नमूद केले आहे. अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपीलामध्ये त्यांना संबंधीत माहिती त्यांच्याकडे दिनांक २१-०७-२००६ रोजीच्या अर्जान्वये मागितली होती. ही माहिती अपिलार्थीस दिनांक-११-१०-२००७ रोजी म्हणजेच सुमारे १ वर्ष १ महिना व २१ दिवस इतक्या विलंबाने दिल्याचे दिसून येते. अपिलार्थीस माहिती देण्यापोटी जनमाहिती अधिकारी यांनी अक्षम्य विलंब लावला व तसेच आयोगाच्या सुनावणीस गैरहजर राहून आपल्या कार्यशैलीतील बेजबाबदारपणा व कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लावलेल्या विलंबाचे समर्थन करण्यास ते आज आयोगासमोर उपस्थित नाहीत. त्याचबरोबर त्यांनी त्यांचे म्हणणे मांडण्याकरिता कोणतेही लेखी निवेदन आयोगाकडे सादर केले नाही.

उपरोक्त बाबी लक्षात घेता संबंधीत जनमाहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्याकरिता लावलेल्या विलंबा बाबत प्रतिदिनी २५०/- रुपये या प्रमाणे एकूण २५,०००/- रुपये शास्ती का लावण्यात येवू नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश प्राप्त होताच ३

आठवडयाच्या आत आयोगाकडे सादर करावा. त्याचबरोबर सचिव (महसूल) यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी संबंधीत जनमाहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रमाणे नमूद केलेल्या विवेचनास अनुसरुन संबंधीत जनमाहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करावी व आपला अनुपालन अहवाल हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ महिन्याच्या आत पाठवावा. सबब खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## **निर्णय**

१. अपीलार्थीचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२. जनमाहिती अधिकारी यांनी या प्रकरणी दाखविलेल्या बेजबाबदारपणा व आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवा नियमानूसार यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करुन आपला अहवाल हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ महिन्याच्या आत पाठवावा.

औरंगाबाद. ( वि.बा.बोरगे)
दिनांक- १६-१०-२००७ राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद.

प्रत,

१. श्री. नवनाथ काशिनाथअप्पा बिरादार, व्दारा बालासाहेब रुगे निवास, श्रीनगर कॉलनी, अंबाजोगाई, जि.बीड.

२. जनमाहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी, रो.ह.यो. तथा सचिव हजेरीसहायक समावेशन जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (By R.P.A.D.)

३. जनअपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, बीड जिल्हा हजेरी सहायक समावेशन, बीड,यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (By R.P.A.D.)

४. सचिव (महसूल) मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६. निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

**अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/५६९**

**निर्णय १६-१०-२००७**

**दिनांक**

१ श्री. अरुण उत्तमराव गीते, : अपिलार्थी
मु. वागबेट, पो. बेलंबा तालुका परळी वैजनाथ
जिल्हा बीड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी :

तथा मुख्याध्यापिका, साईनाथ माध्यमिक
विद्यालय, वागबेट, तालुका परळी वैजनाथ,
जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, बीड

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-१०-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. अरुण उत्तमराव गीते (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, साईनाथ माध्यमिक विद्यालय, वागबेट यांच्या वतीने त्यांचे प्रतिनिधी लिपीक श्री. अमरनाथ राधाकिसन गीते (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद सौ. शोभा सोपानराव काळूसे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २१-१२-२००५ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे तानाजी मालुसरे शिक्षण प्रसारक मंडळ वागबेट संचलीत साईनाथ माध्यमिक विद्यालयासंदर्भात एकूण १० मुद्दयावर खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

१. “ तानाजी मालुसरे शिक्षण प्रसारक मंडळ वागबेट संचलीत साईनाथ माध्यमिक विद्यालय वागबेट तालुका परळी वैजनाथ या शाळेच्या शैक्षणिक वर्ष २००२ ते

आजपर्यंतच्या कर्मचारी वै. मान्यता प्रस्ताव आदेशाच्या सत्यप्रती (अप्रव्हलचे प्रस्ताव व अप्रव्हल),

२. शाळा स्थापनेपासून आजपर्यंतच्या संच मान्यतेच्या प्रस्तावाच्या सत्यप्रती,

३. वर्षनिहाय ३० सप्टेंबरच्या अहवालाच्या सत्यप्रती,

४. शाळेच्या ऑडिट रिपोर्टच्या सत्यप्रती (वर्षनिहाय),

५. या शाळेविरुध्द आपल्या कार्यालयाकडे करण्यात आलेल्या तक्रारीच्या सत्यप्रती,

६. शाळा स्थापनेपासून आजपर्यंतच्या शिक्षकनिहाय वेळापत्रकाच्या सत्यप्रती,

७. शाळा स्थापनेपासून आजपर्यंतच्या शाळा तपासणी अहवालाच्या सत्यप्रती,

८. शाळा स्थापनेपासून आजपर्यंतची वर्षनिहाय सेवाजेष्ठता यादी,

९. सदर शाळेत कर्मचारी नियुक्तीच्या प्रत्येक वेळी वर्तमानपत्रात दिलेल्या जाहिरातीच्या सत्यप्रती तसेच सेवायोजन कार्यालय व मागासवर्गीय सेल समाजकल्याण व इतर नियमाच्या पालनाबाबत पुराव्यासह स्वयंस्पष्ट अहवाल,

१०. शाळा इमारत मालकीची, किरायाची किंवा अनाधिकृत असल्याबाबत आपला स्वयंस्पष्ट खुलासा व पुरावा देणे."

अपिलार्थीने ही माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १६-०१-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद दिला. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या माहितीमध्ये अपिलार्थीने मागितलेल्या एकूण १० मुद्दयावरील माहितीपैकी सहा मुद्दयावरील माहिती दिली नाही कारण ती कागदपत्रे जाळली गेली आहेत असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. त्यांच्या या म्हणण्याप्रित्यर्थ त्यांनी परळी ग्रामीण येथील दिनांक १९-०४-२००५ रोजी दाखल केलेल्या एफ. आय. आर. ची प्रत आयोगासमोर दाखल केली आहे. जन माहिती अधिकारी यांनी दाखल केलेल्या एफ. आय. आर. मध्ये अपिलार्थीने

मागितलेल्या माहितीतील काही मुद्दयावरील माहिती होती. एफ. आय. आर. प्रतीचे अवलोकन करता अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहिती अर्जातील मुद्दा क्रमांक ४, ७, ८ व ९ यावरील माहिती जळाली गेल्याचा उल्लेख या एफ. आय. आर. मध्ये केल्याचा आढळून आला नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २३-०१-२००६ रोजी प्रथम अपील केले.

सदर अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०४-०९-२००६ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश त्याच दिवशी पारीत केले. या आदेशामध्ये त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना सूचना देऊन त्यांच्यावर १२५०० इतकी शास्ती लावण्याची शिफारस केली आहे. सदर अपील निर्णय जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झाला नसल्याचे त्यांचे उपस्थित प्रतिनिधीने आयोगासमोर सांगितले. तर सदर निर्णय जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविला असता त्यांनी तो स्विकृत करण्यास नकार दिला असे जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर सांगितले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-११-२००६ रोजी व्दितीय अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी वेळोवेळी माहितीची मागणी करुनही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारची माहिती पुरविण्यात आलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १६-०१-२००६ रोजीच्या पत्रान्वये जी माहिती दिल्याचे म्हटले आहे त्या माहिती

संदर्भातील फक्त एक सुरुवातीचे पत्र व कोरे कागद व वैयक्तीक मान्यतेच्या प्रती आणि शाळा तपासणी अहवालाची प्रत इतकीच माहिती त्यांना पुरविण्यात आली. त्यांना अपूर्ण माहिती मिळाल्याने जन माहिती अधिकारी हे शिस्तभंगाच्या व शास्तीच्या कारवाईस पात्र असल्याने त्यांच्यावर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कारवाई करावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी त्यांच्या कडे उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस दिली आहे. जी माहिती, सदर नस्ती गहाळ झाल्यामुळे देता आली नाही ती वगळता सर्व माहिती अपिलार्थीस दिलेली आहे. पोलीस तपासात जसजशी माहिती उपलब्ध होत जाईल त्याप्रमाणे ती अपिलार्थीस दिली जाईल असे त्यांनी आयोगास आश्वासित केले. त्यांनी आयोगास पुढे असेही सांगितले की, अपिलार्थी हे त्यांना हेतुपुरस्सर त्रास देत असून अपिलार्थी यांच्याविरुध्द संस्थेने न्यायालयात दावा दाखल केला आहे. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन व आज झालेल्या युक्तिवादावरुन अपिलार्थीस अद्यापही मुद्दा क्रमांक ४, ७, ८ व ९ या संदर्भातील माहिती मिळाली नसल्याचे स्पष्ट झाले आहे. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी मुद्दा क्रमांक ४ च्या संदर्भातील माहिती सदर शिक्षण संस्था यांनी नेमलेले चॉर्टड अकाउंटंट देऊ शकतील व अपिलार्थीने मागितलेली मुद्दा क्रमांक ८ ज्यामध्ये सेवाजेष्ठतेची मागणी केली आहे त्या संदर्भातील माहिती संस्थेकडे सध्या असलेल्या उपलब्ध माहितीवरुन त्यांना अपिलार्थीस ती देणे जन माहिती अधिकारी यांना शक्य आहे. या शाळेच्या तपासणी अहवालासंदर्भात सदर तपासणी अहवाल शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांना अपिलार्थीस देता येणे शक्य आहे. संस्थेच्या कागदपत्राचे जळीत प्रकरण एप्रिल २००५ मध्ये झाले आहे तर अपिलार्थीने शैक्षणिक वर्ष १९९९ ते २१-१२-२००५ पर्यतची माहिती मागितली आहे. यावरुन संस्थे-कडील कागदपत्राचे जळीत झाले हे जरी खरे मानले तरी जन माहिती अधिका-यास

०४ एप्रिल २००५ ते २१ डिसेंबर २००५ पर्यंतची माहिती अपिलार्थीस देता येणे शक्य होते तथापि त्यांनी यादृष्टीने कोठलीही कारवाई केल्याचे दिसून येत नाही.

आज झालेल्या युक्तिवादातील दोन्ही बाजुंचे मुद्दे व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता एकूण शाळेच्या व्यवस्थापनास अपिलार्थी यांना माहिती देण्यात फारसे स्वारस्य नाही असे दिसून येत आहे. तेव्हा या शाळेच्या व्यवस्थापनाची उपसंचालक, शिक्षण औरंगाबाद यांच्या पातळीवरुन तपासणी करणे जरुरीचे आहे असे आयोगास वाटते. अपिलार्थीने मागितलेल्या माहिती संदर्भात असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती संस्थेकडून अथवा इतर सक्षम प्राधिकरणाकडून प्राप्त करुन घेऊन अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्याप्रित्यर्थ त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई अपिलार्थीस अर्धवट माहिती देऊन स्पष्ट केला आहे त्यामुळे त्यांच्यावर प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे संबंधीत प्रशासकीय प्राधिकरणाने यथायोग्य प्रशासकीय कारवाई करुन आपला अहवाल आयोगास हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीन महिन्यात पाठवावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## <u>निर्णय</u>

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती इतर संस्थेकडून अथवा प्राधिकरणाकडून प्राप्त करुन घेऊन अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्याप्रित्यर्थ त्यांच्या कार्यशैली-तील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई अपिलार्थीस अर्धवट माहिती देऊन स्पष्ट केला आहे त्यामुळे त्यांच्यावर संस्थेच्या प्रशासनाने प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करुन आपला अहवाल आयोगास हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीन महिन्यात पाठवावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १६-१०-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अरुण उत्तमराव गीते, मु. वागबेट, पो. बेलंबा तालुका परळी वैजनाथ जिल्हा बीड

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, साईनाथ माध्यमिक विद्यालय, वागबेट, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ उप संचालक, (शिक्षण), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर

प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेला तक्रार अर्ज.

**तक्रार क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/७६**

**निर्णय** १९-१०-२००७

**दिनांक**

१ श्री. भालेकर बापु गंगाधर, : अर्जदार
मु. पो. गुहा, तालुका राहुरी,
जिल्हा अहमदनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता, मुळा पाटबंधारे
विभाग, अहमदनगर

<u>विवेचन</u>

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-१०-२००७ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अर्जदार श्री. भालेकर बापु गंगाधर व जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, मुळा पाटबंधारे विभाग, अहमदनगर हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-०५-२००६ रोजीच्या त्यांच्या अर्जान्वये त्यांच्या कार्यक्षेत्रातील व राहुरी उपविभांतर्गत दिनांक ०१-०४-२००५ ते ३१-०३-२००६ या कालावधीमधील झालेल्या कामांची माहिती मागितली होती. या अर्जामध्ये त्यांनी ते स्वतः दारिद्र्य रेषेखालील आहेत व त्यासोबत त्यांनी शिधावाटप कार्डाची प्रत अर्जासोबत जोडल्याचे म्हटले होते.अपिलार्थीचा सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-०५-२००६ रोजी प्राप्त झाला.

अपिलार्थीच्या या अर्जास उद्देशून जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या कडील दिनांक २२ मे २००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस अर्जाच्या स्विकृतीची पोच देऊन असे कळविले की, अपिलार्थीने केलेल्या अर्जासोबतची शिधावाटप कार्ड हे दारिद्र्य रेषेखाली अनुज्ञेय नाही. त्याचबरोबर त्यांनी अपिलार्थीस असे कळविले की, जर ते दारिद्र्य रेषेखालील असतील तर तहसीलदार राहुरी किंवा ग्रामपंचायत गुहा यांचेकडून तसे प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे व त्यात दारिद्र्य रेषेखालील क्रमांक नमूद करावा म्हणजे त्यांना आवश्यक असलेली माहिती देणे सुकर होईल.

तदनंतर अपिलार्थीने दिनांक ०३-०६-२००६ रोजीच्या त्यांच्या अर्जान्वये त्यांची दारिद्र्य रेषेखालील कार्डाचा नोंद असलेला दाखला जन माहिती अधिकारी यांना दिनांक ०३-०६-२००६ रोजी पाठवून आपल्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती परत मागितली आहे.

अपिलार्थीच्या या तक्रारीच्या स्विकृतीची पोच कार्यकारी अभियंता यांनी त्यांच्याकडील दिनांक १६ जून २००६ च्या पत्रान्वये देऊन अपिलार्थीस ही माहिती देण्यापोटी आवश्यक ते शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले.

वरील सर्व प्रकारच्या पत्रव्यवहारावरुन अपिलार्थीस माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता शासकीय यंत्रणाकडून अडथळे आणले जात आहेत असे अपिलार्थीस वाटत असल्याने त्यांनी

आयोगाकडे त्यांचेकडील दिनांक २१-०६-२००६ रोजीच्या अर्जाव्दारे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये तक्रार केली आहे. सदर अर्ज आयोगास दिनांक ०१-०७-२००६ रोजी प्राप्त झाला आहे. अपिलार्थी जर दारिद्र्य रेषेखालील असेल तर अपिलार्थीस त्यांनी माहिती अधिकार अधिनियमाव्दारे मागणी केलेली माहिती मोफत देणे जन माहिती अधिकारी यांचेवर बंधनकारक आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (६) मध्ये त्या तरतुदींचा उल्लेख केला आहे. ही तरतूद पाहता कार्यकारी अभियंता मुळा पाटबंधारे विभाग यांना खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

१. श्री. भालेकर बापु गंगाधर मु. पो. गुहा, तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर यांना त्यांच्या कडील दिनांक १२-०५-२००६ रोजीच्या अर्जान्वये मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ०७ दिवसाच्या आत अपिलार्थीस, त्यांच्या दारिद्र्य रेषेखालील प्रमाणपत्राची वैधता तपासून, त्यांना स्पष्ट स्वरुपात व विनामूल्य पुरवावी व तदनंतर आपला अनुपालन अहवाल आयोगास १५ दिवसाच्या आत सादर करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचा राज्य माहिती आयोगाकडे केलेला त्यांचा अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**<u>निर्णय</u>**

१. अपिलार्थीचा अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक १९-१०-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. भालेकर बापु गंगाधर, मु. पो. गुहा, तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर (By R.P.A.D.)

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, मुळा पाटबंधारे विभाग, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (By R.P.A.D.)

३ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

४ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

तक्रार क्रमाक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/९८

निर्णय दिनांक- १९-१०-२००७.

श्री.दत्तात्रय फकिरराव गायकवाड : अर्जदार
मु.पो.भोजडे, तालूका-कोपरगाव
जिल्हा-अहदमनगर.

विरुध्द

१ जनमाहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
पाटबंधारे संशोधन विभाग, नाशिक.

# विवेंचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनाक- १९-१०-२००७ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अर्जदार श्री.दत्तात्रय फकिरराव गायकवाड ( यापुढे त्यांना अर्जदार असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत. तर जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पाटबंधारे संशोधन विभाग, नाशिक, श्री. मोहन वामनराव शेलार (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अर्जदाराने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- ३१-०३-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रातील विशेष दुरुस्ती या कार्यक्रमातंर्गत २००५- २००६ या आर्थीक वर्षामधील झालेल्या कामा संदर्भात काही माहिती मागविली होती.

अर्जदाराच्या या अर्जा संदर्भात जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक- १५-०४-२००६ रोजीच्या पत्रान्वये ही माहिती देण्यापोटीचे शुल्क रुपये १,०००/- इतके त्यांच्या कार्यालयात जमा करण्याचे अर्जदारास सूचित केले. दिनांक ०२-०५-२००६ रोजी अर्जदाराने सदर शुल्काचा भरणा त्यांच्या कार्यालयात केला. अर्जदाराने त्यांच्या मूळ अर्जामध्ये माहिती समक्ष व्यक्तीशः मागितली असतांना देखील अर्जदारास जनमाहिती अधिकारी यांनी पोष्टाने माहिती पाठविली व अर्जदारास ही माहिती देण्यापोटीचे जादा शुल्क आकारले व एवढे करुनही अर्जदारास दुसरीच माहिती दिली, असे अर्जदाराचे म्हणणे आहे. अर्जदारास तदनंतर जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक- १०-०५-२००६ रोजी माहिती दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत आहे.

अर्जदारास पाठविलेली माहिती एकूण १३ पृष्ठांची असल्याचे दिसून येत आहे. अर्जदाराने सदर माहिती व्यक्तीशः अपेक्षिली असल्यामूळे अर्जदारास माहिती देण्यापोटी पोष्टाचा काही खर्च अर्जदारास आकारणे या प्रकरणी अपेक्षित नाही. अर्जदारास जनमाहिती अधिकारी यांनी दिलेली ही माहिती अर्जदारास चूकीची का वाटते, हे स्पष्ट करण्यास अर्जदार आज सुनावणीच्यावेळी गैरहजर आहेत. त्यामूळे हा मुद्दा आयोग बाजूला ठेवत आहे. अर्जदारास जनमाहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती केवळ १३ पृष्ठांची असल्यामूळे त्यास त्यांनी अर्जदार त्यांच्याकडून माहिती देण्यापोटीचे शुल्क म्हणून घेतलेली रक्कम रुपये १,०००/- ही अवाजवी आहे, असे आयोगाचे मत आहे.

जनमाहिती अधिकारी यांनी या शुल्का बाबत असा खुलासा केला की, अर्जदारास ही माहिती देण्यापोटी लागलेल्या मनुष्यबळाचा खर्च देखील या शुल्कामध्ये घेतलेला आहे. अर्जदारास माहिती देण्यापोटी प्रतिपृष्ठ केवळ २/- रुपये इतके शुल्क आकारावे अशी राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक- ११-१०-२००५ रोजीच्या अधिसूचना क्रमांक आरटीआय-२००५/सीआर/३१५/०५/५ मध्ये तरतूद आहे. त्यामूळे जनमाहिती अधिकारी यांनी अर्जदारास केवळ १३ पृष्ठांची प्रतिपृष्ठ रुपये २/- याप्रेमाणे केवळ २६/-रुपये शुल्क आकारणे या ठिकाणी वाजवी आहे, असे आयोगाचे मत आहे. अर्जदाराने स्वतःहून पोष्टाने माहिती मागितली नसल्यामूळे परंतू जनमाहिती अधिकारी यांनी स्वतःहून, ती अर्जदारास, त्यांची विनंती नसतांनाही, ती पोष्टाने पाठविली असल्यामूळे, माहिती पोस्टाने पाठविण्याकरिता लागणारा खर्च जनमाहिती अधिकारी यांनी अर्जदारास लावू नये. तेंव्हा जनमाहिती अधिकारी यांना खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**कार्यकारी अभियंता, पाटबंधारे संशोधन विभाग, नाशिक यांनी अर्जदार श्री.दत्तात्रय फकिरराव गायकवाड यांना, त्यांच्याकडून घेतलेले जादा शुल्क रु. ९७४/- ( रुपये नऊशे चौ-याहत्तर फक्त) हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ दिवसाच्या आत परत करावेत.**

वरील पार्श्वभूमीवर अर्जदाराचा तक्रारअर्ज निकाली काढण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## <u>निर्णय</u>

१. अर्जदाराचा अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

२. जनमाहिती अधिकारी यांनी अर्जदार श्री. दत्तात्रय फकिरराव गायकवाड यांना ही माहिती देण्यापोटी लावलेले जादा शुल्क रुपये ९७४/-(रुपये नऊशे चौ-याहत्तर) हे आदेश निर्गमीत झाल्यानंतर २ दिवसाच्या आत परत करावेत.

अहमदनगर. ( वि.बा.बोरगे)
दिनांक- १९-१०-२००७ राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद.

प्रत,

७. अर्जदार श्री.दत्तात्रय फकिरराव गायकवाड, मु.पो.भोजडे, तालूका-कोपरगाव, जिल्हा-अहमदनगर.

८. जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पाटबंधारे संशोधन विभाग, मेरी कॉलनी,गणपती मंदीराच्या मागे, बी-२ सिडीओ ईमारत, दिंडोरी रोड,

नाशिक- ४२२००४ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

९. सचिव, मुख्य माहिती आयुक्त कर्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

१०. निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

**अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/५९५**

**निर्णय १९-१०-२००७**

**दिनांक**

| | | |
|---|---|---|
| १ श्री. भद्रे सुधीर राजाराम,<br>मु. पो. चिंचोडी पाटील,<br>तालुका जिल्हा अहमदनगर | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी,<br>अहमदनगर | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी | : | प्रतिवादी |

तथा विभागीय कृषि सह संचालक, कृषि-भवन,
शिवाजीनगर, पुणे-०५

| | | |
|---|---|---|
| सध्याः जन माहिती अधिकारी | : | कृषि उप संचालक, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, अहमदनगर |
| जन अपिलीय अधिकारी | : | जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय कृषि सह संचालक, कृषि-भवन, शिवाजीनगर, पुणे - ०५ |

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-१०-२००७ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. भद्रे सुधीर राजाराम (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा कृषि उप संचालक, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी श्री. गायकवाड संभाजी किसनराव (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय कृषि सह संचालक श्री. के. व्ही. देशमुख (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २५-०४-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे अहमदनगर जिल्ह्यामध्ये ०१ जानेवारी २००३ ते ३१ डिसेंबर २००४ या कालावधीत जिल्ह्यामध्ये झालेली मृद व जलसंधारण कामाची माहिती त्यांनी विहित केलेल्या नमुन्यामध्ये मागितली होती. अपिलार्थी यांना आवश्यक असलेल्या

माहितीकरिता एक आठ कलमी प्रपत्राचा नमुना तयार केला होता त्यामध्ये अनुक्रमांक, तालुक्याचे नांव, गावाचे नांव, कामाचे व योजनेचे नांव, मंजूर रक्कम, खर्च रक्कम, आडविलेले पाणी व काम पुर्तता अहवाल दिनांक या माहितीचा समावेश होता.

सदर माहिती अपिलार्थीने टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०८-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस ही माहिती संबंधित मंडळ कृषि अधिकारी यांच्याकडून गोळा करुन घेण्याचे सुचविले. मंडळ कृषि अधिकारी यांच्याकडूनही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-०६-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

सदर अपिलाची सुनावणी दिनांक १०-०७-२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांनी घेऊन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस एक महिन्याच्या आत माहिती देण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे आदेश दिनांक १५-०७-२००६ रोजी पारीत केले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-०८-२००६ रोजी व्दितीय अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तिवादामध्ये अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी दिनांक २५-०४-२००६ रोजी अर्ज केला असता जन माहिती अधिकारी यांच्या कडून वेगवेगळ्या टप्प्यामध्ये (दिनांक ०७-०८ व २१-०८-२००६ रोजी) माहिती प्राप्त झाली.

त्यांना माहिती विलंबाने प्राप्त झाली असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई व्हावी अशी विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना १४ तालुक्यातून गोळा करावयाची होती. अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०७-०८-२००६ रोजी व ११-०८-२००६ रोजी पुरविलेली आहे. त्यांनी दिनांक ११-०८-२००६ रोजी पाठविलेली माहिती, ही माहिती फाटलेली असल्यामुळे अपिलार्थीने स्विकृत केली नाही त्यामुळे त्यांना ती माहिती प्राप्त दिनांक २१-०८-२००६ रोजी परत पुरविण्यात आली. अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या सहाव्या स्तरावरील क्षेत्रीय कर्मचा-याकडून गोळा करावी लागत असल्यामुळे त्यांना अपिलार्थीस ही माहिती देतांना थोडा विलंब झाला आहे. जन अपिलीय अधिकारी यांनीही हे मान्य करुन ही माहिती जनतेस सहजरित्या उपलब्ध व्हावी अशा प्रकारची माहिती त्यांच्या वेबसाईटवर देण्याचा त्यांच्या खात्याचा प्रयत्न आहे असे सांगितले.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता तसेच अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप, व्याप्ती व जन माहिती अधिकारी यांची कामाची माहिती संकलीत व या माहितीचे व्यवस्थापन करण्याची प्रचलीत पध्दत पाहता कृषि विभागामध्ये कामा संदर्भातील माहितीचे व्यवस्थापन करणे या घडीला आवश्यक आहे असे आयोगाचे मत आहे. त्यादृष्टीने जन अपिलीय अधिकारी यांनी आता केलेली कारवाई स्वागतार्ह आहे. अपिलार्थीने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या सर्व सहका-याकडून गोळा करुन घेऊन ती अपिलार्थीस नियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये देणे अपेक्षित असतांना त्यांना संबंधीत मंडळ कृषि अधिकारी यांच्याकडून माहिती गोळा करुन घेण्याचे त्यांना सूचित करण्याची त्यांची कृती सर्वस्वी अयोग्य आहे असे आयोगाचे मत आहे. कृषि विभागाचा मृद संधारण व जलसंधारणा च्या कामावर शासनाचा मोठ्या प्रमाणावर निधी खर्च

होत असतो.  अशा कामावर झालेल्या खर्चातील प्रत्येक पैशाला संबंधीत शासकीय यंत्रणा जबाबदार असते.  अशा कामामध्ये जनसामान्याना पारदर्शकता व शासकीय यंत्रणेचे या कामाच्या प्रती उत्तरदायित्व अपेक्षित असते.  माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चा मूळ उद्देश देखील हाच आहे.  कृषि विभागाच्या अधिका-यांकडून असे सांगण्यात आले की, अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्याकडे सहजरित्या उपलब्ध नव्हती ती त्यांना ब-याच परिश्रमाने हाताखालील क्षेत्रीय अधिका-यांकडून गोळा करुन घ्यावी लागली व त्यामुळे त्यांना विलंब झाला.  अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे स्वरुप पाहता अपिलार्थीने फक्त कामे किती झाली, कामांचा एकूण खर्च, झालेला खर्च, उदिष्ट व साध्य एवढीच माहिती विचारली आहे.  ही  प्राथमिक माहिती देखील जर कृषि विभागाच्या जिल्हा स्तरावरील अधिका-याकडे उपलब्ध नसेल तर त्यांच्या कार्यक्षेत्रातील कामाचे नियोजन व व्यवस्थापन ते कसे करतात हा एक संशोधनाचा विषय होऊ शकेल असे आयोगाचे मत आहे.  कोणत्याही कामाच्या नियोजन व व्यवस्थापनाच्या दृष्टीने अपिलार्थीने मागितलेली माहिती ही अत्यंत महत्वाची असून कामाची पुर्तता विहित मुदतीत, विहित खर्चात व त्याचबरोबर ठरलेले भौतिक उदिष्ट साध्य करण्याच्या दृष्टीने यातील प्रत्येक मुद्दा व त्याचबरोबर इतर अनुल्लेखित मुद्दे देखिल कृषि खात्यातील अधिका-यांनी प्रत्येक टप्प्यावर विचारात घेणे गरजेचे आहे असे आयोगाचे मत आहे.  कृषि आयुक्त याची नोंद घेऊन त्यांच्या माहिती व्यवस्थापन पध्दतीत सुधारणा करतील अशी आयोगास अपेक्षा आहे.  जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती विहित मुदतीत न देण्याबाबत जी कारणे आयोगास स्पष्ट केली आहेत ती आयोगास मान्य नाहीत.  अपिलार्थीस आता माहिती प्राप्त झाली असल्याने त्यासंदर्भात आयोगाचे काहीही आदेश नाहीत.

तेव्हा असे आदेशीत करण्यात येते की :

या प्रकरणातील जन माहिती अधिकारी आणि त्यांचे सहकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यास जो असमर्थनीय विलंब लावलेला आहे त्याप्रीत्यर्थ त्यांच्यावर कृषि आयुक्त यांनी प्रचलीत सेवा नियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी व आयोगास आपला अहवाल हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ महिन्याच्या आत सादर करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी आणि त्यांचे सहकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यास जो असमर्थनीय विलंब लावलेला आहे त्याप्रित्यर्थ त्यांच्यावर कृषि आयुक्त यांनी प्रचलीत सेवा नियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी व आयोगास आपला अहवाल हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ महिन्याच्या आत सादर करावा.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक १९-१०-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. भद्रे सुधीर राजाराम, मु. पो. चिंचोडी पाटील, तालुका जिल्हा अहमदनगर

२ कृषि उप संचालक, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय कृषि सह संचालक, कृषि-भवन, शिवाजीनगर, पुणे - ०५ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त, (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, सेंट्रल बिल्डींग, पुणे - ०१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

**अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/५९६**

**निर्णय दिनांक १९-१०-२००७**

१ श्री. भद्रे सुधीर राजाराम, : अपिलार्थी
मु. पो. चिंचोडी पाटील,
तालुका जिल्हा अहमदनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी :

तथा जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी,

पुणे

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा विभागीय कृषि सह संचालक, कृषि-भवन,

शिवाजीनगर, पुणे-०५

सध्याः जन माहिती अधिकारी : कृषि उप संचालक, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, पुणे

जन अपिलीय अधिकारी : विभागीय कृषि सह संचालक, कृषि-भवन, शिवाजीनगर, पुणे - ०५

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-१०-२००७ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. भद्रे सुधीर राजाराम (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा कृषि उप संचालक, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी श्री. शरद ब. दोरगे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय कृषि सह संचालक श्री. के. व्ही. देशमुख (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २५-०४-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे जिल्ह्यामध्ये ०१ जानेवारी २००३ ते ३१ डिसेंबर २००४ या कालावधीत जिल्ह्यामध्ये झालेली मृद व जलसंधारण कामाची माहिती त्यांनी विहित केलेल्या नमुन्यामध्ये मागितली होती. अपिलार्थी यांना आवश्यक असलेल्या माहितीकरिता एक आठ कलमी प्रपत्राचा नमुना तयार केला होता त्यामध्ये अनुक्रमांक, तालुक्याचे नांव,

गावाचे नांव, कामाचे व योजनेचे नांव, मंजूर रक्कम, खर्च रक्कम, आडविलेले पाणी व काम पुर्तता अहवाल दिनांक या माहितीचा समावेश होता.

सदर माहिती अपिलार्थीने टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०८-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस ही माहिती संबंधित मंडळ कृषि अधिकारी यांच्याकडून गोळा करुन घेण्याचे सुचविले. मंडळ कृषि अधिकारी यांच्याकडूनही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-०६-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

सदर अपिलाची सुनावणी दिनांक १०-०७-२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांनी घेऊन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस एक महिन्याच्या आत माहिती देण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे आदेश दिनांक १५-०७-२००६ रोजी पारीत केले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-०८-२००६ रोजी व्दितीय अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तिवादामध्ये अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी उपरोक्त माहिती करिता दिनांक २५-०४-२००६ रोजी अर्ज करुनही त्यांना आजतागायत म्हणजे व्दितीय अपील सुनावणीच्या वेळेपर्यंत देखील आवश्यक ती माहिती प्राप्त झाली नाही त्यामुळे संबंधीतांवर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० प्रमाणे कारवाई व्हावी व त्यांना विनामूल्य माहिती मिळावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, माहितीमध्ये अचूकता असणे हे त्यांच्या दृष्टीने महत्वाचे आहे. सदर माहिती त्यांच्याकडे सहजरित्या उपलब्ध नव्हती. अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना १३ तालुक्यातून गोळा करावयाची होती. ती अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने त्यांनी क्षेत्रिय स्तरावरुन जमा झालेल्या माहितीची तपासणी करुन अंतिमतः अपिलार्थीस दिनांक १७-१०-२००७ रोजी सर्व माहिती दिली आहे. त्यांना खात्याच्या नियमित कामांबरोबरच इतरही कामांचा (अतिवृष्टी, पीक नुकसान पाहणी इ. ) अतिरिक्त कार्यभार होता हे सर्व सांभाळून अपिलार्थीने विचारलेली विस्तृत स्वरुपाची माहिती देण्यास सहाजिकच वेळ लागला. त्यांनी या कालावधीमध्ये उपविभागीय व मंडळ स्तरावर सर्व संबंधीतांना स्मरणपत्रे, दूरध्वनी, सभेतील सूचना या सर्व प्रकारांनी ही माहिती मिळविण्यासाठी संबंधीतांकडे पाठपुरावा केला होता. हे सर्व अपु-या कर्मचारी वर्गाकडून त्यांना करुन घ्यावे लागले हाही मुद्दा ही माहिती उशिरा देण्यास कारणीभूत असल्याचे त्यांनी आयोगापुढे नमूद केले. अपिलार्थीस ही माहिती देतांना थोडा विलंब झाला आहे व त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांचे प्रथम सुनावणीमध्ये हे मान्य करुन, ही माहिती जनतेस सहजरित्या उपलब्ध व्हावी अशा प्रकारची माहिती त्यांच्या वेबसाईट वर देण्याचा त्यांच्या खात्याचा प्रयत्न आहे असे सांगितले.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता तसेच अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती व जन माहिती अधिकारी यांची कामाची माहिती संकलीत व या माहितीचे व्यवस्थापन करण्याची पध्दत पाहता कृषि विभागामध्ये कामा संदर्भातील माहितीचे व्यवस्थापन करणे आवश्यक आहे असे आयोगाचे मत आहे. त्यादृष्टीने जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांनी आता केलेली कारवाई स्वागतार्ह आहे. कृषि विभागाचा मृद संधारण व जलसंधारणाच्या कामावर शासनाचा मोठ्या प्रमाणावर निधी खर्च होत असतो. अशा कामावर झालेल्या खर्चातील प्रत्येक पैशाला संबंधीत शासकीय यंत्रणा जबाबदार असते.

अशा कामामध्ये जनसामान्यांना पारदर्शकता व शासकीय यंत्रणेचे या कामाच्या प्रती उत्तरदायित्व अपेक्षित असते. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चा मूळ उद्देश देखील हाच आहे. कृषि विभागाच्या अधिका-यांकडून असे सांगण्यात आले की, अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्याकडे सहजरित्या उपलब्ध नव्हती ती त्यांना ब-याच परिश्रमाने हाताखालील क्षेत्रीय अधिका-यांकडून गोळा करुन घ्यावी लागली व त्यामुळे त्यांना विलंब झाला. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे स्वरुप पाहता अपिलार्थीने फक्त कामे किती झाली, कामांचा एकूण खर्च, झालेला खर्च, उदिष्ट व साध्य एवढीच माहिती विचारली आहे. ही प्राथमिक माहिती देखील जर कृषि विभागाच्या जिल्हा स्तरावरील अधिका-याकडे उपलब्ध नसेल तर त्यांच्या कार्यक्षेत्रातील कामाचे नियोजन व व्यवस्थापन ते कसे करतात हा एक संशोधनाचा विषय होऊ शकेल असे आयोगाचे मत आहे. कोणत्याही कामाच्या नियोजन व व्यवस्थापनाच्या दृष्टीने अपिलार्थीने मागितलेली माहिती ही अत्यंत महत्वाची असून कामाची पुर्तता विहित मुदतीत, विहित खर्चात व त्याच बरोबर ठरलेले भौतिक उदिष्ट साध्य करण्याच्या दृष्टीने यातील प्रत्येक मुद्दा व त्याचबरोबर इतर अनुल्लेखित मुद्दे देखिल कृषि खात्यातील अधिका-यांनी प्रत्येक टप्प्यावर विचारात घेऊन काम करणे गरजेचे आहे असे आयोगाचे मत आहे. आयुक्त (कृषि) याची नोंद घेऊन त्यांच्या माहिती व्यवस्थापन पध्दतीत सुधारणा करतील अशी आयोगास अपेक्षा आहे. जन माहिती अधिकारी यांच्या प्रमाणे त्यांना माहिती देण्यास त्यांचे जे इतर सहकारी / कर्मचारी जबाबदार आहेत त्यांना देखिल माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) अन्वये जन माहिती अधिकारी असे समजावे अशी तरतूद आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे इतर सर्व सहकारी ज्यांच्या मुळे अपिलार्थी विलंबाने माहिती मिळाली ते देखिल या प्रकरणी तितकेच जबाबदार ठरतात. जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती विहित मुदतीत न देण्याबाबत जी कारणे आयोगास स्पष्ट केली आहेत ती आयोगास मान्य नाहीत. अपिलार्थीस

आता जन माहिती अधिकारी यांनी नुकतीच माहिती दिली असल्याने या संदर्भात आयोगाचे काहीही आदेश नाहीत.

तेव्हा असे आदेशीत करण्यात येते की :

या प्रकरणातील जन माहिती अधिकारी आणि त्यांचे सहकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यास जो असमर्थनीय विलंब लावलेला आहे त्याप्रीत्यर्थ त्यांच्यावर आयुक्त (कृषि) यांनी प्रचलीत सेवा नियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी व आयोगास आपला अहवाल हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ महिन्याच्या आत सादर करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

**<u>निर्णय</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी आणि त्यांचे सहकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यास जो असमर्थनीय विलंब लावलेला आहे त्याप्रित्यर्थ त्यांच्यावर आयुक्त (कृषि) यांनी प्रचलीत सेवा नियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी व आयोगास आपला अहवाल हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ महिन्याच्या आत सादर करावा.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक १९-१०-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. भद्रे सुधीर राजाराम, मु. पो. चिंचोडी पाटील, तालुका जिल्हा अहमदनगर

२ कृषि उप संचालक, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय कृषि सह संचालक, कृषि-भवन, शिवाजीनगर, पुणे - ०५ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त, (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, सेंट्रल बिल्डींग, पुणे - ०१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/५९८
निर्णय दिनांक- १९-१०-२००७

१ श्रीमती. रत्नमाला सुरेश बोरसे : अपिलार्थी
आगरकर मळा, स्टेशनरोड, अहमदनगर.

विरुध्द

१ जनमाहिती अधिकारी तथा : प्रतिवादी

महासंचालक, आरोग्य सेवा विभाग, मुंबई.

२. जनअपिलीय अधिकारी तथा
महासंचालक, आरोग्य सेवा विभाग, पुणे.

## विवेंचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- १९-१०-२००७ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्रीमती. रत्नमाला सुरेश बोरसे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जनमाहिती अधिकारी तथा महासंचालक, आरोग्य सेवा विभाग, मुंबई (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), जनअपिलीय अधिकारी तथा महासंचालक, आरोग्य विभाग मध्यवर्ती इमारत, पुणे (यापुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे तिघेही गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- १६-०५-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक- १९९३ ते २००६ या कालावधीतील बोगस डॉक्टरवर काय कार्यवाही केली या बाबतची खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

‘‘ मी आपल्या कार्यालयास दिनांक- १२-०१-२००६ चे पत्र व सोबत त्यापत्रातील संदर्भीय पत्र क्रमाक १ ते ६ च्या झेरॉक्सप्रति सोबत दिनांक- १७-०४-२००६ रोजी दिलेले स्मरणपत्र.

तसेच १२-१-२००६ च्या पत्रातील संदर्भीय पत्र क्रं. ६ पोलीस पाटील अमराळे यांचे माहितीच्या अधिकारात दिलेले लेखी निवेदन की, वारंवार चौकशी होऊनही सदर डॉक्टरचा

दवाखाना आजपर्यंत राजरोजपणे चालू आहे. यावर आपण चौकशी करणारे संबंधीत अधिकारी व बोगस डॉक्टरवर काय कार्यवाही केली याचा सविस्तर अहवाल पाठवावा. ''

जनमाहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- १९-०६-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. अपिलार्थीने हे अपील महासंचालक, आरोग्य सेवा पुणे, यांच्याकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन या अपीलावर संबंधीतांनी सुनावणी घेतल्याचे दिसून येत नाही.

जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे अर्ज व अपील करुनही कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथीत होवून अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक-२२-०८-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून जनमाहिती अधिका-यावर शास्तीची कार्यवाही करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज युक्तीवादाच्या वेळी अपिलार्थी, जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी या तिघांपैकी कोणीही उपस्थित नाहीत. तथापि अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता आरोग्य विभागाने १९९३ ते २००६ या कालावधीमध्ये बोगस डॉक्टरांवर काय कार्यवाही केली. ही माहिती अपिलार्थीस हवी असल्याचे दिसून येते.

अपिलार्थीने मागितलेल्या माहितीमध्ये अपिलार्थीने जनमाहिती अधिकारी यांच्याकडून अहवालाची अपेक्षा केली आहे. अपिलार्थीने कोणत्याही विशीष्ट कागदपत्राची मागणी न करता जनमाहिती अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मागितला आहे. अपिलार्थीने ही

माहिती मागण्याकरिता जनमाहिती अधिकारी यांच्याकडे वेळोवेळी पाठपूरावा केल्याचेही दिसून येते.

या प्रकरणी अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली आहे किंवा कसे, किंवा ही माहिती पुरविण्यामध्ये काही टाळाटाळ केली आहे काय, हे कळण्यास त्यांच्या अनुपस्थितीमूळे काहीही कळण्यास मार्ग नाही. त्याचबरोबर अपिलार्थी देखील आज सुनावणीस गैरहजर आहेत. हे पाहता, अपिलार्थीस या प्रकरणी आता स्वारस्य राहीले नसल्याचे अनुमान काढण्यास हरकत नाही. त्यामूळे जनमाहिती अधिकारी यांच्या कृती बाबत कोणतेही आदेश देता येत नाहीत. तथापि या प्रकरणाशी संबंधित जे कोणी जनमाहिती अधिकारी असतील त्यांच्यावर सचिव (सार्वजनिक आरोग्य) मंत्रालय, मुंबई यांनी प्रशासकीय कार्यवाही करणे आयोगास गरजेचे वाटते. तेंव्हा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून संबंधीत जनमाहिती अधिकारी यांच्यावर आपल्या स्तरावर यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेंचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत विनामुल्य व साक्षांकित करुन पुरवावी.

**अहमदनगर** **( वि.बा.बोरगे )**

**दिनांक- १९-१०-२००७** **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

**प्रत**

१. श्रीमती.रत्नमाला सुरेश बोरसे, आगरकर मळा, स्टेशनरोड, अहमदनगर.

२. जनमाहिती अधिकारी तथा महासंचालक, आरोग्य सेवा विभाग, पी.डी.डिमेलो रोड, मुंबई, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जनअपिलीय अधिकारी तथा महासंचालक, आरोग्य विभाग, मध्यवर्ती इमारत, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव, (सार्वजनिक आरोग्य), मंत्रालय मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६. निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

**अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/५९९**

**निर्णय** **१९-१०-२००७**

**दिनांक**

१ श्री. शिवाजी विश्वनाथ कु-हे, : अपिलार्थी
मु. राघोहिवरे, पो. खांडगाव, तालुका पाथर्डी,
जिल्हा अहमदनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी :
तथा उप अभियंता, मुळ पाटबंधारे उपविभाग,
अमरापूर, तालुका शेवगाव, जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता, मुळा पाटबंधारे
विभाग, अहमदनगर

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : कार्यकारी अभियंता, मुळा पाटबंधारे विभाग
जन अपिलीय अधिकारी : अधीक्षक अभियंता व प्रशासक लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, सिंचन भवन, त्र्यंबक रोड, नाशिक

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-१०-२००७ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. शिवाजी विश्वनाथ कु-हे व जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता व प्रशासक लाभक्षेत्र विकास प्राधिकरण हे गैरहजर आहेत तर, जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, मुळा पाटबंधारे विभाग श्री. नंदलाल माधवराव तपासे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १२-०७-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील ०१ एप्रिल २००३ ते १२-०७-२००६ या कालावधीतील झालेल्या रोहयो व ठेकेदार कामाविषयी खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

या कालावधीतील झालेल्या रोहयो ठेकेदार कामाविषयी -- संक्षिप्त माहिती कामाचे नांव व पत्ता, कामाची रक्कम, खर्च केलेली रक्कम, मजूर दिवस वा ठेकेदार असल्यास संस्था मजूर सोसायटीचे नांव.

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीने सदर अर्ज उप अभियंता मुळा पाटबंधारे उपविभाग यांच्या नांवाने केला होता. अपिलार्थीचा सदर अर्ज संबंधितांना प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १४-०७-२००६ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस कार्यकारी अभियंता मुळा पाटबंधारे विभाग हे या प्रकरणी जन माहिती अधिकारी असल्याचे कळवून त्यांचे कार्यालयाशी संपर्क साधण्याचे या पत्राव्दारे सूचित केले. उप अभियंता यांची ही कृती सर्वस्वी चूक असून त्यांनी अपिलार्थीचा अर्ज संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठवून त्याची एक प्रत अपिलार्थीस देणे माहिती अधिकार अधिनियमातील तरतूद क्रमांक ६ (३) (i) प्रमाणे आवश्यक होते.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी किंवा त्यांच्या माहिती संबंधात कोणत्याही कार्यालयाकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार कार्यकारी अभियंता, मुळा पाटबंधारे विभाग यांच्याकडे दिनांक १४-०८-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती अधिकारी यांनी दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे म्हटले व जन माहिती अधिका-यास प्रतिदिन रुपये २५० प्रमाणे शास्ती लावण्यास कार्यकारी अभियंता यांना विनंती केली आहे.

या अपिलावर कार्यकारी अभियंता यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी न घेता अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २१-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये असे कळविले की, या प्रकरणी ते जन अपिलीय अधिकारी नसून अधीक्षक अभियंता व प्रशासक लाभक्षेत्र विकास प्राधिकरण नाशिक हे जन अपिलीय अधिकारी आहेत. अपिलार्थीने केलेला अर्ज चुकिच्या प्राधिकरणाकडे केलेला असल्यामुळे निकालात काढून अपिलार्थीस फेरअर्ज करण्याचे सूचित

केले व सुधारीत अर्ज त्यांच्या कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर त्यांना माहिती देता येईल असे अपिलार्थीस आश्वासित केले.

जन अपिलीय अधिकारी यांनी या अपिलासंदर्भात केलेली कारवाई चुकिची असून हा अपील अर्ज तपासून प्रत्यक्षतः ते स्वतः जन माहिती अधिकारी असल्याने त्यांच्याच पातळीवर ही माहिती त्यांनी अपिलार्थीस पाठविणे अपेक्षित होते जेणेकरुन अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती मिळणे सुलभ होऊ शकले असते.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०९-२००६ रोजी व्दितीय अपील केले.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत तथापि त्यांनी आयोगा कडे केलेल्या व्दितीय अपिलामधील विनंती प्रमाणे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी व कार्यकारी अभियंता या दोन्ही प्राधिकरणाकडून आवश्यक असलेली माहिती मिळालेली नाही. त्याचप्रमाणे अपिलार्थीने कार्यकारी अभियंता यांच्याकडे केलेली विनंतीही त्यांनी मान्य केली नसल्यामुळे व्यथित होऊन त्यांनी व्दितीय अपील केल्याचे म्हटले आहे. अपिलार्थीने या व्दितीय अपिलामध्ये महाराष्ट्र माहिती अधिकाराचा संदर्भ दिला आहे व आपली मूळ माहितीची मागणी त्यांनी या अपिलामध्ये कायम ठेवल्याचे दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मूळात अर्ज व अपील चुकिच्या प्राधिकरणाकडे केले होते. त्यांच्या कार्यालयामध्ये माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी कोण हे दर्शविणारे फलक देखील व्यवस्थितरित्या लावलेले आहेत. अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्याकडे तयार असून ते अपिलार्थीस ती माहिती ८ दिवसात विनामूल्य देण्यास तयार आहेत. अपिलार्थीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त

झाला त्यावेळी माहिती अधिकार कायद्याची अंमलबजावणी नुकतीच सुरु झाली असल्याने त्यांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीविषयी फारसे ज्ञान नव्हते त्यामुळे त्यांच्या कडून चुकिची कारवाई अजानतेपणे झालेली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन व जलसंपदा विभागाच्या अधिका-यांनी आयोगासमोर केलेल्या युक्तिवादावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने केवळ चुकिच्या प्राधिकरणाकडे अर्ज व अपील केल्यामुळे अपिलार्थीस संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली नाही. त्याचबरोबर अपिलार्थीस माहिती अधिकारी कोण आहे यासंबंधी सहाय्यक अभियंता यांनी दिनांक १४-०७-२००६ रोजी म्हणजे मुळ अर्ज केल्यापासून २ दिवसानंतर लगेचच कळविले होते. सदर पत्र प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीने सहाय्यक अभियंता यांनी पत्रात सुचविल्याप्रमाणे जर कारवाई केली असती तर अपिलार्थीस ही माहिती मिळू शकली असती. त्याचबरोबर सहाय्यक अभियंता मुळा पाटबंधारे उप विभाग अमरापूर यांनी अपिलार्थीचा हा अर्ज कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयाकडे पाठविला असता तर अपिलार्थीस माहिती वेळेत मिळण्याची जास्त शक्यता होती.अपिलार्थीस ही माहिती न मिळण्यामध्ये संबंधीत सहाय्यक अभियंता मुळा पाटबंधारे उप विभाग अमरापूर तालुका शेवगाव हे मुख्यत्वे जबाबदार असल्याचे दिसून येते. त्याचबरोबर कार्यकारी अभियंता मुळा पाटबंधारे विभाग अहमदनगर यांनी देखील आपले कर्तव्य योग्यरित्या पार पाडल्याचे दिसून येत नाही. त्यांच्याकडे अपिलार्थीचा अपील अर्ज प्राप्त झाल्यानंतर तो त्यांनी तपासून त्यांच्या अधिपत्याखाली काम करणा-या त्यांच्या कार्यालयातून माहिती मागवून त्यावर कारवाई करणे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीप्रमाणे अभिप्रेत आहे. जलसंपदा विभागाच्या क्षेत्रीय अधिका-यांनीही अपिलार्थीस माहिती देण्याकरिता कोणतीही स्वतःहून सकारात्मक कृती केल्याचे किंवा अपिलार्थीस माहिती कशी प्राप्त होईल याबद्दल कारवाई केल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

उपरोक्त विवेचनाच्या पार्श्वभूमीवर असे आदेशीत करण्यात येते की :

कार्यकारी अभियंता मुळ पाटबंधारे विभाग यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत विनामूल्य द्यावी. त्याचबरोबर त्यांनी आपल्या कार्यशैलीमध्ये दर्शविलेल्या कर्तव्य परायणतेच्या अभावाबाबत त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून त्यांनी येथून पुढे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार त्यांच्याकडे प्राप्त होणा-या सर्व अर्जांचा व अपिलांचा निपटारा करावा असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

**निर्णय**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक १९-१०-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शिवाजी विश्वनाथ कु-हे, मु. राघोहिवरे, पो. खांडगाव, तालुका पाथर्डी,

जिल्हा अहमदनगर

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, मुळा पाटबंधारे विभाग, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता व प्रशासक लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, सिंचन भवन, त्र्यंबक रोड, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमाक २००७/रामाआ/अपील/सिआर/६००

निर्णय दिनांक- १९-१०-२००७.

१ श्री.मधुकर रामभाऊ कोरडे, : अपिलार्थी
रा.मिरजगाव (कोरडेवस्ती)
तालूका- कर्जत, जिल्हा-अहमदनगर.

विरुध्द

१ जनमाहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तालूका कृषी अधिकारी कर्जत, जि.अहमदनगर
२. जनअपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय कृषी अधिकारी, कर्जत,
जि.अहमदनगर.

## विवेंचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनाक- १९-१०-२००७ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. मधुकर रामभाऊ कोरडे ( यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल),जनमाहिती अधिकारी तथा तालूका कृषी अधिकारी, कर्जत, श्री. बाबूशा पंढरीनाथ नेटके (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषी अधिकारी, कर्जत, श्री.भाऊसाहेब सावळेराम ब-हाटे (यापुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- २६-०५-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे मंडळ कृषी कार्यालय, मिरजगाव गटातील भूमरी आणि नागमठाण या गावामध्ये २००३ -२००४ व २००४-२००५ या कालावधीतील कामांची माहिती खालीलप्रमाणे मागविली होती.

''एकूण नाले मजूरांची मस्टरची यादी, धान्य वाटप किती, शिल्लक किती''

अपिलार्थीने ही माहिती व्यक्तीशः मागितली होती.

जनमाहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या कालावधीमध्ये कोणतीही माहिती त्यांच्याकडून देण्यात आली नाही. तथापि तदनंतर अपिलार्थीस मंडळ कृषी अधिकारी, मिरजगाव यांच्याकडून त्यांनी मागितलेली माहिती देण्यापोटी रुपये १०,०००/- इतके शुल्क त्यांनी त्यांच्या कार्यालयात भरणा करण्याविषयी त्यांच्याकडील दिनांक- ०४-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये सूचित केले गेले.

अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती देण्यापोटी लागणारे शुल्क जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा अर्ज प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाच्या आत कळवावयास हवे होते. परंतू उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस शुल्क भरण्याविषयी विहित मुदतीपेक्षा उशिराने सूचित केले व जे सूचित केले गेले त्यामध्ये अधिनियमातील तरतूदीचे पालन देखील न केल्याचे दिसून येते. कारण या पत्रामध्ये अपिलार्थीस माहिती अपेक्षीत असलेल्या पृष्ठांची संख्या व प्रतिपृष्ठ दर त्यांनी अपिलार्थीस कळविलेला नाही. जनमाहिती अधिकारी यांचेकडून विहित मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील १९ (१) अन्वये जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- १७-०७-२००६ रोजी प्रथम अपील केले होते. सदर अपीलअर्जावर जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारे सुनावणी झाल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जनअपिलीय अधिकारी यांच्या मते अपिलार्थीकडून सदर अपीलअर्जावर फक्त १०/- रुपयाचे मुद्रांक डकविण्यात आले होते व अपिलार्थीस नेमक्या कोणत्या योजनेची माहिती अभिप्रेत आहे, याचा बोध त्यांच्या अपीलअर्जामध्ये होत नव्हता त्यामूळे त्यांनी अपिलार्थीचा सदर अपील अर्ज या उणिवाची पुर्तता करण्याकरिता त्यांना परत केला. सदर अपील अर्जात

उणीव असल्यामूळे त्यांना पुढील सुनावणी घेणे शक्य झाले नाही, असे त्यांनी आयोगासमोर सुनावणीच्या वेळी दिलेल्या निवेदनामध्ये म्हटले आहे.

अपिलार्थीने केलेल्या अपील अर्जामध्ये जरी उणीव असली तरी जनअपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी सुनावणी घेणे भाग होते व या सुनावणीमध्ये त्यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जातील उणीव लक्षात घेवून नंतर निर्णय घेणे त्यांना शक्य होते. तथापि त्यांनी तशी कृती केल्याचे दिसून येत नाही. येथून पुढे त्यांनी आपल्या कामकाजातील अशा प्रकारच्या त्रूटी टाळाव्यात. जनअपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारचा निर्णय न दिल्यामूळे व्यथीत होवून अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतुदीनूसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- २२-०९-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे.

अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, मिरजगाव गटातील भुमरी व नागमठाण या गावामध्ये कृषी विभागातर्फे नालाबंडींगची कामे चालू असून त्या कामामध्ये भ्रष्टाचार झाला आहे. त्याचबरोबर या कामांच्या मजूरीप्रित्यर्थ मजूरांना देण्यात आलेल्या धान्य वाटपामध्येही अशाच प्रकारचा भ्रष्टाचार झाला आहे. नालाबंडीगची कामे कृषी विभागातर्फे नियमीत मजूर कामावर ठेवून करुन घेण्यात येतात. मजूरांच्या या हजेरीपटामध्ये मजूर कामावर हजर नसतांना त्यांची नांवे खोटी हजेरी दाखविली जाते व त्रयस्त व्यक्तीची ज्यांचा या कामाशी संबंध नसतो, त्यांची सही अथवा अंगठा घेतला जातो व अशा प्रकारे कृषी विभागात चाललेला भ्रष्टाचार त्यांना उघडकीस आणवयाचा असल्यामूळे त्यांनी ही माहिती कृषी अधिका-याकडे मागितली होती. तथापि त्यांनी ती अपिलार्थीस विहित मुदतीत दिली नाही व ती देण्यास टाळाटाळ केली व ती घेण्याकरीता ज्या ज्यावेळी कृषी अधिकारी यांच्या कार्यालयात

गेलो त्या त्यावेळी त्यांना अपमानीत होवून परत यावे लागले. त्यांनी माहिती अधिकाराखाली अर्ज केला असल्यामूळे त्यांच्यावर हा अर्ज मागे घेण्यासाठी दडपण टाकण्यात येवून त्यांच्यावर काही लोकांनी शारिरीक हल्ला देखील केला होता व त्यांनी या प्रकरणी न्यायालयात फिर्याद मागील आठवडयात दाखल केली आहे. अपिलार्थीस नक्की कोणत्या दिवशी फिर्याद दाखल केली हे विचारले असता, सदर तारीख त्यांना सांगता आली नाही.

जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तीवाद केला की, त्यांनी त्यांच्या पदाचा दिनांक १९-०६-२००७ रोजी अतिरीक्त कार्यभार स्वीकृत केला आहे. त्यांच्या कार्यालयात, कार्यालयातील या प्रकरणातील संबंधीत नस्तीचे अवलोकन केले असता, त्यांनी अपिलार्थीस ही माहिती वेळेत का मिळू शकली नाही या विषयी काही कारणे आढळली नाहीत. तथापि त्यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांच्याकडील दिनांक- ०५-०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये दिली आहे. तथापि अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना ही माहिती अपेक्षित नसून त्यांनी त्यांच्या मूळ अपील अर्जामध्ये म्हटल्या प्रमाणे मजूरांच्या सहयासहित ही माहिती त्यांना अपेक्षित होती. अपिलार्थीचा हा मुद्दा आयोग मान्य करीत नाही. कारण अपिलार्थीने जनमाहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागणी केलेल्या माहितीमध्ये कोठेही मजूराच्या सहयासहित असा उल्लेख नाही. मात्र त्यांनी तो उल्लेख जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपीलामध्ये केलेला आहे. अपिलार्थीस जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे जे अपील करावयाचे आहे ते अपिलार्थीच्या मूळ अर्जावरच करावयास हवे, अपिलार्थीस अपिलामध्ये वेगळी किंवा जादा माहिती मागता येणार नाही. अपिलार्थीस हव्या असलेल्या माहितीचे स्वरुप त्यांना अपील अर्जामध्ये बदलण्याची तरतूद अथवा अधिकार या अधिनियमामध्ये नाही त्यामूळे अपिलार्थीस जर उपरोक्त कामा संबंधात मस्टरच्या प्रती हव्या असतील तर त्यांनी त्यासाठी वेगळा अर्ज करावयास हवा.

अपिलार्थीच्या सुधारीत माहितीच्या मागणीची वरीलप्रमाणे जनमाहिती अधिका-यास पुर्तता करता येणे शक्य नाही. एवढे जरी असले तरी अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे ज्या माहितीची मागणी केली आहे ही माहिती देखील जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मदतीपेक्षा ६ महिने १० दिवस इतक्या उशिराने दिली आहे. ही माहिती देण्यासाठी लागलेल्या विलंबाचे जनमाहिती अधिकारी यांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुरेशी संधी दिल्यानंतरही, समर्थन करता आले नाही त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या लिखीत म्हणण्यामध्ये तालूका कृषी अधिकारी कर्जत यांच्या कार्यालयातील बहूसंख्य पदे रीक्त असून उपलब्ध कर्मचा-याकडून सद्य परिस्थितीत कामे करुन घेतली जातात, असे म्हटले आहे. थोडक्यात कर्मचारी उपलब्ध नसल्याने अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती त्यांना विहित मुदतीत देता आली नाही. असे त्यांचे म्हणणे असल्याचे दिसून येते.

जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या माहितीचे स्वरुप पाहता त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लावलेला विलंब खचितच समर्थनीय नाही, असे आयोगाचे मत आहे. जनमाहिती अधिकारी यांच्या मते त्यांना ही माहिती त्यांच्या सहायकाकडून मागवून घेवून नंतर ती एकत्र करुन द्यावी लागते. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) अन्वये माहिती अधिका-यास, माहिती देण्याकरिता जे इतर कर्मचारी / सहायक जबाबदार आहेत त्यांना देखील माहिती अधिकारी म्हणून समजण्यात यावे, अशी तरतूद आहे. या प्रकरणी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती देण्यापोटी जनमाहिती अधिकारी व त्यांचे सहायक हे अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती देवू शकले नाहीत व अतिमतः त्यांनी अपिलार्थीस माााहिती देण्याकरिता ६ महिने १० दिवस इतका असमर्थनीय विलंब केल्याचे दिसून येत आहे.

अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देवून त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व माहिती अधिकार अधिनियमा विषयी बेपर्वाइ त्यांच्या वरील कृतीतून

त्यांनी दर्शविली आहे. अर्जदाराने माहिती मागणे हा अर्जदाराचा हक्क आहे व ती माहिती विहित मुदतीत देणे हे माहिती अधिका-याचे कर्तव्य आहे, हे पाहता जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लावलेला विलंब निश्चीतपणे समर्थनीय नाही असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीच्या माहितीच्या अर्जास त्यांनी मूळात प्रथम प्रतिसाद दिला तो देखील दिनांक ०४-०७-०७ रोजी, म्हणजेच अपिलार्थीच्या अर्जावर सुमारे ५ आठवडे त्यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही त्यांच्या या कृतीने त्यांच्या मनातील या कायद्याविषयी असलेला अनादर अधिकच स्पष्ट होतो.

सबब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतूदी प्रमाणे कार्यवाही करण्यास जनमाहिती अधिकारी व त्यांचे इतर सहायक निश्चीतपणे पात्र आहेत, अशी आयोगाची खात्री झाली आहे. त्यामूळे अपिलार्थीस माहिती देण्यापोटी त्यांनी लावलेल्या या असमर्थनीय विलंबापोटी जनमाहिती अधिकारी व त्यांना माहिती देण्याकरिता जे इतर जबाबदार सहायक आहेत त्या सर्वावर प्रतिदिनी रुपये २५०/- या प्रमाणे एक्रूण रुपये २५०००/- इतकी शास्ती लावण्याचे आदेशित करण्यात येत आहे. जनमाहिती अधिकारी व त्यांचे सहायक यांच्यामध्ये या शास्तीची विभागणी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी अहमदनगर यांनी यथा योग्य रित्या हे आदेश त्यांना प्राप्त होताच सात दिवसाचे आत करुन आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा. त्यांनी सदर शास्तीची रक्कम हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत पुढील शिर्षाखाली जिल्हाकोषागारात जमा करावी.**"००७० इतर प्रशासनिक सेवा, ६० इतर सेवा, ८०० इतर जमा रक्कम, १८ माहितीचा अधिकार ००७०-००६-१"** व तसे केल्याचा अनुपालन अहवाल जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, अहमदनगर यांनी हे आदेश निर्गमित झाल्यापासून ४५ दिवसाचे आत आयोगास सादर करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपीलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## **निर्णय**

३. अपीलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

४. जनमाहिती अधिकारी व त्यांना या प्रकरणी सहाय करणारे इतर कर्मचारी / अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील माहिती त्यांना देण्यापोटी लावलेल्या असमर्थनीय विलंबाबाबत त्यांच्यावर प्रतिदिनी रुपये २५०/- प्रमाणे एकूण २५,०००/- रुपये (पंचवीस हजार रुपये )इतकी शास्ती लावण्यात येत आहे. त्यांनी निकालपत्रामध्ये नमूद केलेल्या शिर्षाखाली शास्तीची रक्कम हे आदेश निर्गमीत झालापासून ३० दिवसाच्या आत जिल्हाकोषागारात जमा करावी.

५. वरील आदेश क्रमांक- २ च्या अनुपालनाचा अहवाल जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी अहमदनगर यांनी हे आदेश निर्गमित झाल्यापासून ४५ दिवसाच्या आत आयोगास सादर करावा.

अहमदनगर
दिनांक- १९-१०-२००७

( वि.बा.बोरगे)
राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद.

प्रत,

११. श्री.मधुकर रामभाऊ कोरडे, राहणार-मिरजगाव (कोरडेवस्ती) ता.कर्जत, जि.अहमदनगर.

१२. जनमाहिती अधिकारी तथा तालूका कृषी अधिकारी, कर्जत जि.अहमदनगर, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१३. जनअपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषी अधिकारी, कर्जत,जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१४. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, जुने पंपीग स्टेशन जवळ, महालक्ष्मी गार्डनच्या मागे सावेडी, अहमदनगर, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१५. सचिव, मुख्य माहिती आयुक्त कर्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

१६. निर्णयनस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/६०१
निर्णय दिनांक- १९-१०-२००७

१ श्री.सुधीर मारुती जोर्वेकर, जुनी गिरमेचाळ, : अपिलार्थी
मु.पो.ता.कोपरगाव, जिल्हा-अहमदनगर

विरुध्द

१ जनमाहिती अधिकारी तथा प्राध्यापक अकोले तालुका एज्युकेशन सोसायटी संचलित कला व वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय अकोले जि.अहमदनगर. : प्रतिवादी

२. जनअपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, अकोले एज्युकेशन सोसायटी संचलित कला व वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय अकोले जि.अहमदनगर.

## विवेंचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- १९-१०-२००७ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. सुधीर मारुती जोर्वेकर (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जनमाहिती अधिकारी तथा प्रा. आनंदराव दत्तू पाटील (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी तथा प्राचार्य रमेशचंद्र धोंडीबा खांडगे (यापुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- ०६-०५-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे प्रा.चंद्रकांत मारुती जोर्वेकर यांनी संस्थेत केलेल्या कामाविषयी व त्यांच्या मानधना विषयी २००२-२००३ व २००३-२००४, २००४-२००५ या शैक्षणिक वर्षातील माहिती खालील प्रमाणे मागितली होती.

‘‘ वरील दिलेल्या कालावधीत प्रा.श्री.चंद्रकांत मारुती जोर्वेकर यांची आपल्या संस्थेने रसायनशास्त्र विषय शिकवण्यासाठी नियुक्ती केलेली होती, परंतु शासनाच्या नियमा प्रमाणे त्यांना आपल्या संस्थेने मानधन दिले काय ? दिले असल्यास किती मानधन दिले ? आज

अखेर त्यांची आपल्या संस्थेकडे किती मानधनाची बाकी आहे ? ती आपण त्यांना केव्हा देणार आहात त्यांची आपल्या संस्थेत किती दिवस सेवा झाली (मस्टरच्या आधारे) या विषयी संपूर्ण तारखेवार मुद्देसूद माहिती आवश्यक आहे. ''

अपिलार्थीने सदर माहिती टपालाने अपेक्षिली होती.

अपिलाथीच्या या अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडून विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनूसार जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- २२-०६-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपीलअर्जावर कोणतीही सुनावणी न घेता अपिलार्थीस दिनांक- ०६-०७-२००६ रोजीच्या त्यांच्याकडील पत्रान्वये अपिलार्थीस कोणतेही मानधन देय नाही, त्यामूळे पुढील प्रश्न उद्‌भवत नाही, असे कळविले. या उत्तरामध्ये त्यांनी त्यांच्याकडील दिनांक- ०७-१२-२००५ रोजीच्या पत्राचा संदर्भ दिला आहे. अपिलार्थीस महाविद्यालयाच्या प्राचार्यानी दिलेले दिनांक- ०७-१२-२००५ रोजीचे पत्र पाहता श्री.चंद्रकांत मारुती जोर्वेकर हे अधिकृतरित्या कोणत्याही पदावर काम करीत नव्हते, असे म्हटले आहे.

जनअपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथीत होवून अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक- २२-०८-२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये अपिलार्थीने जनमाहिती अधिका-याने, पहिले अपील केल्यानंतर त्यांना खोटी व दिशाभूल करणारी अपूर्ण माहिती दिली, असे म्हटले आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद मांडण्यात आला की, जनमाहिती अधिकारी यांच्यातर्फे त्यांना खोटी व दिशाभूल करणारी माहिती देण्यात आली

असून त्यांच्या या कॉलेजमध्ये अपिलार्थीची दिनांक- २३-०८-२००२ ते ०३-०५-२००३ व दिनांक- ०१-०७-२००३ ते ३०-०४-२००४ या कालावधीत सहशिक्षक म्हणून नेमणूक झाली होती. असे असतांना देखील जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक- ०७-१२-२००५ रोजीच्या पत्रामध्ये अपिलार्थी हे अधिकृतरित्या कोणत्याही पदावर काम करीत नव्हते, अशी खोटी माहिती दिली आहे. याचबरोबर जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना शिक्षणसेवक किंवा सहशिक्षक पदाची कोणतीही ऑर्डर संस्थेने दिली नाही, असे म्हटले आहे. अपिलार्थीकडे त्यांच्या नेमणूकीचे आदेश उपलब्ध असतांना जनमाहिती अधिकारी यांनी या प्रमाणे विधान करणे म्हणजेच त्यांना जाणुनबुजून असत्य माहिती देणे, असे अपिलार्थीच्या युक्तीवादात अपिलार्थीने पुढे म्हटले आहे.

जनमाहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद मांडण्यात आला की, अपिलार्थीस त्यांच्या संस्थेने दिलेले वरील दोन नियुक्ती आदेश खरे आहेत. अपिलार्थीस त्यांच्या संस्थेमध्ये सहशिक्षक म्हणून नेमणूक देण्याकरिता त्यांनी त्याप्रमाणे प्रस्ताव शिक्षण संचालक, पुणे यांच्याकडे पाठविला होता. तथापि त्यांनी तो प्रस्ताव नामंजूर करुन पाठविल्यामूळे त्यांना अपिलार्थीस आजतागायत वेतन देता आले नाही.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे गा-हाणे मिटविणे हा माहिती अधिकार कायदयाचा मुलतः उद्देश नसून जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सत्य माहिती विहित मुदतीत देणे हे अभिप्रेत आहे. अपिलार्थीने त्यांचे गा-हाणे मांडण्यासाठी योग्य त्या शैक्षणिक प्राधिकरणाकडे दाद मागावी, असेही त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील प्रकरणी जरी संस्थेने त्यांच्या नेमणूकीच्या पदावरील पगार दिला नसला तरी त्यांनी अपिलार्थीस दोन वेळा नियुक्ती पत्रे दिली आहेत, ही वस्तुस्थिती आहे. असे असतांना

देखील अपिलार्थीस त्यांनी मागितलेल्या माहिती संदर्भात त्यांची मुलतः नेमणूक झाली नव्हती, असे संस्थेचे म्हणणे म्हणजे संस्थने अपिलार्थीस असत्य माहिती पुरविली हे सिध्द होत आहे. या प्रकरणी संस्थेने अपिलार्थीस मुलतः विहित मुदतीत माहिती तर दिली नाहीच परंतू जी माहिती दिनांक- ०६-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये दिली, ती देखील असत्य दिल्याचे व पर्यायाने माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग केल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. या पार्श्वभूमीवर असे आदेशीत करण्यात येते की, संबंधीत जनमाहिती अधिकारी यांनी वरीलप्रमाणे अधिनियमाच्या तरतुदीचा भंग केल्याचे संदर्भात त्यांच्यावर संस्थेच्या सचिवांनी यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करुन आपला अहवाल आयोगाकडे हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ महिन्याच्या आत पाठवावा व अपिलार्थीस त्यांना मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली सत्य माहिती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत साक्षांकित करुन विनामूल्य पुरवावी.

वरील विवेंचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

३. अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

४. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाचे आत अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली सत्य माहिती त्यांना सांक्षाकीत करुन व विनामूल्य द्यावी.

५. संबंधीत जनमाहिती अधिकारी यांच्यावर संस्थेच्या सचिवांनी त्यांनी माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम ७ (१) चा भंग केल्या संदर्भात यथायोग्य

प्रशासकीय कार्यवाही करुन आपला अहवाल आयोगाकडे हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ महिन्याच्यात आत पाठवावा.

**अहमदनगर** **( वि.बा.बोरगे )**

**दिनांक- १९-१०-२००७** **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

**प्रत**

१. श्री.सुधीर मारुती जोर्वेकर, जुनी गिरमेचाळ, मु.पो.ता.कोपरगाव, जिल्हा-अहमदनगर पिन ४२३६०१.

२. जनमाहिती अधिकारी तथा, प्राध्यापक अकोले तालुका एज्युकेशन सोसायटी संचलित कला व वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय अकोले जि.अहमदनगर, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जनअपिलीय अधिकारी तथा, प्राचार्य,अकोले तालुका एज्युकेशन सोसायटी संचलित कला व वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय अकोले जि.अहमदनगर, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव, अकोले तालुका एज्युकेशन सोसायटी संचलित कला व वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय अकोले, जिल्हा- अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. शिक्षण संचालक, (माध्यमिक) शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग, ससून हॉस्पिटल जवळ, पुणे-०१, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत

मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

७. निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

**अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/६०३**

**निर्णय दिनांक** २०-१०-२००७

| | | |
|---|---|---|
| १ श्री. शेख अनिस बुढन,<br>रा. नेवासा रोड, सागर फोटो, श्रीरामपूर,<br>जिल्हा अहमदनगर | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा सह जिल्हा निबंधक, वर्ग-२, नोंदणी<br>उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, नाशिक<br>विभाग, नाशिक | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक | : | प्रतिवादी |

उपनियंत्रक, नाशिक विभाग, नाशिक

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-१०-२००७ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. शेख अनिस बुढन हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक यांचे प्रतिनिधी वरिष्ठ लिपीक श्री. संजय दिनकर गांगुर्डे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक श्री. भिमाजी नारायण गोसावी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०४-०४-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

११. “ नोंदणी उप महानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक नाशिक विभाग नाशिक यांचा अहवाल क्रमांक तक्रार/चौकशी/श्रीरामपूर/०३/१५८०, दिनांक ०५-०८-२००३ इत्यादी..”

अपिलार्थीने ही माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

माहिती अधिकार अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीच्या वरील अर्जासंदर्भात कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०६-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिला मध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. त्याचबरोबर जन माहिती

अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याची जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केली आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात दिनांक २५-०७-२००६ रोजी त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी बोलाविले. तथापि अपिलार्थी या सुनावणीच्या वेळी हजर राहिले नाहीत. तथापि तदनंतर त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांना दिनांक २७-०७-२००६ रोजी पत्र देऊन सदर अपील लवकरात लवकर निकाली काढण्याची लेखी विनंती केल्याचे उपरोक्त कागदपत्रावरुन दिसून येते.

अपिलार्थी सुनावणीस निश्चित केलेल्या दिवशी व वेळी उपस्थित न झाल्याने अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नाही असे जन अपिलीय अधिकारी यांनी सांगितले.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०७-२००६ रोजी व्दितीय अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी, मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्या अनुपस्थितीची नोंद घेण्यात आली आहे. तथापि त्यांनी व्दितीय अपिलामध्ये उपस्थित केलेले मुद्दे हाच त्यांचा युक्तिवाद आहे असे समजून सुनावणी घेण्यात येत आहे.

या प्रकरणाची पार्श्वभूमी नोंदणी उप महानिरीक्षक यांच्याकडून समजून घेतली असता त्यांनी असे सांगितले की, अपिलार्थी हे श्रीरामपूर येथील दस्तलेखक श्री. ढोकणे यांच्याविरुध्द २००२ पासून तक्रार करीत आहेत. श्री. ढोकणे यांच्याविरुध्द अपिलार्थी यांनी नोंदणी

महानिरीक्षक व शासनाकडे वेळोवेळी तक्रार अर्ज केले आहेत. या तक्रार अर्जामध्ये श्री. ढोकणे यांचा परवाना रद्द करण्याबाबत त्यांनी संबंधीतांना विनंती केली होती. या तक्रार अर्जामध्ये त्यांनी श्री. मगर दुय्यम निबंधक श्रीरामपूर यांच्याविरुध्दही उच्च पदस्थांच्याकडे तक्रारी केल्या होत्या. दस्तलेखक हे शासकीय कर्मचारी नसून त्यांना दस्तऐवज लिहिण्याचा परवाना संबंधीत जिल्ह्याच्या जिल्हाधिका-यामार्फत दिला जातो. या परवान्याचे नुतनीकरण संबंधीत जिल्ह्याचे मुद्रांक जिल्हाधिकारी – जे जिल्हाधिका-याच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखाली असतात – ते किंवा जिल्हाधिकारी हे करत असतात. या प्रकरणी आता दिनांक ०९-११-२००६ रोजी अंतीम कारवाई होऊन श्री. ढोकणे यांचा परवाना जिल्हाधिकारी अहमदनगर यांच्याकडून रद्द करण्यात आला असून श्री. मगर यांचेवर देखील शिस्तभंगाची कार्यवाही होऊन त्यांना, नोंदणी महानिरीक्षक यांच्याकडून समज देण्यात आली आहे व अशा त-हेने अपिलार्थीस अपेक्षित कारवाई पूर्ण झालेली आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थी जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक २५-०७-२००६ रोजी उपस्थित न राहता दिनांक २७-०७-२००६ रोजी त्यांच्या कार्यालयात उपस्थित झाले. ते सदर कार्यालयात उपस्थित झाल्यानंतर, त्यांनी अर्ज केलेल्या प्रकरणातील संपूर्ण नस्ती जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयातील कर्मचा-यांनी त्यांना दाखवून त्यांना आवश्यक असलेल्या कागदपत्राच्या झेरॉक्स करुन घेण्याबाबत विनंती केली. तथापि अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीच्या सुचनांचे पालन न करता हे प्रकरण शक्य तितक्या लवकर निकाली काढावे असे पत्र देऊन कार्यालयातून निघून गेले. अपिलार्थीने केलेल्या मूळ तक्रारीचा निपटारा जन माहिती अधिकारी कार्यालय व जन अपिलीय अधिकारी कार्यालय कोणीही करु शकत नव्हते कारण मुळात दस्तऐवज लिहिण्याचा परवाना देण्याचे

अधिकार हे संबंधीत जिल्हाधिका-यांना आहेत तसेच सदर परवाना रद्द करण्याचे अधिकार देखील जिल्हाधिकारी यांनाच आहेत.

आता जरी अपिलार्थीने केलेल्या मागणीचा अंतीम निकाल झाला असला तरी अपिलार्थीने दिनांक ०४-०४-२००६ रोजी अर्ज केला असता त्यावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०३-०५-२००६ रोजी अगर तत्पुर्वी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदी प्रमाणे कारवाई करणे अपेक्षित असतांना ती कारवाई का होऊ शकली नाही हा खरा प्रश्न आहे. या प्रश्नाचे उत्तर सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडे नव्हते. संबंधीत जन माहिती अधिकारी यांची या काळात धुळे येथे बदली झाली असल्यामुळे अपिलार्थीस ही माहिती देता आली नाही असे जन माहिती अधिकारी यांच्या उपस्थित प्रतिनिधीने सांगितले.

अपिलार्थीने ज्या अहवालाची जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केली होती तो अहवाल जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-०४-२००६ रोजी उपलब्ध होता. सदर माहिती उपलब्ध असूनही जन माहिती अधिका-याकडून अपिलार्थीस ती विहित मुदतीत दिली नाही. ती न देण्याची कारणे स्पष्ट करतांना त्यांनी अपिलार्थीस दिनांक २७-०७-२००६ रोजी जी नस्ती पाहण्यासाठी उपलब्ध करुन दिली त्या नस्तीमध्ये संबंधीत दिनांक ०५-०८-२००३ चा अहवाल -- ज्याची मागणी अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे केली होती तो -- उपलब्ध होता तथापि अपिलार्थीने त्याची झेरॉक्स प्रत काढून घेतली नाही असे आयोगासमोर सांगितले. अपिलार्थी हे विविध शासकीय कार्यालयात नेहमीच खोटे तक्रार अर्ज करुन अधिकारी व कर्मचारी यांना त्रास देत असतात. मुद्रांक जिल्हाधिकारी अहमदनगर यांनी जिल्हाधिकारी व नोंदणी महानिरीक्षक यांच्याकडे देखील अपिलार्थीच्या या प्रकारच्या वर्तणूकी संदर्भात वेळोवेळी अहवाल सादर केला आहे व कोतवाली पोलीस ठाणे येथे दिनांक ०३-०१-२००३ रोजी भा. द. वि. ३५३ नुसार गुन्हा देखील नोंदविला आहे असेही त्यांनी आयोगापुढे स्पष्ट केले.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन तसेच उपरोक्त युक्तिवादा-वरुन अपिलार्थीस हवी असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी नियमाप्रमाणे विहित केलेल्या मुदतीत दिली नाही हे निःसंशयपणे सिध्द होत आहे. ही माहिती अपिलार्थीस विहित मुदतीत न देण्याची कारणे वर उध्द्त केली आहेत. तथापि अपिलार्थीने माहिती टपालाव्दारे अपेक्षिली असतांना त्यांना मुदत टळून गेल्यानंतर सबंधीत नस्ती दाखवून त्यातील हव्या त्या कागदपत्रांच्या झेरॉक्स करुन घेण्यास सांगणे ही जन माहिती अधिका-याची कृती सर्वस्वी चुकिची व माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी विसंगत अशी आहे. जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) चा या प्रकरणी वर विवेचन केल्याप्रमाणे निःसंशय भंग केल्याचे सिध्द होत आहे.

त्यामुळे असे आदेशीत करण्यात येते की :

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी व जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम ७ (१) चा भंग करुन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केली असल्याने त्यांच्यावर सचिव (महसूल) यांनी प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करुन आपला अहवाल आयोगास हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४ महिन्याच्या आत पाठवावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## <u>निर्णय</u>

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांच्यावर, त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) चा भंग करुन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केल्याने सचिव (महसूल) यांनी प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करुन आपला अहवाल आयोगास हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४ महिन्याच्या आत पाठवावा.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक २०-१०-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शेख अनिस बुढन, रा. नेवासा रोड, सागर फोटो, श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर

२ जन माहिती अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक, वर्ग-२, नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, नाशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, नाशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, (महसूल) मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/६०४
निर्णय दिनांक- २०-१०-२००७

१ श्री.चंगडे शशिकांत प्रेमराज : अपिलार्थी
३४६३, खिस्त गल्ली, अहमदनगर-४१४००१

विरुध्द

१ जनमाहिती अधिकारी : प्रतिवादी
सहकार आयुक्त कार्यालय, पुणे
२. जनअपिलीय अधिकारी
सहकार आयुक्त कार्यालय, पुणे.

## विवेंचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- २०-१०-२००७ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री.चंगडे शशिकांत प्रेमराज (यापुढे त्यांना

अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत. तर जनमाहिती अधिकारी सहकार आयुक्त कार्यालय, पुणे (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी तथा अपर आयुक्त व विशेष निबंधक सहकारी संस्था, पुणे (यापुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- १६-०४-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे १९८५ ते २००५ या कालावधीतील खालीलप्रमाणे ६ मुद्यावर माहिती मागविली होती.

" १. मा.अप्पर आयुक्त व विशेष निबंधक बी.जी. यशोद यांनी आपल्या कार्यकाळात व शहर सहकारी बँक अहमदनगर यांचेकडील सहकार कलम ८३ च्या चौकशी चालू असतांना किती वेळा शासकिय व खाजगी भेटी दिल्या यांची माहिती द्यावी.

२. शहर सहकारी बँक अहमदनगर यांचेकडिल संचालकाकडून सहकार रुल ७१ (अ) नुसार किती रक्कम येणे किती संचालकाकडून त्यांची माहिती देणे. किती संचालकांनी येणे असणारी रक्कम बँकेकडे जमा केली आहे त्यांची माहिती सरव्यवस्थापक यांनी आपल्याकडे पाठविलेल्या पत्राच्या सत्यप्रती द्याव्यात. सदर वसुली बाबत कार्यालयीन टिपणीच्या सत्यप्रती द्याव्यात.

३. शहर सहकारी बँकेच्या अधिकारी व पदाधिकारी यांना सहकार कलम ८५ (१) नुसार चौकशी अधिकारी खर्चाची रक्कम विभागणी केल्यानंतर सदर रक्कम आज पर्यंत वसूल न होण्या बाबत आपल्या कार्यालयाकडून गेल्या १८-२० वर्षापासून झालेल्या पत्रव्यवहाराची माहिती द्यावी व त्यावरील

कार्यालयीन टिप्पणी माहिती द्यावी. सदर मुद्या बँकेच्या गैरव्यवहारात कोणत्या कलमानुसार मोडतो याची माहिती द्यावी.

४. शहर सहकारी बँक अहमदनगर यांचेकडील सहकार कलम ८३ च्या फेर चौकशीचे आदेश आपण बी.के. आगले यांचे नांवाने काढलेल्या आदेशामध्ये आपणाकडून कोणत्या चुका झालेल्या आहेत त्याबाबत आपण फेर आदेश काढून चुका दुरूस्त केल्याबाबत आपल्याकडून बँकेकडे व सदर चौकशी अधिका-याशी झालेल्या पत्रव्यवहाराच्या कागदपत्राच्या सत्यप्रती द्याव्यात.

५ मा.ना. सहकार मंत्री यांचेकडून सदर सहकारी बँकेच्या ज्या संचालकाकडून ७१ (अ) ची रक्कम येणे बाकी आहे त्या संचालकांनी लिहिलेल्या पत्रावरील दिलेल्या टिप्पणीची माहिती द्यावी तसे सदर संचालकांनी त्या पत्रासोबत बँकेच्या सरव्यवस्थापकाने दिलेल्या पत्राची सत्यप्रत द्यावी.

६. शहर सहकारी बँक अहमदनगर यांचेकडील संचालकाकडून ७१ (अ) नुसार येणे असणा-या वसूला बाबत आपले कार्यालय, जिल्हा उपनिबंधक, अहमदनगर, तसेच सदर बँकेकडे झालेल्या सर्व पत्रव्यवहाराच्या सत्यप्रती द्याव्यात किती संचालकांनी आपल्याकडे पत्रव्यवहार केला आहे त्या पत्राच्या सत्यप्रती द्याव्यात.”

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत्त टपालाव्दारे अपेक्षिली होती.

जनमाहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने दिनांक- १७-०६-२००६ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनूसार जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले आहे.

अपिलार्थीच्या सदर अपीलअर्जावर देखील जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारची सुनावणी आजतागायत झाली नसल्याचे अपिलार्थी यांनी आज आयोगासमोर सांगितले.

जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने व्यथीत होवून अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- २९-०७-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन व आज झालेल्या सुनावणीमध्ये सहकारखात्याच्या प्रतिनिधीची अनुपस्थिती पहाता, अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपासून सहकारखात्याने कोणत्या कारणास्तव वंचित ठेवले आहे हे कळून येत नाही. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे स्वरुप पहाता, ही माहिती अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांना देणे सर्वसाधारण परिस्थतीत सहज शक्य आहे, असे आयोगास वाटते. आज झालेल्या युक्तीवादाच्या वेळी सहकारखात्याचे कोणीही अधिकारी उपस्थित नाही याची प्रकर्षाने नोंद घेण्यात येत आहे.

अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांना अद्यापही त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता आहे. त्याचबरोबर त्यांना माहिती प्राप्त करुन घेण्याचा त्यांचा मुलभत हक्क असून जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना त्यापासून वंचित ठेवल्यामूळे त्यांच्यावर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील २० (१) २० (२) प्रमाणे कार्यवाही व्हावी.

आजच्या सुनावणीच्यावेळी अनुपस्थित राहून संबंधीत जनमाहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ बद्दल त्यांच्या मनात असलेला अनादर तर व्यक्त केला आहेच परंतु त्यांनी आपल्या कार्यशैलीतील बेपर्वाइ देखील आपल्या कृतीव्दारे स्पष्ट केली

आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनूसार माहिती मागणे हा अपिलार्थीचा हक्क आहे व त्यांना आवश्यक असलेली माहिती अधिनियमातील तरतुदीनूसार देणे, हे जनमाहिती अधिकारी यांचे कर्तव्य आहे. तथापि त्यांनी कोणत्याही प्रकारे आपली कर्तव्यपुर्ती केल्याचे आयोगास आढळत नाही. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती दिली नाही. व जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीची कोणतीही अपील सुनावणी घेतली नाही. या दोन्ही अधिका-यांच्या या कृतीव्दारे त्यांनी अपिलार्थीस माहिती प्राप्त करुन घेण्याच्या त्यांना कायद्याव्दारे दिलेल्या मूलभत हक्कापासून वंचित ठेवल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. याव्दारे त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ७ (१) चा भंग करुन स्वतःस कलम २० (१) व २० (२) च्या कार्यवाहीस पात्र ठरविले आहे.

तेव्हा या पार्श्वभूमीवर असे आदेशीत करण्यात येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती हे आदेश निर्गमीत होताच त्यांना २० दिवसाच्या आत साक्षांकित करुन विनामूल्य द्यावी.

संबंधीत जनमाहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाइ सिध्द केल्याने त्यांच्यावर सचिव (सहकार) यांनी प्रचलित सेवा नियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करावी व आपला अनुपालन अहवाल हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ४ महिन्याच्या आत आयोगाकडे पाठवावा.

अपिलार्थीस विहित मुदतीत आवश्यक ती माहिती न देवून कलम ७ (१) च्या तरतुदीचा भंग केल्याने जनमाहिती अधिकारी यांना प्रतिदिनी रुपये २५०/- या प्रमाणे एकुण रुपये २५,०००/- इतकी शास्ती का लावू नये, याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १ महिन्याच्या आत करावा. जेणेकरुन त्यांचा खुलासा तपासून आवश्यक वाटल्यास, या संदर्भातील पुरवणी आदेश काढण्यात येतील.

वरील विवेंचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

## निर्णय

६. अपील मान्य करण्यात येत आहे.

७. जनमाहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ च्या तरतुदीस छेद न देता, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २० दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामुल्य व साक्षांकित करुन पुरवावी.

८. जनमाहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य पराणतेचा अभाव व बेपर्वाई सिध्द केल्याने त्यांच्यावर सचिव (सहकार) यांनी प्रचलित सेवा नियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करावी व आपला अनुपालन अहवाल हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ४ महिन्याच्या आत आयोगाकडे पाठवावा.

**( वि.बा.बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

**अहमदनगर**
**दिनांक- २०-१०-२००७**
**प्रत**

१. श्री.चंगडे शशिकांत प्रेमराज, ३४६३, खिस्त गल्ली, अहमदनगर, जिल्हा- अहमदनगर.
२. जनमाहिती अधिकारी, सहकार आयुक्त निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, बी.जे.रोड, पुणे-४११००१, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३. जनअपिलीय अधिकारी , आयुक्त व विशेष निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, बी.जे.रोड, पुणे-४११००१ यांना, या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४. सचिव, (सहकार), मंत्रालय मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/६०५
निर्णय दिनांक- २०-१०-२००७

१ श्री.चंगडे शशिकांत प्रेमराज : अपिलार्थी
३४६३, खिस्त गल्ली, अहमदनगर-४१४००१

विरुध्द

१ जनमाहिती अधिकारी : प्रतिवादी
सहकार आयुक्त कार्यालय, पुणे

२. जनअपिलीय अधिकारी
सहकार आयुक्त कार्यालय, पुणे.

## विवेंचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- २०-१०-२००७ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री.चंगडे शशिकांत प्रेमराज (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत. तर जनमाहिती अधिकारी सहकार आयुक्त कार्यालय, पुणे (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व

जनअपिलीय अधिकारी तथा अपर आयुक्त व विशेष निबंधक सहकारी संस्था, पुणे (यापुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- ३१-०३-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे खात्याकडील कामकाजा बाबत (अर्बन बँक अ.नगर) खालील ८ मुद्यावर माहिती मागविली होती.

" १. सहकार कलम ८३ नूसार नगर अर्बन बँक अहमदनगर च्या झालेल्या चौकशीचा अहवाल जिल्हा उपनिबंधक तथा चौकशी अधिकारी यांनी सादर केला आहे त्या अहवालाची सत्यप्रत द्यावी.

५. शहर चौकशी अधिकारी यांनी सहकार कलम ८८ / नियम ७२ (२) व ७३ (३) नुसार संचालक मंडळाला दिलेल्या पत्राची सत्यप्रत द्यावी व त्यास संचालक मंडळाने दिलेल्या उत्तराची सत्यप्रती द्याव्यात.

६. सदर चौकशी अधिकारी सहकार कलम ८८ नियिम ७२ (२) दिनांक- २७-०६-०५ मध्ये दिलेल्या पत्रा नुसार कोणत्या दस्तऐवजाच्या तपासणी नुसार बँकेच्या नुकसानीस संचालकाला वैयक्तिक व सामुदायक जबाबदार कागदपत्र (दस्तऐवज)च्या सत्यप्रती द्याव्यात व किती रक्कमेस जबाबदार धरण्यात आले ती माहिती द्यावी.

७. सहकार कलम ८८ नुसार चौकशी अधिकारी यांनी सादर केलेला अहवाला बाबत कार्यालयीन टिपणीची माहिती द्यावी व त्यावरील वरिष्ठ अधिकारी यांचे आदेशाची सत्यप्रत द्यावी.

८. सदर चौकशी केंव्हा सुरु झाली त्याची माहिती द्यावी.

९. सदर चौकशी करीता किती कालावधी देण्यात आला होता त्याची माहिती द्यावी.

१०. वेळोवेळी मदतवाढ देण्यात आल्या त्या कोणत्या कारणाच्या त्याच्या दस्तऐवजाच्या सत्यप्रती द्यावी.

११. सदर बँके बाबत कोणत्या संचालकाने तक्रार अर्ज दिले आहेत त्यांची माहिती द्यावी."

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत्त टपालाव्दारे अपेक्षिली होती.

जनमाहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने दिनांक- ३०-०५-२००६ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनूसार जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले आहे.

अपिलार्थीच्या सदर अपीलअर्जावर देखील जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारची सुनावणी आजतागायत झाली नसल्याचे अपिलार्थी यांनी आज आयोगासमोर सांगितले.

जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने व्यथीत होवून अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- २९-०७-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन व आज झालेल्या सुनावणीमध्ये सहकारखात्याच्या संबंधित प्रतिनिधीची अनुपस्थिती पहाता, अपिलार्थीस त्यांना

आवश्यक असलेल्या माहितीपासून सहकारखात्याने कोणत्या कारणास्तव वंचित ठेवले आहे हे कळून येत नाही. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे स्वरुप पहाता, ही माहिती अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांना देणे सर्वसाधारण परिस्थतीत सहज शक्य आहे, असे आयोगास वाटते. आज झालेल्या युक्तीवादाच्या वेळी सहकारखात्याचे कोणीही अधिकारी उपस्थित नाही याची प्रकर्षाने नोंद घेण्यात आली.

अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांना आजही त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता आहे. त्याचबरोबर त्यांना माहिती प्राप्त करुन घेण्याचा त्यांचा मुलभत हक्क असून जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना त्यापासून वंचित ठेवल्यामूळे त्यांच्यावर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील २० (१) २० (२) प्रमाणे कार्यवाही व्हावी.

आजच्या सुनावणीच्यावेळी अनुपस्थित राहून संबंधीत जनमाहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ बद्दल त्यांच्या मनात असलेला अनादर तर व्यक्त केलाच आहे परंतु त्याचबरोबर त्यांनी आपल्या कार्यशैलीतील बेपर्वाइ देखील आपल्या अनुपस्थितीच्या कृतीव्दारे स्पष्ट केली आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनूसार माहिती मागणे हा अपिलार्थीचा हक्क आहे व त्यांना आवश्यक असलेली माहिती अधिनियमातील तरतुदीनूसार देणे, हे जनमाहिती अधिकारी यांचे कर्तव्य आहे. तथापि उपरोक्त प्रकरणी संबंधीत जनमाहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे कार्यवाही केल्याचे आयोगास आढळत नाही. अपिलार्थीस माहिती दिली नाही, त्यांच्या अपिलाची सुनावणीही घेतली नाही व अशा प्रकारे अपिलार्थीस माहिती मिळविण्यापासून सहकार विभागाच्या संबंधीत अधिका-यांनी वंचित ठेवल्याची आयोगास खात्री झाली आहे.

अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे सर्वसाधारण स्वरुप हे नियमीत शासकीय कार्यालयातील कामकाजा सबंधीचे व त्यातील पत्रव्यवहाराच्या संबंधीचे आहे. त्यामूळे ही माहिती अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत पुरविणे शक्य आहे.

तेव्हा या पार्श्वभूमीवर असे आदेशीत करण्यात येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ च्या तरतुदींना छेद न देता, हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य द्यावी.

संबंधीत जनमाहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई वरील विवेचनात स्पष्ट केल्याप्रमाणे सिध्द केल्याने त्यांच्यावर सचिव (सहकार) यांनी प्रचलित सेवा नियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करावी व आपला अनुपालन अहवाल हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ४ महिन्याच्या आत आयोगाकडे पाठवावा.

अपिलार्थीस विहित मुदतीत आवश्यक ती माहिती न देवून कलम ७ (१) च्या तरतुदीचा भंग केल्याने जनमाहिती अधिकारी यांना प्रतिदिनी रुपये २५०/- या प्रमाणे एकुण रुपये २५,०००/- इतकी शास्ती का लावू नये, याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ महिन्याच्या आत करावा. जेणेकरुन त्यांचा खुलासा तपासून आवश्यक वाटल्यास, या संदर्भातील पुरवणी आदेश काढण्यात येतील.

वरील विवेंचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

## निर्णय

९. अपील मान्य करण्यात येत आहे.

१०. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ च्या तरतुदींना छेद न देता हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १५ दिवसाच्या आत त्यांना विनामुल्य व सांक्षाकित करुन पुरवावी.

११. जनमाहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य पराणतेचा अभाव व बेपर्वाइ सिध्द केल्याने त्यांच्यावर सचिव (सहकार) यांनी प्रचलित सेवा नियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करावी व आपला अनुपालन अहवाल हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ४ महिन्याच्या आत आयोगाकडे पाठवावा.

**अहमदनगर** **( वि.बा.बोरगे )**
**दिनांक- २०-१०-२००७** **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

**प्रत**

१. श्री.चंगडे शशिकांत प्रेमराज, ३४६३, खिस्त गल्ली, अहमदनगर, जिल्हा-अहमदनगर.

२. जनमाहिती अधिकारी सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, यांचे कार्यालय,मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, बी.जे.रोड,पुणे- ४११ ००१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जनअपिलीय अधिकारी तथा सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय,यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव, (सहकार), मंत्रालय मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/६०६
निर्णय दिनांक- २०-१०-२००७

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती रत्नमाला सुरेश बोरसे,<br>आगरकरमळा, स्टेशनरोड, अहमदनगर<br>जिल्हा-अहमदनगर | : | अपिलार्थी |
| | विरुध्द | | |
| १ | जनमाहिती अधिकारी तथा तालूका उपनिबंधक,<br>सहकारी संस्था, धुळे, जुने जिल्हाधिकारी कार्यालय,<br>धुळे. | : | प्रतिवादी |
| २. | जनअपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक<br>सहकारी संस्था, धुळे, जिल्हा-धुळे. | | |

## विवेंचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- २०-१०-२००७ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्रीमती. रत्नमाला सुरेश बोरसे, (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जनमाहिती अधिकारी तथा तालूका उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे (यापुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- ३०-१२-२००५ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे श्रमसाफल्य गृहनिर्माण संस्था म. वलवाडी तालूका जिल्हा- धुळे या संस्थेच्या संदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

" श्रमसाफल्य गृहनिर्माण संस्था म. वलवाडी तालूका जिल्हा- धुळे सर्वेनंबर ३१२ ब, १ अ,३१२ ब या गृहनिर्माण संस्थेची नियमावली, सभासद यादी, किती सभासदानी आपली जागा विकली त्याची यादी, नवीन सभासदांची यादी याची माहिती मिळणे बाबत."

अपिलार्थीने ही माहिती व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीचा अर्ज प्राप्त झाल्या नंतर जनमाहिती अधिकारी यांनी सदर माहिती अपिलार्थीस देण्याकरिता संबंधित गृहनिर्माण संस्थेस दिनांक- २३-०२-२००६ रोजी कळविले व त्याची एक प्रत अपिलार्थी यांना दिली. अपिलार्थीस ही प्रत देतांना त्यांनी अपिलार्थीस असे सूचित केले आहे की, अपिलार्थीने संस्थेशी संपर्क साधून सदर संस्थेकडे आवश्यक ते शुल्क जमा करुन ही माहिती संस्थेकडून परस्पर प्राप्त करुन घ्यावी.

सदर पत्राची प्रत अपिलार्थीस मिळाली नसल्याचे अपिलार्थी यांनी सुनावणीमध्ये आयोगासमोर सांगितले. अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक-०६-०३-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे.

सदर अपीलाची सुनावणी दिनाक- २९-०४-२००६ रोजी घेवून जनअपिलीय अधिकारी यांनी जनमाहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले. सदर आदेश जनअपिलीय अधिकारी यांनी दिनांक- १६-०६-२००७ रोजी पारीत केले आहे. जनअपिलीय अधिकारी यांनी वरीलप्रमाणे निर्णय दिल्या नंतरही दिनांक-२२-०६-२००६ रोजी जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात दिनांक-२८-०६-२००६ पूर्वी

येवून संस्थेच्या पोटनियमावलीची प्रत घेवून जाण्याची विनंती केली. अपिलार्थी यांनी यापूर्वी सदर माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी ही माहिती जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून मिळू शकली नाही व ती देण्याप्रित्यर्थ जनमाहिती अधिकारी यांनी टाळाटाळ केली. तसेच अपिलार्थी हे अहमदनगर जिल्हयात राहत असल्यामूळे त्यांना धुळे येथे माहिती घेण्यासाठी प्रत्यक्षतः जाणे सोयीचे नसल्याने त्यांनी ही माहिती पोस्टाने पाठवावी, असे जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयास कळविले. तथापि यावर जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयातून पोस्टाने ही माहिती देण्यापोटीचा खर्च ते करु शकत नसल्याने अपिलार्थीने स्वतःहून त्यांच्या कार्यालयात हजर राहण्याचे त्यांनी अपिलार्थीस परत सूचित केले. तदनंतर अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी यांच्यामध्ये आपआपसात बराच पत्रव्यवहार होवून अंतिमतः जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी दिनांक-०९-१०-२००६ रोजी अपिलार्थीस पोस्टाने संबंधित संस्थेच्या उपविधीची झेरॉक्सप्रत पाठविली. सदर माहिती अपिलार्थीस मिळाल्याचे अपिलार्थीने आज सुनावणीमध्ये कबूल केले.

अपिलार्थीस बराच प्रयत्न करुनही त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती न मिळाल्याने त्यांनी व्यथीत होवून अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- २७-०६-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळमाहितीची मागणी कायम ठेवली आहे. तसेच जनअपिलीय अधिकारी यांच्या आदेशाचे पालन संबंधित जनमाहिती अधिकारी यांनी केले नसल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणले आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये अपिलार्थी यांनी असा युक्तीवाद केला की, त्यांनी त्यांच्या मूळ अर्जामध्ये नविन सभासदांची यादी व संस्थेच्या उपविधीची प्रत मागितली होती. त्यांना आता जनमाहिती अधिकारी यांच्याकडून उपविधीची प्रत प्राप्त झाली आहे. तथापि संस्थेच्या नविन संस्थेची यादी अद्यापही संबंधिताकडून प्रलंबित आहे. त्यांनी सदर गृहनिर्माण संस्थेच्या

कार्यालयाशी वारंवार संपर्क साधून देखील नविन सभासदांची यादी सदर संस्था देत नाही. अद्यापही त्यांना या यादीची आवश्यकता आहे.

जनमाहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी सदर संस्थेकडे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहिती विषयी दिनांक-२३-०२-२००६ रोजी पत्रव्यवहार केला आहे. तथापि सदर माहिती त्यांना संस्थेकडून आजतागायत देखील उपलब्ध होवू शकली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन व दोन्हीही बाजूचा युक्तीवाद ऐकता असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतूदीनूसार माहितीची मागणीचा अर्ज दिनांक- ३०-१२-२००५ रोजी करुनही जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक- ०९-१०-२००६ रोजी माहिती पाठविली आहे. म्हणजेच अपिलार्थीस माहिती विहित कालावधीपेक्षा ८ महिने व १० दिवस इतक्या विलंबाने अर्धवट स्वरुपात दिली आहे. माहिती, जरी त्रयस्त पक्षाच्या संबंधीत असली तरी संबंधित गृहनिर्माण संस्था या महाराष्ट्र सहकारी कायदा १९६० अन्वये जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्या पर्णतः नियंत्रणाखाली आहेत. या प्रकरणी संबंधीत संस्थेने जनमाहिती अधिकारी यांच्या सूचनांचे देखील उल्लंघन करुन अपिलार्थीस ही सर्व माहिती अर्धवटपणे पाठविल्याचे दिसून येते. माहिती अधिकार अधिनियम २००५ हा गृहनिर्माण संस्थेस लागू होतो, कारण या संस्था महाराष्ट्र सहकर कायद्यामधील तरतुदीच्या अनुषंगाने स्थापित झाल्या असल्यामूळे त्यांना लागू होतो असे आयोगाचे मत आहे. त्याचबरोबर ज्या सहकारी संस्थेमध्ये जमा होणारा निधी हा सार्वजनिक (पब्लीकफंड) असतो, त्यामूळे अशा प्रकारच्या संस्थेच्या कारभारामध्ये पारदर्शकता असणे हे तितकेच गरजेचे आहे. सदर संस्थेस अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमान्वये त्यांनी जनमाहिती अधिकारी

यांच्याकडे अर्ज केला, हे माहिती असूनही अद्यापपर्यंत जनमाहिती अधिका-यास माहिती उपलब्ध न करुन देण्यांची त्यांची कृती यास्तव गैर आहे की, येथे माहिती अधिकार कायद्याचे उल्लंघन करणारे कृत्य केले आहे, असे आयोगाचे मत आहे. तेंव्हा उपनिबंधक सहकारी संस्था व जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, धुळे यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी संबंधित गृहनिर्माण संस्थेकडून अपिलार्थीने मागितलेली माहिती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १५ दिवसाच्या आत हस्तगत करुन घ्यावी. संस्थेने माहिती न दिलयास त्यांच्यावर सहकार कायदा १९६० मधील तरतुदीनूसार यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करावी व कोणत्याही परिस्थितीत अपिलार्थीस ही माहिती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १५ दिवसाच्या आत प्राप्त होईल, अशी व्यवस्था करावी.

अपिलार्थीने केलेला प्रथम अर्ज दिनांक-३०-१२-२००५ रोजी केला होता. त्यामूळे अपिलार्थीस ही माहिती अधिनियमातील तरतुदीनूसार दिनांक- २९-०१-२००६ रोजी अगर तत्पूर्वी जनमाहिती अधिकारी यांनी पर्णतः देणे अपेक्षित होते. तथापि त्यांनी अपिलार्थीस अर्धवट माहिती ८ महिने १० दिवस इतक्या विलंबाने दिली. त्यामूळे ते प्रशासकीय कार्यवाहीस पात्र ठरतात. तेंव्हा सहकार आयुक्त, पुणे यांनी जनमाहिती अधिका-यावर या प्रकरणी त्यांनी त्यांच्या कार्यशैलीतील वरील प्रमाणे दाखविलेल्या कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल कार्यवाही करावी व आपला अनुपालन अहवाल हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ महिन्याच्या आत आयोगास सादर करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपीलार्थीचे अपील मान्य करण्यात येत असून सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

# निर्णय

१. अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अद्यापपर्यंत जी माहिती द्यावयाची असेल अशी सर्व माहिती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १५ दिवसाच्या आत सांक्षाकित करुन विनामूल्य पुरवावी.

३. जनमाहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य पराणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर सहकार आयुक्त, पुणे यांनी प्रचलित सेवा नियमानूसार यथा योग्य प्रशासकीय कार्यवाही करुन आपला अहवाल आयोगास हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ महिन्याच्या आत पाठवावा.

**अहमदनगर** **( वि.बा.बोरगे )**
**दिनांक- २०-१०-२००७** **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रत,

१. श्रीमती रत्नमाला सुरेश बोरसे, बाबू गेणू मार्ग, स्टेशनरोड, आगरकर मळा, स्मृती हौसींग सोसायटी, घ.नं.४१, अहमदनगर.

२. जनमाहिती अधिकारी तथा तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे,यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जनअपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,धुळे,यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, बी.जे.रोड,पुणे- ४११ ००१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

**अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/६०७**

**निर्णय दिनांक २०-१०-२००७**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. शंकरराव विठ्ठलराव राऊत,<br>करमणूक कर निरीक्षक, व्दारा जिल्हा करमणूक<br>कर शाखा, कलेक्टरेट कंपाऊंड, अहमदनगर | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा पोलीस निरीक्षक, कोतवाली पोलीस स्टेशन,<br>अहमदनगर | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, नगर भाग,<br>अहमदनगर | : | प्रतिवादी |

<u>विवेचन</u>

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-१०-२००७ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. शंकरराव विठ्ठलराव राऊत (यापुढे

त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, कोतवाली पोलीस स्टेशन श्री. तुकाराम कोंडिबा वहिले (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, नगर भाग यांचे प्रतिनिधी वाचक फौजदार श्री. राजेंद्र बापुराव भोसले (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०९-०३-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण १२ मुद्दयावर त्यांच्याकडील कोतवाली पोलीस स्टेशन येथे केस नंबर ४१/२००१ संदर्भात दिनांक ३०-०६-२००१ ते ०१-०२-२००६ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

१ मी दाखल केलेले क्रि. रि. पि. क्र. ४९४/२००४ मध्ये कोतवाली पोलीस स्टेशन येथे कार्यरत असलेले पोलीस स्टेशनने पोलीस उपनिरीक्षक यांनी दिनांक ०१-०२-२००६ रोजी सत्य प्रतिज्ञेवर प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. त्यातील पान क्रमांक १२८ ते १५३ असे आहेत. पान १२९ वर पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र बापुराव भोसले यांनी हे प्रतिज्ञापत्र कार्यालयातील उपलब्ध कागदपत्रावरुन केलेचे नमूद केले. त्यांनी कोणते-कोणते कागदपत्र पाहिले, तपासले, यांचा त्यांचेकडून सविस्तर खुलासा मिळावा.

| २ | माझा अर्ज दिनांक | कोतवाली जावक नंबरचे उत्तर | दिनांक |
|---|---|---|---|
| १ | ०६-०५-२००५ | जा. नं. ४०९९/२००५ | १५-०५-२००५ |
| २ | २९-०५-२००५ | उत्तर नाही | -- |
| ३ | २५-०८-२००५ | उत्तर नाही | -- |
| ४ | १८-०८-२००५ | जा. नं. ९९८८/२००५ | ०५-१०-२००५ |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | ३१-०७-२००५ | जा. नं. ९९८९/२००५ | ०५-१०-२००५ |
| ६ | १८-०८-२००५ | जा. नं. ९९८५/२००५ | ०५-१०-२००५ |
| ७ | १८-०८-२००५ | जा. नं. ९९८६/२००५ | ०६-१०-२००५ |
| ८ | १८-०८-२००५ | जा. नं. ९९८७/२००५ | ०६-१०-२००५ |
| ९ | १८-०८-२००५ | जा. नं. १००५८/२००५ | १०-१०-२००५ |
| १० | ११-१०-२००५ | जा. नं. १०९८८/२००५ | २१-११-२००५ |
| ११ | २३-११-२००५ | जा. नं. ११३९८/२००५ | ०९-१२-२००५ |
| | मुद्देमाल पावती क्रमांक | ४९/२००५ | ०२-०७-२००५ |
| | माझा अर्ज | कोतवालीचे उत्तर दिनांक | |
| १२ | १३-१०-२००५ | उत्तर नाही S.D.P.O. कडे अपील | |
| १३ | २३-११-२००५ | जा. नं. ९३/२००५ | ०४-०१-२००६ |

३ ०४-०७-२००५ रोजी माझी पत्नी सौ. पार्वतीने कोतवालीस तार केली त्याबाबत कार्यवाही नाही.

४ १७-११-२००५ रोजी कोलावालीला पत्नीचा अर्ज उत्तर नाही.

५ श्री. भोसले पी. एस. आय. यांना कार्यालयाने ही कागदपत्रे दाखविली असलेस त्या अपिलाचा खुलासा.

६ ही कागदपत्रे दाखवूनही श्री. भोसले यांनी ती दडवून प्रतिज्ञापत्र केले असल्यास त्याचा खुलासा.

७ यामध्ये वस्तुस्थितीचे विपर्यस्थ बाबी नमूद करुन मे. न्यायालयाची वेळ घेऊन न्यायालय निश्चित बाबीवर येणार नाही अशी प्रतिज्ञापत्रांत धादांत खोटी माहिती दिली. अवमान याचिका दाखल करणार त्याबाबत पोलीस निरीक्षक यांचे

अभिप्राय.

८ पान १३१ वर सायकल पूर्ण डॅमेज झाली ती पी. एस. आय. भोसलेनी पाहिली का,

९ पान १३१ Medical Officer यांनी P. M. केले. Autopsy Surgeon चिकित्सक हे शब्दार्थ कोणत्या हेतुने नमूद केला.

१० पान – १३२ – गैर आरोप केले असू प्रतिज्ञापत्रात नमूद केले. परंतू मला दिलेली उत्तरे, पंचनामा, P. M. यांचा अभ्यास न करताच अनुमान चुकीचे काढले त्याबाबत श्री. भोसलेचे मनोगत.

११ पान १३४ – एस. पी. ना दिलेला १९-०७-२००१ रोजीचा माझा अर्ज त्यावर झालेले चौकशीचे आदेश, उपविभागीय पोलीस अधिकारी शहर भाग यांनी पत्र क्रमांक उत्तर/१६५/२००२ दिनांक ११-०६-२००२ प्रमाणे उपस्थित झालेले शकांची पुर्तता झाली नसतांना ए. डी. फायनलचा रिपोर्ट दिला. याची पडताळणी प्रतिज्ञापत्र करतांना केली का, (ए. डी. पान १०९)

१२ १९-०७-२००१ रोजी चौकशीचे आदेश होते. एस. पी. साहेबांनी ए. डी. फायनल करण्याचे आदेश दिलेले नव्हते ही बाब भोसले साहेबांनी तपासली का, खुलासा.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २७-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला.

जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-०४-२००६ रोजी प्रथम अपील केले. त्यामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती अधिकारी यांच्यावर माहितीचा अधिकार

अधिनियम २००५ मधील कलम २० (२) नुसार शास्ती लावण्याची जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केली.

सदर अपिलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २७-०४-२००६ रोजी घेऊन आपले आदेश दिनांक १७-०५-२००६ रोजी जारी केले. ह्या आदेशाव्दारे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे अपील खारीज केले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०८-२००६ रोजी व्दितीय अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. या अपिलामध्ये त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना संरक्षण दिल्याचे म्हटले आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांच्या मुलाचा अहमदनगर येथील केडगाव येथे अपहरण करुन खून करण्यात आला व त्याचे प्रेत रेल्वे रुळावर टाकण्यात आले. या प्रकरणी पोलीस तपास चालू असून पोलीस स्टेशन अहमदनगर येथील कोतवाली पोलीस स्टेशनला संशयितावर गुन्हा दाखल केला असून त्याचा एफ. आय. आर. क्रमांक ३१४/०६ आहे. हे प्रकरण तपासाधीन आहे असे अपिलार्थीने सांगितले.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने या प्रकरणी अन्य दुस-या संस्थेकडून तपास होणेकामी औरंगाबाद येथील उच्च न्यायालयामध्ये दावा दाखल केला होता. सदर दावा चालू असतांना जन माहिती अधिकारी यांनी केलेले शपथपत्र चुकिचे व दिशाभूल करणारे आहे असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. या प्रतिज्ञापत्रात जन माहिती अधिकारी यांनी जर योग्य माहिती दिली असती किंवा अपिलार्थीस आता माहिती अधिकार अधिनियमाखाली दिलेली उत्तरे जर या प्रतिज्ञापत्रात असती तर त्यांना आता जो

त्रास होत आहे तो झाला नसता. सदर जन माहिती अधिकारी यांनी न्यायालयात दाखल केलेल्या चुकिच्या शपथपत्रामुळे संबंधीत आरोपींना त्याचा फायदा मिळत असून ते अपिलार्थीस वेगवेगळ्या प्रकारे त्रास देत आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी उच्च न्यायालयामध्ये जे प्रतिज्ञापत्र सादर केले आहे ते त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेल्या माहितीवरुन तयार करण्यात आले आहे तद्वतच, अपिलार्थी हे महसूल कार्यालयातील कर्मचारी असून त्यांना या विषयावर, त्यांनी यापूर्वी वेळोवेळी मागितलेली आवश्यक ती माहिती पुरविली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व दोन्ही बाजुंचा युक्तिवाद पाहता तसेच अपिलार्थीचा मूळ अर्ज पाहता अपिलार्थीने एकूण १२ मुद्दयावर प्रश्नार्थक स्वरुपात खुलासेवजा माहिती विचारल्याचे दिसून येते. माहिती या शब्दाची व्याख्या माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये पुरेशा प्रमाणात स्पष्ट करण्यात आलेली आहे. या व्याख्येमध्ये अपिलार्थीने विचारलेली माहिती बसत नाही. माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये विहित केलेल्या तरतुदीप्रमाणे स्पष्टीकरण अथवा खुलासा जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देणे अभिप्रेत नाही. अपिलार्थीने ही माहिती मागतांना विशिष्ट शब्द, उदा. कोणत्या हेतुने नमूद केले, श्री. भोसले यांचे मनोगत, ए. डी. फायनलचा रिपोर्ट केला त्याची पडताळणी प्रतिज्ञापत्र करतांना केली का ? एस. पी. साहेबांनी ए. डी. फायनल करण्याचे आदेश दिलेले नव्हते ही बाब भोसले साहेबांनी तपासली का? खुलासा -- वापरुन अशा प्रकारचे बहुतांशी प्रश्न विचारले आहेत. माहिती अधिकार अधिनियमामध्ये अशा प्रकारच्या प्रश्नाला उत्तरे देण्याची तरतूद नसल्याने अपिलार्थीस त्यांच्या प्रश्नांची उत्तरे माहिती अधिकार अधिनियमातील तरतूदीन्वये मिळणार नाहीत हे उघड आहे. तथापि या प्रकरणाची नस्ती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार तपासण्यासाठी ते मागवून घेऊ शकतील.

सदर नस्तीची तपासणी करुन त्यांना त्यांनी मागितलेल्या प्रश्नांची उत्तरे त्यांना सुलभरित्या मिळू शकतील असे आयोगास वाटते. तेव्हा त्यांनी त्यांना हव्या असलेल्या माहितीबाबत संबंधीत पोलीस स्टेशनकडे संबंधीत नस्ती पाहण्यासाठी वेगळ्याने अर्ज करावा. सदर अर्जाची संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी प्राधान्याने दखल घेऊन संबंधीत नस्ती अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार प्राधान्याने उपलब्ध करुन द्यावी एवढेच या प्रकरणी सुचविण्यात येईल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक २०-१०-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शंकरराव विठ्ठलराव राऊत, करमणूक कर निरीक्षक, व्दारा जिल्हा करमणूक कर शाखा, कलेक्टरेट कंपाऊंड, अहमदनगर

२ जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, कोतवाली पोलीस स्टेशन, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, नगर भाग, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर

प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

**अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/६०८**

**निर्णय** **२०-१०-२००७**

**दिनांक**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. संपत तुकाराम गायकवाड,<br>मु. पो. शेंडी (भंडारदरा वसाहत),<br>तालुका अकोले, जिल्हा अहमदनगर | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता,<br>घाटघर उदंचन जलविद्युत प्रकल्प,<br>विभाग क्रमांक १, भंडारदरा, तालुका अकोले,<br>जिल्हा अहमदनगर | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अधीक्षक अभियंता,<br>घाटघर जलविद्युत प्रकल्प मंडळ, त्र्यंबक रोड,<br>नाशिक – ०२ | : | प्रतिवादी |

सध्या : जन माहिती अधिकारी : कार्यकारी अभियंता, घाटघर उदंचन जलविद्युत प्रकल्प, विभाग क्रमांक ३, चोंढे

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-१०-२००७ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. संपत तुकाराम गायकवाड (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, घाटघर उदंचन जलविद्युत प्रकल्प श्री. मच्छींद्र कारभारी थोरात (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, घाटघर जलविद्युत प्रकल्प मंडळ श्री. दिलीप रामरतन जोशी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ११-०३-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील कामासंदर्भात १९८५ ते १९८७ या कालावधीतील स्टोन क्रशरवरील खडी रजिस्टरची झेरॉक्स कॉपी मिळण्याबाबत खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

१२. “ ठेकेदार अथवा वाहनचालक यांना खडी दिलेल्या क्रशरवरील रजिस्टरची झेरॉक्स प्रत.”

अपिलार्थीने ही माहिती समक्ष मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिनांक ०१-०४-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. या पत्रान्वये त्यांनी अपिलार्थीस, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचा शोध घेऊनही त्यांना खडी रजिस्टर सापडले नसल्याचे कळविले आहे.

त्याच बरोबर त्यांनी अपिलार्थीस पुढे असेही कळविले आहे की, अशा प्रकारचे रजिस्टर तत्कालीन शाखा अभियंता अथवा ठेकेदार यांनी त्यांच्या सोयीकरिता अनाधिकृतरित्या ठेवले असल्यास सदर रजिस्टर उपविभागात त्यांनी जमा केले असल्याचे आढळून आले नाही. अशा प्रकारे त्यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती पुरविण्याप्रित्यर्थ असमर्थता व्यक्त केली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती उपलब्ध न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०५-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नसल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. तथापि त्यांनी अपिलार्थीस दिनांक ३१-०५-२००६ रोजी त्यांचे अपील निकाली काढल्याचे कळविले आहे. सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले असल्याचे अपिलार्थीने आज सुनावणीमध्ये कबूल केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढण्याची कारणे देतांना सदर रजिस्टर माहिती अधिका-याकडे उपलब्ध नाही व त्यांच्या म्हणण्याप्रमाणे देता येत नाही हे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ग्राह्य धरले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०९-२००६ रोजी व्दितीय अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे व अपिलाची सुनावणी न घेता जन अपिलीय अधिकारी यांनी अधिका-याची बाजू घेतली असल्याचे म्हटले आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, ते या प्रकल्पावर मजूर म्हणून १९८५ ते १९८७ या कालावधीत कामाला होते. त्यावेळी संबंधीत क्रशरवर या खडीचा हिशोब ठेवण्याचे काम त्यांच्याकडे होते. त्यांना या खडी रजिस्टरची झेरॉक्स प्रत हवी आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, प्रकल्पावर असणारे क्रशर हे खाजगी ठेकेदाराचे होते त्यामुळे अशा प्रकारच्या रजिस्टरची प्रत त्यावेळी ठेवली होती किंवा कसे यासंबंधी त्यांना आज काहीही सांगता येणार नाही. खात्यामार्फत असे कोणत्याही प्रकारचे रजिस्टर त्यावेळी ठेवण्यात आले नव्हते. सदर कार्यालय आता बंद झाले आहे त्यामुळे अपिलार्थीस, त्यांना ही माहिती, मुळात ती आस्तित्वात नसल्यामुळे देता येत नाही. अपिलार्थीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर सदर रजिस्टर्स शोधण्याचा त्यांनी कसोशीने व प्रामाणिकपणे प्रयत्न केला आहे तसेच सदर रजिस्टर सर्वत्र शोधूनही त्यांना अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्राप्त होऊ शकली नाही.

या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती मुळात जुनी आहे व अशा प्रकारची माहिती जलसंपदा प्रकल्पावर ठेवण्याची पध्दत नाही कारण प्रकल्पामध्ये चालणारे क्रशर हे संबंधीत ठेकेदार आणत असतो व त्याचा दैनंदिन हिशोब देखील ठेकेदारच ठेवत असतो. अपिलार्थीने मुळात मागितलेली माहिती संबंधीत ठेकेदाराच्या व्यवसायाशी संबंधीत असून अशी माहिती सरकारी कागदपत्र म्हणून जतन करत नाहीत. मुळात ही माहिती या प्रकल्पाकरिता नेमल्या गेलेल्या शासनाच्या विभागामध्ये सार्वजनिक माहिती म्हणून ठेवलीच जात नव्हती त्यामुळे माहिती अधिकार अधिनियमातील तरतूदी अशा प्रकारच्या कागदपत्राकरिता लागू होऊ शकत नाही. जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती ही सर्व संबंधितांकडे चौकशी करुनच पुरविलेली असल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस ही माहिती देण्याकरिता पुरेसे प्रयत्न केल्याचे दिसून येते.

त्याचबरोबर ही माहिती देखील जन माहिती अधिकारी यांच्याकडे, मुळात ती -- सार्वजनिक माहिती नसल्याने व त्यायोगे आस्तित्वातच नसल्यामुळे आज रोजी उपलब्ध नाही हा जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद आयोग मान्य करत असून अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

**<u>निर्णय</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक २०-१०-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. संपत तुकाराम गायकवाड, मु. पो. शेंडी (भंडारदरा वसाहत), तालुका अकोले, जिल्हा अहमदनगर

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, घाटघर उदंचन जलविद्युत प्रकल्प, विभाग क्रमांक १, भंडारदरा, तालुका अकोले, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ कार्यकारी अभियंता, घाटघर उदंचन जलविद्युत प्रकल्प, विभाग क्रमांक ३, चोंढे, तालुका अकोले, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात

पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, घाटघर जलविद्युत प्रकल्प मंडळ, त्र्यंबक रोड, नाशिक – ०२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेला अर्ज

**क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/८१**

**निर्णय** २३-१०-२००७

**दिनांक**

१ श्री. गोविंदा नामदेव भिरुड, : अर्जदार

मु. पो. फेकरी, तालुका भुसावळ,

जिल्हा जळगाव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी

तथा मुख्य व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य वीज

निर्मिती म., भुसावळ औष्णिक विद्युत निर्मिती

कं. मर्यादित, दिपनगर, भुसावळ, जिल्हा

जळगाव

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-१०-२००७ रोजी जळगाव येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अर्जदार श्री. गोविंद नामदेव भिरुड (यापुढे त्यांना अर्जदार असे संबोधण्यात येईल) व जन माहिती अधिकारी तथा मुख्य व्यवस्थापक, भुसावळ औष्णिक विद्युत निर्मिती केंद्र श्री. अभय अरुण हरणे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

अर्जदार श्री. गोविंद नामदेव भिरुड रा. फेकरी यांनी भुसावळ औष्णिक विद्युत निर्मिती केंद्र येथे माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये यांच्याकडील दिनांक २४-११-२००६ रोजीच्या अर्जान्वये काही माहिती मागविली होती. अर्जदाराच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती देण्यापोटीचे शुल्क म्हणून रुपये २८४० (अक्षरी रुपये दोन हजार आठशे चाळीस फक्त ) इतके त्यांचे कार्यालयात भरण्याचे त्यांच्या दिनांक २५-१२-२००६ रोजीच्या पत्राव्दारे कळविले. सदर पत्रानुसार अपिलार्थीने दिनांक २८-१२-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात रुपये २८४० (अक्षरी रुपये दोन हजार आठशे चाळीस फक्त) याचा चलन क्रमांक ४३५८४९० ने भरणा केला. तदनंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक १०-०१-२००७ रोजी माहिती मिळाली. सदर माहितीच्या पृष्ठांची संख्या एक इतकी आहे.

एक पानाच्या माहितीबाबत रुपये २८४० /- इतके शुल्क का आकारले असे जन माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी ही माहिती देण्यामध्ये त्यांचे जे मनुष्यबळ खर्च पडले आहे त्या मनुष्यबळाच्या प्रतिदिनी वेतनाचा व ही माहिती तयार करावयास लागणा-या

कालावधीचा विचार करुन अपिलार्थीस ही रक्कम कळविल्याचे त्यांनी आज रोजी सुनावणी मध्ये सांगितले. एकूण खर्च रुपये २८४० /- याचा खुलासा त्यांनी, आस्थापना अधीक्षक रुपये ८७२, उच्च स्तरीय लिपीक रुपये १२५२, व लघुटंकलेखक रुपये ७१६ असा केला या सर्व खर्चाची बेरीज रुपये २८४० /- इतकी येत आहे.

विद्युत वितरण कंपनीचा वरील युक्तिवाद अमान्य करण्यात येत आहे कारण माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या संदर्भात करावे लागणारे कामकाज हा सार्वजनिक प्राधिकरणाच्या कर्मचा-यांच्या दैनंदिन व नित्याच्या कामाचा एक भाग आहे. माहितीचा अधिकार अधिनियमाव्दारे अर्जदाराने मागितलेली माहिती देण्यासाठी सार्वजनिक प्राधिकरणा-च्या कर्मचा-यांना / अधिका-यांना जे श्रम घ्यावे लागतात त्या श्रमाचे मूल्य त्यांच्या मासिक वेतनामध्ये समाविष्ट आहे. माहितीचा अधिकार अधिनियमातीतील तरतुदीप्रमाणे मागितलेल्या माहितीकरिता अर्जदारास विहित दरापेक्षा जादा दर लावण्याचे राज्यतील सार्वजनिक प्राधिकरणास कोणतेही स्वतंत्र अधिकार नाहीत. अर्जदारास पुरविण्यात येणा-या माहितीच्या दराबाबत राज्य शासनाने सामान्य प्रशासन विभागामार्फत दिनांक ११-१०-२००५ रोजी अधिसूचना क्रमांक आरटीआय/२००५/सीआर/३१५/०५/०५ प्रसिध्द केली आहे. यातील उप कलम ४ मध्ये माहिती अधिकार अधिनियमाव्दारे अर्जदारास पुरविण्यात येणा-या माहितीचा दर रुपये २ (रुपये दोन) प्रती पृष्ठ अधिक पोस्टाचा खर्च इतका निश्चित करण्यात आलेला आहे. त्यामुळे विद्युत कंपनीने अर्जदारास प्रति पृष्ठ रुपये २ या दराने माहिती पुरविणे भाग आहे.

सबब, जन माहिती अधिकारी यांना खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे. --

**जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास त्यांच्याकडून उपरोक्त माहिती पुरविण्यापोटी घेतलेले शुल्क, त्यातून टपाल खर्च वजा करुन रुपये २८१३ /- (अक्षरी - रुपये दोन हजार**

**आठशे तेरा फक्त) अर्जदारास हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २४ तासाच्या आत अदा करावेत व आपला अनुपालन अहवाल आयोगास ७ दिवसाच्या आत सादर करावा.**

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अर्जदाराचा अर्ज मान्य करण्यात येत आहे.

जळगाव ( वि. बा. बोरगे )

दिनांक २३-१०-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गोविंदा नामदेव भिरुड, मु. पो. फेकरी, तालुका भुसावळ, जिल्हा जळगाव

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्य व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती मंडळ, भुसावळ औष्णिक विद्युत निर्मिती केंद्र भुसावळ, जिल्हा जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

४ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

तक्रार क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/८२
निर्णय दिनांक- २३-१०-२००७

१ श्री.निळकंठ दगडू पाटील : तक्रारदार
राहणार-बिलखेडे, पो.जांभोरे, तालूका-धरणगाव,
जिल्हा- जळगांव,

विरुध्द

१ जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, एरंडोल : प्रतिवादी

२. जनअपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी, जळगाव

३. तहसीलदार,धरणगाव

४. तालुका निरीक्षक भूमिअभिलेख, जळगांव

## विवेंचन

वरील तक्रार प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- २३-१०-२००७ रोजी जळगाव येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तक्रारदार निळकंठ दगडू पाटील (यापुढे त्यांना तक्रारदार असे संबोधण्यात येईल), व प्रतिवादी श्री.रवींद्र बळीराम राजपूत, जळगांव, श्री.अनिल खंडेराव पवार, तहसीलदार धरणगाव श्री.भिमराव आत्माराम बाविस्कर, व तालूका निरीक्षक भूमि अभिलेख,जळगांव हे हजर आहेत.

या प्रकरणी तक्रारदाराने त्यांच्या भूखंडाची मोजणी करण्यासाठी तालूका भूमिअभिलेख यांच्याकडून टाळाटाळ होत असल्याबाबत राज्य माहिती आयोगाकडे अर्ज दाखल केला आहे. तक्रारदाराने अर्जामध्ये त्यांना महसूल व भूमि अभिलेख कर्मचारी /अधिका-याकडून निश्चीतपणे कोणती माहिती मिळत नाही, याचा कोणताही उल्लेख नाही. तक्रारदार हे त्यांचे वैयक्तीक काम माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ च्या तरतूदीनूसार करुन घेवू इच्छित आहेत. उपविभागीय अधिकारी, जळगाव, तहसीलदार, एरंडोल,

तहसीलदार, धरणगाव व तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांच्या युक्तीवादावरुन असे दिसून येते की, आवश्यक असलेली मोजणीची फी तक्रारदार हे भरत नाहीत. त्याचबरोबर तक्रारदारास ज्या भुखंडाची मोजणी करुन हवी आहे, त्या भूखंडावर तक्रारदारानेच अतिक्रमण केले आहे. ही बाब संपूर्णतः प्रशासकीय स्वरुपाची असल्यामूळे व तक्रारदाराने मोजणीसाठी आवश्यक त्या रकमेचा भरणाही केलेला नाही. प्रकरणाचे स्वरुप पर्णतः प्रशासकीय स्वरुपाचे आहे. यामध्ये राज्य माहिती आयोगास निर्णय देण्यास वाव नाही. यास्तव तक्रारदाराने आयोगाकडे कलम १८ खालील केलेला तक्रारअर्ज फेटाळण्यात येत आहे.

वरील विवेंचनाच्या पार्श्वभूमीवर तक्रारदाराची तक्रार फेटाळण्यात येत आहे.

## निर्णय

१२. तक्रार फेटाळण्यात येत आहे.

**जळगाव** **( वि.बा.बोरगे )**
**दिनांक- २३-१०-२००७** **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

**प्रत**

१. तक्रारदार श्री. निळकंठ दगडू पाटील, राहणार-जांभोरे तालूका- धरणगाव, जिल्हा- जळगाव
२. तहसीलदार, एरंडोल, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३. उपविभागीय अधिकारी, जळगाव, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४. तहसीलदार, धरणगाव, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
५. तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, जळगाव, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात

पुढील कार्यवाहीसाठी.
सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.
निर्णयनस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/६३४
निर्णय दिनांक- २३-१०-२००७

१ श्री.दिलिपकुमार गौरीशंकर अग्रवाल, : अपिलार्थी
मेनरोड,बोदवड, तालूका-बोदवड, जिल्हा-जळगाव

विरुध्द
१ जनमाहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा. पं.)
जिल्हापरिषद, जळगाव.
२. जनअपिलीय अधिकारी तथा
अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हापरिषद, जळगाव.

## विवेंचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- २३-१०-२००७ रोजी जळगाव येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री.दिलीपकुमार गौरीशंकर अग्रवाल (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जनमाहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी

अधिकारी, जिल्हापरिषद,जळगाव, श्री. प्रशांत शालीग्राम भामरे (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी तथा अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, जळगांव, श्री.अनिल बाळाजी लांडगे (यापुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- ०६-०५-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे बोदवड ग्रामपंचायतच्या संदर्भात वरिष्ठ अधिका-याने दिलेल्या आदेशा बाबत झालेल्या पुढील कार्यवाही संदर्भात व इतर माहिती खालील प्रमाणे विचारली होती. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचा कालावधी सन २००० ते २००६ असा होता.

"आदेश क्रमांक-१ मे.जिल्हाधिकारी यांचेकडील पत्र क्र. ३/२८/८७१, दिनांक- २३-०६-०४, आदेश क्रमांक-२ मे.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद जळगाव जा.क्र./ग्रा.पं./२ आरआर/ ४०९/४ दिनांक- १६-०८-०४, आदेश क्रमांक-३ मे.गटविकास अधिकारी साहेब यांचे कडील पत्र दि. २९-९-२०००, आदेश क्रमांक-४ मे.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब जिल्हापरिषद जळगाव क्र.अपील /ग्रा.प./२ आर आर/ ८६०/०५ दि. १२.१२.०५, आदेश क्रमांक-५ गटविकास अधिकारी साहेब पंचायत समिती, बोदवड पत्र क्र. ग्रापं/ अपील/आरआर/ १३९/०५ दिनांक- ०४-०१-२००६.

१. वरील प्रमाणे वेळोवेळी आदेश झालेले आहेत याबद्दल सदर आदेशाचे अंमलबजावणी बाबतची खरी व अचुक माहिती द्यावी.

२. अंमलबजावणी झाली नसल्यास कायदेशीर दखल घेण्यात आली आहे काय, याची माहिती द्यावी.

३. दखल घेतली असल्यास प्रशासकीय कारवाई झालेली आहे काय, याची माहिती द्यावी.

४. सदर आदेशाची पूर्ती झाली असल्यास केव्हा झाली याची माहिती द्यावी.

५. वरीष्ठ अपील अधिकारी साहेबांचा फोन नंबर, फॅक्स नंबर, व कार्यालयाची माहिती द्यावी.

६. मे.कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग जिल्हापरिषद यांचे वरीष्ट अधिकारी यांचे नांव व पत्ता यांची माहिती द्यावी.''

अपिलार्थीने सदर माहिती सर्वसाधारण टपालाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीने मागितलेली माहिती वरीलप्रमाणे एकूण ६ मुद्यावर असून अपिलार्थी यांनी त्यांनी केलेल्या अर्जावर जिल्हापरिषद प्रशासनाने काय कार्यवाही केली हे जाणण्यास अपिलार्थी हे उत्सूक असल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या या अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना दिनांक- ०३-०७-२००६, १०-०७-२००६ व १४-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये उत्तर दिल्याचे दिसून येते. यापैकी दिनांक- ०३-०७-२००६ रोजीच्या पत्रामध्ये अपिलार्थीस त्यांनी मागितलेल्या माहिती संदर्भात पंचायत समितीकडून त्यांनी मागणी केलेली माहिती प्राप्त करुन घेण्याचे सूचित करण्यात आले आहे. दिनांक- १० जुलै, २००६ रोजीच्या पत्रामध्ये अपिलार्थीस अपुर्ण माहिती देण्यात आलेली आहे. त्यामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता यांच्या वरिष्ठ अधिका-याचे नाव व पत्ता न देवून बांधकाम विभागाकडून ही माहिती प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले आहे तर दिनांक-१४-०८-२००६ रोजीच्या पत्रामध्ये अपिलार्थीस परत ग्रामपंचायत स्तरावर ही माहिती प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले आहे.

जनमाहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- १३-०७-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. यामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या अपीलावर जनअपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. तथापि त्यांनी या अपीलावर सुनावणी दिनांक- ३१-०७-२००६ रोजी त्यांच्या कार्यालयात ठेवली असल्याचे त्यांच्याकडील दिनांक- २४-०७-२००६ रोजीच्या पत्रावरुन दिसून येते.

सदर सुनावणीस अपिलार्थी हे हजर नसल्याने ही सुनावणी त्या दिवशी अंतिम होवू शकली नाही. तथापि तदनंतर जनअपिलीय अधिकारी यांनी संबंधित उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) यांना सूचना देवून त्यांच्या सहाय्याने अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक- २२-०९-२००६ रोजीच्या पत्रान्वये माहिती  दिली आहे. सदर माहिती प्राप्त झाल्याचे अपिलार्थी यांनी आज सुनावणीमध्ये कबूल केले आहे.

तथापि ही माहिती प्राप्त होण्या आधीच अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक-२९-०८-२००६ रोजी व्दितीय अपील सादर केले होते. या अपीलामध्ये त्यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणले आहे की, संबंधीत जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्यास टाळाटाळ केली असून त्यांच्या माहितीचा अर्ज चुकीच्या कारणाने नाकारला गेला आहे.

आज झालेल्या युक्तीवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद मांडण्यात आला की, त्यांनी मागितलेली माहिती जनमाहिती अधिकारी यांनी सर्व संबंधिताकडून गोळा करुन घेवून अपिलार्थीस देणे त्यांना अपेक्षित होते. त्याचबरोबर अपिलार्थीने दिनांक-०६-०५-२००६ रोजी प्रथम अर्ज केला असता, त्यांना प्रथम प्रतिसाद दिनांक-०३-०७-२००६, १०-०७-२००६ व १४-०८-२००६ रोजी देण्यात आला. सदर प्रतिसाद माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या अधिनियमामध्ये विहित केलेल्या तरतूदीपेक्षा जास्त कालावधीने देण्यात आला आहे. त्यांनी केलेल्या अर्जावर पुढे काय कार्यवाही झाली हे जाणून घेण्यास त्यांना आजही स्वारस्य आहे.

जनमाहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, जळगाव जिल्हयात एकूण ११५२ ग्रामपंचायती असून त्यांच्या संदर्भातील माहिती अनेक ठिकाणाहून वेगवेगळे अर्जदार त्यांना नेहमीच विचारत असल्यामूळे सर्वसाधारणपणे ही माहिती ग्रामपंचायत स्तरावरुन उपलब्ध करुन घ्यावी लागते. प्रचलीत पध्दतीनुसार अशा प्रकारेच माहिती गोळा करुन संबंधीतांना देण्यात येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व दोन्हीही बाजूचा युक्तीवाद ऐकता असे दिसून येते की, अपिलार्थीने मूळात अर्ज दिनांक- ०६-०५-२००६ रोजी केला असता त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी उशिरात उशिरा दिनांक- ०५-०६-२००६ रोजी अगर तत्पूर्वी प्रतिसाद देणे माहिती अधिकार अधिनियमाव्दारे अपेक्षित आहे. तथापि त्यांनी प्रथम प्रतिसाद दिला तो विहित मुदतीपेक्षा २८ दिवस इतक्या उशिराने. तदनंतर परत अपिलार्थीस टप्याटप्याने माहिती देवून अंतिमतः अपिलार्थीस माहिती देण्यास विहित मुदतीपेक्षा १ महिना १७ दिवस इतका विलंब लावला आहे व अपिलार्थीस दिलेली माहिती देखील त्यांनी अर्धवट अशा स्वरुपात दिलेली आहे.

अपिलार्थीस मूळात त्यांनी जिल्हापरिषदेच्या वेगवेगळया अधिका-याकडे केलेल्या अर्जा बाबत काय कार्यवाही केली हे जाणून घेण्यास स्वारस्य आहे. हे पाहता त्यांनी संबंधीत नस्त्या पाहणी करणे जास्त सोयीस्कर होईल, असे आयोगाचे मत आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतूदीनूसार अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांच्याकडे नस्त्या पाहण्याचे अधिकार आहेत व या करिता त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडे वेगळा अर्ज करावा लागेल. तेव्हा असे सूचित करण्यात येते की, जनमाहिती अधिकारी यांनी, अपिलार्थी यांच्याकडून, त्यांच्याकडे नस्तीची पहाणी करण्यासाठी अर्ज प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीस त्यांनी मूळअर्जा व्दारे मागणी केलेल्या अर्जा संबंधीच्या सर्व नस्त्या त्यांना पाहणीसाठी हे आदेश प्राप्त होताच ७ दिवसाच्या आत उपलब्ध करुन द्याव्यात. संबंधित जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वेळोवेळी दिलेली माहिती पाहता त्यांना अपिलार्थीस ही माहिती कशी देता येणार नाही किंवा दुस-या प्राधिकरणाकडून ही माहिती प्राप्त करुन घेण्याचे सूचित करणे म्हणजे अपिलार्थीस माहिती देण्यासाठी टाळाटाळ करणे हे येथे निःसंशयपणे सिध्द झाले आहे. उदाहरणार्थ- मुद्दा क्रमांक- ४ च्या बाबतीत कार्यकारी अभियंता, बांधकाम यांच्या वरिष्ठांची माहिती जनमाहिती अधिकारी यांच्याकडे निश्चीतपणे असली पाहिजे. तथापि ती देखील त्यांना अपिलार्थीस शेवटपर्यंत दिली नाही. यावरुन अपिलार्थीस माहिती देण्यास टाळाटाळ केल्याचे दिसून येते.

ग्रामपंचायतचे कार्यालय व जिल्हापरिषदेमधील उप मुख्य कार्यकारी अधिकारी तथा माहिती अधिकारी यांचे कार्यालय हे एकाच प्राधिकरणाचे वेगवेगळे भाग आहेत. या प्रकरणी असे दिसून आले आहे की, अपिलार्थीने माहिती मागितल्या बरोबर जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना संबंधित ग्रामपंचायतकडे जाण्याचे सूचित केले आहे.

जनमाहिती अधिकारी व ग्रामपंचायत कार्यालय हे एकाच प्राधिकरणाचे दोन भाग असल्याने अपिलार्थीने ज्या कार्यालयाकडे माहिती मागितली आहे. त्या जनमाहिती अधिका-याने ही माहिती अपिलार्थीस इतर सर्व कार्यालयांकडून घेवून त्यांना देणे माहिती अधिकार अधिनियमामध्ये अभिप्रेत आहे. त्यामुळे या प्रकरणी जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दुस-या कार्यालयाकडे माहितीसाठी निर्देशित करणे हे कोणत्याही परिस्थितीत समर्थनीय तर नाहीच परंतू जनमाहिती अधिकारी यांची ही कृती म्हणजे अपिलार्थीस माहिती देण्यापोटीची त्यांनी केलेली टाळाटाळ असे म्हटल्यास फारसे वावगे होणार नाही. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीपेक्षा १ महिना १७ दिवस इतक्या उशीराने माहिती दिली आहे व तीही देण्यास टाळाटाळ केल्याचे अशा प्रकारे सिध्द होत आहे. त्यांनी या प्रकरणी त्यांच्या कार्यशैलीत अशा प्रकारे दर्शविलेल्या कर्तव्य परायणतेच्या अभावामुळे ते माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (२) मधील तरतुदीस पात्र ठरतात. तेव्हा त्यांचेवर या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, जळगाव यांनी प्रचलित सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेंचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

## निर्णय

१३. अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

१४. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लावलेल्या ४७ दिवस इतक्या असमर्थनीय विलंबा बाबत त्यांच्यावर प्रचलित सेवा नियमानूसार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, जळगाव यांनी यथायोग्य प्रशासकीय

कार्यवाही करुन आपला अहवाल आयोगास हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ महिन्याच्या आत पाठवावा.

१५. जनमाहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीकडून त्यांच्याकडे नस्तीची पहाणी करण्यासाठी अर्ज प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या अर्जा संबंधीच्या सर्व नस्त्या त्यांना पाहणीसाठी हे आदेश प्राप्त होताच ७ दिवसाच्या आत उपलब्ध करुन द्याव्यात.

१६. अपिलार्थीस त्यांच्या मुळ अर्जातील मुद्दा क्रमांक-६ वर जनमाहिती अधिकारी यांनी हे आदेश निर्गमित झाल्यापासून ३ दिवसाचे आत विनामूल्य व साक्षांकित माहिती द्यावी.

**जळगाव** **( वि.बा.बोरगे )**
**दिनांक- २३-१०-२००७** **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**
**प्रत**

१. श्री.दिलिपकुमार गौरीशंकर अग्रवाल, मेनरोड बोदवड,तालूका-बोदवड, जिल्हा-जळगाव

२. जनमाहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी,(ग्रा.पं.) जिल्हापरिषद, जळगाव, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जनअपिलीय अधिकारी तथा अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, जळगाव, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर

प्रसिध्द करण्यासाठी.

६. निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/६३६
निर्णय दिनांक- २३-१०-२००७

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री.दिलिपकुमार गौरीशंकर अग्रवाल,<br>मेनरोड बोदवड, जिल्हा-जळगाव | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जनमाहिती अधिकारी तथा<br>उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा. पं.)<br>जिल्हापरिषद, जळगाव. | : | प्रतिवादी |
| २. | जनअपिलीय अधिकारी तथा<br>अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हापरिषद, जळगाव. | | |

## विवेंचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- २३-१०-२००७ रोजी जळगाव येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री.दिलीपकुमार गौरीशंकर अग्रवाल (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जनमाहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी,(ग्रा.पं.) जिल्हापरिषद,जळगाव श्री.प्रशांत शालीग्राम भामरे (यापुढे त्यांना

जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), जनअपिलीय अधिकारी तथा अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, जळगांव, श्री.अनिल बालाजी लांडगे (यापुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- १३-०३-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कर्तव्य व अधिकारा संदर्भात १९८५ ते २००५ या कालावधीतील माहिती खालील प्रमाणे मागितली होती.

" i) मे.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचे कर्तव्य व अधिकाराची माहिती विशेषतः बोदवड ग्रामपंचायत यांचे बाबतीत देणेत यावी.

ii) ग्रामपंचायत यांचे ठराव नियमानूसार केलेले आहेत किंवा नाही याची पहाणी केली जाते काय याची माहिती द्यावी.

iii) ठराव कायदेशिर व नियमबाहय करण्याचे अधिकार आहेत काय याची माहिती द्यावी. नियमबाहय असल्यास दखल घेण्यात येते काय याची माहिती द्यावी व प्रशासकीय कारवाई केली जाते काय याची माहिती द्यावी.

iv) उपकार्यकारी अधिकारी, बीडीओ साहेब यांचे आदेशाचे पालन ग्रामपंचायतकडून केले जाते काय याची माहिती द्यावी व आदेशाचे पालन केले नसल्यास दखल घेवून प्रशासकीय कारवाई केली जाते काय याची माहिती द्यावी व आदेशाचे पालन करण्याची कायद्याची बंधने व कालावधी असतो काय यांची माहिती द्यावी व आदेशाची पूर्तता झाली आहे अथवा नाही याचे अवलोकन केले जाते काय याची माहिती द्यावी.

v) आदेशाच्या अनुसार प्रत्यक्ष कारवाई होते अथवा कागदोपत्री पूर्तता होते याचे अवलोकन केले जाते काय याची माहिती द्यावी व वास्तविक कारवाई न झाल्यास आदेशाप्रमाणे तर कर्तव्यात कसूर कोणाची होते याची माहिती द्यावी. ”

अपिलार्थीने सदर माहिती टपालाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जनमाहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक-१३-०४-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देण्यात आला.

जनमाहीती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या उत्तराने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- ०६-०५-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपीलावर जनअपिलीय अधिकारी यांनी आयोगास दाखविलेल्या रोजनाम्यावरुन अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक- २४-०७-२००६ रोजी जनमाहिती अधिकारी यांना मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलमान्वये मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अधिकारा बाबत अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केल्याचे दिसून येते. तथापि त्यांनी सुनावणीचे आदेश लिखीत स्वरुपात अपिलार्थीस कळविले नाही, असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. जनअपिलीय अधिकारी यांची ही कृती चुकीची असून त्यांनी सुनावणी आदेश अपिलार्थीस लेखी कळविणे जरुरीचे होते.

जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादामूळे व्यथीत होवून अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- २१-०६-२००६ रोजी व्दितीय अपील सादर केले आहे. हे

व्दितीय अपील सादर करतांना देखील त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून आजपावेतो माहिती प्राप्त झाली नसल्याने हे व्दितीय अपील आयोगाकडे सादर केल्याचे म्हटले आहे. त्याचबरोबर त्यांना प्राप्त झालेली माहिती ही अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी आहे, असेही त्यांनी या अपीलअर्जामध्ये पुढे म्हटले आहे.

आज झालेल्या युक्तीवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद मांडण्यात आला की, जळगाव जिल्हापरिषदेतंर्गत ग्रामपंचायत स्तरावर अनेक बेकायदेशीर ठराव पास करुन घेतले जातात व सदर ठराव बेकायदेशीर असूनही रद्द होण्याबाबत प्रशासनाकडून कोणतीही कार्यवाही केली जात नाही. त्यामुळेच त्यांनी उपरोक्त अर्जाव्दारे माहिती मागितली होती.

जनमाहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक- १३-०४-२००६ रोजी त्यांना आवश्यक असलेली माहिती दिली आहे. अपिलार्थीच्या अपील सुनावणीमध्ये जनअपिलीय अधिकारी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची ग्रामपंचायत कायद्यानूसार कर्तव्ये व त्यांचे अधिकार या संबंधी माहिती अपिलार्थीस देण्याचे नजरचूकीने राहून गेले होते. तथापि ते अपिलार्थीस आता हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १ दिवसाच्या आत ही माहिती देवू शकतील, असे सुनावणीमध्ये सांगितले.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व दोन्हीही बाजूचा युक्तीवाद ऐकता असे दिसून येते की, अपिलार्थीची मूळ तक्रार जिल्हापरिषद व ग्रामपंचायत स्तरावरील कारभारा संदर्भात आहे. त्यांच्या मते बोदवड ग्रामपंचायतचे कामकाज नियमानूसार होत नसून त्यामध्ये अनेक नियमबाहय ठराव पास करुन घेतले जातात व ते नियमबाहय व चुकीचे आहेत, असे कळविल्या नंतरही ते रद्द होण्या संदर्भात प्रशासनाकडून कोणतीही कार्यवाही होत नाही. तेव्हा या प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची नक्की कर्तव्ये काय आहेत व त्यांना

अधिकार काय आहेत हे जाणून घेण्यासाठी त्यांनी ही माहिती जनमाहिती अधिकारी यांचेकडून मागितली होती.

तेव्हा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हापरिषद, जळगांव यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी ग्रामपंचायत बोदवडने सन १९९५-२००५ या कालावधीतील केलेल्या ठरावाची तपासणी करुन त्यातील जे ठराव बेकायदेशीर अथवा नियमबाहय आहेत. ते रद्द करुन घेण्याकरिता अथवा त्यावर जिल्हापरिषद व ग्रामपंचायत कायद्यानूसार काही कार्यवाही करणे शक्य असल्यास त्यांनी त्या संदर्भात पुढील कार्यवाही हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ महिन्याच्या आत करावी.

जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथम सुनावणीचे आदेश लेखी कळविण्या बाबतीत यापूढे सतर्क राहावे असे आयोगातर्फे जनअपिलीय अधिकारी यांना सूचित करण्यात येत आहे व जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जी माहिती अद्यापपर्यंत द्यावयाची राहून गेली आहे ती सर्व माहिती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २४ तासाच्या आत विनामुल्य व साक्षांकित करुन पुरविण्यात यावी.

वरील विवेंचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

## **निर्णय**

१७. अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

१८. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली जी माहिती अद्यापपर्यंत द्यावयाची राहून केली आहे ती सर्व माहिती हे

आदेश निर्गमीत झाल्यापासून १ दिवसाच्या आत विनामुल्य व साक्षांकित करुन पुरवावी.

**जळगाव** **( वि.बा.बोरगे )**

**दिनांक-** २३-१०-२००७ **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

**प्रत**

१. श्री.दिलिपकुमार गौरीशंकर अग्रवाल, रा.मेनरोड बोदवड,तालूका-बोदवड, जिल्हा-जळगाव

२. जनमाहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी,(ग्रा.पं.) जिल्हापरिषद, जळगाव, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जनअपिलीय अधिकारी तथा अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, जळगाव, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५. निर्णयनस्ती.

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

**अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/६३७**

**निर्णय** २३-१०-२००७

**दिनांक**

1 ¸ÉÒ. ¯û{ÉSÉÆnù ®úPÉÖxÉÉlÉ EòÉºÉÉ®ú, : +Ê{É±ÉÉlÉÔ
xÉÉlÉ´ÉÉb÷É ÊVÉ±½þÉ {Éä`ö,
VÉ³ýMÉÉ´É

विरुध्द

1 VÉxÉ ¨ÉÉÊ½þiÉÒ +ÊvÉEòÉ®úÒ :
iÉlÉÉ iÉ½þºÉÒ±ÉnùÉ®ú, ºÉÆVÉªÉ MÉÉÆvÉÒ
ªÉÉäVÉxÉÉ ¶ÉÉJÉÉ, ÊVÉ±½þÉÊvÉEòÉ®úÒ
EòÉªÉÉÇ±ÉªÉ, VÉ³ýMÉÉ´É

2 VÉxÉ +Ê{É±ÉÒªÉ +ÊvÉEòÉ®úÒ : |ÉÊiÉ´ÉÉnùÒ
तथा अपर जिल्हाधिकारी,
जळगाव

<u>विवेचन</u>

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-१०-२००७ रोजी जळगाव येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. रुपचंद रघुनाथ कासार (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, संजय गांधी योजना, जिल्हाधिकारी कार्यालय श्री. ईश्वर बाजीराव राणे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी यांचे प्रतिनिधी उपजिल्हाधिकारी (म. प्र.) श्री. मनोहर चौधरी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

ªÉÉ |ÉEò®úhÉÒ +Ê{É±ÉÉlÉÔxÉä ºÉ´ÉÇ |ÉlÉ¨É iªÉÉÆSªÉÉEòb÷Ò±É ÊnùxÉÉÆEò 16-01-2006 ®úÉäVÉÒSªÉÉ +VÉÉÇx´ÉªÉä VÉxÉ ¨ÉÉÊ½þiÉÒ +ÊvÉEòÉ®úÒ ªÉÉÆSªÉÉEòbä÷ ºÉÆVÉªÉ MÉÉÆvÉÒ ºÉÉ¨ÉÉÊVÉEò ºÉ½þÉªªÉ ªÉÉäVÉxÉäºÉÆnù¦ÉÉÇiÉ VÉÉÉxÉä´ÉÉ®úÒ 2005 iÉä Êb÷ºÉå¤É®ú 2005 ªÉÉ EòÉ±ÉÉ´ÉvÉÒiÉÒ±É JÉÉ±ÉÒ±É |É¨ÉÉhÉä ¨ÉÉÊ½þiÉÒ ¨ÉÉÊMÉiÉ±ÉÒ ½þÉäiÉÒ.

१. “ संजय गांधी सामाजिक सहाय्य योजना समितीच्या सदस्यांची यादी, त्यात संपूर्ण नांव, पत्ता, जातीचे दाखले,

२. तहसीलदार जळगाव यांनी केलेले शिफारस यादी व त्यांना शिफारस करण्याबाबतचे अधिकारपत्र किंवा शासन निर्णय,

३. समितीस मंजुरी मिळाल्याबाबत शासनाचे मंजुरी आदेश पत्र. ”

+Ê{É±ÉÉlÉÔxÉä ½þÒ ¨ÉÉÊ½þiÉÒ ´ªÉÊHò¶[É: +{ÉäÊIÉ±ÉÒ ½þÉäiÉÒ.

अपिलार्थीच्या या अर्जास उद्देशून जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १७-०१-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती तयार असून ती घेण्याकरिता त्यांच्या कार्यालयात समक्ष हजर राहण्यास व आवश्यक ते शुल्क भरुन माहिती घेण्यास सूचित केले. सदर पत्र अपिलार्थीस दिनांक २१-०२-२००६ रोजी प्राप्त झाले. तद नंतर अपिलार्थी यांनी माहिती प्राप्त करुन घेण्यापोटीचे शुल्क रुपये १० जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक २१-०२-२००६ रोजी भरले. व त्याच दिवशी त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून काही माहिती मिळाली.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २३-०३-२००६ रोजी प्रथम अपील केले.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी विहित मुदतीत सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. तथापि त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०९-०५-२००६ रोजी जन माहिती अधिका-याकडून प्राप्त झालेल्या निर्णयाची प्रत अपील अर्जाबरोबर जोडली नसल्याचे निदर्शनास आणून सदर प्रत त्यांना तात्काळ सादर करण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अर्जावर ४५ दिवसामध्ये निर्णय घेणे माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे

अभिप्रेत आहे, तथापि या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी विहित मुदतीत अपिलार्थी-च्या अपील अर्जाची सुनावणी घेतली नसल्याचे दिसून येते.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय न मिळाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिलेली माहिती अपूर्ण असून ती उशीराने दिलेली आहे व त्याच बरोबर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील अर्जाची माहिती अधिकार अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत सुनावणी घेतली गेली नाही यास्तव त्यांना उर्वरीत माहिती मोफत मिळावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्याकडील दिनांक १७-०१-२००६ रोजीच्या पत्रान्वये दिली आहे. सदर पत्र त्यांनी पोस्टामध्ये दिनांक ०७-०२-२००६ रोजी टाकले ते अपिलार्थीस दिनांक २१-०२-२००६ रोजी प्राप्त झाल्याने ती माहिती अपिलार्थीस उशिरा मिळाली असा अपिलार्थीचा गैरसमज झाला आहे. संजय गांधी सामाजिक सहाय्य योजने अंतर्गत सर्व प्रथम पालकमंत्री या समितीच्या प्रस्तावित सदस्यांची यादी जिल्हाधिकारी यांना पाठवितात. यानंतर ही यादी जिल्हाधिकारी शासनाकडे पाठवितात. शासनाकडून मंजूरी प्राप्त झाल्यानंतर समिती गठणाचे आदेश जिल्हाधिकारी यांचेकडून काढले जातात. जर पालकमंत्र्यांनी कोणतीही शिफारस केली नसेल तर जिल्हाधिकारी या समितीच्या सदस्यांच्या नावाची शिफारस शासना-कडे करु शकतात. तहसीलदार यांना या समितीच्या सदस्यांच्या नावाची शिफारस करण्याचे कोणतेही अधिकार नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून सकारात्मक प्रतिसाद मिळण्यास काहीसा विलंब झाल्याचे दिसून येते. त्याच बरोबर अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना पूर्णतः जन माहिती अधिकारी यांनी दिली नसल्याचे दिसून येते. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ च्या माहिती संबंधात सदस्यांच्या जातीचा रकाना सोडून त्यांनी अपिलार्थीस उर्वरीत माहिती दिल्याचे दिसून येते. मुद्दा क्रमांक २ वर जन माहिती अधिकारी यांनी काहीही भाष्य केलेले नाही. कारण मुळात त्यांना सदस्यांच्या नावाची शिफारस करण्याचे अधिकार नव्हते. मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भात समितीस मंजुरी मिळाल्याबाबतच्या आदेशाची प्रत त्यांना अपिलार्थीस देता येणे सहज शक्य होते तथापि त्यांनी तशी कृती केलेली नाही. अपिलार्थीस माहिती देतांना त्यांनी कोणत्याही प्रकारचे पत्र न देता काही कागदाच्या झेरॉक्स प्रती अपिलार्थीस पुरविल्या. या प्रतीतील मजकुरावरुन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची पुर्तता होत नाही असे दिसून येते.

या प्रकरणी असे दिसून आले की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस लिहिलेल्या दिनांक १७-०१-२००६ च्या पत्राची दिनांक ०७-०२-२००६ रोजी पोस्टामध्ये टाकल्याची अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींग प्रत सादर केली आहे. एकदा पत्र दिल्यानंतर ते पोस्टात टाकण्यासाठी त्यांना २१ दिवस इतका कालावधी लागला आहे. या वरुन पत्राच्या तारखेच्या वैधतेविषयी आयोगाच्या मनात शंका निर्माण होत आहे. तेव्हा सदर पत्र पोस्टाने पाठविण्यासाठी एवढा उशीरा का झाला याचा जन माहिती अधिकारी यांनी कसोशीने शोध घेऊन संबंधीत कर्मचा-यावर यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी व आपला अहवाल आयोगास सादर करावा असे त्यांना सूचित करण्यात येत आहे व तसेच अशा प्रकारची कार्यपध्दती त्यांनी यापुढे टाळून त्यांच्या कार्यपध्दतीमध्ये जास्तीत जास्त पारदर्शकता येईल अशा प्रकारची सुधारणा घडवून आणावी असेही त्यांना यापुढे सूचित करण्यात येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन जरी जन माहिती अधिकारी यांचा उद्देश अपिलार्थीपासून मुद्दाम किंवा हेतुपुरःस्सर माहिती लपवून ठेवण्याचा आढळून आला नसला तरी त्यांनी या प्रकरणात अपिलार्थीच्या अर्जातील विनंतीकडे दुर्लक्ष केले आहे हे नाकारता येणे अशक्य आहे. तेव्हा त्यांना आयोगातर्फे अशी ताकीद देण्यात येते की, त्यांनी येथून पुढे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या संदर्भात दाखल झालेल्या अर्जावर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये प्रतिसाद द्यावा. त्याचबरोबर जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीच्या अपिलाची सुनावणी घेतली नसल्याचे दिसून येते. त्यांनाही असे सूचित करण्यात येते की, त्यांनी भविष्यात येथून पुढे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार जी अपिले दाखल होतील त्यावर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये यथायोग्य निर्णय घ्यावा.

तेव्हा असे आदेशीत करण्यात येते की :

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना हे आदेश प्राप्त होताच सदस्याचे जातीचे दाखले वगळून ७ दिवसाच्या आत विनामूल्य देण्यात यावी. सदस्यांच्या जातीच्या दाखल्याबाबत त्यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी या संदर्भात माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ११ च्या तरतुदीनुसार हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २० दिवसाचे आत आवश्यक ती कारवाई करुन अपिलार्थीस आपला निर्णय तदनंतर १० दिवसाचे आत कळवावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

**<u>ÊxÉhÉÇªÉ</u>**

1. +{ÉÒ±É ¨ÉÉxªÉ Eò®úhªÉÉiÉ ªÉäiÉ +É½äþ.
2. VÉxÉ ¨ÉÉÊ½þiÉÒ +ÊvÉEòÉ®úÒ ªÉÉÆxÉÒ +Ê{É±ÉÉlÉÔºÉ iªÉÉÆxÉÒ ¨ÉÚ³ý +VÉÉÇ´nùÉ®äú ¨ÉÉMÉhÉÒ Eäò±Éä±ÉÒ ¨ÉÉÊ½þiÉÒ ´É®úÒ±É Ê´É´ÉäSÉxÉÉ¨ÉvªÉä º{É¹]õ

Eäò±ªÉÉlÉ¨ÉÉhÉä ½äþ +Énäù¶ÉÉ ÊxÉMÉÇ¨ÉÒiÉ ZÉÉ±ªÉÉ{ÉÉºÉÚxÉ 7 Êìnù´ÉºÉÉSªÉÉ +ÉiÉ Ê´ÉxÉÉ¨ÉÚ±ªÉ tÉ´ÉÒ.

3. +Ê{É±ÉÉlÉÔ ªÉÉÆSªÉÉ ¨ÉÚ³ý +VÉÉÇiÉÒ±É, ºÉÊ¨ÉiÉÒ ºÉnùºªÉÉÆSªÉÉ VÉÉiÉÒSªÉÉ nùÉJÉ±ªÉÉºÉÆnù¦ÉÉÇiÉ VÉxÉ ¨ÉÉÊ½þiÉÒ +ÊvÉEòÉ®úÒ ªÉÉÆxÉÒ, Ê´É´ÉäSÉxÉÉ¨ÉvªÉä º{É¹]õ Eäò±ªÉÉlÉ¨ÉÉhÉä, ½äþ +Énäù¶ÉÉ ÊxÉMÉÇ¨ÉÒiÉ ½þÉäiÉÉSÉ 20 Êìnù´ÉºÉÉSÉä +ÉiÉ EòÉªÉÇ´ÉÉ½þÒ Eò¯ûxÉ +É{É±ÉÉ ÊxÉhÉÇªÉ +Ê{É±ÉÉlÉÔºÉ iÉnùxÉÆiÉ®ú 10 Êìnù´ÉºÉÉSÉä +ÉiÉ Eò³ý´ÉÉ´ÉÉ.

जळगाव ( वि. बा. बोरगे )

दिनांक २३-१०-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. रुपचंद रघुनाथ कासार, नाथवाडा जिल्हा पेठ, जळगाव

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, संजय गांधी योजना शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

## अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/६३८

### निर्णय २३-१०-२००७

### दिनांक

1 ¸ÉÒ. ®úÉ¨ÉSÉÆpù nùÉVÉÒ¤ÉÉ {ÉÉ]õÒ±É, : +Ê{É±ÉÉlÉÔ
¨ÉÖ. {ÉÉä. ÊEòxÉMÉÉÆ´É (MÉÉäb÷ºÉä ¦É´ÉxÉ),
iÉÉ±ÉÖEòÉ ªÉÉ´É±É, ÊVÉ±½þÉ VÉ³ýMÉÉ´É

विरुध्द

1 VÉxÉ ¨ÉÉÊ½þiÉÒ +ÊvÉEòÉ®úÒ :
iÉlÉÉ ´ÉètEòÒªÉ +ÊvÉEòÉ®úÒ, |ÉÉlÉÊ¨ÉEò
+É®úÉäMªÉ Eåòpù vÉÉxÉÉä®úÉ, iÉÉ±ÉÖEòÉ
SÉÉä{Éb÷É, ÊVÉ±½þÉ VÉ³ýMÉÉ´É

2 VÉxÉ +Ê{É±ÉÒªÉ +ÊvÉEòÉ®úÒ : |ÉÊiÉ´ÉÉnùÒ
तथा जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, जळगाव

विवेचन

´É®úÒ±É |ÉEò®úhÉÉSÉÒ ºÉÖxÉÉ´ÉhÉÒ +ÉVÉ ÊnùxÉÉÆEò 23-10-2007 ®úÉäVÉÒ VÉ³ýMÉÉ´É ªÉälÉä PÉähªÉÉiÉ +É±ÉÒ. ºÉÖxÉÉ´ÉhÉÒSªÉÉ ´Éä³äýºÉ +Ê{É±ÉÉlÉÔ ¸ÉÒ. ®úÉ¨ÉSÉÆpù nùÉVÉÒ¤ÉÉ {ÉÉ]õÒ±É (ªÉÉ{ÉÖfäø iªÉÉÆxÉÉ +Ê{É±ÉÉlÉÔ +ºÉä ºÉÆ¤ÉÉävÉhªÉÉiÉ ªÉä<Ç±É) ´É VÉxÉ +Ê{É±ÉÒªÉ +ÊvÉEòÉ®úÒ iÉlÉÉ ÊVÉ±½þÉ +É®úÉäMªÉ +ÊvÉEòÉ®úÒ ¸ÉÒ. vÉÖb÷EUò ¤ÉÖvÉÉ ¨É½þÉ±Éä (ªÉÉ{ÉÖfäø iªÉÉÆxÉÉ VÉxÉ +Ê{É±ÉÒªÉ +ÊvÉEòÉ®úÒ +ºÉä ºÉÆ¤ÉÉävÉhªÉÉiÉ ªÉä<Ç±É) ½äþ ½þVÉ®ú +É½äþiÉ iÉ®ú VÉxÉ ¨ÉÉÊ½þiÉÒ +ÊvÉEòÉ®úÒ iÉlÉÉ ´ÉètEòÒªÉ +ÊvÉEòÉ®úÒ, |ÉÉlÉÊ¨ÉEò +É®úÉäMªÉ Eåòpù vÉÉxÉÉä®úÉ, iÉÉ±ÉÖEòÉ SÉÉä{Éb÷É ½äþ MÉè®ú½þVÉ®ú +É½äþiÉ.

ªÉÉ |ÉEò®úhÉÒ +Ê{É±ÉÉlÉÔxÉä º´É´ÉÇ |ÉlÉ¨É iªÉÉÆSªÉÉ ÉÉEòb÷Ò±É ÊnùxÉÉÆEò 24-07-2006 ®úÉäVÉÒSªÉÉ +VÉÉÇx´ÉªÉä VÉxÉ ¨ÉÉÊ½þiÉÒ +ÊvÉEòÉ®úÒ ªÉÉÆSªÉÉEòbä÷ |ÉÉlÉÊ¨ÉEò +É®úÉäMªÉ Eåòpù vÉÉxÉÉä®úÉ ªÉälÉÒ±É Ê¶É{ÉÉ<Ç {ÉnùÉ´É®ú EòÉªÉÇ®úiÉ +ºÉ±Éä±Éä ¸ÉÒ. Ê´É¶ÉÉ±É VÉMÉzÉÉlÉ PÉÉä®ú{Ébä÷ ªÉÉÆSªÉÉ ºÉÆnù¦ÉÉÇiÉ JÉÉ±ÉÒ±É¨ÉÉhÉä ¨ÉÉÊ½þiÉÒ ¨ÉÉMÉÊ´É±ÉÒ ½þÉäiÉÒ. +Ê{É±ÉÉlÉÔSªÉÉ +VÉÉÇ¨ÉvªÉä +É´É¶ªÉEò ¨ÉÉÊ½þiÉÒSªÉÉ EòÉ±ÉÉ´ÉvÉÒSÉÉ =±±ÉäJÉ xÉÉ½þÒ.

“ +É{É±ªÉÉ EòÉªÉÉÇ±ÉªÉÉiÉÒ±É Ê¶É{ÉÉ<Ç Ê´É¶ÉÉ±É VÉMÉzÉÉlÉ PÉÉä®ú{Ébä÷ ªÉÉÆSÉÒ ºÉÊ´ÉºiÉ®ú ¨ÉÉÊ½þiÉÒ ½þ´ÉÒ, PÉÉä®ú{Ébä÷ ½äþ Ê¶ÉEòÉ>ð Ê{ÉÊ®úªÉb÷¨ÉvªÉä +É½äþiÉ ËEò´ÉÉ Eòºä, +É{É±ªÉÉ EòÉªÉÉÇ±ÉªÉÉiÉÒ±É Ê¶É{ÉÉ<Ç ½äþ +ÉìÊ¡òºÉ ¨ÉvÉÒ±É EòÉì]Çõ®ú¨ÉvªÉä ®úÉ½þiÉÉiÉ EòÉ, +{É-b÷É>ðxÉ Eò®úiÉÉiÉ, ½äþ +ÉìÊ¡òºÉ¨ÉvªÉä ®úÉ½þiÉ xÉºÉiÉÉÆxÉÉ ºÉÖvnùÉ VÉ³ýMÉÉ´É ´É¯ûxÉ +{É-b÷É>ðxÉ Eò®úiÉÉiÉ, iªÉÉÆSªÉÉ xÉÉ´ÉÉxÉä ÊEòiÉÒ ]õÒ. B. ¤ÉÒ±É ¨ÉÆVÉÚ®ú Eò®úhªÉÉiÉ +É±Éä, iªÉÉÆSÉä ´ÉÊb÷±ÉÉSÉä xÉÉ´Éä ½äþ Ê®ú]õÉªÉbÇ÷ ®äú±´Éä Eò¨ÉÇSÉÉ®úÒ +ºÉ±ªÉÉ´É®ú ºÉÖvnùÉ iªÉÉÆSªÉÉ xÉÉÆ´ÉÉxÉä {Éäx¶ÉxÉ Ê¨É³ýiÉ +ºÉ±ªÉÉ´É®ú ºÉÖvnùÉ iªÉÉÆSÉä ¨ÉäÊb÷Eò±É ¤ÉÒ±É ¨ÉÆVÉÚ®ú ZÉÉ±Éä Eòºä ªÉÉ¤Éqù±É ºÉÊ´ÉºiÉ®ú ¨ÉÉÊ½þiÉÒ ½þ´ÉÒ, ¨ÉäÊb÷Eò±É ¤ÉÒ±É ÊEòiÉÒ ¨ÉÆVÉÚ®ú ZÉÉ±Éä, ´É ¤ÉÒ±É ¨ÉÆVÉÚ®úÒºÉ iªÉÉÆxÉÒ EòÉähÉEòÉähÉiÉÒ EòÉMÉnù{ÉjÉEäò Ênù±ÉÒ ªÉÉSÉÒ ¨ÉÉÊ½þiÉÒ ½þ´ÉÒ. ”

ºÉnù®ú ¨ÉÉÊ½þiÉÒ +Ê{É±ÉÉlÉÔxÉä ]õ{ÉÉ±ÉÉ´ÉnùÉ®äú +{ÉäÊIÉ±ÉÒ ½þÉäiÉÒ.

+Ê{É±ÉÉlÉÔSªÉÉ ªÉÉ +VÉÉÇ´É®ú VÉxÉ ¨ÉÉÊ½þiÉÒ +ÊvÉEòÉ®úÒ ªÉÉÆxÉÒ +ÊvÉÊxÉªÉ¨ÉÉiÉÒ±É Ê´ÉÊ½þiÉ Eäò±Éä±ªÉÉ EòÉ±ÉÉ´ÉvÉÒ¨ÉvªÉä EòÉähÉiªÉÉ½þÒ |ÉEòÉ®úSÉÉ |ÉÊiÉºÉÉnù Ênù±ªÉÉSÉä +ÉªÉÉäMÉÉºÉ ={É±É¤vÉ Eò¯ûxÉ näùhªÉÉiÉ +É±Éä±ªÉÉ EòÉMÉnù{ÉjÉÉ´É¯ûxÉ ÊnùºÉÚxÉ ªÉäiÉ xÉÉ½þÒ. iÉlÉÉÊ{É VÉxÉ ¨ÉÉÊ½þiÉÒ +ÊvÉEòÉ®úÒ ªÉÉÆxÉÒ +Ê{É±ÉÉlÉÔºÉ ½þÒ ¨ÉÉÊ½þiÉÒ ºÉ®ú³ý{ÉhÉä xÉ näùiÉÉ ½þÒ ¨ÉÉÊ½þiÉÒ ÊVÉ±½þÉ +É®úÉäMªÉ +ÊvÉEòÉ®úÒ ªÉÉÆSªÉÉEòbä÷ {ÉÉ`öÊ´É±ÉÒ. VÉxÉ ¨ÉÉÊ½þiÉÒ +ÊvÉEòÉ®úÒ ªÉÉÆxÉÒ ªÉÉ |ÉEò®úhÉÒ ºÉ´ÉiÉ: +Ê{É±ÉÉlÉÔºÉ ¨ÉÉÊ½þiÉÒ xÉ näùiÉÉ +Ê{É±ÉÉlÉÔxÉä iªÉÉÆxÉÉ Ê´ÉSÉÉ®ú±Éä±ÉÒ ¨ÉÉÊ½þiÉÒ ÊVÉ±½þÉ +É®úÉäMªÉ +ÊvÉEòÉ®úÒ – VÉä ªÉÉ |ÉEò®úhÉÒ VÉxÉ +Ê{É±ÉÒªÉ +ÊvÉEòÉ®úÒ -- +É½äþiÉ iªÉÉÆSªÉÉEòbä÷, iªÉÉÆSÉä EòÉªÉÉÇ±ÉªÉÒxÉ {ÉjÉ ÊnùxÉÉÆEò 09-10-2006 +x´ÉªÉä {ÉÉ`öÊ´É±ÉÒ.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-०८-२००६ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली किंवा कसे हे कळण्यास काही मार्ग नाही. या संदर्भातील कागदपत्रे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे आज रोजी उपलब्ध नाहीत व अपिलार्थी यांनीही आयोगाकडे संबंधीत कागदपत्रे सादर केलेली नाहीत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या कडून कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-१०-२००६ रोजी व्दितीय अपील केले. या

अपिलामध्ये त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २६-०९-२००६ रोजी अपील ठेवले मात्र त्यांनी आवश्यक असलेली माहिती न देता उडवाउडवीची उत्तरे देऊन त्यांच्याकडे पुराव्याची मागणी केली असे म्हटले आहे. त्याचबरोबर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील प्रथम अपिलाचा निर्णय आजपर्यंत दिला नसल्याचे त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिका-याने त्यांना दिलेल्या माहितीपोटी कोणतेही शुल्क न आकारता त्यांना रजिस्टर्ड पोस्टाने माहिती पाठविली. या पाकिटात त्यांनी विचारलेली माहिती नसून कोरे कागद होते. सदर पाकिट तपासण्यासाठी आयोगाने मागितले असता अपिलार्थी ते पाकिट दाखवू शकले नाहीत. अपिलार्थी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे केलेल्या मागणीबाबत आग्रही असून त्यांना सदर माहिती जन माहिती अधिका-याकडून सांक्षांकीत करुन हवी आहे.

जन माहिती अधिकारी हे आज सुनावणीस अनुपस्थित आहेत. त्यांच्या वतीने जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक २६-१०-२००६ रोजी अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती रजिस्टर्ड पोस्टामार्फत दिली असून त्याप्रीत्यर्थ रजिस्टर्ड पोस्टाची व अपिलार्थीची पोच प्रत त्यांनी आयोगास दाखविली. आता हीच माहिती अपिलार्थीस ते साक्षांकीत करुन द्यावयास तयार आहेत.

**आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता अपिलार्थीने मागितलेली माहिती ही त्रयस्त व्यक्तीसंदर्भात असून संबंधीत कर्मचारी विशाल जगन्नाथ घोरपडे यांच्या मेडिकल बिलाच्या प्रती त्यांना हव्या असल्याचे दिसून येते. संबंधीत व्यक्तीच्या मेडिकल बिलाच्या प्रती या कोषागार कार्यालय, जिल्हा आरोग्य अधिकारी, प्राथमिक आरोग्य अधिकारी या सर्वाच्या दप्तरात उपलब्ध असल्याने त्यांना सार्वजनिक माहितीचे स्वरुप प्राप्त होते. तसेच शिपाई श्री. विशाल जगन्नाथ घोरपडे यांना शासकीय तिजोरीतून हे बील अदा**

**केले गेले असल्यामुळे ही माहिती सार्वजनिक माहिती ठरते व त्यामुळे ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देणे भाग आहे.**

उपरोक्त प्रकरणी असेही दिसून येते की, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. अपिलार्थीने त्यांच्याकडे केलेल्या अर्जासंदर्भात त्यांनी दिनांक २३-०८-२००६ रोजी अगर त्यापुर्वी निर्णय घेणे अभिप्रेत आहे. त्यांनी अपिलार्थीने विचारलेली माहिती सरळ अपिलार्थीस त्यांच्याकडे पाठविण्याऐवजी ही माहिती जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे पाठविली. यावरुन त्यांनी आपल्या कर्तव्य परायणतेत कसूर केल्याचे दिसून येते. या प्रकरणी त्यांनी केलेल्या या कसुराबद्दल त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून भविष्यात त्यांच्याकडे माहितीसंबंधी अर्ज प्राप्त झाल्यानंतर सदर अर्जाचा निपटारा त्यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत करावा व वर उल्लेख केल्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ दिवसाच्या आत विनामूल्य द्यावी असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

**<u>ÊxÉhÉÇªÉ</u>**

1. +{ÉÒ±É +Æ¶ÉiÉ: ¨ÉÉxªÉ Eò®úhªÉÉiÉ ªÉäiÉ +É½äþ.
2. VÉxÉ ¨ÉÉÊ½þiÉÒ +ÊvÉEòÉ®úÒ ªÉÉÆxÉÒ +Ê{É±ÉÉlÉÔºÉ iªÉÉÆxÉÒ ¨ÉÚ³ý +VÉÉÇ´nùÉ®äú ¨ÉÉMÉhÉÒ Eäò±Éä±ÉÒ ¨ÉÉÊ½þiÉÒ ½äþ +Énäù¶É ÊxÉMÉÇ¨ÉÒiÉ ZÉÉ±ªÉÉ{ÉÉºÉÚxÉ 3 Ênù´ÉºÉÉSªÉÉ +ÉiÉ ºÉÉlÉÉÆEòÒiÉ Eò¯ûxÉ Ê´ÉxÉÉ¨ÉÚ±ªÉ tÉ´ÉÒ.

जळगाव ( वि. बा. बोरगे )

दिनांक २३-१०-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. रामचंद्र दाजीबा पाटील, मु. पो. किनगांव (गोडसे भवन), तालुका यावल, जिल्हा जळगाव

२ जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र धानोरा, तालुका चोपडा, जिल्हा जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमाक २००७/रामाआ/अपील/सिआर/६३९

निर्णय दिनांक- २३-१०-२००७.

१ श्रीमती सुनिता केशव कोल्हे : अपिलार्थी
स्वामिनारायण मंदिराजवळ,
मु.पो.सावदा, तालूका रावेर, जिल्हा-जळगाव

विरुध्द

१ जनमाहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापक, नामदेव गोमाजी पाटील
माध्यमिक विद्यालय उदळी तालूका-रावेर
जिल्हा-जळगाव.

२. जनअपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हापरिषद,
जळगाव.

## विवेंचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनाक- २३-१०-२००७ रोजी जळगाव येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. श्रीमती सुनिता केशव कोल्हे ( यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल),जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नामदेव गोमाजी पाटील माध्यमिक विद्यालय उदळी तालूका रावेर, जिल्हा- जळगाव, श्री.किशोर राघव महाजन (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत. तर जनअपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हापरिषद, जळगाव (यापुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- १७-०१-२००६ रोजीच्या अर्जान्वये सन १९९८-१९९९ या कालावधीतील त्यांच्या सेवा व आस्थापना विषयक बाबी संदर्भात जनमाहिती अधिकारी यांच्याडे एकूण ५ मुद्यावर खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

‘‘ अ) १. ज.शि.मंडळ, माध्यमिक विद्यालय उदळी स्कूल कमेटी यांचे जा.क्र.९३/ ९९-२००० दिनांक-२१/ ११/९९ च्या पत्राची साक्षांकित झेरूक्स प्रत मिळावी.

२. जा.क्र.९३ / ९९-२००० दि.२१.११.९९ च्या पत्रानुसार श्री.एन.जी.पाटील माध्यमिक विद्यालय उदळी ता.रावेर येथे हजर झाल्यापासुन शिक्षक हजेरी पत्रकावर मी केलेल्या हजेरी पत्रकाची झेरॉक्स प्रत मिळावी.

३. जा.क्र.९३/ ९९-२००० दि.२१.११९९ च्या पत्रानुसार मा.शिक्षणाधिकारी (माध्य) जळगाव हयांचेकडे पाठविलेल्या प्रस्तावाची जावक क्रमांक व दिनांकासहीत झेरॉक्स प्रत मिळावी.

४. जा.क्र.९३/९९-२००० दिनांक- २१-११-९९ नुसार जो प्रस्ताव मा.शिक्षणाधिकारी (माध्य) जळगांव हयांना पाठविलेला असेल आणि मा.शिक्षणाधिकारी (माध्य) जळगांव हयांनी प्रस्तावाला दिलेल्या उत्तराची झेरॉक्स प्रत मिळावी.

५. जा. क्र.९३/९९-२००० दि २१-११-९९ नुसार मी नोकरी शिक्षक म्हणून रुजु झाल्यानंतर मुख्याध्यापक व पर्यवेक्षक हयांनी केलेल्या पाठाचे निरिक्षणाची झेराक्स प्रत मिळावी.

ब) १. मी श्रीमती सुनिता केशव कोल्हे दि.२३.११.९८ ते दि.२०.२.९९ हया कालावधीमध्ये आपल्या विद्यालयात शिक्षीकेचे काम केले आहे त्या संबंधीचे नेमणूकीच्या पत्राची झेरॉक्स प्रत मिळावी.

२. दि.२३.११.९८ ते २०.२.९९ हया कालावधीमध्ये आपल्या विद्यालयाच्या शिक्षक हजेरी पत्रकावर मी सहया केल्या आहे त्या सहयाची व त्याकाळातील हजेरी पत्रकाची झेरॉक्स प्रत मिळावी.

३. दि.२३.११.९८ ते २०.२.९९ हया कालावधीमध्ये मी शिक्षीकेची नोकरी केली आहे आणि हया कालावधीला मा.शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

हयांची  मान्यता लागते त्या विषयी आपण मा. शिक्षणाधिकारी हयांना पाठविलेल्या पत्राची झेरॉक्स प्रत मिळावी.

४. दि.२३.११.९८ ते २०.२.९९ हया कालावधीना मा.शिक्षणाधिकारी जळगांव हयांनी दिलेल्या उत्तराच्या पत्रांची झेरॉक्स प्रत मिळावी.

५. अपिल प्राधिकरणाचा संपूर्ण पत्ता मिळावा.

अपिलार्थीने ही माहिती नोंदणीकृत टपालाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जनमाहिती  अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक- २१-०१-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देवून ''अपिलार्थीस माहिती मिळविण्याचा हक्क व अधिनियम २००५  जोडपत्र अ {कलम ६ (१)} नूसार क्रमांक ३ मधील क्रमांक ६ ची माहिती नसल्यामूळे अर्ज फेटाळण्यात येत आहे. तरी अर्ज परिपूर्ण सादर करावा,'' असे उत्तर दिले आहे व अपिलार्थीचा अर्ज जनमाहिती अधिका-यास अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन त्यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्यास नकार दिला, असे या ठिकाणी अनुमान काढण्यास हरकत नाही.

जनमाहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- ०९-०२-२००६  रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली असल्याचे दिसून येते.

अपिलार्थीने सदर अपील शिक्षणाधिकारी माध्यमिक जिल्हापरिषद, जळगाव यांच्याकडे केले होते. सदर अपिल अर्जावर जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्या आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जाची सुनावणी ते का घेवू शकले नाही. याची कारणे आज ते सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्यामूळे नोंदवून घेता येत नाही.

अपिलार्थी यांच्या म्हणण्यानूसार त्यांनी केलेल्या अपील अर्जावर जनअपिलीय अधिकारी यानी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतलेली नाही. जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादामूळे व्यथीत होवून अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतुदीनूसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- ०८-०६-२००५ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळमाहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्या दिनांक-२२-११-१९९९ पासून संबंधित शाळेच्या सेवेत उप शिक्षीका पदी कार्यरत होत्या. त्या शाळेचे मस्टरवर त्यांच्या सहया आहेत. तव्दतच त्यांना दोन वर्षाकरिता नेमणूक पत्र सुध्दा सदर संस्थेने दिले आहे. त्यांनी दोन वर्षे सेवा करुनही त्यांना २ वर्षाच्या सेवेचा पगार संबंधित शिक्षण संस्थेने दिला नाही. त्यामूळे त्या शाळेची चौकशी करुन संबंधितांना योग्यती शास्ती लावावी. त्यांनी नामदेव गोमाजी पाटील माध्यमिक विद्यालय उदळी तालूका रावेर जिल्हा- जळगाव येथे उप शिक्षीका पदी काम केले असल्यामूळे त्यांच्या संदर्भात जिल्हापरिषद (माध्यमिक) जिल्हापरिषद, जळगाव यांच्याकडे मंजूरीस्तव सादर केलेल्या

प्रस्तावाची सत्यप्रत व त्या संदर्भातील कागदपत्राच्या सत्यप्रती आजही त्यांना आवश्यकता आहे.

जनमाहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थी यांचे सासरे व सदर शिक्षण संस्थेचे संस्थापक यांची मैत्री असल्यामूळे सदर शिक्षण संस्थेच्या संस्थापकाने अपिलार्थीस २ वर्षाकरिता जरी नेमणूकीचे पत्र दिले असले तरी त्यांना तत्कालीन मुख्याध्यापक यांनी सेवेमध्ये रुजू करुन घेतले नव्हते.

जनमाहिती अधिकारी यांची अपिलार्थी यांच्या दिनांक-१७-०१-२००६ रोजीचा अर्ज फेटाळण्याची कृती यास्तव चुकीची आहे की, अपिलार्थीने यामध्ये माहितीचा अधिकार अधिनियमातील ज्या कलमाचा संदर्भ उद्धृत केला आहे. ते कलम मूळात माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये अस्तित्वातच नाही. याचबरोबर अपिलार्थीने त्यांनी दिनांक-०९-०१-२००६ रोजी केलेल्या दुस-या एका अर्जा संदर्भात, त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दिनांक-१३-०१-२००६ रोजी प्राप्त झालेल्या पत्राची प्रत दिली आहे. या पत्रामध्ये देखिल अपिलार्थीने ज्यासाठी माहिती आवश्यक आहे त्यासाठीचे प्रयोजन न दिल्याने जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा अर्ज फेटाळला आहे. यावरुन अपिलार्थीस माहिती न देण्याचा जनमाहिती अधिकारी यांनी जणू चंगच बांधला होता, असे दिसून येते. अपिलार्थीस विहित मुदतीत कोणत्याही प्रकारे माहिती न देवून त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ विषयी त्यांच्या मनात असलेला अनादर व्यक्त केला आहे त्यांनी आपल्या या कृतीव्दारे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) चा निःसंशयपणे भंग केल्याचे व आपल्या कर्तव्यात कुचराई केल्याचे सिध्द होत आहे. त्यामूळे संबंधित जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनूसार अर्ज करुनही

त्यांना विहित मुदतीत कोणतीही माहिती न दिल्याबद्दल त्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २०(१) च्या तरतुदीनूसार प्रतिदिनी २५०/- रुपये या प्रमाणे एकूण रुपये २५,०००/- (पंचवीस हजार रुपये) इतकी शास्ती लावण्याचे आदेशीत करण्यात येत आहे. त्यांनी सदर शास्तीची रक्कम हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत पुढील शिर्षाखाली जिल्हाकोषागारात जमा करावी.

**"००७० इतर प्रशासनिक सेवा, ६० इतर सेवा, ८०० इतर जमा रक्कम, १८ माहितीचा अधिकार ००७०-००६-१"** व तसे केल्याचा अनुपालन अहवाल शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हापरिषद, जळगाव यांनी हे आदेश निर्गमित झाल्यापासून ४५ दिवसाचे आत आयोगास सादर करावा. त्याचबरोबर पुढे असेही आदेशीत करण्यात येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ दिवसाच्या आत विनामूल्य व साक्षांकित करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपीलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

६. अपीलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

७. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत साक्षांकित करुन विनामूल्य पुरवावी.

८. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील माहिती त्यांना कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय देण्याचे नाकारल्याबद्दल त्यांच्यावर

प्रतिदिनी २५०/- रुपये प्रमाणे एकूण २५,०००/- रुपये (पंचवीस हजार रु.) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. त्यांनी निकालपत्रामध्ये नमूद केलेल्या शिर्षाखाली शास्तीची रक्कम हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत जिल्हाकोषागारात जमा करावी.

९. वरील आदेश क्रमांक- ३ च्या अनुपालनाचा अहवाल शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हापरिषद, जळगाव यांनी हे आदेश निर्गमित झाल्यापासून ४५ दिवसाच्या आत आयोगास सादर करावा.

जळगाव ( वि.बा.बोरगे)
दिनांक- २३-१०-२००७ राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद.

प्रत,

१७. श्रीमती.सुनिता केशव कोल्हे, स्वामिनारायण मंदिराजवळ, सावदा, तालूका-रावेर, जिल्हा-जळगाव.

१८. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नामदेवराव गोमाजी पाटील माध्यमिक विद्यालय, उदळी तालूका-रावेर, जिल्हा-जळगाव, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१९. जनअपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हापरिषद, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

२०. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हापरिषद, जळगाव, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत

मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६. निर्णयनस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

अपील क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/७९
निर्णय दिनांक- २४-१०-२००७

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री.भालचंद्र मुंजु ठाकूर उर्फ बापू ठाकूर<br>संपादक साप्ताहिक आक्रन्दन,धुळे.<br>जिल्हा-धुळे. | : | तक्रारदार |
| | विरुध्द | | |
| १ | उपविभागीय अधिकारी, सार्वजनिक बांधकाम<br>उपविभाग क्रमांक-२, शहदा, जिल्हा-नंदूरबार. | : | प्रतिवादी क्रमांक-१ |
| २. | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,<br>शहादा, जिल्हा-नंदूरबार. | | प्रतिवादी क्रमांक-२ |

## विवेंचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- २४-१०-२००७ रोजी धुळे येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तक्रारदार श्री.भालचंद्र मुंजु ठाकूर उर्फ बापू ठाकूर (यापुढे त्यांना तक्रारदार असे संबोधण्यात येईल), प्रतिवादी क्रमांक-१ उपविभागीय अधिकारी, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक-२, शहदा, श्री.शिवाजी हरी पाटील (यापुढे त्यांना प्रतिवादी क्रमांक-१ असे संबोधण्यात येईल), प्रतिवादी क्रमांक-२ तथा कार्यकारी अभियंता,

लछमनसिंह भगवानसिंह चंदेल, (यापुढे त्यांना प्रतिवादी क्रमांक-२ असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी तक्रारदाराने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- ११-०८-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे सार्वजनिक बांधकाम उपविभाग शहदा यांच्याकडे सन २००५ ते २००६ या कालावधीतील त्यांच्या कार्यक्षेत्रातील विविध विकास योजनेतंर्गत घेतलेल्या कामांची माहिती मागितली होती. त्यामध्ये मंजूर रक्कम कामाची सद्यस्थिती, जुलै, २००६ अखेर झालेला खर्च संबंधित कामावर देखरेख ठेवणारे कनिष्ठ अभियंत्याचे नाव, काम ठेकेदारीने दिलेले असल्यास संबंधधीत ठेकेदार किंवा मजूर कामगार संस्थेचे नाव या मुद्याचा समावेश होता.

तक्रारदाराने सदर माहिती सर्वसाधारण टपालाने अपेक्षिली होती.

सदर माहिती तक्रारदाराने विहित मुदतीत न मिळाल्याने त्यांनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग शहादा यांच्याकडे महाराष्ट्र माहितीचा अधिकार २००२ मधील ११ (१) अन्वये अपील दाखल केले आहे. सदर अपीलअर्जावर जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून दिनांक- १७-१०-२००६ रोजी सुनावणी ठेवली होती तथापि या दिवशी सुनावणी होवू शकली नाही. परंतु अंतिम सुनावणी दिनांक-३०-१०-२००६ रोजी होवून या सुनावणी संबंधित आदेश प्रतिवादी क्र.२ यांनी दिनांक- ०६-११-२००६ रोजी पारीत केले. तथापि सदर सुनावणीचे आदेश तक्रारदार यांना प्राप्त झालेले नाहीत. असे त्यांनी आज सुनावणीमध्ये सांगितले.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व केलेला युक्तीवाद पाहता, असे दिसून येते की, तक्रारदाराने प्रतिवादी क्र.१ व २ यांच्याकडे महाराष्ट्र माहितीचा अधिकार

२००२ अन्वये माहिती मागविली होती व प्रतिवादी क्रमांक-२ यांच्याकडे नंतर अपील केले होते. तक्रारदाराने माहिती मागण्याच्या दिवशी म्हणजेच दिनांक-११-०८-२००६ रोजी महाराष्ट्र माहितीचा अधिकार २००२ हा निरसीत झाला होता. त्यावेळी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा अस्तित्वात आला होता. त्यामूळे असे आदेशीत करण्यात येते की, तक्रारदाराने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये त्यांना अद्यापही ही माहिती हवी असेल तर दिनांक- ११ ऑक्टोंबर, २००५ रोजी पारीत झालेल्या अधिनियमातील तरतूदीप्रमाणे त्यांनी माहितीसाठीचा अर्ज संबंधित जनमाहिती अधिकारी यांच्याकडे परत अर्ज करावा.

राज्य माहिती आयोगाला आता, महाराष्ट्र माहितीचा अधिकार २००२ निरसीत झाल्यामूळे त्यावर निर्णय घेण्याची कोणतीही अधिकारीता नसल्यामूळे तक्रारदाराचा तक्रारअर्ज निकाली काढण्यात येत आहे व त्याचबरोबर संबंधित प्रतिवादी क्रमांक-१ उपअभियंता व प्रतिवादी क्रमांक-२ कार्यकारी अभियंता यांना असे सूचित करण्यात येत आहे की, तक्रारदाराचा अर्ज त्यांना परत प्राप्त झाल्यानंतर त्यावर अधिनियमात विहित केलेल्या मुदतीतच त्यांनी अपिलार्थीच्या अर्जावर आवश्यक ती कार्यवाही करावी.

वरील विवेंचनाच्या पार्श्वभूमीवर तक्रारदाराची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

## निर्णय

१९. तक्रारदाराची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**धुळे** **( वि.बा.बोरगे )**

**दिनांक- २४-१०-२००७** **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

**प्रत**

१. तक्रारदार श्री.भालचंद्र मुंजु ठाकूर उर्फ बापू ठाकूर, संपादक, साप्ताहिक आक्रन्दन, धुळे. जिल्हा-धुळे.

२. प्रतिवादी क्रमांक-१,उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, शहादा, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. प्रतिवादी क्रमांक-२, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग शहादा जिल्हा नंदूरबार, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५. निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेला अर्ज

**क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/८०**

**निर्णय** २४-१०-२००७

**दिनांक**

१ श्री. ए. एस. पाटील, : अर्जदार

७, गायत्रीनगर, देवपूर,

धुळे

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी

तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम

विभाग, धुळे

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-१०-२००७ रोजी धुळे येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अर्जदार श्री. ए. एस. पाटील (यापुढे त्यांना अर्जदार असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग श्री. पद्‌माकर भागवतराव भोसले (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (रोहयो) धुळे हे हजर आहेत.

या प्रकरणी अर्जदाराने कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, धुळे यांच्याकडे दिनांक ०१-१२-२००५ रोजी चिप्पी मोहाने कुत्तरखांब रस्त्यास खदानीवरुन सन ४/२००२ मध्ये ७८-६६ घनमिटर व २१०-९३ घनमिटर खडी सार्वजनिक बांधकाम विभागा मार्फत वापरली गेली असल्याचा अहवाल पत्र लेखा/साक्री/१३६०/२००२, दिनांक १३-०८-२००२ रोजी सादर केला आहे. सदर खडी वापरल्याची देयके, शिल्लक खडीचा आरएमआर,

खडी वापरासंबंधीचे आदेश व पत्रव्यवहाराच्या साक्षांकीत प्रती मिळाव्यात अशी मागणी केली होती.

कार्यकारी अभियंता यांनी यावर अर्जदारास त्यांच्याकडील दिनांक २०-१२-२००५ रोजी अर्जदाराने मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध नसून सदर काम हे रोहयो (सार्वजनिक बांधकाम विभाग धुळे) यांच्या अंतर्गत झाले असल्याचे कळविले आहे.

अर्जदारास आता वापरलेल्या खडीची देयके, शिल्लक खडीचा आर एम आर, शिल्लक खडी याच्या प्रती हव्या होत्या.

आज सुनावणीस सदर कामाचे या विभागाशी संबंधीत रोहयो विभागाचे कार्यकारी अभियंता हे देखील उपस्थित होते. त्यांनी आयोगासमोर शपथपत्राव्दारे असे सांगितले की, अर्जदाराने मागितलेल्या मागणी केलेल्या माहितीपैकी कोणतीही माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही. जन माहिती अधिकारी सार्वजनिक बांधकाम विभाग धुळे व सार्वजनिक बांधकाम विभाग रोहयो धुळे यांनी आयोगासमोर शपथपत्रावर अर्जदाराने मागितलेली माहिती त्यांच्याकडे शोध करुनही उपलब्ध नाही हे पाहता अर्जदाराने मागितलेली माहिती त्यांना उपलब्ध करुन देणे शक्य नाही हे सिध्द होत आहे. सदर शपथपत्राची प्रत त्यांनी अर्जदारास विनामूल्य व तात्काळ पुरवावी.

सबब, अर्जदाराचा उपरोक्त तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

धुळे ( वि. बा. बोरगे )

दिनांक २४-१०-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. ए. एस. पाटील, ७, गायत्रीनगर, देवपूर, धुळे

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

**अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/६४०**

**निर्णय दिनांक** **२४-१०-२००७**

१ श्री. सुनिल चंद्रकांत पवार, : अपिलार्थी
मु. पो. कमखेडा, तालुका शिंदखेडा,
जिल्हा धुळे

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी :
तथा अध्यक्ष, गुरुदत्त विद्या प्रसारक मंडळ,
कमखेडा, तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त,
धुळे

<u>विवेचन</u>

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-१०-२००७ रोजी धुळे येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. सुनिल चंद्रकांत पवार (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, गुरुदत्त विद्या प्रसारक मंडळ श्री. मनोहर दत्तात्रय पवार (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त श्री. शांताराम वसंत मुळे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १०-०२-२००६ रोजीच्या अर्जान्वये अध्यक्ष गुरुदत्त विद्या प्रसारक मंडळ कमखेडा यांच्याकडे त्यांच्या शैक्षणिक संस्थेच्या सन २००४ ते २००६ या कालावधीतील इमारत निधी व संस्थेकडे प्राप्त झालेल्या देणग्या संदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

१. " संस्थेने इमारत निधी, देणग्या घेतल्या आहेत काय,

२. देणगी / इमारत निधी गोळा केलेल्या असल्यास त्या कोणत्या बॅकेत खात्यावर जमा आहेत तो खाते नंबर व बॅकेचे नांव,

३. देणगी / इमारत निधी बॅक खातेवरील अधिकार कोणाला आहे, किती व्यक्तींच्या सही अधिकाराने खातेवरील व्यवहार चालतो,

४. देणगी / इमारत निधी गोळा करण्यासाठी किती पावती पुस्तके छापली, किती इमारत निधी / देणगी जमा झाली, जमा निधीपैकी किती रक्कम खर्ची झाली, कोणत्या कामासाठी, किती रक्कम शिल्लक आहे,

५. संस्थेच्या बांधकामासंदर्भात निविदा मागविल्या होत्या का, मागविलेल्या असल्यास कधी व केव्हा मागितल्या होत्या त्याचा तपशील,

६. संस्थेच्या इमारत बांधकामाची परवानगी घेतली आहे काय,

७. संस्थेचे इमारत बांधकामाचे क्षेत्र, ठिकाणे, बिनशेती आहे काय,

८. इमारत बांधकाम जागा संस्थेच्या नावावर आहे काय.”

सदर माहिती अपिलार्थीने टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीचा माहितीसाठीचा सदर अर्ज प्राप्त झाल्यानंतर अध्यक्ष गुरुदत्त विद्या प्रसारक मंडळ कमखेडा यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १७-०२-२००६ रोजीच्या पत्रान्व्ये माहितीचा अधिकार कायदा त्यांच्या संस्थेस लागू होत नसल्याचे कारण देऊन अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले.

जन माहिती अधिकारी यांच्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांचेकडे दिनांक २७-०२-२००६ रोजी या संदर्भात प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे व त्याच बरोबर संस्थेच्या माहिती अधिका-याने माहिती पुरविली नाही व माहिती देण्यास विलंब केला त्यामुळे या कायद्यानुसार त्यांना योग्य तो दंड आकारण्याची विनंती केली आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर सहाय्यक धर्मादाय आयुक्त धुळे विभाग यांनी सुनावणी घेऊन दिनांक ०७-०८-२००६ रोजी आपले आदेश पारीत केले आहे. या आदेशा मध्ये त्यांनी अपिलार्थीचे अपील अंशतः मंजूर करुन अपिलार्थीस त्यांनी मागितलेली संपूर्ण

माहिती अध्यक्ष गुरुदत्त विद्या प्रसारक मंडळ प्राधिकरणाने १५ दिवसाच्या आत पुरविण्याचे आदेश दिले.

धर्मादाय आयुक्त यांनी आदेश देऊनही संबंधीत संस्थेने अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती न पुरविल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०८-२००६ रोजी व्दितीय अपील केले. अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करेपर्यत देखील अपिलार्थीस संबंधीत शिक्षण संस्थेकडून कोणतीही माहिती मिळाली नसल्याचे त्यांनी अपील अर्जामध्ये नमूद केले आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना मुद्दाम गुरुदत्त विद्या प्रसारक मंडळाच्या अध्यक्षांनी माहिती देण्यास जाणुन-बुजून टाळाटाळ केली व विलंब लावला त्यामुळे त्यांच्यावर माहिती अधिकार अधिनियमामधील तरतुदीनुसार शास्ती लावावी. त्यांनी सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांच्याकडे अपील केल्यानंतर या अपिलाची सुनावणी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीप्रमाणे ४५ दिवसात होणे आवश्यक असले तरी ही सुनावणी १६० दिवसांनी झाली. त्यांना संबंधीत शिक्षण संस्थेकडून दिनांक ०१-०९-२००६ रोजी पोस्टाने ही माहिती प्राप्त झाली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदींची काहीही कल्पना नसल्याने त्यांनी अद्यापही सदर शिक्षण संस्थेच्या कार्यालयाकरिता जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांची नेमणूक केलेली नाही. या कायद्यातील तरतुदींची त्यांना काहीही कल्पना नसल्याने त्यांनी अपिलार्थीस सुरुवातीस माहिती दिली नाही. सदर अधिनियम त्यांच्या संस्थेस लागू होत नाही अशी त्यांची धारणा झाल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस माहिती दिली नाही. अपिलार्थीस माहिती देण्याकरिता त्यांनी कोणत्याही प्रकारे टाळाटाळ केली नाही. सहाय्यक धर्मादाय

आयुक्तांचे दिनांक ०७-०८-२००६ चे आदेश त्यांच्याकडे दिनांक ११-०८-२००६ ला प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीने मागितलेल्या सर्व कागदपत्रांची पुतर्ता करुन त्यांनी अपिलार्थीस दिनांक २५-०८-२००६ रोजी पोस्टाने माहिती पाठविली. सदर माहिती अपिलार्थीस दिनांक ०१-०९-२००६ रोजी प्राप्त झाली. या प्रकरणी त्यांनी मुद्दामहून माहिती देण्यास टाळाटाळ केली नसल्यामुळे केवळ कायद्याबाबत अज्ञान असल्यामुळे त्यांना अपिलार्थीस माहिती पुरविण्यापोटी विलंब झाला असाही युक्तिवाद त्यांनी पुढे मांडला. त्यांनी ही माहिती अपिलार्थीस दिनांक २५-०८-२००६ रोजी विनामूल्य पोस्टाने पाठविली होती.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व युक्तिवाद पाहता असे स्पष्ट होते की, गुरुदत्त विद्या प्रसारक मंडळ या संस्थेस शासनाकडून नियमीतपणे अनुदान प्राप्त होत असते. सदर संस्थेची रजिस्ट्रेशन ऑफ सोसायटीज ॲक्ट १८६० अन्वये धर्मादाय आयुक्त यांच्याकडे नोंदणी झालेली आहे. एवढे सर्व असतांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी या संस्थेस लागू होत नाही हे संस्थेच्या अध्यक्षांचे म्हणणे पूर्णतः निराधार आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील सर्व तरतुदी या संस्थेस लागू होत असल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (१) मधील तरतुदीनुसार या संस्थेने त्यांच्याकडील सर्व शाळामध्ये / महाविद्यालयामध्ये -- जन माहिती अधिकारी त्यांच्या नेमणूका तातडीने कराव्यात -- असे त्यांना आदेशीत करण्यात येत आहे.

अपिलार्थीने या प्रकरणी सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१)नुसार प्रथम अपील केले आहे. अपिलार्थीची ही कृती बरोबर नाही. मुळात सहाय्यक धर्मादाय आयुक्त हे या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी नाहीत. कारण या माहिती अधिकार अधिनियमान्वये सहाय्यक धर्मादाय आयुक्त हे त्यांच्या कार्यालयातील उपलब्ध असलेल्या माहिती संदर्भात व त्यांचे कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांचे निर्णयासंदर्भातच फक्त जन अपिलीय अधिकारी म्हणून काम करु शकतात.

या प्रकरणामध्ये सहाय्यक धर्मादाय आयुक्त, जन अपिलीय अधिकारी म्हणून विशिष्ट नेमणुकीशिवाय काम करु शकत नाहीत. अपिलार्थी यांचे असे म्हणणे आहे की, त्यांना संबंधीत शिक्षण संस्थेने त्यांच्या निर्णयाविरुध्द कोणाकडे अपील करावे हे कळविले नव्हते. परंतु येथे प्रश्न असा येतो की, मुळात या संस्थेची, माहिती अधिकार अधिनियम त्यांना लागू होत नाही अशी धारणा आहे व त्यामुळे त्यांनी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या नेमणुका देखिल केलेल्या नाहीत. त्यामुळे अपिलार्थीच्या म्हणण्यास परस्पर उत्तर मिळत आहे. शिक्षण खात्याने शिक्षण संस्थासंदर्भात सर्व शाळांचे व महाविद्यालयाचे जन माहिती अधिकारी संबंधीत मुख्याध्यापक हे असतील व जन अपिलीय अधिकारी सर्व संबंधीत संस्थांचे सचिव असतील अशा अर्थाचे परिपत्रक दिनांक २७-०४-२००६ रोजी जारी केले आहे. हे परिपत्रक उपरोक्त शिक्षण संस्थेकडे प्राप्त झाले नसल्याचे त्यांनी आज आयोगासमोर सांगितले आहे. अशा प्रकारच्या अनेक संस्थांमध्ये अद्यापही जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या नेमणुका केल्या गेल्या नसल्याची शक्यता नाकारता येत नाही. **तेव्हा शिक्षण संचालक यांनी त्यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या सर्व शाळांमध्ये आणि सर्व शैक्षणिक मध्ये माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांच्या नेमणूका झाल्या किंवा कसे याबाबत परत तपासणी करणे गरजेचे आहे असे आयोगास वाटते.**

उपरोक्त प्रकरणी मुळात अपिलार्थीने चुकिच्या प्राधिकरणाकडे माहितीसाठीचा अर्ज व अपील केले आहे. सदर प्रकरणी प्राधिकरणाने त्यांनी मागितलेल्या माहितीच्या प्रयोजनार्थ कोणत्याही विशिष्ट आदेशाव्दारे जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांची नेमणूक केली नसल्याने अपिलार्थीचे आयोगाकडे कलम १९ (३) अन्वये केलेले व्दितीय अपील तथ्यहीन झाले आहे. अपिलार्थीने आयोगास संबंधीत शाळेच्या मुख्याध्यापकास त्यांनी माहिती देण्यापोटी लावलेल्या विलंबाबाबत शास्ती लावण्याची विनंती केली आहे. मुळात या

संस्थेने संबंधीत मुख्याध्यापकाची जन माहिती अधिकारी म्हणून नेमणूक केली नसल्यामुळे अपिलार्थीची जन माहिती अधिका-यास शास्ती लावण्याची मागणी आयोगास मान्य करता येणार नाही, तथापि या शिक्षण संस्थेने माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५ (१) चे सरळ व १९ (१) च्या तरतुदींचे अप्रत्यक्षपणे उल्लंघन केल्याचे स्पष्ट होत आहे त्यामुळे अपिलार्थीने आयोगाकडे अधिनियमातील कलम १९ (३) अन्वये केलेले अपील ही त्यांची अधिनियमातील कलम १८ प्रमाणे केलेली तक्रार समजून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ (२) मधील तरतुदी अन्वये सदर शिक्षण संस्थेवर शिक्षण संचालक, पुणे यांनी व धर्मादाय आयुक्त यांनी यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

**<u>निर्णय</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

२. शिक्षण संचालक, पुणे व धर्मादाय आयुक्त, धुळे यांनी गुरुदत्त विद्या प्रसारक मंडळ कमखेडा, तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे या संस्थेवर त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुद क्रमांक ५ (१) व १९ (१) चा भंग केल्याबद्दल यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करावी.

३. गुरुदत्त विद्या प्रसारक मंडळ कमखेडा, तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे या संस्थेतील सर्व शाळा, महाविद्यालये यांच्या मुख्याध्यापकाची / प्राचार्यांची जन माहिती अधिकारी म्हणून हे आदेश प्राप्त होताच ३ दिवसात सदर संस्थेने नेमणूक करावी.

धुळे ( वि. बा. बोरगे )

दिनांक २४-१०-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुनिल चंद्रकांत पवार, मु. पो. कमखेडा, तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे

२ जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, गुरुदत्त विद्या प्रसारक मंडळ, कमखेडा, तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ धर्मादय सह आयुक्त, धर्मादाय सह आयुक्त यांचे कार्यालय, जानकी प्लॉझा, व्दारका सर्कल, पुणे रोड, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग, ससून हॉस्पिटल जवळ, पुणे - ०१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

७ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/६४१
निर्णय दिनांक- २४-१०-२००७

१ श्री.पुरुषोत्तम लोटन पाटील, सदस्य, ग्रामपंचायत, वर्शी, रा.वर्शी, तालूका-शिंदखेडा, जिल्हा-धुळे. : अपिलार्थी

विरुध्द

१ जनमाहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत वर्शी, तालूका-शिंदखेडा, जिल्हा-धुळे. : प्रतिवादी

२. जनअपिलीय अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, शिंदखेडा, जिल्हा-धुळे.

## <u>विवेंचन</u>

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- २४-१०-२००७ रोजी धुळे येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री.पुरोषत्तम लोटन पाटील (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जनमाहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, वर्शी, श्री.पाटील दिलीप ढगाजी (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (ग्रा.पं.) पंचायत समिती शिंदखेडा (यापुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- ०२-११-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे  दलित वस्ती सुधारणा योजनेतंर्गत त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये केलेल्या कामासंदर्भात फेब्रुवारी २००६ ते ऑक्टोंबर, २००६ या कालावधीतील माहिती खालील प्रमाणे मागितली होती.

'' १. रस्ता काँक्रीटीकरण

२. गटार बांधकाम कामांचे इस्टीमेट, वर्कऑर्डर, जमा खर्चाचा संपूर्ण तपशील. ''

अपिलार्थीने ही माहिती व्यक्तीशः अपेक्षिली आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक-३०-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. या पत्राव्दारे त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी १५ दिवसाची मुदत वाढवून मिळावी, अशी विनंती केली आहे. जनमाहिती अधिकारी यांची ही कृती चुकीची असून अशा प्रकारची कोणतीही तरतूद माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये नाही. हे जनमाहिती अधिका-यास स्पष्ट करण्यात आले.

जनमाहिती अधिकारी यांच्याकडून मुदतीत माहिती प्राप्त न झाल्यामूळे, अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- ०५-१२-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली असल्याचे दिसून येते.

सदर अपीलअर्जावर जनअपिलीय अधिकारी यांनी दिनांक- २५-०१-२००७ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि सदर पत्र अपिलार्थीस दिनांक-२७-०१-२००७ रोजी प्राप्त झाल्याने अपिलार्थीने सुनावणीची तारीख पुढे ढकलण्याची जनअपिलीय अधिकारी यांना विनंती केली व त्याप्रमाणे जनअपिलीय अधिकारी यांनी दिनांक- ०२-०२-२००७ रोजी सुनावणी घेवून या प्रकरणातील आपले आदेश दिनांक- १७-०२-२००७ रोजी पारीत केले. या सुनावणीच्या वेळी देखील जनमाहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने मागितलेली माहिती तयार नव्हती, असे दिसून येते. जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावरील सुनावणी निर्णयामध्ये अपिलार्थीस माहिती अवगत झाली असल्याने अपिल निकाली काढल्याचे म्हटले आहे.

जनअपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथीत होवून अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक-२२-०२-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी जनमाहिती अधिकारी यांनी, त्यांना उशिराने माहिती दिल्यामूळे त्यांच्यावर कार्यवाही करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तीवादाच्या वेळी अपिलार्थीने त्यांच्यातर्फे असा युक्तीवाद मांडला की, त्यांना, दिनांक- ०८-०२-२००७ रोजी माहिती प्राप्त झाली आहे. तथापि ही माहिती त्यांना अधिनियमा व्दारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा उशिराने दिली असल्यामूळे जनमाहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील विहित तरतुदी प्रमाणे योग्यती कार्यवाही करावी.

जनमाहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांच्याकडे त्यांच्या नियमीत कार्यभारा व्यक्तीरीक्त पिंपरा ग्रामपंचायतीचा अतिरिक्त कार्यभार सोपाविला आहे. दोन ग्रामपंचायतचा कार्यभार एकाच वेळी सांभाळणे त्यांना जिकरीचे होत असल्याने त्यांना अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती  विहित मुदतीत पुरविता आली नाही. तसेच त्यावेळी पिंपरा गावामध्ये पाणी टंचाईची परिस्थिती निर्माण झालेली होती  व संबंधित इंजिनिअरने अपिलार्थीने मागणी केलेल्या कामाची बिले तयार केली नसल्याने त्यांना अपिलार्थीस माहिती मुदतीत देता आली नाही. तसेच त्यांच्या पत्नीचे आरोग्य व इतर कौटूंबिक अडचणीमूळेही त्यांना अपिलार्थीस माहिती देण्यास विलंब लागलेला आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व दोन्हीही बाजूचा युक्तीवाद ऐकता असे दिसून आले की, जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याकरिता अधिनियमाव्दारे  विहित केलेल्या मुदतीपेक्षा  एकूण ६९ दिवसाचा असमर्थनीय विलंब लावला आहे. जनमाहिती अधिकारी यांच्यातर्फे युक्तीवाद करतांना त्यांनी असे सांगितले आहे की, संबंधित इंजिनिअरकडून बीले प्राप्त झाली नसल्याने त्यांना अपिलार्थीने मागितलेली माहिती पुरविता आली नाही. जनमाहिती अधिकारी यांचा हा युक्तीवाद आयोगास मान्य नाही. कारण अपिलार्थीने विचारलेल्या माहितीमध्ये कामाचे अंदाजपत्रक वर्क ऑर्डर व जमा खर्च या मुद्याचा समावेश होतो व त्यासाठी अपिलार्थीने  फेब्रुवारी, २००६ ते ऑक्टोंबर २००६ हया विशीष्ट कालावधीचा उल्लेख केला होता. जर ईजिनिअरने बील सादर केले नाही तर या कामावरील उपरोक्त विशिष्ट कालावधीमध्ये कोणताही खर्च कॅश बूकमध्ये दिसणार नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहिती पैकी कामाचे अंदाजपत्रक, जमा व खर्चाचा तपशील जनमाहिती अधिकारी याच्याकडे सहज उपलब्ध होता. तथापि त्यांनी प्रथम अपिलार्थीस त्यांचा अर्ज प्राप्त झाल्यापासून २८ दिवसाने म्हणजे दिनांक- ३०-११-२००६ रोजी १५ दिवसाची मुदतवाढ

मागवून घेतली तदनंतर जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक-२२-०७-२००६ रोजी झालेल्या सुनावणीच्यावेळी देखील परत मुदतवाढ मागवून घेतली. यावरुन जनमाहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने मागितलेली माहिती सहज व सुलभपणे उपलब्ध नसल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीस माहिती देण्याची जर खरोखरीच त्यांची इच्छा असती तर किमान कामाच्या अंदाजपत्रकाच्या प्रती अपिलार्थीस त्यांनी पुरविल्या असत्या परंतू या प्रकरणी त्यांनी ते देखील केले नाही. यावरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याकरिता टाळाटाळ केल्याचे सिध्द होत आहे. त्यांच्या बचावाप्रित्यर्थ आज त्यांनी आयोगासमोर केलेला युक्तीवाद आयोगास मान्य नाही. त्यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देवून माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील ७ (१) च्या तरतुदीचे उल्लंघन केले असून त्याव्दारे आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाइ वृती स्पष्ट केली आहे. त्यामुळे ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (२) च्या कार्यवाहीस पात्र ठरतात असा आयोगाचा निष्कर्ष आहे. तेंव्हा त्यांनी त्यांच्या कार्यशैलीमध्ये दर्शविलेल्या या कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्याच्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, धुळे यांनी प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करुन आपला अहवाल आयोगास २ महिन्याच्या आत सादर करावा, असे त्यांना आदेशीत करण्यात येत आहे.

वरील विवेंचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

## <u>निर्णय</u>

२०. अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

२१. संबंधीत जनमाहिती अधिकारी श्री.कोठावदे प्रकाश रामचंद्र यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, धुळे यांनी प्रचलीत सेवा नियमानुसार त्यांचेवर यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करुन आपला अहवाल आयोगास हे आदेश निर्गमीत झाल्यानंतर २ महिन्याच्या आत सादर करावा.

**धुळे** **( वि.बा.बोरगे )**
**दिनांक- २४-१०-२००७** **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**
**प्रत**

१. श्री.पुरुषोत्तम लोटन पाटील, रा.वर्शी, तालूका- शिंदखेडा, जिल्हा- धुळे.

२. जनमाहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत, वर्शी, तालूका- शिंदखेडा, जिल्हा-धुळे, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जनअपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (ग्रा.पं.) पंचायत समिती, शिंदखेडा, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, धुळे, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६. निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम

२००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

**अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/६४२**

**निर्णय** २४-१०-२००७

**दिनांक**

१ श्री. चौधरी नरेंद्र बारकू, : अपिलार्थी
दै. राजरंग टाईम्स,
बाफना मार्केट, तळमजला,
राणाप्रताप चौक, मनपासमोर,
धुळे

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी :
तथा उप अभियंता,
सार्वजनिक बांधकाम (बांध.) उपविभाग, शहादा,
जिल्हा नंदूरबार

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, शहादा,
जिल्हा नंदूरबार

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप विभागीय अधिकारी,
सार्वजनिक बांधकाम (बांध.) उपविभाग, शहादा,
जिल्हा नंदूरबार

विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-१०-२००७ रोजी धुळे येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. चौधरी नरेंद्र बारकू (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, शहादा श्री. लछमनसिंह भगवानसिंह चंदेल (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, सार्वजनिक बांधकाम (बांध.) उपविभाग, शहादा हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १५-०७-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्याकडे ०१ एप्रिल २००५ ते १५ एप्रिल २००६ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> " आपल्या उपविभागामार्फत करण्यात आलेल्या (१) तोरणमाळ तालुका अक्राणी शासकीय आश्रमशाळातील इमारतीचे नुतनीकरण करणे (२) म्हसावद सुलतानपूर रस्ता प्रजिमा-१७ कि. मी. ३३/०० ते ३४/५०० मध्ये मजबुतीकरण व डांबरीकरण करणे (३) वरुळ कानडी बिलाडी रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे कि. मी. ६/३०० ते ८/०० (४) भादा वैजाली रस्ता कि. मी. ८/०० ते १२/०० एम. डी. आर १६ मजबुतीकरण व डांबरीकरण (डी-७७/१७३) (५) कोंढावळ गावात कॉक्रीट रस्ता तयार करणे आदि विकास कामांचे अंदाजपत्रक व मोजमाप पुस्तिकेच्या प्रती तसेच रनिंग बिलाच्या प्रती मिळणेबाबत."

सदर माहिती अपिलार्थीने टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी प्रथम प्रतिसाद त्यांच्याकडील दिनांक २१-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये दिला. त्यामध्ये त्यांनी अपिलार्थीस ही माहिती संकलीत करण्याकरिता वेळ लागेल व त्याकरिता किमान एक महिन्याची मुदतवाढ जन

माहिती अधिकारी यांना देण्यात यावी व दिनांक १८-०८-२००६ पर्यत ही माहिती त्यांना उपलब्ध करुन देण्यात येईल असे आश्वासित केले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी दिलेल्या मुदतीतही अपिलार्थीस कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-०९-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची विनंती जन अपिलीय अधिकारी यांना केली होती.

सदर अपिलाची सुनावणी दिनांक १७-१०-२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांनी घेऊन, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस १५ दिवसात विनामूल्य माहिती देण्याचे सूचित करुन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. सदर आदेश जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १८-१०-२००६ रोजी पारीत केले. सदर आदेश अपिलार्थीस प्राप्त झालेले आहेत असे अपिलार्थीने आज सुनावणीमध्ये कबूल केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या आदेशानंतरही अपिलार्थीने कार्यकारी अभियंता यांच्याकडून माहिती मिळण्याकरिता त्यांच्याकडील दिनांक १७-१०-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रयत्न केला असे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्रयत्न करुनही माहिती न मिळाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-११-२००६ रोजी व्दितीय अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, ते दैनिक राजरंग टाईम्स धुळे या वृत्तपत्राचे संपादक असून त्यांना ही माहिती आजही हवी आहे व त्यांना माहिती न मिळाल्यामुळे संबंधितावर कारवाई करावी.

आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी हे अनुपस्थित आहेत. त्यांच्या वतीने जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचे निधन झाले असून अपिलार्थीने त्यांना मागितलेली माहिती पूर्णतः संकलीत करुन ७ दिवसात त्यांना ही माहिती देण्यास ते आता तयार आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद पाहता असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना विहित मुदतीत देणे जन माहिती अधिका-यास सहज शक्य होते तथापि त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी कोणताही प्रयत्न केल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थीस मुळात त्यांना माहिती द्यावयाची होती किंवा कसे याबाबत जन माहिती अधिका-याच्या मनात साशंकता असावी असे आयोगास वाटते. माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतूदी जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांना अद्यापपर्यत माहिती नसाव्यात किंवा अपिलार्थीस ही माहिती त्यांनी जाणुन-बुजून देण्याचे टाळले असल्याची शक्यताही नाकारता येत नाही.

तेव्हा असे आदेशीत करण्यात येते की :

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत साक्षांकीत करुन विनामूल्य पुरवावी. कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, शहादा यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत व विनामूल्य माहिती मिळेल हे पहावे. संबंधीत जन माहिती अधिकारी यांचे आता निधन झाले असल्यामुळे त्यांच्यावर कोणत्याही कारवाईचे आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

४. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत विनामूल्य व साक्षांकीत करुन द्यावी.

५. कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, शहादा यांनी वरील क्रमांक २ च्या आदेशाच्या पालनाचा अनुपालन अहवाल आयोगास हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १५ दिवसाच्या आत पाठवावा.

धुळे ( वि. बा. बोरगे )

दिनांक २४-१०-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. चौधरी नरेंद्र बारकू, दै. राजरंग टाईम्स, बाफना मार्केट, राणाप्रताप चौक, धुळे

२ जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, सार्वजनिक बांधकाम (बांध.) उपविभाग, शहादा, जिल्हा नंदूरबार यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, शहादा, जिल्हा नंदूरबार यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर

प्रसिध्द करण्यासाठी.
५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/६४३
निर्णय दिनांक- २४-१०-२००७

१ श्री.सिताराम दौलत कुंवर (कोळी) : अपिलार्थी
मु.सतारे पो.देवी, ता.शिंदखेडा, जि.धुळे.

विरुध्द

१ जनमाहिती अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक : प्रतिवादी
(जकास) पश्चिम धुळे.

२. जनअपिलीय अधिकारी तथा उपवनसंरक्षक पश्चिम
धुळे,

## <u>विवेंचन</u>

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- २४-१०-२००७ रोजी धुळे येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री.सिताराम दौलत कुंवर (कोळी) (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जनमाहिती अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (जंकास) पश्चिम धुळे, श्री.व्हि.जी.कुलकर्णी (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी तथा उपवनसंरक्षक पश्चिम धुळे, श्री.एस.एस.डोळे (यापुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- ११-०७-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे सन १९८२ तें १९८८ या कालावधीतील हजेरीपत्रके (प्रमाणके) बाबत खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

''आपल्या कार्यालयाच्या पत्र क्र. ब/ सवसं/माअ/७०, दि. २२-०६-२००६ अन्वये निर्गमित केलेल्या पत्रातील प्रपत्रात ज्या हजेरी पत्रकाच्या (प्रमाणकांच्या) आधारावर माहिती दिलेली आहे. त्या हजेरी पत्रकांच्या (प्रमाणकांच्या) तसेच सदरच्या कालावधीतील ३२ नंबर फार्मवर दिलेल्या मजुरीच्या झेरॉक्स प्रती तयार करुन त्यावर सत्यप्रतीचा दाखला देवून पुरवाव्यात. आपल्या कार्यालयाचे उपरोक्त संदर्भाचे पत्राची झेरॉक्स प्रत सोबत अवलोकनार्थ सादर केली आहे.''

सदर माहिती अपिलार्थीने नोंदणीकृत टपालाने अपेक्षिली होती.

अपिलार्थी हे दारिद्रय रेषेखालील व्यक्ती आहेत. अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्यामूळे अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- ०८-०९-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर ०८/०७ अशा प्रकारच्या तारखेचा उल्लेख आहे. सदर अपिलअर्जावर जनअपिलीय अधिकारी यांनी प्रत्यक्षतः सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. तथापि त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक- १६-१०-२००६ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीच्या अपील अर्जातील प्रत्येक मुद्याचा परामर्श घेवून उत्तर दिले आहे. सदर उत्तराव्दारे त्यांनी अपिलार्थीने त्यांच्याकडे केलेले अपील निकाली काढले आहे. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जाच्या प्रत्येक मुद्यावरील म्हणणे नाकारले आहे.

जनअपिलीय अधिकारी यांच्या वरील प्रकारच्या निर्णयाने व्यथीत होवून अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती

आयोगाकडे दिनांक-१६-०१-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी जनमाहिती अधिकारी यांनी, माहिती अधिकार अधिनियमाचे उल्लंघन केल्याचे, अपिलार्थीची दिशाभूल केल्याचे व तसेच अपिलार्थीच्या माहितीच्या मागणीकडे हेतूपुरस्सर दुर्लक्ष करुन त्यांची कोणत्याही प्रकारे दखल घेतली नसल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणले आहे. या सर्व प्रकारामुळे जनमाहिती अधिकारी यांच्यावर प्रतिदिनी २५०/- प्रमाणे शास्ती लावण्यात यावी, अशी त्यांनी आयोगास पुढे विनंती केली आहे. याचबरोबर जनअपिलीय अधिकारी यांनी जनमाहिती अधिकारी यांना पाठीशी घातल्याचा आरोपही त्यांनी या अपीलामध्ये केला आहे.

आज झालेल्या युक्तीवादाच्या वेळी अपिलार्थीने त्यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी त्यांचे म्हणणे राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपीलामध्ये मांडले आहे. ते सन १९८२ ते १९८७- १९८८ या कालावधीमध्ये वनखात्याच्या नर्सरीमध्ये मजूर म्हणून कामावर होते. तथापि तदनंतर १९८७-१९८८ त्यांना कामावरुन काढून टाकण्यात आले. अशीही अतिरिक्त माहिती त्यांनी आयोगास दिली.

जनमाहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अर्जावर मुदतीत उत्तर दिले आहे सदर उत्तराची प्रत त्यांच्याकडे मागितली असता ती प्रत ते आयोगास दाखवू शकले नाहीत. या पत्रामध्ये त्यांच्या म्हणण्या प्रमाणे त्यांनी अपिलार्थीस असे कळविले होते की, अपिलार्थीने मागितलेले मस्टर्स हे वाळवीमुळे जीर्ण झाले असल्यामूळे त्यांच्या प्रती काढून त्या अपिलार्थीस पुरविता येणे शक्य नाही. तथापि अपिलार्थीस त्या मस्टरसची समक्ष पाहणी करता येईल. जनमाहिती अधिकारी यांनी पुढे असेही स्पष्ट केले आहे की, अपिलार्थीने मागितलेली माहिती १९८२ ते १९८८ या अनु.२५,१९ वर्षा पूर्वीची असल्यामूळे व सदर मस्टर्सना वाळवी लागली असल्यामूळे या

मस्टरच्या झेरॉक्सप्रती काढता येणे अशक्य आहे. सदर मस्टरसमध्ये एकूण ६२ मजूरांच्या हजेरीची माहिती आहे व २००४ पासून जनमाहिती अधिकारी हे अपिलार्थीस व इतर कर्मचा-यांना हे मस्टरस पाहण्याची विनंती करीत आहेत. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थी व त्याचप्रमाणे त्यांच्या सारख्या इतर मजूरांना त्यांची हजेरीपत्रकाच्या संदर्भात त्यांच्याकडे उपलब्ध असलेली काही माहती पुरविली होती. सदर माहिती अपिलार्थीस देखिल २००४ सालीच पुरविण्यात आली असल्यामूळे त्यांनी अपिलार्थीच्या या अर्जावर माहिती दिली नाही. अपिलार्थीस या प्रकरणी संबंधित मस्टरची झेरॉक्सप्रत हवी आहे तर जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक-२२-०६-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात त्यांच्याकडे उपलब्ध असलेला अपिलार्थीचा हजेरीचा तपशिल दिलेला आहे. या तपशिलामध्ये अपिलार्थी वर्षनिहाय किती दिवस कामावर हजर होते. त्या दिवसाची संख्या दिली आहे.

आयोगाकडे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन व दोन्हीही बाजूचा युक्तीवादावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने मस्टरच्या प्रतीच्या माहितीच्या अधिकारामध्ये मागणी केली आहे. सदर मस्टरच्या प्रती वाळवीग्रस्त असल्याने त्याच्या झेरॉक्सप्रती जनमाहिती अधिकारी यांना काढता येत नाहीत. तथापि या मस्टरमधील तपशिल त्यांनी अपिलार्थीना उपरोक्त पत्राव्दारे मागणी करण्यापूर्वीच दोनदा दिलेला आहे. जनमाहिती अधिकारी यांच्यकडून अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांच्या हजेरीपत्रकाचा तपशील एवढीच माहिती उपलब्ध आहे. या मजूराच्या उपस्थिती बाबतचे हे प्रकरण लोक आयुक्तां कडेही चालू आहे. हे पाहता असे आदेशीत करण्यात येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहितीशी संबंधीत जी इतर माहिती त्यांच्योकडे उपलब्ध आहे ती अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत

विनामुल्य द्यावी. त्याचबरोबर अपिलार्थीच्या प्रथम अर्जास जनमाहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत कोणत्याही प्रकारे प्रतिसाद न दिल्याचे सिध्द झाल्याने त्यांना आयोगातर्फे ताकीद देण्यात येत असून संबंधितांना येथून पुढे त्यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्ज दाखल होताच त्या अर्जावर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती पुरविण्यात यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेंचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

## निर्णय

२२. अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**धुळे** **( वि.बा.बोरगे )**
**दिनांक- २४-१०-२००७** **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**
**प्रत**

१. श्री.सिताराम दौलत कुंवर (कोळी) मु.सतारे पो.देवी, ता.शिंदखेडा, जिल्हा-धुळे

२. जनमाहिती अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक पश्चिम धुळे, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जनअपिलीय अधिकारी तथा उपवनसंरक्षक पश्चिम धुळे वनविभाग धुळे, जिल्हा-धुळे, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५. निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

**अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/६४४**

**निर्णय** **२४-१०-२००७**

**दिनांक**

१ रविंद्र नामदेव इंगळे, : अपिलार्थी

संपादक साप्ताहिक सावज सावधान,

७६, फॉरेस्ट कॉलनी, नगांवबारी, देवपूर,

धुळे

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी :

तथा लागवड अधिकारी,

सामाजिक वनीकरण क्षेत्र शिरपूर, जिल्हा धुळे

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा उप संचालक, सामाजिक वनीकरण विभाग, पालेशा वाणिज्य महाविद्यालय जवळ, एस. टी. कॉलनी समोर, धुळे

विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-१०-२००७ रोजी धुळे येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. रविंद्र नामदेव इंगळे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा लागवड अधिकारी श्री. जयप्रकाश आनंदराव

पाटील (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उप संचालक सामाजिक वनीकरण श्री. विजय विश्वनाथ पाटोळे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १०-०८-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्याकडे एप्रिल २००५ ते ३१ जुलै २००६ या कालावधीतील वन विकासाच्या कामासंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

" १. योजनेचे नांव, २. कामाचे स्वरुप, ३. क्षेत्रफळ, ४. मंजूर रक्कम, ५. खर्च झालेली रक्कम, ६. कामाचे ठिकाण, ७. काम सुरु केल्याची तारीख, ८. काम पूर्ण झाल्याची तारीख, ९. अंतिम मोजमाप दिनांक, १०. देयके अदा केल्याची दिनांक व रक्कम, ११. प्रत्यक्ष काम करुन घेणा-या अधिकारी व कर्मचा-याचे नांव व पद, १२. कामावर हजर असलेल्या मजुरांच्या गावाचे नाव, १३. कामाची सद्यस्थिती, १४. योजनानिहाय कामाच्या प्रकारानुसार मजुरीचे दर पत्रकाची प्रत."

सदर माहिती अपिलार्थीने नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी यांच्याकडील दिनांक १७-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. त्यामध्ये त्यांनी अपिलार्थीस ही माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी रुपये १२६३१ (रुपये बारा हजार सहाशे एकतीस फक्त) इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. या पत्रामध्ये त्यांनी सदर रकमेचा बाबनिहाय तपशील दिलेला आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या पत्रावर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना त्यांच्याकडील दिनांक २१-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये त्यांनी मागितलेली माहिती त्यांच्या मूळ अर्जात मागितल्याप्रमाणेच द्यावी अशी जन माहिती अधिका-यास विनंती केली. यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी पुर्वी कळविल्याप्रमाणे आवश्यक त्या रक्कमेचा भरणा करण्याविषयी त्यांचेकडील दिनांक २२-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये

कळविले. तदनंतर जन माहिती अधिकारी व अपिलार्थी यांच्यामध्ये बराच पत्रव्यवहार होऊनही अपिलार्थीस माहिती मिळाली नाही त्यामुळे अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०९-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची विनंती जन अपिलीय अधिकारी यांना केली आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. तथापि त्यांनी अपिलार्थीस त्यांचेकडील दिनांक १७-१०-२००६ च्या पत्रान्वये अपिलार्थीच्या अपिलाचा विचार करता येणार नाही असे कळविले. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या संदर्भात दाखल होणा-या अपिलावर निर्णय घेण्याची ही कृती चुकिची आहे. त्यांनी जन माहिती अधिकारी व अपिलार्थी या दोघांनाही एकत्र बोलावून, त्यांचे म्हणणे ऐकून तदनंतर आपला निर्णय पारीत करणे हे " अपील ठरविणे " या प्रक्रियेत अभिप्रेत आहे. येथून पुढे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार दाखल होणा-या अपिलाबाबत त्यांनी सतर्क राहून दोन्ही बाजुंचे म्हणणे ऐकून आपला निर्णय पारीत करावा असे त्यांना आयोगातर्फे सुचविण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या वरील निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-११-२००६ रोजी व्दितीय अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय रद्द करण्याचा व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आजतागायत माहिती न दिल्याने त्यांच्यावर प्रतिदिन रुपये २५० प्रमाणे शास्ती लावण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी दिनांक १०-०८-२००६ रोजी माहिती मागवूनही आजतागायत त्यांना सदर माहिती अप्राप्त आहे. वास्तविकतः सदर माहिती संबंधीत विभागाने स्वंयप्रेरणेने घोषित करावयाच्या स्वरुपातील आहे. जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियमा-तील तरतुदींचा चुकिचा अर्थ लावून त्यांना माहिती मिळण्यापासून वंचित ठेवले. त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना आजही हवी आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या नमुन्यामध्ये देण्यासाठी त्यांच्याकडे पुरेसे मनुष्यबळ नाही, तथापि त्यांनी अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती ज्या इतर कागदपत्रावर उपलब्ध आहे त्या सर्व कागदपत्रांच्या प्रती अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्याची तयारी दर्शविली आहे. या कागदपत्रा-च्या प्रती अपिलार्थीस देण्यापोटी लागणारे शुल्क त्यांनी अपिलार्थीस वेळीच कळविले आहे. त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये पुढे असेही सांगितले आहे की, त्यांच्याकडे एकंदर एका योजनेमधील ६२ व रोजगार हमी योजनेखालील १० अशी एकूण ७२ कामे आहेत. सदर कामे सध्या बंद स्थितीत आहे. त्यांच्या हाताखाली फक्त दोन कर्मचारी काम करत असल्यामुळे अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती त्यांना देणे सहज शक्य होत नाही.

या प्रकरणी आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व दोन्ही बाजुंनी मांडलेला युक्तिवाद पाहता असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) चा चुकिचा अर्थ लावलेला आहे. या कलमामध्ये अपिलार्थीने मागितलेल्या माहितीसाठी जर प्रमाणाबाहेर मनुष्यबळ लागत नसेल तर सर्वसाधारणपणे त्यांनी मागितलेल्या नमुन्यात माहिती द्यावी अशा अर्थाची तरतूद आहे. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधीत फक्त ७२ कामे आहेत. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील मुद्दे पाहता त्यामध्ये कोणतीही तांत्रिक क्लीष्टता आढळून येत नाही. क्षेत्रीय

स्तरावरील कामांच्या व्यवस्थापन पध्दतीमध्ये अपिलार्थीने मागणी केलेल्या मुद्दयावरील माहिती सर्वसाधारणपणे सर्व क्षेत्रिय कार्यालयात पर्यवेक्षक पातळी उपलब्ध असणे जरुरीचे आहे व त्याप्रमाणे ती असतेही अन्यथा कामाची किंमत, कालावधी, भौतिक लक्ष्य व साध्य याच्यावर क्षेत्रिय कर्मचा-यांचे कोणतेही नियंत्रण राहणार नाही या पार्श्वभूमीवर जन माहिती अधिका-यांनी आयोगासमोर तोंडी व लेखी मांडलेले सर्व मुद्दे आयोग फेटाळून लावत आहे.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती (त्यांनी मागितलेल्या नमुन्यात) हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत साक्षांकीत करुन विनामूल्य द्यावी. जन माहिती अधिका-यास ही माहिती संकलीत करुन अपिलार्थीस देण्यापोटी, एक अपवादात्मक बाब म्हणून उप संचालक सामाजिक वनीकरण यांनी, आवश्यक वाटल्यास, जन माहिती अधिका-यास तात्पुरते कर्मचारी उपलब्ध करुन द्यावेत. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस केवळ माहिती द्यावयाची नाही असे उदिष्ट समोर ठेवल्याचे आयोगास आढळून आले नाही. त्यामुळे त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्या-पोटी टाळाटाळ केल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नाही. अपिलार्थीच्या अर्जास त्यांनी, त्यांना योग्य वाटेल अशा प्रकारे कायद्यातील तरतुदींचा अर्थ काढून, उत्तरे दिली आहेत हे पाहता त्यांच्यावर कोणतीही शास्तीची कारवाई करण्याचे आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती (त्यांनी मागणी केलेल्या नमुन्यात) हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत साक्षांकीत करुन विनामूल्य द्यावी.

धुळे ( वि. बा. बोरगे )

दिनांक २४-१०-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ रविंद्र नामदेव इंगळे, संपादक साप्ताहिक सावज सावधान, ७६, फॉरेस्ट कॉलनी, नगांवबारी, देवपूर, धुळे

२ जन माहिती अधिकारी तथा लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण क्षेत्र शिरपूर, जिल्हा धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप संचालक, सामाजिक वनीकरण विभाग, पालेशा वाणिज्य महाविद्यालय जवळ एस. टी. कॉलनी समोर धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम

२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेला अर्ज

**क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/७७**

**निर्णय २५-१०-२००७**

**दिनांक**

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | ¸ÉÒ. JÉÆbÚ÷ {ÉÖÆVÉÚ VÉÉvÉ´É,<br>29, +¶ÉÉäEòxÉMÉ®ú, VÉ¨ÉxÉÉÊMÉ®úÒ ®úÉäb÷,<br>vÉÖ³äý | : | +VÉÇnùÉ®ú |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | VÉxÉ ¨ÉÉÊ½þiÉÒ +ÊvÉEòÉ®úÒ<br>iÉlÉÉ Ê´É¦ÉÉMÉÒªÉ ºÉ½þ ÊxÉ¤ÉÆvÉEò,<br>ºÉ½þEòÉ®úÒ ºÉÆºlÉÉ, xÉÉÊ¶ÉEò Ê´É¦ÉÉMÉ,<br>xÉÉÊ¶ÉEò | : | |ÉÊiÉ´ÉÉnùÒ |

<u>विवेचन</u>

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-१०-२००७ रोजी धुळे येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अर्जदार श्री. खंडू पुंजू जाधव (यापुढे त्यांना अर्जदार असे संबोधण्यात येईल) व जन माहिती अधिकारी तथा विभागीय सह निबंधक सहकारी संस्था यांचे प्रतिनिधी उप निबंधक धुळे श्री. हिरालाल काशिराम ठाकूर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

अर्जदार श्री. खंडू पुंजू जाधव यांनी राज्य माहिती आयोगाकडे त्यांच्याकडील दिनांक १-०२-२००७ च्या अर्जान्वये अशी तक्रार केली आहे की, ए. के. चव्हाण विभागीय सह निबंधक सहकारी संस्था यांच्याकडे त्यांनी धुळे व नंदूरबार जिल्हा पोलीस को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड धुळे या संस्थेसंदर्भात काही माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता दिनांक ०३-

१०-२००६, ०९-११-२००६ व ०४-१२-२००६ रोजी अर्ज केले होते. या अर्जासोबत माहितीसाठीचे आवश्यक शुल्क भरण्यास त्यांची तयारी होती. तथापि ३ महिने ३९ दिवस इतका कालावधी ओलांडूनही श्री. चव्हाण यांनी अर्जदारास त्यांनी मागणी केलेली माहिती न देऊन शासनाचे आदेश न मानून त्यांची अवज्ञा करुन कर्तव्यात कसूर केला आहे व त्यामुळे त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे. आजही ते आवश्यक ते शुल्क भरण्यास तयार आहेत असे त्यांनी या तक्रारी अर्जाच्या अखेरीस म्हटले आहे.

आज रोजी या तक्रारीची चौकशी करता सह निबंधकाचे प्रतिनिधी तालुका उप निबंधक श्री. हिरालाल काशीराम ठाकूर यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की, त्यांनी अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज त्यांचे कार्यालयात प्राप्त झाल्यानंतर त्यांनी दिनांक ३०-१०-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस सदर माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता झेरॉक्स प्रती अधिक पोस्टाचा खर्च एकूण रुपये ३१० इतके शुल्क भरण्यासाठी त्यांच्याकडील दिनांक ३०-१०-२००६ चे पत्रान्वये कळविले होते तथापि सदर शुल्क अर्जदारास मान्य नाही व त्याप्रमाणे त्यांनी त्यांच्याकडील दिनांक ०९-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये विभागीय सह निबंधक यांना कळविले आहे असे आयोगाच्या निदर्शनास आणले.

या प्रकरणी अर्जदाराने सहकार विभागाच्या अधिका-यांना लिहिलेल्या पत्राचे अवलोकन करता अपिलार्थी हे झेरॉक्स प्रतीकरिता प्रती पृष्ठ ५० पैसे या दराने शुल्क भरण्यास तयार आहेत असे दिसून येते कारण हा प्रचलीत बाजारभाव आहे असे अर्जदाराचे म्हणणे आहे.

सदर प्रकरणी अर्जदाराने माहितीसाठीचा अर्ज विभागीय सह निबंधक यांच्या कार्यालयात सादर केला आहे. तथापि माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी लागणारे शुल्क भरण्यासाठी त्यांची तयारी नाही. सदर दर त्यांना अमान्य आहेत. राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने या संदर्भात दिनांक ११ ऑक्टोंबर २००५ रोजी आर. टी. आय. २००५/

सी. आर. ३१५/०५/५ या क्रमांकाची अधिसूचना प्रसिध्द करुन या अधिसुचनेमध्ये कलम ४ मध्ये अर्जदारास माहिती देण्यापोटी लागणा-या शुल्काच्या दराची निश्चिती करण्यात आली आहे. त्याप्रमाणे अर्जदारास या प्रकरणी प्रती पृष्ठ रुपये २ ( रुपये दोन) इतकी रक्कम सह निबंधक नाशिक यांच्या कार्यालयात भरणे भाग आहे.

सबब या प्रकरणी असा निर्णय देण्यात येत आहे की, अर्जदाराने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ खाली प्रथम विहित नमुन्यात संबंधीत जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात अर्ज करावा. तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कळविल्याप्रमाणे ही माहिती मिळण्यापोटी लागणा-या शुल्काचा भरणा त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात करावा. अपिलार्थीने सदर शुल्काचा भरणा केल्यानंतर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या तरतुदीनुसार जन माहिती अधिका-याने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कार्यवाही करावी.

अर्जदाराची आयोगाकडून अपेक्षा अशी आहे की, धुळे व नंदूरबार जिल्हा पोलीस सहकारी सोसायटी च्या कारभारात राज्य माहिती आयोगाने लक्ष घालावे. तथापि राज्य माहिती आयोगाला अशा प्रकारची कोणत्याही संस्थेच्या दैनंदिन प्रशासनामध्ये हस्तक्षेप करण्याची अधिकारीता नाही. याकरिता अर्जदाराने सहकारी विभागाच्या संबंधीत प्राधिकरणा-कडे अर्ज करणे योग्य राहील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अर्जदाराची त्यांनी त्यांच्या दिनांक १-२-०७ च्या अर्जाव्दारे केलेली विनंती अमान्य करुन अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

धुळे                                                            ( वि. बा. बोरगे )
दिनांक   २५-१०-२००७                              राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. खंडू पुंजू जाधव, २९, अशोकनगर, जमनागिरी रोड, धुळे

२ जन माहिती अधिकारी तथा विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, नाशिक विभाग, नाशिक यांचे कार्यालय, ३ रा मजला गृहनिर्माण भवन, गडकरी चौक, नाशिक – २ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

४ निर्णय नस्ती

# राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

तक्रार क्रमाक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/७८

निर्णय दिनांक- २५-१०-२००७.

श्री.सलीम अब्दुल्ला शेख : तक्रारदार
प्लॉट नंबर १६०, मिल्लत नगर, सार्वजनीक
ट्रस्ट दवाखान्याचे मागे धूळे- ४२४००१.

विरुध्द

१ जनमाहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
राज्य ग्राहक वाद निवारण आयोग,

महाराष्ट्र, जुने प्रशासकीय विद्यालय इमारत,
रुम नं. १,२,५,६ हजारीमल सोमानी मार्ग,
सी.एस.टी.समोर, मुंबई- ४००००१.

## विवेंचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनाक- २५-१०-२००७ रोजी धुळे येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तक्रारदार श्री.सलीम अब्दुल्ला शेख ( यापुढे त्यांना तक्रारदार असे संबोधण्यात येईल) व प्रतिवादी क्रमांक-१ तथा राज्य ग्राहक वाद निवारण आयोग महाराष्ट्र, जूने प्रशासकीय विद्यालय इमारत मुंबई (यापूढे त्यांना प्रतिवादी क्रमांक-१ असे संबोधण्यात येईल.) हे हजर आहेत.

या प्रकरणी अर्जदाराने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- ०५-०८-२००६ रोजी जनमाहिती अधिकारी राज्य ग्राहक वाद निवारण आयोग महाराष्ट्र, जूने प्रशासकीय विद्यालय इमारत मुंबई यांच्याकडून उशिराने माहिती मिळाल्याबद्दल त्यांचेवर शास्ती लावण्याची कार्यवाही करण्या बाबत राज्य माहिती आयोगाकडे अर्ज केला आहे. या प्रकरणी तक्रारदाराने त्यांच्याकडील दिनांक ०४-०३-२००६ रोजीच्या अर्जान्वये माहिती अधिकार अधिनियमतातील तरतूदीनूसार जनमाहिती अधिकारी यांचेकडे काही माहिती मागविली होती. तक्रारदारास जनमाहिती अधिकारी यांच्याकडून या अर्जामधील माहिती दिनांक-०४-०४-२००६ रोजी माहिती प्राप्त झाली. तथापि सदर माहितीवर तक्रारदाराचे समाधान न झाल्याने त्यांनी दिनांक-१३-०४-२००६ रोजी माहिती अधिकार अधिनियमान्वये परत दुसरा अर्ज जनमाहिती

अधिकारी यांच्याकडे सादर केला. या अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक- २८-०४-२००६ रोजीच्या पत्रान्वये तक्रारदारास रुपये ९२/- इतक्या शुल्काचा भरणा करण्याचे सूचविले. सदर पत्र  तक्रारदारास दिनांक ०९-०५-२००६ रोजी प्राप्त झाले. तक्रारदाराने तदनंतर लागलीच दिनांक- १०-०५-२००६ रोजी  रुपये ९२/- ची मनिऑर्डर जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयास पाठविली. सदर मनिऑर्डर जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयास दिनांक २१-०५-२००६ रोजी प्राप्त झाली आहे. तक्रारदाराने आवश्यक ते शुल्क विहित मुदतीत भरुनही अंतिमतः तक्रारदारास दिनांक- १८-०७-२००६ रोजी माहिती जनमाहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली. तक्रारदाराने  त्यांच्या दिनांक- १३-०४-२००६ रोजीच्या माहितीच्या अर्जामध्ये खालील ३ प्रश्न विचारले होते.

१) ग्राहक तक्रार निवारण मंच नंदूरबार येथे सुरु झालेले आहे का ? असल्यास केंव्हा पासून?

२) सुरु झालेले नसल्यास केंव्हा पासून सुरु होणार आहे ?

३) नंदुरबार ग्राहक मंचसाठी ज्या दोन सभासदांची निवड करण्यात आली आहे त्यांना केंव्हा चार्ज घेणेचे आदेश आहेत ?

या प्रश्नाची उत्तरे देतांना जनमाहिती  अधिकारी यांनी अर्जदारास या प्रश्नाची उत्तरे अन्न व नागरी पुरवठा  व ग्राहक संरक्षण विभाग मंत्रालय, मुंबई यांच्याशी संबंधीत असल्यामूळे त्यांच्याकडून तक्रारदाराने माहिती प्राप्त करुन घ्यावी असे सूचविले. थोडक्यात तक्रारदाराने विहित आवश्यक त्या रक्कमेचा भरणा करुनही तक्रारदारास उशिराने अर्धवट माहिती देण्यात आली. तक्रारदाराने मुळात दिनांक- १३-०४-२००६ रोजीच्या अर्जान्वये माहिती मागविली असता त्यांना ती माहिती जनमाहिती अधिकारी यांच्याकडील दिनांक-१३-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आली व ती ही अर्धवट स्वरुपात देण्यात आली.

तक्रारदाराने एकूण ८ मुद्यावर माहिती मागविली होती त्यापैकी ३ मुद्यावरील माहिती तक्रारदारास न देता ती त्यांनी अन्न व नागरी पुरवठा विभागाकडून घ्यावी असे तक्रारदारास सुचविण्यात आले आहे. जनमाहिती अधिकारी यांनी तक्रारदारास अन्न व नागरी पुरवठा विभागाकडून माहिती घेण्यास सूचना देण्याची त्यांची ही कृती चुकीची आहे. कारण जनमाहिती अधिकारी व अन्न नागरी पुरवठा विभाग ही एकाच प्राधिकरणाचे वेगवेगळे दोन भाग आहेत. त्यामूळे त्यांनी अन्न व नागरी पुरवठा विभागाकडून ही माहिती प्राप्त करुन घेवून तक्रारदारास देणे भाग होते.तक्रारदाराने मागितलेली माहिती संपूर्णतः तयार नसतांनाही तयार आहे असे त्यांच्याकडील दिनांक- २८-०४-२००६ रोजीच्या पत्रान्वये अर्जदारास कळविले आहे. यावरुन असे सिध्द होते की, जनमाहिती अधिकारी यांनी तक्रारदारास उशिरा, अर्धवट व अपूरी माहिती दिली आहे.

जनमाहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीचे असे म्हणणे आहे की, माहिती अधिकारी यांच्याकडे इतर विषया संदर्भात मा.उच्च न्यायालयाचे आदेशा प्रमाणे अंदाजे १५,००० प्रकरणाची विल्हेवाट लावण्याचे काम सोपाविण्यात आले होते. जनमाहिती अधिकारी या कामात व्यस्त असल्यामूळे त्यांना अर्जदारास माहिती पुरविण्यास उशिर झाला आहे. जनमाहिती अधिका-यास त्यांच्या नियमीत कामाव्यतीरीक्त इतर कामांचा भार असल्यामूळे अर्जदारास विहित मुदतीत माहिती देता आली नाही. **तथापि त्यांचा हा मुद्या आयोग मान्य करीत नाही. माहिती अधिकार अधिनियमा संबंधात त्यांच्याकडे सोपाविलेली कामे हा त्यांचा दैनंदिन कामाचा एक भाग आहे. माहिती अधिकार अधिनियमा संदर्भात त्यांच्याकडे केला जाणारा पत्रव्यवहार वा तत्संबंधी करावे लागणारे काम हा सार्वजनिक प्राधिकरणाच्या कर्मचा-यांच्या नियमित कामापेक्षा अतिरीक्त काम आहे असे आयोग मानत नाही. कारण माहिती आयोगाच्या संदर्भातील काम हा त्यांच्या दैनंदिन कामाचा एक भाग हे अधिनियम**

**अमंलात आणलेल्या दिवसापासून झालेला आहे.** सबब जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर केलेला युक्तीवाद आयोग अमान्य करीत आहे.

वर विवेचन केल्याप्रमाणे जनमाहिती अधिकारी यांनी तक्रारदारास माहिती देण्यापोटी निःसंशयपणे विलंब लावल्याचे व तक्रारदारास अर्धवट माहिती दिल्याचे निःसंयपणे सिध्द होत आहे. तक्रारदाराची मनिऑर्डर त्यांना दिनांक २१-०५-२००६ रोजी प्राप्त झाल्या नंतर तक्रारदारास दिनांक २०-०६-२००६ रोजी अगर तत्पूर्वी माहिती प्राप्त होणे आवश्यक होते. तथापि त्यांनी तक्रारदारास ही माहिती त्यांच्याकडील दिनांक १३-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये दिली. म्हणजेच ही माहिती देण्यापोटी त्यांना एकूण २३ दिवस इतका विलंब लागलेला आहे. या विलंबाचे समर्थन जरी जनमााहिती अधिकारी यांनी केले असले तरी आयोगास ते वर विवेचन केल्या प्रमाणे मान्य नाही. सबब असे आदेशित करण्यात येत आहे की, संबंधीत जनमाहिती अधिकारी यांनी या प्रकरणी तक्रारदारास माहिती देण्यापोटी लावलेल्या २३ दिवसाच्या असमर्थनीय विलंबा बाबत त्यांना प्रतिदिनी २५० /- रुपये अशी एकूण ५७५०/-रु. (एकूण रुपये पाच हजार सातशे पन्नास ) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. त्यांनी सदर शास्तीची रक्कम हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत पुढील शिर्षाखाली शासकीय कोषागारात जमा करावी.

**"००७० इतर प्रशासनिक सेवा, ६० इतर सेवा, ८०० इतर जमा रक्कम, १८ माहितीचा अधिकार ००७०-००६-१"**

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर तक्रारदाराची तक्रार निकाली काढण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

# निर्णय

१०. तक्रारदाराची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

११. जनमाहिती अधिकारी यांनी तक्रारादारास माहिती पुरविण्यापोटी लावलेल्या २३ दिवसाच्या असमर्थनीय विलंबा बाबत त्यांना प्रतिदिनी २५०/-रुपये प्रमाणे ५७५०/-रु. (एकूण रुपये पाच हजार सातशे पन्नास) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम वर उल्लेख केलेल्या शिर्षाखाली शासकीय कोषागारात, त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत भरावी.

धुळे
दिनांक- २५-१०-२००७

( वि.बा.बोरगे)
राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद.

प्रत,

२१. तक्रारदार, श्री.सलीम अब्दूल्ला शेख , प्लॉट नंबर १६०, मिल्लत नगर, सार्वजनीक ट्रस्ट दवााखान्याचे मागे धूळे- ४२४१००१.

२२. जनमाहिती अधिकारी तथा प्रबंधक,राज्य ग्राहक वाद निवारण आयोग, महाराष्ट्र जुने प्रशासकिय विद्यालय इमारत रुम नं.१,२,५,६ हजारीमल सोमानी मार्ग, सी.एस.टी.समोर, मुंबई-४०००01, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

२३. सचिव, मुख्य माहिती आयुक्त कर्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

२४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/६४८
निर्णय दिनांक- २५-१०-२००७

१ श्री.शांतीलाल मंगा चौधरी : अपिलार्थी
रा.सोनगीर ता. जि.धुळे पिनकोड-
४२४३०९.

विरुध्द

१ जनमाहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
(ग्रा.पं.)जिल्हापरिषद,धुळे

२. जनअपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हापरिषद, धुळे.

सध्या जनमाहिती अधिकारी : कार्यालयीन अधिक्षक
सध्या जनअपिलीय अधिकारी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.)

# विवेंचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- २५-१०-२००७ रोजी धुळे येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री.शांतीलाल मंगा चौधरी (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जनमाहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधिक्षक, जिल्हापरिषद,धुळे, श्री.अमर सोनभाऊ शिंदे (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) जनअपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) जिल्हापरिषद, धुळे, श्री.मिलिंद दत्तात्रय धांडे (यापुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- २१-०३-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाकडून पोलीस निरीक्षक सोनगीर पोलीस स्टेशन यांच्याकडे झालेल्या काही विशीष्ट पत्रव्यवहाराच्या प्रतीची मागणी खालील प्रमाणे केली होती.

> ‘‘ आपल्या कार्यालयाने क्रमांक/धुजिप/ग्रा.पं.२/ चौकशी/ २४५/२००६, दिनांक- ४-२-२००६ च्या आदेशान्वये ‘ सोनगीर ग्रामपंचायत भूखंड वाटप प्रकरणी ’ फौजदारी कारवाईचे आदेश पंचायत समिती, धुळे यांना दिलेत. तद अनुषंगाने सोनगीर पोलीस स्टेशन येथे दिनांक- ११-२-२००६ रोजी १३-०६ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर प्रकरणी सोनगीर पोलीस स्टेशन निरिक्षक यांनी आपल्या कार्यालयाशी पत्रव्यवहार केलेला आहे. तसेच आपल्या कार्यालयाने देखील सोनगीर

पोलीस स्टेशन सोनगीर येथे पत्रव्यवहार केलेला आहे. सदर पत्रव्यवहारांच्या प्रति (छायाकींत) कलम ७ अन्वये ४८ तासात माहितीस्तव, शासकीय कामास्तव मिळाव्यात.

१. वरील माहितीचे स्वरुपाच्या अनुषंगाने सोनगीर पोलीस स्टेशन, निरीक्षक, सोनगीर यांनी आपल्या कार्यालयाशी पत्रव्यवहार केलेला आहे त्या पत्राची छायांकीत प्रत मिळावी.

२. आपल्या कार्यालयाने सोनगीर पोलीस स्टेशन यांचेशी तदअनुषंगाने पत्रव्यवहार केलेला आहे त्याची देखील छायाकींत प्रत मिळावी.''

अपिलार्थीने त्यांना हव्या असलेल्या माहितीचा संबंधीत कालावधी २००६ असा दर्शविलेला आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक-२७-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये खालील प्रमाणे उत्तर दिले आहे.

'' वरील विषयान्वये कळविण्यात येते की, आपण दिनांक- २१-०३-२००६ चे अर्जान्वये केंद्र सरकार माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये सोनगीर पोलीस स्टेशन येथील दिनांक-११-०२-२००६ रोजी गुन्हा रजिष्टर नंबर १३/६ अन्वये सोनगीर पोलीस स्टेशन निरीक्षक यांनी केलेल्या पत्रव्यवहाराची प्रत मिळणेबाबत अर्ज सादर केलेला आहे. तथापी सदर कागदपत्राची प्रत ही पोलीस स्टेशन सोनगीर यांचेकडून मिळणेसाठी अर्ज सादर करावा.''

जनमाहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) मधील तरतूदीस अनुसरुन जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- ०७-०४-२००६ रोजी प्रथम अपील केले.

जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपीलअर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या नकारात्मक प्रतिसादामूळे व्यथीत होवून अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) मधील तरतूदीनूसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- १०-०८-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांनी विहित केलेल्या कालावधीमध्ये कोणतीही कृती केली नाही व त्यामूळे जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी हे शिस्तभंगाच्या कार्यवाहीस पात्र ठरतात. सबब त्यांच्या विरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद मांडण्यात आला की, त्यांनी जनमाहिती अधिका-यास मागितलेली माहिती जनमाहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत पुरविली नाही. ती ज्या प्राधिकरणाशी संबंधित होती त्या प्राधिकरणाकडेही त्यांनी अपिलार्थीच्या अर्जाची प्रत पाठवून अपिलार्थीस कळविले नाही. तद्वतच जनअपिलीय

अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नाही. त्यांच्या या कृतीव्दारे त्यांनी कलम ५,६ व ७ चा भंग केला आहे. त्यामूळे जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्यावर शिस्तभंगाची तद्वतच शास्तीची कार्यवाही करावी.

जनमाहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नव्हती. कारण अपिलार्थीने माहितीच्या अर्जाच्या संदर्भात दिलेल्या प्रकरणाशी संबंधित त्यांच्या कार्यालयाचा सोनगीर पोलीस स्टेशनमध्ये कोणत्याही प्रकारचा मूळात पत्रव्यवहार झालेला नव्हता. त्यामूळे त्यांनी अपिलार्थीच्या अर्जाची त्वरीत दखल घेवून अपिलार्थीस दिनांक- २७-०३-२००६ रोजी त्यांच्या माहिती अर्जा संदर्भात उत्तर दिलेले आहे. तव्दतच अपिलार्थी हे माहितीच्या अधिकारा अन्वये त्यांच्या कार्यालयाकडे वारंवार अर्ज करीत असतात. कार्यालयाशी संबंधित नसलेली माहिती मागवून चुकीचे अपील करीत असतात व जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्या विरुध्द कार्यवाहीची मागणी करीत असतात व याव्दारे ते प्रशासकीय कामात अडथळा आणीत असतात. हाही मुद्दा आयोगाने विचारात घ्यावा.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व दोन्हीही बाजूने मांडलेला युक्तीवाद पाहता अपिलार्थीने माहिती अर्ज केल्यानंतर जर ती माहिती जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलबध नव्हती तर त्यांनी त्याप्रमाणे अपिलार्थीस कळवावयास हवे होते. तथापि त्यांनी अपिलार्थीस पाठविलेले दिनांक- २७-०३-२००६ रोजीच्या पत्राचे अवलोकन करता, त्यांनी अपिलार्थीस पोलीस स्टेशन, सोनगीर यांच्याकडून माहिती मिळविण्याचा अर्ज करावा, असे उत्तर दिले आहे. या पत्रामध्ये त्यांनी त्यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती होती किंवा नव्हती या संदर्भात कोणताही खुलासा केला नाही. अपिलार्थीस दिलेल्या

या पत्रावरुन त्यांनी अपिलार्थीस दिलेले उत्तर हे टोलवाटोलवीचे उत्तर असल्याचे सकृतदर्शनी स्पष्ट होते. त्यामूळे अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती दिली नाही, हा त्यांचा मुद्दा ग्राहय ठरतो. याचबरोबर जनअपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी सुनावणी घेतली नाही, हे देखिल निःसंशयपणे सिध्द होत आहे. जनअपिलीय अधिकारी यांना सुनावणी न घेण्याचे कारण विचारले असता अपिलार्थीने अपील अर्जात नमूद केलेल्या विषयावर त्यांच्याकडे कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार उपलब्ध नसल्याने त्यांनी सुनावणी घेतली नाही, असे उत्तर आयोगास देण्यात आले. सदर कारण आयोगास मान्य नाही. जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे माहिती अधिकारातील तरतुदी व्दारे प्राप्त होणा-या अपिलावर विहीत मुदतीत घेणे अनिवार्य आहे तथापि या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या अपीलअर्जावर निर्णय न घेण्याची त्यांची कृती चुकीची आहे, असे आयोगाचे मत आहे. त्यांनी अपिलार्थीची सुनावणी टाळून एक प्रकारे त्यांच्या कर्तव्यात कसूर केला आहे, असे म्हटल्यास फारसे वावगे होणार नाही. अपिलार्थीनी त्यांच्या मूळ अर्जामध्ये उपमुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हापरिषद धुळे यांनी पोलीस स्टेशन सोनगीर यांच्याशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रतीची मागणी केली होती तर अशा प्रकारचा पत्रव्यवहार  उपमुख्य कार्यकारी अधिकारी व पोलीसस्टेशन सोनगीर यांच्यामध्ये झालेला नाही, असे उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सुनावणीमध्ये सांगितले. या प्रकरणी संबंधित ग्रामपंचायतचे विस्तार अधिकारी यांनी सोनगीर पो.स्टे.मध्ये फौजदारी दाखल केली असून या संबंधातला पत्रव्यवहार विस्तार अधिकारी (ग्रा.पं.) पंचायत समिती धुळे यांच्या कार्यालयात अपिलार्थीस उपलब्ध होवू शकेल, असे त्यांनी आज सुनावणीमध्ये सांगितले. तेंव्हा अपिलार्थीस या फौजदारी संदर्भातील पत्रव्यवहाराच्या प्रती हव्या असतील तर त्यांनी तसा अर्ज पंचायत समितीचे विस्तार अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमाखाली अर्ज दाखल करुन त्यांच्याकडून माहिती मिळविणे योग्य राहील असे आयोगाचे मत आहे.

वरील प्रकरणी जनमाहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत अपिलार्थीस कोणतीही माहिती वा अपिलार्थीच्या पत्रावरील यथास्थिती अभिप्राय न देवून शेवटी अपिलार्थीस दिशाभूल करणारी माहिती व तीही उशिराने दिली हे निःसंशयपणे सिध्द झाले असल्याने व त्याव्दारे त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव दर्शविल्याबद्दल संबंधित जनमाहिती अधिकारी यांच्यावर सचिव, (ग्रामविकास) यांनी प्रचलित सेवानियमानूसार यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेंचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

२३. अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

२४. जनमाहिती अधिकारी यांच्यावर त्यांनी या प्रकरणी त्यांच्या कार्यशैलीमध्ये दर्शविलेल्या कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल सचिव, (ग्रामविकास) यांनी प्रचलित सेवानियमानूसार यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करावी व अहवाल आयोगास दोन महिन्याच्या आत सादर करावा.

**धुळे** **( वि.बा.बोरगे )**
**दिनांक- २५-१०-२००७** **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**
**प्रत**

१. श्री.शांतीलाल मंगा चौधरी रा.सोनगीर ता. जि.धुळे पिनकोड-४२४३०९.
२. जनमाहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधिक्षक, जिल्हापरिषद,धुळे,यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३. जनअपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) जिल्हापरिषद, धुळे, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (ग्रामविकास) मंत्रालय, मुंबई, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६. निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम

२००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

**अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/६४९**

**निर्णय** **२५-१०-२००७**

**दिनांक**

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | ¸ÉÒ. SÉÉèvÉ®úÒ xÉ®åúpù ¤ÉÉ®úEÚò,<br>nèù. ®úÉVÉ®ÆúMÉ ]õÉ<Ç¨ºÉ,<br>¤ÉÉ¡òxÉÉ ¨ÉÉEæò]õ, iÉ³ý¨ÉVÉ±ÉÉ,<br>®úÉhÉÉlÉiÉÉ{É SÉÉèEò, ¨ÉxÉ{ÉÉºÉ¨ÉÉä®ú,<br>vÉÖ³äý | : | +Ê{É±ÉÉlÉÔ |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | VÉxÉ ¨ÉÉÊ½þiÉÒ +ÊvÉEòÉ®úÒ<br>iÉlÉÉ ºÉ½þÉªªÉEò +Ê¦ÉªÉÆiÉÉ, ¸ÉähÉÒ-1,<br>ºÉÉ´ÉÇVÉÊxÉEò ¤ÉÉÆvÉEòÉ¨É ={ÉÊ´É¦ÉÉMÉ – 1,<br>Ê¶[É®ú{ÉÚ®ú, ÊVÉ±½þÉ vÉÖ³äý | : | |
| 2 | VÉxÉ +Ê{É±ÉÒªÉ +ÊvÉEòÉ®úÒ<br>तथा कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग (रोहयो),<br>जिल्हा धुळे | : | lÉÊiÉ´ÉÉnùÒ |

<u>विवेचन</u>

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-१०-२००७ रोजी धुळे येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. चौधरी नरेंद्र बारकू हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, श्रेणी-१ श्री. दिनेश बी. बागूल (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (रोहयो) श्री. दिलीप आकारामजी साळूंके (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

ªÉÉ lÉEò®úhÉÒ +Ê{É±ÉÉlÉÔxÉä ºÉ´ÉÇ lÉlÉ¨É iªÉÉÆSªÉÉEòb÷Ò±É ÊnùxÉÉÆEò 17-04-2006 ®úÉäVÉÒSªÉÉ +VÉÉÇx´ÉªÉä VÉxÉ ¨ÉÉÊ½þiÉÒ +ÊvÉEòÉ®úÒ ªÉÉÆSªÉÉEòbä÷ iªÉÉÆSªÉÉ ={ÉÊ´É¦ÉÉMÉÉ¨ÉÉ¡ÇòiÉ 01 BÊ|É±É 2005 iÉä 15 BÊ|É±É 2006 ªÉÉ EòÉ±ÉÉ´ÉvÉÒiÉÒ±É Eò®úhªÉÉiÉ +É±Éä±ªÉÉ ®úºiÉä Ê´ÉEòÉºÉ EòÉ¨ÉÉºÉÆnù¦ÉÉÇiÉ JÉÉ±ÉÒ±É lÉ¨ÉÉhÉä ¨ÉÉÊ½þiÉÒ ¨ÉÉÊMÉiÉ±ÉÒ ½þÉäiÉÒ.

“ १. कामाचे नांव, २. योजनेचे नांव, ३. अंदाजपत्रकीय रक्कम, ४. मंजूर रक्कम, ५. प्रत्यक्ष झालेला खर्च, ६. कामाची सद्यस्थिती, ७. कामाच्या सर्वसाधारण वर्णनाच्या प्रती, ८. संबंधीत कामावर देखरेख करणा-या अधिकारी यांचे नांव आदी माहिती. ”

+Ê{É±ÉÉlÉÔxÉä ½þÒ ¨ÉÉÊ½þiÉÒ xÉÉånùhÉÒEÞòiÉ ]õ{ÉÉ±ÉÉ´nùÉ®äú ¨ÉÉÊMÉiÉ±ÉÒ ½þÉäiÉÒ.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अधिकार अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६-०६-२००६ रोजी प्रथम अपील केले.

जन अपिलीय अधिकारी यांनी या अपिलाची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. सदर अपिलाची सुनावणी का घेतली नाही असे विचारले असता सदर अपील त्यांच्या कार्यालयास प्राप्त झाले नसल्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी शपथपत्राव्दारे आयोगासमोर सांगितले.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३१-०७-२००६ रोजी व्दितीय अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन संबंधीत जन माहिती अधिका-यास जास्तीत जास्त शास्ती लावण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्याने त्यांनी त्यांच्या व्दितीय अपिलामध्ये केलेली विनंती हाच त्यांचा युक्तिवाद मानून पुढे सुनावणी घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेल्या विशिष्ट प्रपत्रामध्ये त्यांच्याकडे माहिती नव्हती तथापि त्यांनी प्रयत्न करुन अंतीमतः ही माहिती दिनांक २८-०७-२००६ रोजी दिली आहे. तथापि ही माहिती प्राप्त होण्यापुर्वीच एक दिवस आधी म्हणजेच दिनांक २७-०७-२००६ रोजी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे. (सदर अर्ज राज्य माहिती आयोग मुंबई यांचे कार्यालयास दिनांक ३१-०७-२००६ रोजी प्राप्त झाला)

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे करण्यात आलेला युक्तिवाद पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, मुळात अपिलार्थीने त्यांच्या प्रथम अर्जामध्ये ही माहिती नोंदणीकृत किंवा शिघ्र टपालाव्दारे मागितली होती. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २४-०४-२००६ रोजीच्या पत्रामध्ये अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती तयार असल्याचे कळवून अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात ही माहिती पाहण्यासाठी बोलाविले. जन माहिती अधिकारी यांची ही कृती सर्वस्वी चुकिची आहे. जर त्यांच्याकडे अपिलार्थीने मागितलेली माहिती तयार होती तर त्यांनी अपिलार्थीस ही माहिती देण्यापोटी लागणा-या शुल्काची रक्कम विहित

मुदतीत संपूर्ण तपशीलासह कळविणे माहिती अधिकार अधिनियमाव्दारे अभिप्रेत होते. तथापि त्यांनी अशी कोणतीही कृती केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रा-वरुन दिसून येत नाही. त्यामुळे त्यांच्याकडे ही माहिती खरोखरच तयार होती किंवा कसे हे कळण्यास मार्ग नाही. अपिलार्थीने मागितलेली माहिती जरी विस्तृत स्वरुपात असली तरी अशा प्रकारची माहिती सार्वजनिक बांधकाम खात्याच्या क्षेत्रीय पातळीवरील कामांच्या अंदाजपत्रकाच्या प्रतीमध्ये सहज उपलब्ध असते. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीत फक्त संबंधीत कनिष्ठ अभियंत्याचे नांव, उपरोक्त माहितीमध्ये जरी जन माहिती अधिकारी यांनी टाकले असते तरी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती मिळू शकली असती.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती अंतीमतः जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २८-०७-२००६ रोजी दिली असून ही माहिती अपिलार्थीस मिळाल्याप्रित्यर्थ अपिलार्थीची पोच पावती त्यांनी आयोगासमोर दाखल केली आहे. येथे असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांच्याकडे वर म्हटल्याप्रमाणे ही माहिती त्यांच्या नियमीत कार्यालयीन कामकाजात नेहमी तयार ठेवलेली असते. ही माहिती त्यांना अपिलार्थीस विहित मुदतीत देणे सहज शक्य होते. तथापि त्यांनी अपिलार्थीस ही माहिती देण्यास विहित मुदतीपेक्षा २ महिने १२ दिवस इतका जास्त विलंब लावला आहे व त्यायोगे या प्रकरणी त्यांनी त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव दर्शविलला आहे. त्यांच्या या कृतीमुळे ते निःसंशयपणे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीअन्वये कार्यवाहीस पात्र ठरत आहेत.

तेव्हा असे आदेशीत करण्यात येते की, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (२) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यशैलीमध्ये दर्शविलेल्या कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक

विभाग, नाशिक यांनी त्यांच्यावर यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी व आपला अनुपालन अहवाल आयोगास हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ महिन्याच्या आत सादर करावा. अपिलार्थीस आता पूर्णतः माहिती मिळाली असल्याने माहितीबाबत कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

**<u>ÊxÉhÉÇªÉ</u>**

1. +{ÉÒ±É ¨ÉÉxªÉ Eò®úhªÉÉiÉ ªÉäiÉ +É½äþ.
6. VÉxÉ ¨ÉÉÊ½þiÉÒ +ÊvÉEòÉ®úÒ ªÉÉÆxÉÒ iªÉÉÆSªÉÉ EòÉªÉÇ¶Éè±ÉÒ¨ÉvªÉä nù¶ÉÇÊ´É±Éä±ªÉÉ EòiÉÇ´ªÉ {É®úÉªÉhÉiÉäSªÉÉ +¦ÉÉ´ÉÉ¤Équù±É ¨ÉÖJªÉ +Ê¦ÉªÉÆiÉÉ, ºÉÉ´ÉÇVÉÊxÉEò ¤ÉÉÆvÉEòÉ¨É ÊÉÉnäùÊ¶ÉEò Ê´É¦ÉÉMÉ, xÉÉÊ¶ÉEò ªÉÉÆxÉÒ iªÉÉÆSªÉÉ´É®ú ªÉlÉÉªÉÉäMªÉ |É¶ÉÉºÉEòÒªÉ EòÉ®ú´ÉÉ<Ç Eò®úÉ´ÉÒ ´É +É{É±ÉÉ +xÉÖ{ÉÉ±ÉxÉ +½þ´ÉÉ±É +ÉªÉÉäMÉÉºÉ ½äþ +Énäù¶É ÊxÉMÉÇ¨ÉÒiÉ ZÉÉ±ªÉÉ{ÉÉºÉÚxÉ 2 ¨ÉÊ½þxªÉÉSªÉÉ +ÉiÉ ºÉÉnù®ú Eò®úÉ´ÉÉ.

धुळे ( वि. बा. बोरगे )

दिनांक २५-१०-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ ¸ÉÒ. SÉÉèvÉ®úÒ xÉ®åúpù ¤ÉÉ®úEÚò, nèù. ®úÉVÉ®ÆúMÉ ]õÉ<Ç¨ºÉ, ¤ÉÉ¡òxÉÉ ¨ÉÉEæò]õ, ®úÉhÉÉ|ÉiÉÉ{É SÉÉèEò,
धुळे

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, श्रेणी-१, सार्वजनिक बांधकाम उपविभाग - १, शिरपूर, जिल्हा धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग

(रोहयो), जिल्हा धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, बांधकाम भवन, त्र्यंबकेश्वर रोड, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमाक २००७/रामाआ/अपील/सिआर/६५०

निर्णय दिनांक- २५-१०-२००७.

श्री.नथेसिंग रामसिंग गिरासे उर्फ प्रतापसिंग रामसिंग गिरासे, मु.पो.चिमठावळ, ता.शिंदखेडा जिल्हा-धुळे. : अपिलार्थी

विरुध्द

१ जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक (जंकास) प.धुळे : प्रतिवादी

२.	जनअपिलीय अधिकारी तथा
उपवनसंरक्षक, पश्चिम धुळे
वनविभाग, धुळे.

## विवेंचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनाक- २५-१०-२००७ रोजी  धुळे येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री.नथेसिंग रामसिंग गिरासे उर्फ प्रतापसिंग रामसिंग गिरासे ( यापुढे त्यांना  अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक (जंकास) पश्चिम धुळे, श्री.व्हि.जी.कुलकर्णी (यापुढे त्यांना  जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), जनअपिलीय अधिकारी तथा उपवनसंरक्षक, पश्चिम धुळे, श्री.एस.एस.डोळे (यापुढे त्यांना  जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल)  हे हजर आहेंत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक-१७-०४-२००६  रोजीच्या अर्जा अन्वये जनमाहिती अधिकारी यांचेकडे सन १९८० ते १०-०४-२००६ या कालावधीतील  हजेरीपत्रकाच्या संदर्भात खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

‘‘१. मी सन १९८० पासून आपल्या वनविभागात, चिमठावळ ता.शिंदखेडा व परिसरात रोजंदारी मजुर म्हणून काम केलेले आहे. सुरुवातीस वनक्षेत्रपाल श्री.व्ही.जी.पाटील म्हणून धुळे येथे नेमणूकीस होते, त्यांचेकडेस श्री.एम.एस.भामरे, वनपाल म्हणून कार्यरत असतांना मी कामास लागलो आहे.

तरी माझ्या नांवाचा उल्लेख असलेले प्रमाणक / हजेरीपत्रक इ.कागदपत्रांच्या सत्यप्रती पुरवाव्यात ही विनंती.

२. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार आपल्या कार्यालयाने कागदपत्रांची सुची (इंडेक्स) तयार केले असेलच, तर त्याची सत्यप्रत पुरवावी ही विनंती.

सदर माहिती अपिलार्थीने नोंदणीकृत टपालाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीचा अर्ज जनमाहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी लागलीच त्यांच्याकडील दिनांक- १७-०४-२००६ रोजीच्या पत्रान्वये सदर माहिती वनक्षेत्रपाल धुळे (प्रा.) यांच्याकडे उपलब्ध असल्याने त्यांच्याकडून अपिलार्थीने विचारलेली माहिती त्यांच्या कार्यालयाकडून १५ दिवसाच्या आत सादर करण्या विषयी सूचित केले. जनमाहिती अधिकारी यांनी वनक्षेत्रपाल धुळे (प्रा.) यांना दिनांक- १७-०४-२००६ रोजीच्या दिलेल्या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस पुरविली आहे.

तथापि विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनूसार जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक-२२-०५-२००६ प्रथम अपील केले. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळमाहितीची मागणी कायम ठेवली असल्याचे दिसून येते. त्याचबरोबर वनक्षेत्रपाल धुळे (प्रा.) यांनी अपिलार्थीस माहिती देण्याप्रित्यर्थ टाळाटाळ केली आहे असेही त्यांनी जनअपिलीय अधिकारी यांच्या निदर्शनास या अपीलअर्जामध्ये आणले आहे.

अपिलार्थीच्या या अपीलअर्जावर जनअपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नसल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात असलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत आहे. अपीलाची सुनावणी न घेण्याची कारणे जनअपिलीय अधिकारी यांना विचारली असता वनक्षेत्रपाल, धुळे (प्रा.) यांच्याकडून अपिलार्थीने मागितलेली माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी ही सुनावणी न घेतल्याचे आयोगासमोर कबूल केले आहे.

जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादामूळे व्यथीत होवून अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) मधील तरतुदीनुसार दिनांक- १२-०७-२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे. या व्दितीय अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून जनमाहिती अधिकारी यांच्यावर माहिती अधिकार अधिनियमातील तरतूदीनूसार, त्यांना ही माहिती न देण्या संदर्भात योग्यती प्रशासकीय कार्यवाही करण्याची आयोगास विनंती केली आहे व त्याचबरोबर जनअपिलीय अधिकारी यांनी अधिनियमातील विहित तदतूदीमध्ये त्यांचे अपील न ठरवून एक प्रकारे ते विना सुनावणीचे पडलेले असल्याचेही या अपीलअर्जामध्ये आयोगाच्या निदर्शनास आणले आहे.

आज झालेल्या युक्तीवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांना विहित मुदतीत जनमाहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद मिळालेला नाही. व त्याचबरोबर जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीच्या अपीलअर्जाची कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतली नाही. आयोगाच्या सुनावणीचे पत्र प्राप्त झाल्यानंतर उपवनसरंक्षक धुळे यांच्या कार्यालयाचे दिनांक- २०-१०-२००७ रोजीच्या पत्रान्वये

त्यांना जी माहिती प्राप्त झाली आहे ती असत्य व अपूर्ण अशी आहे. त्याचबरोबर त्यांना ही माहिती देखील जनमाहिती अधिकारी यांनी विलंबाने दिली आहे.

जनमाहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, वनखात्याच्या नियमीत पध्दतीनूसार अपिलार्थीने मागितलेली माहिती ही वनक्षेत्रपाल, धुळे (प्रा.) यांच्या पातळीवर ठेवली जाते व त्याप्रमाणे अपिलार्थीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी वनक्षेत्रपाल, धुळे (प्रा.) यांना दिनांक- १७-०४-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठीचा तपशील त्यांच्याकडून मागविला होता. त्यांच्याकडे वेळोवेळी पाठपूरावा करुन देखील त्यांनी विहित मुदतीत माहिती न देता आता दिनांक- १९-१०-२००७ रोजी त्यांनी जनमाहिती अधिकारी यांच्याकडे माहिती दिली आहे. सदर माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक २०-१०-२००७ रोजी विनामुल्य पुरविली आहे. तथापि अपिलार्थीचे असे म्हणणे आहे की, ही माहिती असत्य आहे. अपिलार्थीने येथे माहितीच्या सत्यासत्यतेचा जो मुद्दा उपस्थित केला आहे त्या मुद्या संदर्भात जनमाहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती उपवनसंरक्षक यांनी तपासून पाहून अपिलार्थीस सत्य माहिती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १० दिवसाच्या आत विनामुल्य पुरवावी असे आदेशीत करण्यात येत आहे.

या प्रकरणी असे दिसून येत आहे की, अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना विहित मुदतीपेक्षा जास्त विलंब लागलेला आहे. अपिलार्थीने मागितलेली माहिती जनमाहिती अधिकारी यांच्याकडे सहजरित्या उपलब्ध नव्हती त्यांना ती माहिती संबंधित वनक्षेत्रपाल, धुळे (प्रा.) यांच्याकडून प्राप्त करुन घ्यावयाची होती. सदर माहिती वनक्षेत्रपाल, धुळे (प्रा.) यांच्याकडून प्राप्त करुन घेण्यापोटी त्यांना दिनांक- ०३-०६-२००६ व १९-१०-२००७ रोजी स्मरणपत्रे देखिल पाठविली आहेत व त्याचबरोबर संबंधित

वनक्षेत्रपाल, धुळे (प्रा.) यांना त्यांनी वेळोवेळी या संदर्भात तोंडी सूचना दिल्या होत्या. त्यामूळे अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लागलेल्या विलंबा बाबत वनक्षेत्रपाल, धुळे (प्रा.) हे प्रामुख्याने जबाबदार आहेत, असे आयोगाचे मत आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) अन्वये माहिती अधिका-यास माहिती देण्यापोटी जे इतर कर्मचारी / सहायक जबाबदार असतील त्यांना देखील जनमाहिती अधिकारी म्हणून समजण्यात यावे, अशी तरतूद आहे. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लावलेला विलंब हा निश्चीतपणे समर्थनीय नाही असे आयोगाचे मत आहे. त्यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देवून आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव सिध्द तर केलाच आहे परंतू त्याचबरोबर त्यांनी आपल्या या कृतीव्दारे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या प्रती त्यांच्या मनात असलेला अनादर देखील त्यांनी त्यांच्या कृतीव्दारे दाखवून दिला आहे. जनमाहिती अधिकारी यांची उपरोक्त परिस्थितीत अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देण्याची कृती कोणत्याही परिस्थितीत निश्चीतपणे समर्थनीय होवू शकत नाही, असे आयोगाचे मत आहे. तेंव्हा असे आदेशीत करण्यात येत आहे की, जनमाहिती अधिकारी व त्यांचे सहायक जे त्यांना या प्रकरणी माहिती देण्यास जबाबदार आहेत त्यांना, त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लावलेल्या विलंबाबाबत प्रतिदिनी २५०/- रुपये या प्रमाणे एकूण रुपये २५,०००/- (पंचविस हजार रुपये) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम त्यांनी ४ हप्त्यात हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत पुढील शिर्षाखाली जिल्हाकोषागारात जमा करावी. जनमाहिती अधिकारी व सहायक जनमाहिती अधिकारी यांच्यामध्ये शास्तीची विभागणी उपवनसंरक्षक धुळे यांनी करावी.

**“००७० इतर प्रशासनिक सेवा, ६० इतर सेवा, ८०० इतर जमा रक्कम, १८ माहितीचा अधिकार ००७०-००६-१”**

शास्तीची रक्कम भरण्याच्या पहिला हप्त्याची अंतिम मुदत दिनांक- ३०-११-२००७, दुस-या हप्त्याची दिनांक- ३१-१२-२००७, तिस-या हप्त्याची दिनांक- ३०-०१-२००८ व चौथ्या हप्त्याची दिनांक- २८-०२-२००८ ही राहील. सदर शास्तीचा शासकीय कोषागारात भरणा सुरु केल्याचा प्रथम अनुपालन अहवाल उपवनसंरक्षक (पश्चिम) धुळे यांनी हे आदेश निर्गमित झाल्यापासून ६० दिवसाचे आत आयोगास सादर करावा. त्याचबरोबर जनमाहिती अधिकारी यांना पुढे असेहि आदेशीत करण्यात येत आहे की, त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १० दिवसाच्या आत संपूर्ण माहिती सत्यस्वरुपात व साक्षांकित करुन अपिलार्थीस विनामुल्य द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपीलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

१२. अपीलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

१३. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, त्यांना हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १० दिवसाच्या आत सत्य स्वरुपात व साक्षांकित करुन विनामुल्य द्यावी.

१४. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लावलेल्या असमर्थनिय विलंबा बाबत त्यांना एकूण रुपये २५,०००/- इतकी शास्ती लावण्यात येत आहे. त्यांनी निकालपत्रामध्ये नमूद केलेल्या शिर्षाखाली शास्तीची रक्कम टप्याटप्याने जिल्हाकोषागारात जमा करावी.

४. वरील आदेश क्रमांक-३ च्या अनुपालनाचा अहवाल उपवनसंरक्षक, धुळे यांनी दर महिन्याच्या ४ थ्या आठवडयात आयोगास अहवाल सादर करावा.

धुळे. ( वि.बा.बोरगे)
दिनांक- २५-१०-२००७. राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद.

प्रत,

२५. श्री.नथेसिंग रामसिंग गिरासे उर्फ प्रतापसिंग रामसिंग गिरासे मु.पो.चिमठावळ, तालूका-शिंदखेडा, जिल्हा-धुळे.

२६. जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक, पश्चिम धुळे, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

२७. जनअपिलीय अधिकारी तथा उपवनसंरक्षक पश्चिम धुळे, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

२८. वनक्षेत्रपाल, धुळे (प्रा.) यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

२९. सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

३०. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/६५१
निर्णय दिनांक- २५-१०-२००७

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री.दिपक चंद्रकांत पवार.<br>मु.पो.कमखेडा, तालूका शिंदखेडा, जिल्हा-धुळे. | : | अपिलार्थी |
| | विरुध्द | | |
| १ | जनमाहिती अधिकारी तथा<br>अध्यक्ष, गुरुदत्त विद्या प्रसारक मंडळ,कमखेडा<br>तालूका शिंदखेडा जिल्हा धुळे. | : | प्रतिवादी |
| २. | जनअपिलीय अधिकारी तथा<br>सहाय्यक धर्मादाय आयुक्त, धुळे, जिल्हा- धुळे. | | |

## <u>विवेंचन</u>

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- २५-१०-२००७ रोजी धुळे येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री.दिपक चंद्रकांत पवार (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जनमाहिती अधिकारी तथा अध्यक्ष गुरुदत्त विद्या प्रसारक मंडळ कमखेडा तालूका शिंदखेडा जिल्हा धुळे, श्री.मनोहर दत्तात्रय पवार (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) जनअपिलीय अधिकारी तथा सहाय्यक धर्मदाय आयुक्त धुळे, श्री. शांताराम वसंत मुळे (यापुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक-१५-०२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे गुरुदत्त विद्या प्रसारक मंडळ कमखेडा तालूका

शिंदखेडा जिल्हा धुळे यांच्याकडे त्यांच्या संस्थेतील सभासद संख्या, सभासदत्व नाकारल्याच्या ठरावाच्या सत्यप्रती व कार्यकारी मंडळाच्या सभेबाबत १० फेब्रुवारी २००६ पर्यंतच्या कालावधीतील माहिती खालील प्रमाणे मागितली होती.

‘‘१. संस्थेतील एकूण सभासद संख्या किती ?

२. संस्थेतील १० फेब्रुवारी ०६ पर्यंत झालेल्या सभासदांची नांवे, कोणत्या तारखेला सभासद झाले ती तारीख

३. १० फेब्रुवारी ०६ पर्यंत किती व्यक्तींनी संस्थेत सभासद होणेसाठी अर्ज केले. मात्र कार्यकारी मंडळाने त्यांना सभासद होणेसाठी नाकारले असे असल्यास त्या अर्जदाराची नांवे, ज्या कार्यकारी मंडळाच्या सभेत सभासद होण्याचा विषय नामंजूर करण्यात आला त्या ठरावाची सत्यप्रत.

४. सन २००२- ०७ मुदतीसाठी कार्यरत असलेल्या कार्यकारी मंडळाने कार्यभार स्विकारले पासून ते १० फेब्रूवारी ०६ पर्यंत किती सभा झाल्या ? व कोणत्या दिवशी ?

५ सर्व साधारण सभांचे या कालावधीतील (२००२-०७) दिनांक’’

अपिलार्थीने ही माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीचा अर्ज प्राप्त झाल्यावर जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक-१७-०२-२००६ रोजी एका पत्रान्वये असे कळविले की, ‘‘माहितीचा अधिकार कायदा २००५ या संस्थेस लागू होत नाही. कारण ही संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम सन १९५० खाली नोंदविलेली शैक्षणिक संस्था असल्यामूळे या शैक्षणिक संस्थेस सार्वजनिक प्राधिकरण म्हणून संबोधण्यात आले नाही, अशी त्यांची धारणा आहे. हा कायदा त्यांच्या

शैक्षणिक संस्थेला लागू होत नाही. सबब अपिलार्थीस मागितलेली माहिती त्यांना देता येत नाही. '' संस्थेच्या अध्यक्षाकडून अशा प्रकारचे पत्र प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीने सहाय्यक धर्मादाय आयुक्त, धुळे यांच्याकडे महाराष्ट्र माहितीचा अधिकार २००२ मधील कलम ११ अन्वये दिनांक- २७-०२-२००६ रोजी प्रथम अपील केले. त्यावेळी महाराष्ट्र माहितीचा अधिकार २००२ निरसित झालेला होता. अपिलार्थीने चूकीच्या फॉर्मवर जनमाहिती अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते असे दिसते.

या प्रकरणाच्या सुनावणी संदर्भात धर्मादाय आयुक्त यांनी दिनांक- ०५-०८-२००६ रोजी आदेश पारीत करुन अपिलार्थीचे अपील अंशतः मंजूर केले व गुरुदत्त विद्याप्रसारक मंडळ कमखेडा, तालूका- शिंदखेडा या संस्थेच्या पदाधिका-याना अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत माहिती देण्याचे सूचित केले. सदर आदेश सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांनी दिनांक- ०७-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये त्यांनी निर्गमित केलेले आहेत. सहायक धर्मादाय आयुक्त यांच्या आदेशास अनुसरुन संबंधित संस्थेने संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सचिव यांच्या सहीने अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक- २४-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये माहिती पुरविली आहे. सदर माहिती अपिलार्थीस दिनांक-०१-०९-२००६ रोजी प्राप्त झाली आहे.

अपिलार्थीस मिळालेली सदर माहिती अपूर्ण असल्याने व्यथीत होवून अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) मधील तरतूदीनूसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- ०२-०९-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास विलंब केला आहे. अध्यक्ष, गुरुदत्त विद्याप्रसारक मंडळ,कमखेडा तथा माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कार्यवाही व्हावी, अशी विनंती आयोगास केली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, संस्थेच्या अध्यक्षांनी त्यांना अपूर्ण माहिती दिल्याने त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही व्हावी व पूर्ण माहिती त्यांना संस्थेने द्यावी. संस्थेकडून प्राप्त झालेल्या माहितीमध्ये सभासदांची नावे व सर्वसाधारण सभेचे दिनांक नाहीत. त्यामूळे या संस्थेवर दंडात्मक कार्यवाही होण्याचे आदेश व्हावेत.

जनमाहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस योग्यती माहिती सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांच्या आदेशा नंतर त्यांच्याकडील दिनांक- २४-०८-२००६ रोजीच्या पत्राने व दिनांक- २५-०८-२००६ चे रजिस्टर पोष्टाने संबंधितास पाठविली आहे. त्यांच्या संस्थेमध्ये जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्या अद्यापही त्यांनी नेमणूका केलेल्या नाहीत. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा त्यांच्या संस्थेस लागू होत नसल्याचे त्यांना वाटल्यावरुन त्यांनी या नेमणूका केल्या नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व दोन्हीही बाजूच्या युक्तीवादावरुन असे दिसून येते की, मुलतः गुरुदत्त विद्याप्रसारक मंडळ, कमखेडा तालूका शिंदखेडा या शिक्षण संस्थेने त्यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी मधील कलम ५ (१) च्या तरतुदीनूसार जनमाहिती अधिकारी यांच्या नेमणूका केलेल्या नाहीत.

युक्तीवादाच्या वेळी संस्थेच्या अध्यक्षानी शिक्षण संचालकाचे संबंधित परिपत्रक (दिनांक- २७-०४-२००६) ज्यामध्ये, शाळेचे मुख्याध्यापक शाळेचे जनमाहिती अधिकारी असून शिक्षण संस्थेचे सचिव हे जनअपिलीय अधिकारी आहेत, असे सूचित केले आहे, हे त्यांना अद्यापपर्यंत प्राप्त झाले नसल्याचे सांगितले. उपरोक्त प्रकरणातील शिक्षण संस्था ही शासनाचे अनुदान प्राप्त होणारी शिक्षण संस्था असून तिची नोंदणी मुंबई पब्लीक ट्रस्ट ॲक्ट

१९५० व सोसायटीज रजिष्ट्रेशन ॲक्ट १८६० नुसार झाली आहे. त्यामूळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतूदी या शिक्षण संस्थेस तंतोतंत लागू होत आहेत. अपिलार्थीने संस्थेच्या अध्यक्षाकडे माहिती मागितल्या नंतर माहितीचा अधिकार हा कायदा आपल्या संस्थेस लागू होत नसल्याचे वाटल्यावरुन संस्थेच्या अध्यक्षाने अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले. तदनंतर अपिलार्थीने सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील केले आहे. वास्तकितः या प्रकरणात सहाय्यक धर्मादाय आयुक्त हे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनूसार या प्रकरणात जनअपिलीय अधिकारी होवू शकत नाहीत कारण मूळत त्यांची या शिक्षणसंस्थेचे जन अपिलीय अधिकारी म्हणून विशीष्ट अशी नेमणूक झालेली नाही. जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी हे सर्वसाधारणपणे एकाच प्राधिकरणाचे असावेत, असे माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये अभिप्रेत आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ व कलम १९ (१) मध्ये माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी कोण असावेत, याचे पुरेशा प्रमाणात स्पष्टीकरण दिलेले आहे. अपिलार्थीने मूलतः प्रथम अपील चुकीच्या प्राधिकरणाकडे व त्यादिवशी अस्तित्वात नसलेल्या आणि निरसित झालेल्या कायद्यातील तरतुदीप्रमाणे केले आहे व त्या अपिलातील निर्णया विरुध्द त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयुक्तांकडे अपिल केले असल्याने अपिलार्थीचे व्दितीय अपील तथ्यहीन ठरत आहे त्यामुळे ते फेटाळण्या वाचून आयोगास मार्ग उरला नाही. तथापि या प्रकरणात असे निश्चीतपणे सिध्द होत आहे की, सदर संस्थेने माहितीचा अधिकार २००५ मधील तरतुदीचे अनेक प्रकारे उल्लंघन केले आहे. त्यापैकी प्रथम म्हणजे त्यांनी त्यांच्या संस्थेमध्ये माहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्या नेमणूका केलेल्या नाहीत. त्यामूळे या संस्थेकडून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (१) व अप्रत्यक्षपणे कलम १९ (१) च्या

तरतुदीचा भंग झाला आहे. अपिलार्थीने मागितलेली माहिती वास्तविकतः माहिती अधिकार अधिनियमातील कलम ४ (२) अन्वये संस्थेने स्वयं प्रेरणेने घोषीत करावयास हवी होती. तथापि त्यांनी तसे केल्याचे दिसून येत नाही. सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांनी देखील या प्रकरणी अपील ठरवितांना हे अपील ठरविण्याची त्यांना खरोखरीच अधिकारीता आहे किंवा कसे, याचा विचार केल्याचे आयोगास दिसून येत नाही. त्यांच्या आदेशा नंतरही संस्थेने अपीलार्थीस जी माहिती दिली आहे त्यामध्ये अपिलार्थीने विचारलेल्या एकूण ५ मुद्यावरील माहितीपैकी मुद्या क्रमांक-२ व मुद्या क्रमांक- ५ ची माहिती दिली नाही. म्हणजेच त्यांनी अपिलार्थीस अर्धवट माहिती दिली आहे. हे सर्व पाहता सदर संस्थेच्या कारभाराची धर्मादाय आयुक्त व शिक्षण संचालक यांच्याकडून सखोल चौकशी होणे गरजेचे आहे, असे आयोगास वाटते. तव्दतच शिक्षण खात्यामध्ये, याच संस्थेसारख्या अद्यापही इतर अनेक संस्था, ज्यामध्ये जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्या अद्यापही नेमणूका केल्या गेलेल्या नाहीत, अशा अस्तित्वात असण्याची शक्यता नाकारता येत नाही. तेंव्हा असे सूचित करण्यात येते की, शिक्षण संचालक व धर्मादाय आयुक्त यांनी या संस्थेने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील उपरोक्त विवेचनात वर्णन केल्याप्रमाणे, कलम ५ (१)१९ (१) व ४ (२) यांचा भंग केल्यामूळे या संस्थेवर यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करावी. अपिलार्थीने मुळात चुकीच्या प्राधिकरणांकडे अर्ज व प्रथम अपिल केल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील तथ्यहीन ठरुन ते फेटाळण्यात येत आहे. अपिलार्थीचे अपिल जरी फेटाळले असले तरीही त्यांच्या मागण्या रास्त वाटत असल्याने त्यांचे आयोगाकडील अपिल ही अधिनियमातील कलम १८ अन्वये केलेली तक्रार समजून उर्वरित मुद्यावर आयोग खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

## <u>निर्णय</u>

२५. अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे.

२६. गुरुदत्त शिक्षण प्रसारक मंडळ या शिक्षण संस्थेने अपिलार्थीस अद्यापपावेतो द्यावयाची माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत विनामुल्य पुरवावी.

२७. गुरुदत्त शिक्षण प्रसारक मंडळ या शिक्षण संस्थेने त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व शाळा/महाविद्यालयांमध्ये जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्या नेमणूका हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ दिवसाच्या आत कराव्यात.

२८. सदर शिक्षण संस्थेच्या सर्व कारभाराची धर्मादाय आयुक्त व शिक्षण संचालक यांनी सखोल चौकशी करुन पुढे त्यांना आवश्यक वाटेल अशी कार्यवाही करावी.

२९. शिक्षण संचालक,पूणे यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व सार्वजनिक व खाजगी शिक्षण संस्थेमध्ये जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्या नेमणूका झाल्यात किंवा कसे याचा आढावा घेवून ज्या शिक्षण संस्थांमध्ये जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्या नेमणूका झालेल्या नाहीत त्या सर्व शिक्षण संस्थांमध्ये दिनांक- ३०-११-२००७ पर्यंत जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्या नेमणूका होतील, असे पहावे.

**धुळे** **( वि.बा.बोरगे )**
**दिनांक- २५-१०-२००७** **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

**प्रत**

१. श्री.दिपक चंद्रकात पवार, मु.पो.कमखेडा, तालूका-शिंदखेडा, जिल्हा-धुळे.

२. जनमाहिती अधिकारी तथा अध्यक्ष गुरुदत्त विद्याप्रसारक मंडळ कमखेडा तालूका-शिंदखेडा, जिल्हा-धुळे, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जनअपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, धुळे,यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. शिक्षण संचालक,(माध्यमिक)/ (प्राथमिक) शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, डॉ.बाबासहेब आंबेडकर मार्ग, ससून हॉस्पिटल जवळ, पुणे-०१, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.(दोन प्रतित)

५. धर्मादाय सह.आयुक्त,सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, जानकी प्लाझा, व्दारका सर्कल जवळ, पुणे रोड, नाशिक.

६. सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

७. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/५३०
निर्णय दिनांक- २९-१०-२००७

१ श्री. कांबळे चतुरंग रामदास, मुख्यसंपादक साप्ता. : अपिलार्थी
किनवटचा चतुरंग, कार्यालय सिदधार्थ नगर,
जेतवन बौध्द विहारा जवळ, किनवट,
तालूका-किनवट, जिल्हा-नांदेड.

विरुध्द

१ जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, : प्रतिवादी
किनवट, तहसील कार्यालय, किनवट, जि.नांदेड.

२. जनअपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, किनवट, जिल्हा-नांदेड.

## विवेंचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- २९-१०-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी कांबळे चतुरंग रामदास (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा)प्रभारी, किनवट, श्री.डुकरे दिंगबर खंडुजी (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी तहसीलदार, किनवट, श्री.लाड शंकर नारायणराव (यापुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- २३-०६-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे कामाच्या बदल्यात धान्य या योजनेतंर्गत सन २००४ ते २००६ या कालावधीतील माहिती खालील प्रमाणे मागितली होती.

“ केंद्र सरकार पुरस्कृत कामाचे बदल्यात धान्य व राष्ट्रीय रोजगार हमी योजने अंतर्गत सन २००४ पासुन सन २००६ पर्यंत आपल्या कार्यालयाकडून वितरीत करण्यात आलेल्या अन्न धान्याची माहिती.१)काम केलेल्या यंत्रणेचे नाव (२) त्यांनी शिफारस केलेल्या स्वस्त धान्य दुकानदाराचे नाव, गाव व परवाना क्रमांक, (३) अन्नधान्य देण्यासाठी दिलेला परमिट क्रमांक, दिनांक व गोदामाचे नाव- गाव, (४) स्वस्त धान्य वितरकांनी प्रत्यक्षात माल उचल केल्याचा दिनांक, माल वाटप केल्याचा

दिनांक (गहु व तांदूळ -वजनासह) (५) धान्य वाटप केलेल्या मजुरांची नांवे व कुपन्स क्रमांक आणि वजन  तसेच स्वाक्ष-याच्या सत्यप्रती."

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीने जनमाहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या या अर्जामध्ये ते दारिद्रय रेषेखाली आहेत किंवा कसे याबद्दल कोणताही उल्लेख केला नसल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या या अर्जास जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक- ०६-०७-२००६ रोजीच्या पत्राने प्रथम प्रतिसाद दिला. असाच अर्ज अपिलार्थीने जनमाहिती अधिकारी यांच्याकडे यापूर्वीच केलेला असल्यामूळे व त्या संदर्भात जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक- ०२-०२-२००६ रोजी कळविले असल्याने अपिलार्थीच्या दिनांक २३-०६-२००६ रोजीच्या अर्जास देखील जनमाहिती अधिकारी यांचे दिनांक- ०२-०२-२००६ रोजीचे उत्तर ग्राहय धरावे, असे जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कळविले आहे. जनमाहिती अधिकारी यांची ही कृती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत नाही. त्यांनी अपिलार्थीने केलेल्या प्रत्येक माहितीच्या अर्जावर स्वतंत्रपणे विचार करणे अपेक्षित आहे. कारण सर्वसामान्य माणूस शासकीय कार्यालया प्रमाणे या विषयाची नस्ती त्यांच्याकडे ठेवीलच याची शाश्वती नसते. त्यामूळे जनमाहिती अधिकारी यांचे हे पत्र प्राप्त झाल्यानंतर त्यांच्याकडे दिनांक- ०२-०२-२००६ रोजीची प्रत खरोखरच उपलब्ध होती किंवा कसे, हे कळण्यास मार्ग नाही. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या अर्जावर स्वतंत्रपणे माहिती देणे अपेक्षित होते. कदाचित जर त्यास स्वतंत्र उत्तर मिळाले असते तर त्यांनी जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे पुढील अपील केले नसते.

जनमाहिती अधिकारी यांच्या वरील पत्रातील माहितीने समाधान न झाल्याने त्यांनी जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९

(१) च्या तरतुदीनूसार दिनांक-०२-०८-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपीलाची जनअपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नसल्याचे आयोगास दिसून येते. जनअपिलीय अधिकारी यांनी या संदर्भात आयोगाकडे त्यांचे निवेदन सादर केले आहे. त्यामध्ये संबंधित अव्वलकारकूनाची बदली झाल्यामूळे या अपिलावर सुनावणीची प्रक्रिया झाली नाही. असे त्यांनी म्हटले आहे. जनअपिलीय अधिकारी यांचे अपील न ठरविण्याचे हे कारण आयोग मान्य करीत नाही. कारण माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील सर्व अपेक्षित प्रक्रिया या सार्वजनिक प्राधिकरणाच्या कर्मचा-यांच्या दैनदिंन कर्तव्याचा एक अविभाज्य भाग आहे. त्यांनी सदर अपिलाची सुनावणी न घेवून आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला, असे आयोगास वाटते. जनअपिलीय अधिकारी यांच्या अपील न ठरविण्याच्या या कार्यपध्दती बद्दल महसूल आयुक्त, औरंगाबाद यांनी याची यथायोग्य दखल घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येते.

जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादामूळे व्यथीत होवून अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) मधील तरतूदीनूसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- २७-१०-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तीवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांना जनमाहिती अधिकारी यांच्याकडील दिनांक- ०२-०२-२००६ रोजीचे कथीत पत्र ज्याचा संदर्भ जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस लिहिलेल्या दिनांक- ०६-०७-२००६ च्या पत्रामध्ये दिला आहे, ते त्यांना अद्यापही प्राप्त झालेले नाही. तसेच त्यांनी केलेल्या जनअपिलीय अधिकारी यांच्याकडील अपील अर्जाबाबत जनअपिलीय अधिकारी यांना

देखील दिनांक- १०-१०-२००६ रोजीच्या वेगळया पत्रान्वये त्यांच्या अपीलावर सुनावणी घेण्या संदर्भात विंनती केली होती. कारण अपिलार्थीस व्दितीय अपील करण्याची मुदत लवकरच संपत होती. अपिलार्थीने जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे याप्रमाणे विनंती करुनही त्यांच्या अपिलाची सुनावणी घेण्यात आली नाही. तव्दतच त्यांना अद्यापही सदर माहिती आवश्यक असल्याचे त्यांनी आयोगापुढे स्पष्ट केले.

जनमाहिती अधिकारी यांनी असा युक्तीवाद मांडला की, त्यांच्याकडे अपिलार्थीने मागितलेली माहिती उपलब्ध असून ते अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य देण्यास तयार आहेत. जनअपिलीय अधिकारी यांनी असा युक्तीवाद मांडला की, अपिलार्थीने अपील सुनावणीचा अर्ज दाखल केला त्यावेळी ते स्वतः वैद्यकीय रजेवर होते व त्या पदाचा कार्यभार दुस-या जन माहिती अधिका-यांच्याकडे होता.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व दोन्हीही बाजूचा युक्तीवाद ऐकला असता, असे दिसून येते की, अपिलार्थीने अशाच प्रकारची माहिती जनमाहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्याकडील दिनांक- १६-०१-२००६ रोजीच्या अर्जान्वये मागितली होती. सदर अर्ज जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयास दिनांक- १७-०१-२००६ रोजी प्राप्त झाला होता. या अर्जास उत्तर देताना जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्याकडे ही माहिती देण्यापोटीचे शुल्क रुपये १०७६/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याविषयी दिनांक- ०२-०२-२००६ अन्वये सूचित केले होते. याच पत्राचा संदर्भ त्यांनी अपिलार्थीस दिनांक-२३-०३-२००६ रोजी, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीच्या अर्जास उत्तर देतांना दिला आहे. तथापि मूळात हे पत्रच अपिलार्थीस प्राप्त झाले नाही, असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. सदर पत्र अपिलार्थीच्या पत्नीस प्राप्त झाल्याचे (परंतु ते अपिलार्थीस माहिती नसल्याचे) या सदंर्भात केलेल्या पत्रव्यवहारावरुन दिसून येते.

थोडक्यात अपिलार्थीवर जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्यामध्ये ब-याचवेळा पत्रव्यवहार होवूनही अंतिमतः अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेली माहिती मिळविण्या पासून जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून वंचीत राहिल्याचे दिसून येते. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केलेल्या त्यांच्या लेखी म्हणण्यामध्ये असाही मुद्या उपस्थित केला आहे की, अपिलार्थीने ते दारिद्रयरेषेखाली आहेत किंवा कसे याबाबत त्यांच्या मूळ अर्जात कोणताही उल्लेख केलेला नाही. या संबंधीत उत्तर देतांना अपिलार्थीने अशी माहिती दिली की, ते दारिद्रयरेषेखाली आहेत किंवा कसे याचा उललेख करण्याचे त्यांच्या हातून अनावधानाने राहिले होते. तथापि त्यांनी जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील करतांना या सोबत ते दारिद्रय रेषेखालील असल्या बाबतचे प्रमाणपत्र सादर केले होते. तथापि हा अपीलअर्ज सुनावणीस न आल्यामूळे अपिलार्थीचा ते दारिद्रयरेषेखाली असण्याचा हा मुद्या अनुत्तरीत राहिला आहे.

उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीस आवश्यक असलेली सर्व माहिती जनमाहिती अधिकारी यांच्याकडे तयार आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये एकूण ५ मुद्यापैकी सर्व मुद्यावरील माहिती त्यांच्याकडे जवळ जवळ तयार असून फक्त मजूराच्या सहयाच्या सत्यप्रती त्यांच्याकडे आज रोजी काही प्रमाणात उपलब्ध नाहीत. कारण या प्रति संबंधीत दुकानदाराकडे असून ही माहिती त्यांना तालुक्यातील वेगवेगळया दुकानदाराकडून प्राप्त करुन घ्यावी लागते. दुकानदार ही माहिती लागलीच देतील याची खात्री नसते, त्यासाठी त्यांना संबंधीतांचा वारंवार पाठपूरावा देखील करावा लागतो. जनमाहिती अधिकारी यांचा हा मुद्या आयोग मान्य करीत आहे. तथापि त्यांनी अपिलार्थीस मागीतलेल्या सहयाच्या सत्यप्रती अपिलार्थीस मिळवून देण्याच्या दृष्टीने ७ दिवसाच्या आत तातडीने कार्यवाही करुन ही माहिती परिपूर्ण करावी, असे त्यांना आयोग निर्देश देत आहे.

वरील घटनाक्रम व पत्रव्यवहार पहाता, जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने विहित मुदतीत प्रतिसाद दिल्याचे दिसून येते. तथापि अपिलार्थीने त्यांचा ते दारिद्ररेषेखाली असलेले प्रमाणपत्र अर्जासोबत जोडले नसल्यामूळे त्यांनी अपिलार्थीस ही माहिती दिली नाही. जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीचा अपीलअर्ज पोंचला नसल्यामूळे जनअपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिला नाही त्यांच्या या कृती बाबत वर भाष्य केले आहे. आता जनमाहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने मागितलेली जवळ जवळ ९५ टक्के माहिती तयार असल्याचे ते आयोगा समोर कबुल करीत आहेत व ते अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य पुरविण्यासही तयार आहेत. तेंव्हा असे आदेशित करण्यात येते की,

१. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ (सात) दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील - वजन तसेच स्वाक्ष-याच्या सत्यप्रती - या संदर्भातील माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच १० (दहा) दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

३०. अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

३१. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ (सात) दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३२. अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील - वजन तसेच स्वाक्ष-याच्या सत्यप्रती - या संदर्भातील माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच १० (दहा) दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद.** **( वि.बा.बोरगे )**

**दिनांक- २९-१०-२००७** **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

**प्रत**

१. श्री.कांबळे चतुरंग रामदास, मुख्यसंपादक साप्ता.किनवटचा चतुरंग कार्यालय, सिदधार्थ नगर, जेतवन बौध्द विहारा जवळ, किनवट, तालूका-किनवट, जिल्हा-नांदेड.

२. जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा)प्रभारी, तहसील कार्यालय, किनवट, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जनअपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, किनवट,जिल्हा-नांदेड,यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. विभागीय आयुक्त (महसूल) औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६. निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

**अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/५३१**

**दिनांक** २९-१०-२००७

श्री. हनमंत काशीराव देशमुख, : अपिलार्थी
मु. पो. देशमुख गल्ली, भोकर,
तालुका भोकर, जिल्हा नांदेड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी :
तथा माहिती अधिकारी तालुका कृषि कार्यालय,
मुखेड, तालुका मुखेड,
जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तालुका कृषि कार्यालय, मुखेड,
तालुका मुखेड, जिल्हा नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : तालुका कृषि अधिकारी यांचे कार्यालयातील कृषि अधिकारी

जन अपिलीय अधिकारी : तालुका कृषि अधिकारी

<u>विवेचन</u>

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-१०-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. हनमंत काशीराव देशमुख हे गैरहजर आहेत तर कृषि अधिकारी तालुका कृषि अधिकारी कार्यालय श्री. गोरे आनंदा गोविंदराव (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी श्री. सुरकुठवार हानमनळू भुमन्ना (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी सर्व प्रथम अपिलार्थीने त्यांच्याकडील दिनांक ३१-०५-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे कामासाठी धान्य योजने अंतर्गत त्यांच्या कार्यक्षेत्रातील कामासंदर्भात सन २००६ च्या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

१. " शिकारा सी. सी. टी. (४५६, ४६३) कामाचे मजुरी मस्टर रजिस्टरच्या सत्यप्रती व काम किती मिटर झाले,

२. शिकारा एफ. बी. एस. कामाचे मजुराची यादी,

३. जुन्ना सी. सी. टी. (४६१, ४६७) कामाचे मजुरी मस्टर रजिस्टरच्या सत्यप्रती व मजुरांना दिलेले कामाचे रेट,

४. जुन्ना अद्रन स्ट्रक्चर (४६२, ४८८) कामावरील मजुराची यादी व त्यांना दिलेले कामाचे रेट. "

सदर माहिती अपिलार्थीने टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहितीचा अधिकार अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद देण्यात आला नाही असे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत कोणत्याही प्रकारची माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०८-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नसल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. तथापि त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १६-१०-२००६ रोजीच्या पत्रान्वये एकूण ९२८ अधिक ५ अशी एकूण ९३३ पृष्ठांची माहिती विनामूल्य दिल्याचे दिसून येते. सदर माहिती अपिलार्थीस पोहोचल्याप्रीत्यर्थ अपिलार्थीची जन माहिती अधिकारी यांच्याकडील कार्यालयातील स्थळप्रतीवर सही असल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येते.

तथापि माहिती प्राप्त होण्यापुर्वीच आवश्यक ती माहिती कोणत्याही प्रकारे न मिळाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-१०-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिला मध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत याची नोंद घेण्यात आली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांच्या कामाचे स्वरुप तालुका कृषि अधिकारी यांच्या कार्यालयातील कर्मचा-यांना तांत्रिक मार्गदर्शन करणे व तालुका कृषि अधिका-यांना तांत्रिक स्वरुपाची मदत करणे असे आहे. अपिलार्थीचा अर्ज त्यांच्या कार्यालयात दिनांक ३१-०५-२००६ रोजी प्राप्त झाल्यानंतर त्यांनी मंडळ अधिकारी मुखेड यांना ही माहिती त्यांच्या कार्यालयास सादर करण्याविषयी दिनांक ०८-०६-२००६

रोजी प्रथम पत्र लिहिले व दिनांक २०-०६, १९-०६, २३-०६, ०६-०७, २६-०७, ०९-०८, १८-०८, २५-०८ व ०६.०९ अशी ०९ स्मरणपत्रे देऊनही त्यांनी तालुका कृषि अधिकारी यांचे कार्यालयास आवश्यक ती माहिती सादर केली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांचे सहाय्यक जे या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागितलेली माहिती देण्यास प्रामुख्याने जबाबदार आहेत, त्यांनी अपिलार्थीस ही माहिती देण्यासाठी, त्यांना कृषि अधिका-याकडून ९ स्मरणपत्रे देऊनही दिली नाही. कृषि अधिका-यांनी मंडळ कृषि अधिका-यास लिहिलेल्या या स्मरणपत्राच्या प्रती आयोगास दाखविल्या. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता ही माहिती अपिलार्थीस विहित मुदतीत देणे सहज शक्य होते. तथापि त्यांना ही माहिती संबंधीत मंडळ कृषि अधिका-याकडून विहित मुदतीत प्राप्त न झाल्याने अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती देता आली नाही. अपिलार्थीस ही माहिती विहित मुदतीत देण्यासाठी संबंधीत मंडळ कृषि अधिकारी हे प्रामुख्याने जबाबदार असल्याचे या प्रकरणी सिध्द होत आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) अन्वये जन माहिती अधिका-यास माहिती देण्यास जे इतर कर्मचारी जबाबदार असतील त्यांनाही जन माहिती अधिकारी म्हणून समजण्यात यावे अशी तरतूद आहे. अपिलार्थीने दिनांक ३१-०५-२००६ रोजीच्या अर्जान्वये मागितलेली माहिती दिनांक ३०-०६-२००६ रोजी अगर तत्पुर्वी मिळणे सर्वसाधारण परिस्थितीत अपेक्षित होते. तथापि अपिलार्थीस दिनांक १६-१०-२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या पत्राने ही माहिती विनामूल्य पुरविली आहे. अपिलार्थीस जरी आता माहिती मिळाली असली तरी अपिलार्थीस ती माहिती विहित मुदतीपेक्षा ३ महिने १६ दिवस इतक्या विलंबाने जन अपिलीय अधिका-याकडून पुरविली गेली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या वतीने असा मुद्दा मांडला की, अपिलार्थीने मागितलेल्या मस्टरच्या प्रती या सर्वात शेवट-

च्या स्तरावरील पर्यवेक्षक या कर्मचा-याकडे असतात, त्याच्याकडून मस्टर गोळा करण्यात वेळ जातो, तथापि जन अपिलीय अधिकारी यांचा हा मुद्दा आयोग मान्य करत नाही कारण मंडळ कृषि अधिकारी व जन माहिती अधिकारी या सर्वांची मुख्यालये एकाच ठिकाणी असूनही अपिलार्थीने मागितलेल्या ४ कामाच्या संदर्भातील प्रती त्यांना पुरविण्यास ३ महिन्याहून जास्त विलंब लागावा हा मुद्दाच मुळी त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाचे दर्शन घडवतो. अपिलार्थीने मागितलेली माहिती नजिकच्या काळातील असल्यामुळे ती शोधून अपिलार्थीस देण्यामध्ये जन माहिती अधिकारी यांना कोणतीही अडचण नव्हती असे आयोगाचे स्पष्ट मत आहे. अपिलार्थीने ज्या मस्टरच्या संबंधात माहिती मागविली आहे हे सर्व मस्टर जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात मान्यतेकरिता येत असतातच. त्यामुळे ही माहिती पर्यवेक्षकाकडून उपलब्ध करुन घेण्यासाठी वेळ लागतो या कारणास्तव त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी जो विलंब लावला आहे तो खचितच समर्थनीय नाही असे आयोगाचे मत आहे.

सबब, असे आदेशीत करण्यात येते की :

जन माहिती अधिकारी व त्यांना या प्रकरणी माहिती देण्यासाठी जबाबदार असलेले त्यांचे इतर सहाय्यक / कर्मचारी यांच्यावर, त्यांनी ३ महिने १६ दिवस इतक्या जास्त विलंबाने अपिलार्थीस माहिती दिल्याचे निःसंशयपणे सिध्द झाल्याने व त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) चा भंग केल्यामुळे त्यांच्यावर प्रतिदिन रुपये २५० /- (अक्षरी रुपये दोनशे पन्नास) याप्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती लावण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक यांचेमध्ये या शास्तीची विभागणी विभागीय सह संचालक (कृषि), लातूर यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत करावी.

सदर शास्तीची रक्कम जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ६० दिवसाच्या आत दोन हप्त्यामध्ये पुढील लेखाशिर्षाखाली शासकीय कोषागारामध्ये भरणा करावी.

लेखा शिर्ष संकेतांक ००७० इतर प्रशा सेवा ६० इतर सेवा ८०० इतर जमा रकम १८ केंद्र शासन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ शुल्क व दंड.

यापैकी पहिला हप्ता भरण्यासाठी अंतीमतः मुदत ३०-११-२००७ व दुसरा अंतीम हप्ता भरण्यासाठी अंतीमतः मुदत ३१-१२-२००७ अशी राहील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे, राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी व त्यांना माहिती देण्यासाठी लावलेल्या विलंबास जबाबदार असलेले त्यांचे इतर सहाय्यक / कर्मचारी यांच्यावर विलंबाच्या प्रतिदिन रुपये २५० /- (अक्षरी रुपये दोनशे पन्नास) याप्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती लावण्यात येत आहे.

३. या शास्तीची विभागणी जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक यांचेमध्ये विभागीय सह संचालक (कृषि), लातूर यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत करावी.

४. सदर शास्तीची रक्कम, जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ६० दिवसाच्या आत शासकीय कोषागारामध्ये वरील विवेचना मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे दोन हप्त्यामध्ये भरावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २९-१०-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. हनमंत काशीराव देशमुख, मु. पो. देशमुख गल्ली, भोकर, तालुका भोकर, जिल्हा नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ विभागीय सह संचालक (कृषि), जिल्हाधिकारी कार्यालयाचे मागे, शिवाजी चौक, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

**अपील क्र मांक**

**२००७/रामाआ/अपील/सिआर/५३८**

**निर्णय दिनांक** २९-१०-२००७

श्री. रामनारायण रामेश्वरजी डागा, : अपिलार्थी
रा. जिजामाता रोड, सुदाम व्हिडीओसमोर,
परभणी,
तालुका जिल्हा परभणी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी :
तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद,
परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपायुक्त (सामान्य प्रशासन),
विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

<u>विवेचन</u>

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-१०-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. रामनारायण रामेश्वरजी डागा (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सामान्य प्रशासन) श्री. सोमनाथ गुंजाळ (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) व तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी श्री. के. एन. कुंभार हे हजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी नगरपरिषद हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी सर्व प्रथम अपिलार्थीने त्यांच्याकडील दिनांक २९-०८-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे -- नगरपरिषद कार्यालय, परभणी येथून देण्यात आलेल्या रहिवासी प्रमाणपत्र, नाहरकत प्रमाणपत्र, विद्युत प्रमाणपत्र सन २००५ - २००६ ऑगस्ट पर्यतची नावासहीत यादी व सदर प्रमाणपत्राकरिता केलेल्या शिफारशीची नावासहीत यादी द्यावी -- ही माहिती मागितली होती.

अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. तसेच अपिलार्थी हे दारिद्र्य रेषेखालील असल्याचे या अर्जात त्यांनी म्हटले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत कोणत्याही प्रकारची माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-१०-२००६ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांना केलेल्या प्रथम अपिलामध्ये आपली मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली होती.

सदर अपिलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १९-१०-२००६ रोजी घेऊन त्याच दिवशी आपले आदेश पारीत केले.

जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या दिवशी म्हणजे दिनांक १९-१०-२००६ रोजी अपिलार्थीस २०० पृष्ठे असलेली माहिती विनामूल्य पुरविल्याचे जन अपिलीय अधिकारी यांच्या अपील निर्णयावरुन दिसून येते. याच बरोबर अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिका-यास प्रतिदिन रुपये २५० प्रमाणे शास्ती लावण्याची विनंती केलेली होती. तथापि ती विनंती जन अपिलीय अधिकारी, यांनी त्यांना शास्ती लावण्याचे अधिकार नसल्याने फेटाळली होती.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांचेकडून सर्व माहिती पुरविली गेली असल्यामुळे अपिलार्थीचे अपील निकाली काढले व जन माहिती अधिकारी यांना यापुढे विहित मुदतीत माहिती पुरविण्याची दक्षता घेण्याचे सूचित केले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-११-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळाल्याचे कबूल केले आहे. तथापि ती माहिती जन माहिती अधिकारी यांनी ठराविक मुदतीत न देऊन माहितीचा अधिकारी अधिनियम २००५ या कायद्याची पायमल्ली केल्याचे आयोगाचे निदर्शनास आणले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देऊन अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील करण्यास भाग पाडले व तेथे ही माहिती दिली. त्याचबरोबर अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस शास्ती न लावण्याच्या त्यांच्या कृतीबद्दल आक्षेप घेऊन आयोगास जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना शिक्षा करावी अशी विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तिवादामध्ये अपिलार्थीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी दिनांक २९-०८-२००६ रोजी माहिती मागितली असता त्यांना जन माहिती अधिकारी

यांच्याकडून ही माहिती दिनांक २८-०९-२००६ रोजी अगर तत्पुर्वी मिळणे अपेक्षित होते. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न देता, त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील करण्यास भाग पाडले व अशा प्रकारे जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींचा भंग केल्याने त्यांच्यावर शास्ती लावण्याची कारवाई करावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीचा अर्ज त्यांना प्राप्त होताच तो दिनांक ३१-०८-२००६ रोजीच त्यांच्या कार्यालयातील संबंधीत कर्मचा-याकडे पाठवून अपिलार्थीस सदर माहिती विहित मुदतीत देण्याकरिता त्यांच्या कडे सादर करण्याच्या सूचना दिल्या. या पत्रामध्ये संबंधीत कर्मचा-यास माहिती अपिलार्थीस विहित मुदतीत न दिल्यास होणा-या संभाव्य परिणामाची जाणीव करुन दिली होती. तदनंतर-ही त्यांनी त्यांचे सहाय्यकास त्यांचेकडील दिनांक १८ ऑक्टोंबर २००६ रोजी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी तयार करुन ठेवण्यासंदर्भात स्मरणपत्र दिले होते.

जन माहिती अधिकारी यांनी आज आयोगासमोर त्यांचे म्हणणे लेखी स्वरुपात सादर केले आहे. त्यांच्या या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लागलेल्या विलंबाची कारणे नमूद केली आहेत. यामध्ये प्रामुख्याने अपिलार्थीने मागणी केलेली माहिती २०० पृष्ठाची असल्यामुळे व तसेच अपिलार्थीने माहिती मागितलेल्या कालावधीमध्ये नगरपरिषद परभणी यांची सार्वत्रिका निवडणुक, नगर अध्यक्ष निवड व निवडणुकीबाबतच्या मतदारयाद्या तयार करण्याचे काम त्यांच्याकडे चालू असल्यामुळे म्हणजेच नियमित कामाव्यतिरिक्त इतर कामाच्या अधिकच्या बोजामुळे व माहितीच्या मोठ्या प्रमाणावरील व्याप्तिमुळे अपिलार्थीस त्यांना विहित मुदतीत माहिती पुरविता आली नाही हे त्यांनी मान्य केले आहे. या अर्जामध्ये त्यांनी अपिलार्थीस विनामूल्य माहिती पुरविल्याचा उल्लेख केला आहे. त्याचबरोबर त्यांनी या पत्रात असेही प्रतिपादीत केले आहे की, अपिलार्थी यांना माहिती कशासाठी लागते याचा

उल्लेख त्यांनी त्यांच्या माहितीच्या अर्जात केला नाही, अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न मिळाल्यामुळे अपिलार्थीचे काय नुकसान झाले किंवा काय त्रास झाला याचा उल्लेख केलेला नाही, अपिलार्थीचे कोणते आर्थिक नुकसान झाले नाही, त्यामुळे अपिलार्थीने मागितलेली माहिती ही केवळ अपिलार्थीला माहिती मागण्याचा कायदेशीर हक्क प्राप्त झाला असून यामध्ये अपिलार्थीचा जन माहिती अधिकारी व त्यांचे कर्मचारी यांना केवळ शारिरीक व मानसिक त्रास देऊन शासकीय कामाचा वेळ वाया घालविणे हा हेतू असल्याचे म्हटले असून जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय योग्य असून तो निर्णय कायम ठेवावा असे शेवटी म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने माहितीसाठी अर्ज दिनांक २९-०८-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केला होता. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीस ही माहिती दिनांक २८-०९-२००६ रोजी अगर तत्पुर्वी मिळणे भाग होते, तथापि अपिलार्थीस ही माहिती मिळण्याकरिता जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील करावे लागले. जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १९-१०-२००६ रोजी सुनावणी ठेवली असता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १९-१०-२००६ रोजी म्हणजेच सुनावणीच्या दिवशी माहिती दिली. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी अधिनियमा व्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न देऊन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) चा निःसंशय भंग केल्याचे या प्रकरणी सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सादर केलेल्या त्यांच्या लेखी अर्जामध्ये उपस्थित केलेले मुद्दे -- माहिती कशासाठी लागते, त्याची कारणे अपिलार्थीने दिली नाही, अपिलार्थीचे काय नुकसान झाले किंवा त्यांना काय त्रास झाला याचा उल्लेख अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या अपिला मध्ये नाही -- हे मुद्दे आयोग फेटाळून लावत आहे, कारण माहितीचा अधिकार अधिनियम २००५

मधील कलम ६ (२) मधील तरतुदींप्रमाणे -- अपिलार्थीस माहिती मागण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना कारणे सांगण्याची आवश्यकता नाही. याच बरोबर आयोगाकडे व्दितीय अपील करतांना अपिलार्थीचे काय नुकसान झाले याचा उल्लेख करण्याचीही तरतूद माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कोणत्याही कलमामध्ये नाही. जन अपिलीय अधिकारी यांना जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावण्याचे अधिकार नाहीत त्यामुळे त्यांनी जन माहिती अधिका-यास या प्रकरणी शास्ती न लावण्याबाबतची जन अपिलीय अधिकारी यांची ही कृती बरोबर आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या पत्रामध्ये उल्लेख केलेल्या विशिष्ट परिस्थितीमध्ये त्यांना अपिलार्थीस ही माहिती विहित मुदतीत देता आली नाही हे जन माहिती अधिकारी यांनी मान्य केले आहे. सबब अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देऊन त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला असल्याचे स्पष्टपणे सिध्द होत आहे.

जन माहिती अधिकारी यांना ही माहिती त्यांच्या सहाय्यकाकडून गोळा करुन घ्यावी लागते. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) अन्वये जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे इतर कर्मचारी यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे. त्यामुळे या प्रकरणी जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक या दोघांवरही कारवाई करणे उचित राहील असे आयोगाचे मत आहे.

तेव्हा संचालक, नगरपालिका प्रशासन यांनी जन माहिती अधिकारी व त्यांना अपिलार्थीने मागितलेली माहिती देण्यासाठी जबाबदार असलेल्या इतर सर्व कर्मचारी / अधिका-यांवर त्यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी असे आदेशीत करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे, राज्य माहिति आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. संचालक, नगरपालिका प्रशासन, यांनी जन माहिती अधिकारी व त्यांना अपिलार्थीने मागितलेली माहिती देण्यासाठी जबाबदार असलेल्या इतर सर्व कर्मचा-यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांचेवर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २९-१०-२००७ राज्य माहिति आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. रामनारायण रामेश्वरजी डागा, रा. जिजामाता रोड, सुदाम व्हिडीओसमोर, परभणी, तालुका जिल्हा परभणी

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सामान्य प्रशासन), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ संचालक, नगरपालिका प्रशासन, नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालयासमोर, मुंबई

– ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम

२००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेला अर्ज

**क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/१०**

**निर्णय ३०-१०-२००७**

**दिनांक**

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | ¸ÉÒ. EòÉåÊb÷¤ÉÉ Eäò®ú¤ÉÉ EÖòSÉäEò®ú,<br>ºÉ©ÉÉ]õ +¶ÉÉäEòxÉMÉ®ú, iÉÉÆnÖù³ý´ÉÉb÷Ò<br>®úÉäb÷, Eò³Æý¤É, iÉÉ±ÉÖEòÉ Eò³Æý¤É,<br>ÊVÉ±½þÉ =º¨ÉÉxÉÉ¤ÉÉnù | : | +VÉÇnùÉ®ú |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | VÉxÉ ¨ÉÉÊ½þiÉÒ +ÊvÉEòÉ®úÒ<br>iÉÊlÉÉ ¨ÉÖJªÉÉvªÉÉ{ÉEò, VÉxÉ VÉÉMÉÞiÉÒ<br>¨ÉÉvªÉÊ¨ÉEò Ê´ÉtÉ±ÉªÉ, Eò³Æý¤É, iÉÉ±ÉÖEòÉ<br>Eò³Æý¤É,<br>ÊVÉ±½þÉ =º¨ÉÉxÉÉ¤ÉÉnù | : | lÉÊiÉ´ÉÉnùÒ |
| 2 | VÉxÉ +Ê{É±ÉÒªÉ +ÊvÉEòÉ®úÒ<br>iÉÊlÉÉ Ê¶ÉIÉhÉÉÊvÉEòÉ®úÒ (¨ÉÉvªÉÊ¨ÉEò),<br>ÊVÉ±½þÉ {ÉÊ®ú¹Én, =º¨ÉÉxÉÉ¤ÉÉnù | | |

<u>विवेचन</u>

´É®úÒ±É lÉEò®úhÉÉSÉÒ ºÉÖxÉÉ´ÉhÉÒ +ÉVÉ ÊnùxÉÉÆEò 30-10-2007 ®úÉäVÉÒ +Éè®ÆúMÉÉ¤ÉÉnù ªÉälÉä PÉähªÉÉiÉ +É±ÉÒ. ºÉÖxÉÉ´ÉhÉÒSªÉÉ ´Éä³äýºÉ iÉGòÉ®únùÉ®ú ¸ÉÒ. EòÉåÊb÷¤ÉÉ EÖòSÉäEò®ú ½äþ MÉè®ú½þVÉ®ú +É½äþiÉ iÉ®ú VÉxÉ ¨ÉÉÊ½þiÉÒ +ÊvÉEòÉ®úÒ

iÉlÉÉ ¨ÉÖJªÉÉvªÉÉ{ÉEò, VÉxÉ VÉÉMÉÞiÉÒ ¨ÉÉvªÉÊ¨ÉEò Ê´ÉtÉ±ÉªÉ ¸ÉÒ. ®úÉä]äõ xÉ´ÉxÉÉlÉ iÉÖ³ýÊ¶É®úÉ¨É (ªÉÉ{ÉÖfäø iªÉÉÆxÉÉ VÉxÉ ¨ÉÉÊ½þiÉÒ +ÊvÉEòÉ®úÒ +ºÉä ºÉÆ¤ÉÉävÉhªÉÉiÉ ªÉä<Ç±É) ´É VÉxÉ +Ê{É±ÉÒªÉ +ÊvÉEòÉ®úÒ iÉlÉÉ Ê¶ÉIÉhÉÉÊvÉEòÉ®úÒ (¨ÉÉvªÉÊ¨ÉEò), ÊVÉ±½þÉ {ÉÊ®ú¹Énù ªÉÉÆSÉä lÉÊiÉÊxÉvÉÒ ={É Ê¶ÉIÉhÉÉÊvÉEòÉ®úÒ (¨ÉÉvªÉÊ¨ÉEò) ¸ÉÒ. ¨ÉÉ¶ÉÉ³ýEò®ú ºÉÖ¦ÉÉ¹É MÉÖ®ú{{ÉÉ ½äþ ½þVÉ®ú +É½äþiÉ.

या प्रकरणी तक्रारदाराने आयोगाकडून दिनांक ११ जानेवारी २००६ रोजी आदेश देऊन त्यांना जन माहिती अधिका-याकडून १० दिवसात माहिती प्राप्त झाली नसल्याचे व संबंधीत मुख्याध्यापक यांच्याविरुध्द सक्षम प्राधिकरणाने विभागीय चौकशी केली नसल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणून दिले आहे.

आज सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर त्यांनी तक्रारदारास त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती दिल्याचे व ती माहिती तक्रारदारास मिळाल्याप्रित्यर्थ त्यांची सही असलेला कागद दाखविला. यावरुन अर्जदारास आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १६-०१-२००७ रोजी दिल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांच्यावर विभागीय चौकशी करण्याच्या आदेशासंदर्भात शिक्षणाधिकारी माध्यमिक, जिल्हा परिषद यांच्या प्रतिनिधीने असे सांगितले की, संबंधीत मुख्याध्यापकावर प्रशासकीय कारवाई करण्याचे अधिकार संबंधीत शिक्षण संस्थेच्या व्यवस्थापनाला आहेत त्यामुळे त्यांच्यातर्फे मुख्याध्यापकावर कोणतीही शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली नाही. तथापि या शिक्षणसंस्थांवर त्यांचे नियंत्रण असल्याचे त्यांनी कबूल केले तेव्हा आज सुनावणीच्या वेळी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्या प्रतिनिधींना अशी सूचना देण्यात आली की, त्यांनी संबंधीत मुख्याध्यापकावर, आयोगाने दिनांक ११-०१-२००७ रोजीच्या आदेशामध्ये नमूद केल्याप्रमाणे, शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस संबंधीत शिक्षण संस्थेच्या व्यवस्थापनास हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत करावी व त्याचे विहित मुदतीत अनुपालन होईल असे पहावे. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्या प्रतिनिधीने ते मान्य केले.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर तक्रारदाराचा अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ३०-१०-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. कोंडिबा केरबा कुचेकर, सम्राट अशोकनगर, तांदुळवाडी रोड, कळंब, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जन जागृती माध्यमिक विद्यालय, कळंब, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

## अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/५६६

## निर्णय दिनांक ३०-१०-२००७

१. दक्ष नागरिक समिती, : अपिलार्थी
व्दारा/- अ.लतीफ कुरेशी,
मु. पो. आखाडा बाळापूर, तालुका कळमनुरी,
जिल्हा हिंगोली

विरुध्द

१. जन माहिती अधिकारी
तथा तहसीलदार कळमनुरी, जिल्हा हिंगोली
२. जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपविभागीय अधिकारी, हिंगोली,
जिल्हा हिंगोली

विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-१०-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी दक्ष नागरिक समिती व्दारा/- श्री. अ.लतीफ कुरेशी, आखाडा बाळापूर, तालुका कळमनुरी (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, हिंगोली, ( यापुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत. तर जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार कळमनुरी श्री.हरिचंद्र आनंदा गवळी (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी दक्ष नागरिक समिती व्दारा अ.लतीफ कुरेशी, मु.पो.आखाडा बाळापूर, तालूका-कळमनूरी, यांच्यातर्फे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- ०४-१०-२००६ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपील दाखल झाले आहे. यामध्ये सदर समितीने मौजे आखाडा बाळापूर तालूका-कळमनूरी येथील स्वस्त धान्य दुकानदाराच्या माहे जानेवारी २००६ च्या सेल रजिस्टरच्या कॉप्या मिळणे बाबत आयोगास विनंती केली आहे.

प्रथम दर्शनी आयोगाच्या असे लक्षात आले आहे की, माहितीची मागणी करणारी व्यक्ती ही कोणी एक व्यक्ती नसून दक्ष नागरिक समिती या नावाची संस्था आहे. सदर समितीची स्थापना कोणत्या कायद्यांतर्गत झाली आहे किंवा अन्य इतर मार्गाने तिची वैधता सिध्द करण्या संदर्भात कोणतीही कागदपत्रे आज रोजी आयोगाकडे उपलब्ध नाहीत.

अपिलार्थीने आयोगाकडे अपील करतांना अपिलकर्त्याचे नाव या सदराखाली दक्ष नागरीक समिती व्दारे अ.लतिफ कुरेशी असा उल्लेख केला आहे. अपिलार्थीने मूळमाहितीची मागणी करतांना व जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील करतांना देखील अपिलकर्त्याच्या नावासमोर दक्ष नागरिक समिती असा उल्लेख केला आहे.

माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये कलम ३ व ६ मधील तरतूदी खालील प्रमाणे आहेत.

**कलम ३ ( माहितीचा अधिकार )**

३."या अधिनियमाच्या तरतुदीना अधिन राहून सर्व **नागरिकांना** माहितीचा अधिकार असेल "

याच बरोबर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (१)- माहिती मिळविण्याकरिता विनंती करणे - मध्ये खालील प्रमाणे उध्दृत केलेले आहे.

## कलम ६ ( माहिती मिळण्याकरिता विनंती करणे )

६. (१) या अधिनियमा अन्वये कोणतीही माहिती मिळण्याची इच्छा **असलेली व्यक्ती, त्याने किंवा तीने** मागणी केलेल्या माहितीचा तपशील. **...**"

माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये वरील कलमांचा अभ्यास केल्यास असे दिसून येईल की, हे अधिकार फक्त सजीव मनुष्य प्राण्याला आहेत. या दाव्या पृष्ठयर्थ राज्य माहिती आयोग गोवा यांनी दिनांक- १९-१०-२००६ रोजी तक्रार क्रमांक- २५/ २००६ च्या मे.लाल्का असोसिएटस विरुध्द जनमाहिती अधिकारी या संदर्भातील खालील आदेश येथे विशेष करुन उध्दृत करणे गरजेचे आहे असे आयोगास वाटते.

" However, the request for obtaining the information, which is prescribed under Section 6, has to be made only by a human being and not by a company or firm society or other legal person. This is clear from the words " specifying the particulars of the information sought by him or her. " This clinches the issue that only human beings (natural persons ) can request for the information as the companies are in the neutral gender"

सदर आदेश या प्रकरणी देखिल तंतोतंत लागू पडत असल्याने प्रस्तुत प्रकरणी देखिल उपरोक्त निर्देशित केलेली कारणमिमांसा या प्रकरणास लावणे योग्य राहील, असे आयोगाचे मत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे व खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

# निर्णय

१. अपीलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )
दिनांक ३०-१०-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ दक्ष नागरिक समिती व्दारा/- श्री. अ. लतीफ कुरेशी, मु. पो. आखाडा बाळापूर, तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार कळमनुरी, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, हिंगोली, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अ्धिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

**अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/६१०**

**निर्णय ३०-१०-**

**दिनांक २००७**

श्री. विजय दत्तात्रय बाईस्कार, : अपिलार्थी
मु. पो. उमरी (बाजार), तालुका किनवट,
जिल्हा नांदेड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी :
तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत उमरी बाजार, तालुका किनवट,
जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,
किनवट, तालुका किनवट,
जिल्हा नांदेड

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-१०-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. विजय दत्तात्रय बाईस्कार हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, उमरी बाजार श्री. साहेबराव गंगाराम बटूर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, किनवट श्री. किशन रामजी गवळी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी सर्व प्रथम अपिलार्थीने त्यांच्याकडील दिनांक ०७-०७-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे उमरी ग्रामपंचायतच्या संदर्भात सन २००५-२००६ या कालावधीतील उत्पन्न, वसुली व खर्च याबाबत खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" सन २००५-२००६ चा ग्रामपंचायतचे उत्पन्न + वसुली व खर्च यांचा तपशील :

१. वसुली टॅक्स (घर),

२. नळ टॅक्स,

३. बाजार हर्रास,

४. शेणखत हर्रास,

५. पांढरी हर्रास,

६. कोंडवाडा वसुली,

७. फेरफार वसुली,

८. बांधकाम परवानगी वसुली,

९. गावातील नालीची फाडीची विक्री कुठे व किती झाली,

वरील वर्णनानुसार एकूण वसुली किती व खर्च किती याची सविस्तर माहिती मिळावी. "

सदर माहिती अपिलार्थीने साक्षांकीत करुन व्यक्तिशः अपेक्षिली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सदर माहिती त्यांच्याकडील दिनांक १५-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये देण्याचा प्रयत्न केला, तथापि अपिलार्थीने ती माहिती स्विकारली नाही असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. त्यांनी अपिलार्थीस दिनांक १५-०७-२००६ रोजी माहिती पुरविल्याच्या पुराव्याप्रीत्यर्थ त्यांच्याकडील टपालवही (Peon Book) दाखविली. त्यामध्ये त्यांनी अपिलार्थीस ही माहिती देऊ केली असता अपिलार्थीने माहिती घेण्यास नकार दिल्याचे ग्रामपंचायतच्या कारकुनाचे अभिप्राय त्यामध्ये नमूद आहेत. तदनंतर

ही माहिती दिनांक १५-०७-२००६ रोजी श्री. अनिल कृष्णाराव कोत्तावार ग्रामपंचायतचे कारकून हे अपिलार्थीस माहिती देण्याकरिता गेले असता अपिलार्थीने ती माहिती घेण्यास नकार दिल्याचा त्यांचा अहवाल जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सादर केला असल्याचेही उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येत आहे. त्याच दिवशी संबंधीत ग्रामविकास अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती स्वतः देण्याचा प्रयत्न केला. तथापि अपिलार्थीने ही माहिती स्विकारण्यास नकार दिल्याचे त्यांनी त्या जागेवर केलेल्या पंचनाम्यावरुन दिसून येते. सदर पंचनामा एकूण ५ साक्षीदारांच्या उपस्थितीमध्ये तयार केला आहे. अशाच प्रकारचा प्रयत्न जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २४-०७-२००६ रोजी केला असता अपिलार्थीने माहिती घेण्यास नकार दिला, याही घटनेचा त्यांनी पंचनामा केला असून त्या घटनेच्या पंचनाम्याची प्रत त्यांनी आयोगासमोर सादर केली आहे. तदनंतर ही माहिती अपिलार्थीस दिनांक १७-०८-२००६ रोजी अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगने पाठविली असता अपिलार्थीने सदर माहिती असलेले कथित पाकीट घेण्यास नकार दिल्याचे पोस्टमनच्या अभिप्रायावरुन दिसून येते.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त होत नाही असे वाटल्यावरुन त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०८-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

सदर अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०८-२००६ रोजी प्रत्यक्षतः प्राप्त झाला. सदर अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. तथापि त्यांनी जन माहिती अधिकारी यांना उद्देशून त्यांच्याकडील दिनांक २२-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांना, अपिलार्थीस माहिती का देण्यात

आली नाही याबाबतचा खुलासा मागितला व त्याची प्रत अपिलार्थीस माहितीकरिता अग्रेषित केली. जन अपिलीय अधिकारी यांच्या या पत्रास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०३-१०-२००६ रोजी उत्तर देऊन त्यामध्ये त्यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना देण्यासाठी दिनांक १५-०७-२००६ रोजी तयार केल्याचे नमूद केले आहे. याच पत्राबरोबर त्यांनी अपिलार्थीस त्यांनी दिनांक १५-०७-२००६ रोजी देऊ केलेल्या माहितीची प्रतही सोबत जोडली आहे. तदनंतर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीच्या प्रथम अपील सुनावणीसंदर्भात काहीही कारवाई झाल्याचे दिसून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणतीही अपेक्षित कारवाई न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-११-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी, आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत याची नोंद घेण्यात आली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीस माहिती देण्याकरिता त्यांनी, अपिलार्थीस विहित मुदतीत संपूर्ण माहिती देऊन त्यांच्याकडून अपेक्षित असलेली कारवाई त्यांनी पूर्ण केलेली आहे. त्यांच्या म्हणण्याप्रीत्यर्थ त्यांनी अपिलार्थीस जी माहिती दिनांक १५-०७-२००६ रोजी देऊ केली होती त्या माहितीच्या प्रती आयोगास सादर केल्या. त्यांनी अपिलार्थीस ग्रामपंचायतच्या कारकुनामार्फत व स्वतःतर्फे व्यक्तिशः माहिती देण्याचा प्रयत्न केला, तथापि अपिलार्थीने ही माहिती स्विकारली नाही. अपिलार्थीने माहिती स्विकारली नसल्याचा पुरावा म्हणून त्यांनी त्याच वेळी घटनास्थळी दोनदा, दिनांक १५-०७-२००६ व पुन्हा २४-०७-२००६ रोजी पंचनामा देखील केला असल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणले आहे. तदनंतर त्यांनी अपिलार्थीस हीच माहिती अंडर

सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगने दिनांक १७-०८-२००६ रोजी पाठविली असता अपिलार्थीने सदर माहिती घेण्यास नकार दिला. गट विकास अधिकारी यांनी त्यांच्याकडे खुलासा मागितल्या-नंतर देखील त्यांनी हीच माहिती गट विकास अधिकारी यांना दिनांक ०३-१०-२००६ रोजी सादर केली आहे.

यावेळी गट विकास अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना देखील त्यांचे स्तरावर त्यांनी दिनांक ०४-०४-२००७ रोजी हीच माहिती अपिलार्थीच्या अर्जापोटी पाठवून त्याची एक प्रत अपिलार्थीस दिली आहे. अपिलार्थीने सदर माहिती दिनांक ०५-०४-२००६ रोजी स्विकृत केल्याची त्यांची पोच त्यांनी आयोगासमोर सादर केली.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती विहित मुदतीत जन माहिती अधिकारी यांनी संपूर्णरित्या पाठवून आपले कर्तव्य यथायोग्यरित्या पार पाडले आहे. अपिलार्थीस ही माहिती वेळोवेळी व्यक्तिशः व दुतामार्फत पाठवून त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याकरिता अथक प्रयत्न केले असल्याचे सिध्द केले आहे. तथापि अपिलार्थीने ही माहिती स्विकृत करण्याकरिता वेळोवेळी नकार दिला आहे हे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. अपिलार्थीने ही माहिती अंतीमतः दिनांक ०५-०४-२००७ रोजी स्विकृत केली असल्या मुळे व ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत असल्याने अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केली संपूर्ण माहिती मिळाली आहे असे अनुमान काढण्यात येत आहे.

या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्याकरिता ग्रामविकास अधिकारी यांनी केलेले प्रयत्न उल्लेखनीय आहेत याचा येथे विशेष उल्लेख करणे जरुरीचे आहे असे आयोगास वाटते. माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदींचे पालन जर अशा प्रकारे सर्व जन माहिती अधिका-यांनी केले तर सर्व अर्जदारांना आवश्यक ती माहिती उपलब्ध होऊन

सार्वजनिक प्राधिकरणाच्या कारभारात पारदर्शकता आणण्यासाठी त्याची निश्चितपणे मदत होईल. सबब, या ग्रामविकास अधिका-याच्या या अनुकरणीय कृतीची व त्यांच्या या कार्यशैलीची नोंद मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांनी त्यांच्या सेवापटामध्ये यथायोग्यरित्या घ्यावी असे त्यांना सुचविण्यात येत आहे.

अपिलार्थीस आता संपूर्ण माहिती मिळाली असल्यामुळे व तसेच अपिलार्थीने विहित मुदतीत ही माहिती स्विकृत करण्यास नकार दिल्याचे निःसंशयपणे सिध्द झाल्याने अपिलार्थीस माहिती उशीरा मिळण्यास ते स्वतःच जबाबदार आहेत व जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे कर्तव्य योग्यरित्या पार पाडले आहे असा निष्कर्ष आयोग काढत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे, राज्य माहिती आयोगाकडे केलेले त्यांचे दिनांक १७-११-२००६ रोजीचे व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

**<u>निर्णय</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ३०-१०-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. विजय दत्तात्रय बाईस्कार, मु. पो. उमरी (बाजार), तालुका किनवट, जिल्हा नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत उमरी बाजार, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमाक २००७/रामाआ/अपील/सिआर/६११

निर्णय दिनांक- ३०-१०-२००७.

१ श्री.राजेंद्र फुलचंद चरखा, : अपिलार्थी
जिजामाता सहायोगनगर, बीड
तालूका जिल्हा-बीड.

विरुध्द

१ जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे — प्रतिवादी

२ जनअपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, ठाणे.

प्रत्यक्षात- जन माहिती अधिकारी — कक्षाधिकारी, पशुसंवर्धन विभाग

प्रत्यक्षात- जन अपिलीय अधिकारी — तांत्रिक सहाय्यक जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी कार्यालय.

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनाक- ३०-१०-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री.राजेंद्र फुलचंद चरखा ( यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी जिल्हापरिषद, ठाणे (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत. तर जनअपिलीय अधिकारी तथा तांत्रिक सहाय्यक, जिल्हा पशुसंवर्धन जिल्हापरिषद, ठाणे, डॉ.प्रशांत धनंजय कांबळे (यापुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- ११-०७-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील दिनांक ०१ जानेवारी, २००३ ते ११ जुलै, २००६ पर्यंतच्या कालावधीतील एकूण १५ मुद्याव्दारे माहिती मागविली होती.

“१. औषधी भावबंध कराराच्या साक्षांकित केलेल्या प्रती.

२. औषधी, पुरवठादार यांचे सोबत झालेल्या करारनाम्याचा नमुना.

३. औषधी खरेदी संदर्भात तसेच गुणवत्ता तपासणी संदर्भात आयुक्त पशु संवर्धन व प्रादेशिक पशु संवर्धन सह.आयुक्त यांनी निर्गमीत केलेल्या परिपत्रके व मार्गदर्शक सुचनांच्या साक्षांकित प्रती.

४. तालुका स्तरीय औषधांच्या मागण्या लेखा शिर्ष निहाय.

५. लेखा शिर्ष निहाय उपलब्ध तरतुदी शासन / जिल्हा परिषद निधी.

६. पुरवठा आदेशांच्या साक्षांकीत केलेल्या प्रती - लेखा शिर्ष निहाय.

७. पुरवठादारांची बिले / डिलेव्हरी चलन्स साक्षांकित.

८. जिल्हा स्तरीय औषधी साठा पुस्तकांची साक्षांकीत प्रत.

९. तालूका स्तरीय औषधी साठा पुस्तकाची साक्षांकीत प्रत.

१०. प्राप्त झालेल्या औषधी तालुका स्तरावर वितरीत केल्या बाबतची कागदपत्रे.

११. दवाखाना निहाय औषधांच्या वाटपाची साक्षांकीत प्रत.

१२. अर्थ विभाग जिल्हा परिषदठाणे यांचेकडे सादर करण्यात आलेल्या औषधांच्या सर्व देयकांच्या साक्षांकीत प्रती. नमुना नं.२९ ( नियम क्र.७९ )

१३. लेखा शिर्ष निहाय औषधांच्या खरेदी नस्तीमधील टिपण्यांच्या साक्षांकीत प्रती.

१४. पुरवठादार निहाय अदा केलेले धनादेश क्रमांक, धनादेशावरील दिनांक व अदा केलेल्या दिनांकासह.

१५. धनादेश अदा केल्यानंतर प्राप्त झालेलया पुरवठादारांच्या पावत्या दिनांकासह.”

अपिलार्थीने ही माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक- २९-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला आहे. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस मागितलेली माहिती क्लीष्ट व  मोठया प्रमाणात असल्यामूळे त्यांनी अपिलार्थीस त्यांचे कार्यालयात उपस्थित राहून माहिती प्राप्त करुन घेण्याचे व माहितीचे शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले आहे.

जनमाहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत कोणताच प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अन्वये त्यांच्याकडील दिनांक- २१-०८-२००६ रोजीच्या अर्जाव्दारे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले आहे.

या अपीलअर्जामध्ये अपिलार्थीने जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना जाणीवपूर्वक माहिती देण्याचे टाळले असल्याने त्यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) व २० (२) प्रमाणे कार्यवाही करण्याची विनंती केली होती. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जनअपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. तथापि त्यांनी त्यांच्याकडील दिनांक- १८-१०-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस  टपालखर्च म्हणून ५००/-रुपये अधिक छायाकिंतप्रतिचे रुपये १५००/- असे एकूण २,०००/- शुल्क जिल्हापरिषद फंडात  भरण्याचे लेखी सूचित केले आहे.

जनअपिलीय अधिकारी यांची हे अपील ठरविण्याची ही कृती संपूर्णपणे चुकीची असून त्यांना त्यांच्याकडे अपिलार्थीचा अपीलअर्ज प्राप्त झाल्यानंतर जनमाहिती अधिकारी व अपिलार्थी यांना सुनावणीची तारीख देवून त्यांना बोलावून घेवून त्यांचे म्हणणे ऐकून या

प्रकरणात ठोस निर्णय देणे माहिती अधिकार अधिनियमामध्ये अभिप्रेत आहे. तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. त्यांच्या या कृतीची नोंद मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांनी यथायोग्यरित्या घ्यावी.

जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून अशा प्रकारच्या मिळालेल्या प्रतिसादाने व्यथीत होवून अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) मधील तरतुदीनुसार दिनांक- १८-११-२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे. या व्दितीय अपीलामध्ये त्यांनी, आपल्या मूळअर्जा व्दारे केलेली माहितीची मागणी कायम ठेवून जनमाहिती अधिकारी यांच्यावर प्रतिदिनी २५०/-रुपये इतकी शास्ती लावण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये अपिलार्थी हे गैरहजर आहेत. तथापि त्यांनी त्यांचे म्हणणे लेखी अर्जाव्दारे आयोगास सादर केले आहे. त्यावरुन असे दिसून येते की, अद्यापही त्यांना जनमाहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती दिल्याचे दिसून येत नाही. या अर्जामध्ये देखील त्यांनी जनमाहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची व शिस्तभंगाची कार्यवाही करण्याची व त्याचबरोबर त्यांना विनामूल्य माहिती देण्याचे आदेश देण्याचे आयोगास विनंती केली आहे.

जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्यातर्फे जनअपिलीय अधिकारी हे सुनावणीस हजर आहेत. त्यांनी असा युक्तीवाद मांडला की, सदर घटनेच्यावेळी ते जनमाहिती अधिकारी या पदावर कार्यरत नव्हते. त्यांनी आता प्रयत्न करुन अपिलार्थीस मूळ अर्जाव्दारे

मागणी केलेली संपूर्ण माहिती गोळा केली असून अपिलार्थीने आवश्यक ते शुल्क त्यांच्याकडे भरल्यास ते ही माहिती देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम व अपिलार्थी आणि शासकीय अधिकारी यांच्यात झालेल्या पत्रव्यवहाराचे अवलोकन करता एखाद्या माहिती अर्जाची बोळवण शासकीय अधिकारी कशा प्रकारे करतात व जनसामान्याना त्यांना आवश्यक असलेली माहिती देण्यापासून कसे वंचित ठेवले जाते, याचा हे प्रकरण म्हणजे एक उत्तम नमूना आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. मूलतः अपिलार्थीने दिनांक- ११-०७-२००६ रोजी माहिती करिता अर्ज केल्यानंतर अपिलार्थीस दिनांक- २९-०७-२००६ रोजी त्यांनी मागितलेली माहिती क्लीष्ट स्वरुपाची असल्यामूळे, त्यांच्याकडून माहिती घेण्यासाठी अपिलार्थीस आपल्या कार्यालयात बोलाविण्याची जनमाहिती अधिकारी यांची कृती यास्तव चुकीची आहे, असे आयोगाचे मत आहे. कारण अपिलार्थीने मागितलेली माहिती ही टपालाने मागविली असून त्यांना ही माहिती गोळा करण्याप्रित्यर्थ जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कोणतेही प्रयोजन नव्हते. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती जरी मोठी असली तरी ही माहिती अपिलार्थीस देणे हे जनमाहिती अधिका-यांना अशक्य नव्हते. अपिलार्थीने जनमाहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्याकडील माहितीच्या फक्त साक्षांकित प्रतीची मागणी केली होती. अपिलार्थीने विचारलेली माहिती ही स्वतंत्रपणे तयार करण्याची गरज नव्हती. फक्त त्यांनी मागितलेल्या कराराच्या प्रती करारनाम्याच्या प्रती, परिपत्रके व मार्गदर्शक सूचनाच्या प्रती, इत्यादी माहिती जनमाहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीतूनच या माहितीच्या प्रती त्यांनी मागितल्या होत्या. हे पाहता, अपिलार्थीने मागितलेली माहिती क्लिष्ट होती, असे आयोगास वाटत नाही. तथापि आयोगासमोर उपस्थित असलेले जनमाहिती अधिकारी यांच्याकडे आताच ही माहिती उपलब्ध असल्याचे ते सांगत आहेत. अपिलार्थीने २०००/-रुपये ( दोन हजार रुपये ) इतके

शुल्क जिल्हापरिषदेकडे भरल्यास त्यांना ही माहिती देण्यास ते आजही तयार आहेत. तथापि अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याची मुदत त्यांनी अर्ज केल्यापासून ३० दिवसाच्या आत, म्हणजेच या प्रकरणी दिनांक- १९-०८-२००६ रोजी संपूष्टात येते. त्यामूळे जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती विनामुल्य व साक्षांकित करुन द्यावी लागणार हे उघड आहे. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती देण्यापोटी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात टपालाने माहिती मागवूनही समक्ष कार्यालयात उपस्थित राहण्याची सूचना देणे व त्याचबरोबर ३० दिवसाची विहित मुदत टळून गेल्या नंतरही अपिलार्थीस दिनांक- १८-१०-२००६ रोजीच्या पत्राअन्वये २,०००/रुपये इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरावयास सांगणे, या दोन्हीही बाबी जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यास टाळाटाळ केले, हे सिध्द करण्यास पूरेशा आहेत, असे आयोगाचे मत आहे. जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतूदीच्या अंमलबजावणी संदर्भात किमान आवश्यक ते ज्ञानही अद्याप त्यांना प्राप्त झाले नसल्याचेही या सुनावणीच्या दरम्यान दिसून आले.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता संबंधित जनमाहिती अधिकारी हे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतूदीप्रमाणे कार्यवाही करण्यास पात्र झाले असल्याची आयोगास खात्री पटली आहे. तेव्हा असे आदेशित करण्यात येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित झाल्यापासून ७ दिवसाचे आत विनामूल्य व साक्षांकित करुन द्यावी. तसेच त्यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती देण्यासाठी जो असमर्थनीय विलंब लावला आहे. त्यामूळे त्यांच्यावर विलंबाच्या प्रित्यर्थ प्रतिदिनी रुपये २५०/- प्रमाणे एकूण रुपये २५,०००/- (पंचवीस हजार रुपये ) इतकी

शास्ती का लावण्यात येवू नये, याचा खुलासा त्यांनी हा निर्णय त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाच्या आत आयोगाकडे लेखी स्वरुपात सादर करावा.

सदर खुलासा प्राप्त झाल्यानंतर जनमाहिती अधिकारी यांना, आवश्यक असल्यास, शास्ती लावण्याची कार्यवाही आयोगास करता येईल.

या प्रकरणी जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देता आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव व बेपर्वाई त्यांनी, त्यांच्या अशा प्रकारच्या वर्तनाने स्पष्ट केली असल्याने आयुक्त (पशुसंवर्धन) पुणे यांनी त्यांच्यावर प्रचलित सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करावी व आपला अनुपालन अहवाल आयोगास हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ महिन्याच्या आत पाठवावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपीलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

१५. अपीलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

१६. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून सात दिवसाच्या आत साक्षांकित करुन विनामूल्य पुरवावी.

१७. आयुक्त (पशुसंवर्धन) पुणे यांनी संबंधित जनमाहिती अधिकारी यांच्यावर त्यांनी या प्रकरणामध्ये त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव व बेपर्वाइ, त्यांच्या वर्तनाने स्पष्ट केली असल्याने त्यांच्यावर प्रचलित सेवा

नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करावी व आपला अनुपालन अहवाल आयोगास हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ महिन्याच्या आत पाठवावा.

औरंगाबाद.
दिनांक- ३०-१०-२००७

( वि.बा.बोरगे)
राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद.

प्रत,

३१. श्री.राजेंद्र फुलचंद चरखा, जिजामाता चोक, सहायोगनगर, बीड तालूका जिल्हा- बीड.

३२. जनमाहिती अधिकारी तथा,कक्षाधिकारी,पशुसंवर्धन विभाग, जिल्हापरिषद, ठाणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३३. जनअपिलीय अधिकारी तथा तांत्रिक सहाय्यक, जिल्हा पशुसंवर्धन विभाग, जिल्हापरिषद, ठाणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३४. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, ठाणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३५. आयुक्त पशुसंवर्धन कार्यालय पुणे, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३६. सचिव, मुख्य माहिती आयुक्त कर्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६. निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

**अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/६१२**

| | |
|---|---|
| **निर्णय** | ३०-१०- |
| **दिनांक** | २००७ |

श्री. प्रेमचंद गुलाबचंद नहार, : अपिलार्थी
पंकज मोटार्स, स्टेडियम कॉम्प्लेक्स,
जालना रोड, बीड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी :
तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, वडवणी, तालुका
वडवणी, जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,
वडवणी, तालुका वडवणी,

जिल्हा बीड

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-१०-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. प्रेमचंद गुलाबचंद नहार (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, वडवणी श्री. कालीनाथ ज्ञानदेव गोंदावले (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वडवणी श्री. विलास पुजारी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी सर्व प्रथम अपिलार्थीने त्यांच्याकडील दिनांक २८-०७-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील मिळकत क्रमांक ८३४ व आजुबाजुच्या मिळकतीसंदर्भात खालीलप्रमाणे एकूण ४ मुद्दयावर माहिती मागितली होती. सदर अर्ज जन माहिती अधिका-यास दिनांक ३१-०७-२००६ रोजी प्राप्त झाल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येते.

१. “ आपल्या ग्रामपंचायत हद्दीतील मिळकत क्र. ८३४ मध्ये मालकाचे नांव या रकान्यात बालाजी मंदिर दाखविलेले आहे. तर मिळकतीचे वर्णनामध्ये उत्तर बाजुला लक्ष्मीकांत प्रमोद, दक्षिण बाजुला दिनकर यादव, राजेभाऊ मुंडे, पुर्व बाजुला रस्ता व सुलोचना आंधळे, पश्चिम बाजुला रस्ता दाखविलेला आहे.

याबाबतच्या लक्ष्मीकांत प्रमोद, दिनकर यादव, राजेभाऊ मुंडे व सुलोचना आंधळे यांच्या क्षेत्राच्या पी. टी. आर. उता-याच्या प्रती द्याव्यात. म्हणजेच या

लोकांची नावे या बालाजी मंदिराशेजारी ज्या मिळकतीवर लागलेले आहे, त्या मिळकतीच्या पी. टी. आर. च्या उता-याच्या प्रती द्याव्यात.

२. या सर्वांची नावे ज्या कागदपत्रांआधारे वरील मिळकतीमध्ये लावलेले आहे त्या सर्व कागदपत्रांच्या प्रती त्यांनी नाव लावण्यासाठी दिलेल्या अर्जासह द्याव्यात.

३. यांची नावे लावण्यासाठी ग्रामपंचायतने दिलेले जाहीर प्रगटन व भरुन घेतलेल्या फीस बद्दलची माहिती द्यावी.

४. लक्ष्मीकांत प्रमोद, दिनकर यादव, राजेभाऊ मुंडे, सुलोचना आंधळे यांचे नावाचा फेरफार उतारा द्यावा. या सर्वांची नावे कोणत्या आधारे लावली त्याचा सर्व कागदोपत्री पुरावा द्यावा."

अपिलार्थीने ही माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०९-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रतिदिन रुपये २५० इतकी शास्ती लावण्याची जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केली.

या अपिलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २१-०९-२००६ व १६-१०-२००६ रोजी घेऊन या संदर्भातील आपला आदेश दिनांक १७-१०-२००६ रोजीच्या पत्राने दिनांक ३०-१०-२००६ रोजी पारीत केला आहे. त्यामध्ये त्यांनी जन माहिती अधिका-यास अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले असून जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी कोणताही प्रयत्न न केल्याने ते शास्तीस पात्र असल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणले आहे.

अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०९-२००६ रोजी अपील केल्याने दिनांक १२-०९-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अपिलार्थीने मागितलेल्या एकूण ४ मुद्दयापैकी फक्त एका मुद्दयावर माहिती पुरविल्याचे दिसून येते. उर्वरीत माहिती न देण्याचे कारण म्हणून त्यांनी त्यांच्या पुर्वीच्या ग्रामसेवकाकडून पदभारात ही माहिती मिळाली नसल्याने ही माहिती अपिलार्थीस देता येत नाही असे म्हटले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४-११-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांचेवर शास्ती लावण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तिवादामध्ये अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना अद्यापपर्यत त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती मिळालेली नाही त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचेवर ही माहिती मिळेपर्यत प्रतिदिन रुपये २५० इतकी शास्ती लावण्यात यावी.

या प्रकरणातील पार्श्वभूमी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून समजून घेतली असता असे निदर्शनास येत आहे की, वडवणीस्थित बालाजी मंदिराच्या नावाने अंदाजे ३२०० चौरस फूट / मीटर इतक्या क्षेत्रफळाचा भुखंड आहे. सदर भुखंडाची जमीन काही खाजगी व्यक्तींनी बळकावून त्याच्यावर बांधकामे केली आहेत. सदर भुखंड सार्वजनिक मालकीचा असतांनाही काही व्यक्तींनी बांधकामे केली आहेत. सदर बांधकामाच्या वैधतेसंदर्भात अपिलार्थीने उच्च न्यायालयात दावा दाखल केला आहे त्याकरिता त्यांना ही माहिती हवी आहे. सदर माहिती प्राप्त झाल्याने शासकीय जमिनी गैरमार्गाने बळकावून त्यावर बांधकामे करणा-यांची नावे जनतेसमोर उघडी होऊन व्यापक जनहित साध्य होईल असे अपिलार्थीचे म्हणणे आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्याकडे तयार असून ते अपिलार्थीस ती ३ दिवसात विनामूल्य देण्यास तयार आहेत. त्यांच्याकडे त्यावेळी उपलब्ध असलेली माहिती त्यांनी दिनांक १२-०९-२००६ रोजी अपिलार्थीस पुरविली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद पाहता जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस आता ३ दिवसाच्या आत ही माहिती देण्यास तयार आहेत असे दिसून येते. त्यांनी हीच माहिती अपिलार्थीस जर त्यांचा अर्ज प्राप्त झाल्या नंतर किंवा त्यांनी या पदाचा पदभार घेतल्यानंतर दिली असती तर कदाचित अपिलार्थीस आयोगाकडे व्दितीय अपील करावे लागले नसते. सध्याचे जन माहिती अधिकारी हे या पदावर दिनांक १०-१२-२००६ रुजू झाले आहेत. त्यांनी रुजू झाल्यापासून १० महिन्यात अपिलार्थीस ही माहिती देण्याचा कोणताही प्रयत्न केला नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी देखील त्यांच्या दिनांक १७-१०-२००६ रोजीच्या अपील निर्णयामध्ये ही बाब आयोगाच्या निदर्शनास आणली आहे. त्यामुळे ते या प्रकरणी निश्चितपणे दोषी ठरतात. अपिलार्थीने जन माहिती अधिका-याकडे दिनांक २८-०७-२००६ रोजी प्रथम अर्ज केल्यापासून ते आजतागायत संबंधित कार्यालयामध्ये एकूण ३ जन माहिती अधिकारी होऊन गेले. त्यांची नावे अनुक्रमे श्री. व्ही. एन. शिंदे, श्री. जी. बी. सोळंके व सध्या कार्यरत असलेले श्री. के. डी. गोंदावले अशी असून या तीनही अधिका-यांनी अपिलार्थीस माहितीपासून वंचित ठेऊन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ७ (१) चा या प्रकरणी निःसंशयपणे भंग केल्याचे सिध्द होत आहे. त्यांनी आपल्या कार्यशैली तील दाखविलेल्या अशा प्रकारच्या कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी प्रचलीत सेवा नियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. त्याच बरोबर सध्याचे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी

मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली उर्वरीत माहिती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ दिवसाच्या आत उपलब्ध करुन द्यावी असेही त्यांना पुढे सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती दिनांक ३०-०८-२००६ रोजी अगर तत्पुर्वी देणे भाग असतांना त्यांनी अपिलार्थीस अर्धवट स्वरुपातील माहिती दिनांक १२-०९-२००६ रोजी दिलेली आहे. त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी १२ दिवसांचा असमर्थनीय विलंब लावला असल्यामुळे त्यांच्यावर प्रतिदिन रुपये २५० (अक्षरी रुपये दोनशे पन्नास) प्रमाणे एकूण रुपये ३००० /- (अक्षरी रुपये तीन हजार फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे.

सदर शास्तीची रक्कम त्यांनी खालील प्रमाणे लेखाशिर्षाखाली शासकीय तिजोरीत हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत एकाच हप्त्यात जमा करावी.

लेखा शिर्ष संकेतांक ००७० इतर प्रशा सेवा ६० इतर सेवा ८०० इतर जमा रकम १८ केंद्र शासन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ शुल्क व दंड.

या शास्तीची वरील तीन जन माहिती अधिका-यामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी यथायोग्य विभागणी करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे, राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश निर्गमीत होताच अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीपैकी यापूर्वी दिलेली माहिती वगळता उर्वरीत माहिती ३ दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. अपिलार्थीस माहिती विलंबाने देण्यासाठी जबाबदार असलेल्या दिनांक २८-०७-२००६ पासून ते आजतागायत या कालावधीमध्ये ग्रामसेवक ग्रामपंचायत वडवणी या पदावर कार्यरत असलेल्या सर्व माहिती अधिका-यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी प्रचलीत सेवा नियमा नुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत करावी व आपला अनुपालन अहवाल आयोगास तदनंतर एक महिन्याने पाठवावा.

४. वरील सर्व जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रतिदिन रुपये २५० (अक्षरी रुपये दोनशे पन्नास) प्रमाणे एकूण रुपये ३००० /- (अक्षरी रुपये तीन हजार फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ३०-१०-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. प्रेमचंद गुलाबचंद नहार, पंकज मोटार्स, स्टेडियम कॉम्प्लेक्स, जालना रोड, बीड

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, वडवणी, तालुका वडवणी, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वडवणी, तालुका वडवणी, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

**अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/६१३**

**निर्णय** ३०-१०-२००७

**दिनांक**

श्री. प्रेमचंद गुलाबचंद नहार, : अपिलार्थी
पंकज मोटार्स, स्टेडियम कॉम्प्लेक्स,
जालना रोड, बीड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी :

तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, वडवणी, तालुका
वडवणी, जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,
वडवणी, तालुका वडवणी,
जिल्हा बीड

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-१०-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. प्रेमचंद गुलाबचंद नहार (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, वडवणी श्री. कालीनाथ ज्ञानदेव गोंदावले (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वडवणी श्री. विलास पुजारी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी सर्व प्रथम अपिलार्थीने त्यांच्याकडील दिनांक २८-०७-२००६ रोजीच्या अर्जान्वये बालाजी मंदिरा संदर्भात जनमाहिती अधिकारी यांच्याकडे खालील प्रमाणे एकूण ३ मुद्यावर माहिती मागविली होती.

''१) सन १९८० मध्ये विशेष जिल्हा निरीक्षक, भूमी अभिलेख यांनी सर्व्हे नं.१०७ पैकी हिंदु समाजाचे सार्वजनिक बालाजी मंदिर, व्यवस्थापक पुजारी ब्रदीदास शारमदास वैष्णु यांच्या नावाची नोंद आखीव पत्रीकेत घेतली होती. सन १९८० मध्ये आपल्या ग्रामपंचायत रेकॉर्डप्रमाणे बालाजी मंदिराच्या मिळकतीचा जो पी.टी.आर.उतारा होता त्या पी.टी.आर.उता-याची प्रत द्यावी.

२)   ब्रदीदास शारमदास वैष्णु यांचे नाव ज्या कागदपत्रांआधारे बालाजी मंदिराचे पुजारी म्हणून लागले होते त्या कागदपत्रांसह त्यांचा फेरफार उतारा द्यावा.

३)   ब्रदीदास शारमदास वैष्णु यांचेनंतर या जागेत ज्यांचे ज्यांचे नाव लागले त्या सर्वांचे फेरफार उतारे आजतागायतपर्यंतचे द्यावेत.''

अपिलार्थीने ही माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०९-२००६ रोजी प्रथम अपील केले.  या अपिलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रतिदिन रुपये २५० इतकी शास्ती लावण्याची जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केली.

जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे दिनांक- १२-०९-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस काही माहिती पुरविली. अपिलार्थीने विचारलेल्या एकूण ३ मुद्यावरील माहिती पैकी त्यांनी फक्त एकाच मुद्यावर या पत्रामध्ये माहिती दिल्याचे दिसून येते.

अपिलार्थीच्या सदर अपील अर्जावर जनअपिलीय अधिकारी यांनी दिनांक- २१-०९-२००६ व दिनांक १६-१०-२००६ रोजी सुनावणी  घेतली. सदर सुनावणीचे आदेश त्यांनी त्यांच्याकडील दिनांक- १७-१०-२००६ रोजीच्या पत्रान्वये दिनांक- ३०-१०-२००६ रोजी पारीत केले. या पत्रामध्ये त्यांनी जनमाहिती अधिकारी यांना अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियमातील कलम ६ नूसार मोफत माहिती पुरविण्याचे जनमाहिती अधिकारी यांना सूचित केले आहे व त्याचबरोबर माहिती अधिका-याने अपिलार्थीच्या अर्जातील मुद्या क्रमांक-२ बाबतची कागदपत्रे त्यांच्या सेवाकाळा पूर्वी त्याच पदावर कार्यरत असलेल्या इतर अधिका-

याकडून आवश्यक ते अभिलेखे व फेरफार उपलब्ध करुन घेण्याकरिता कोणतेही प्रयत्न केले नाही व अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती दिली नाही. त्यामूळे ते शास्तीस पात्र ठरतात, असे आयोगाचे निदर्शनास आणले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४-११-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी, जन अपिलीय अधिकारी यांनी एकाच ग्रामसेवकास दोषी धरल्याबद्दल हरकत घेतली असून संबंधित जनमाहिती अधिकारी यांना २५०/- रुपये प्रतिदिनी या प्रमाणे शास्ती लावण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तीवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी, त्यांना मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती आजतागायत जनमाहिती अधिकारी यांच्याकडून मिळाली नाही. त्यामूळे जनमाहिती अधिकारी यांच्यावर सदर माहिती प्राप्त होईपर्यंत प्रतिदिनी २५०/- रुपये या प्रमाणे शास्ती लावण्यात यावी.

जनमाहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेली माहिती आता त्यांच्याकडे तयार असून ते ही माहिती अपिलार्थीस ३ दिवसात विनामुल्य देण्यास तयार आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व दोन्हीही बाजूचा युक्तीवाद ऐकता अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती पुरविली नसल्याचे तसेच अपिलार्थीने मागितलेली संपूर्ण माहिती त्यांना दिली नसल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. अपिलार्थीने प्रथम अर्ज दिनांक- २८-०७-२००६ रोजी केला हे पाहता, जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना दिनांक- २७-०८-२००६ रोजी अगर तत्पूर्वी माहिती देणे, माहितीचा अधिकार अधिनियमामध्ये अपेक्षित आहे. तथापि त्यांनी ही माहिती अपिलार्थीस अर्धवट

स्वरुपात दिनांक-१२-०९-२००६ रोजीच्या पत्रान्वये कळविली आहे. म्हणजेच त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी १५ दिवस इतका विलंब लावलेला आहे. सदर विलंबाचे कारण जनमाहिती अधिकारी आज सुनावणीच्या वेळी सांगू शकत नाहीत. सदर अर्ज प्राप्त झाला त्यावेळी सध्याचे ग्रामसेवक या पदावर कार्यरत नव्हते. त्यावेळी श्री.व्ही.एन.शिंदे (सध्या पंचायत समिती वडवणी) हे त्या पदावर कार्यरत होते. त्यामूळे हा विलंब श्री.व्ही.एन. शिंदे यांनी लावला आहे. असे त्यांचे म्हणणे आहे. तत्कालीन ग्रामसेवकाने विलंब लावला तरी सध्या कार्यरत असलेले ग्रामसेवक यांनी या पदाचा कार्यभार दिनांक- १०-१२-२००६ रोजी स्वीकृत केला. त्यांनी देखील अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने कोणत्याही प्रकारची सकारात्मक कार्यवाही केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. त्याचबरोबर अशाच प्रकारचे निरीक्षण जनअपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १७-१०-२००६ रोजीच्या अपील निर्णयामध्ये केलेली आहेत. हे पाहता, या प्रकरणी जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यास विलंब लावला व जी माहिती दिली ती अर्धवट दिली हे निःसंशयपणे सिध्द होत आहे. अपिलार्थीस आज पासून तीन दिवसात त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागितलेली संपूर्ण माहिती देण्यास सध्याचे ग्रामसेवक तयार आहेत. वरील युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे दिसून येते की, अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देण्याकरिता सध्याचे जनमाहिती अधिकारी व तत्कालीन जनमाहिती अधिकारी श्री.व्ही.एन.शिंदे व श्री.जी.बी.सोळंके,(मध्यंतरी काही काळ कार्यरत) ग्रामपंचायत वडवणी हे जबाबदार ठरत आहेत. त्यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देवून व अर्धवट माहिती देवून आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केली आहे. त्यांनी केलेल्या या कृतीमूळे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २०(१) च्या तरतूदीस निःसंशयपणे ते पात्र ठरत आहेत.

तेव्हा असे आदेशित करण्यात येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल (माहिती पूर्वी दिलेली सोडून) हे आदेश निर्गमीत होताच तीन दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. त्यांनी अपिलार्थीस १५ दिवसाच्या विलंबाने व अर्धवट माहिती दिल्याबद्दल त्यांच्यावर प्रतिदिनी २५०/- रु. प्रमाणे एकूण रुपये ३,७५०/- (रुपये तीन हजार सातशे पन्नास) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम त्यांनी खालील लेखाशिर्षाखाली जिल्हा कोषागारात हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत एकाच हप्त्यात जमा करावी. उपरोक्त तीन ग्रामसेवकामध्ये शास्तीची विभागणी गटविकास अधिकारी पंचायत समिती, वडवणी, जिल्हा-बीड यांनी हे आदेश निर्गमीत झालेल्या दिनांकापासून १० दिवसाचे आत करावी.

''००७० इतर प्रशासनिक सेवा, ६० इतर सेवा, ८०० इतर जमा रक्कम, १८ माहितीचा अधिकार ००७०- ००६-१'' **व तसे केल्याचा अनुपालन अहवाल गटविकास अधिकारी, पंचायत समिती, वडवणी यांनी हे आदेश निर्गमित झाल्यापासून ४५ दिवसाचे आत आयोगास सादर करावा.**

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

निर्णय

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जनमाहिती अधिकारी यांनी हे आदेश निर्गमीत होताच अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीपैकी, यापूर्वी दिलेली माहिती वगळता, उर्वरीत माहिती हे आदेश निर्गमित झाल्यापासून ३ दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. संबंधित जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विलंबाने व अर्धवट माहिती दिल्याबद्दल त्यांच्यावर प्रतिदिनी २५०/- रुपये याप्रमाणे एकूण ३,७५०/- (अक्षरी

रुपये तीन हजार सातशे पन्नास) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. त्यांनी ती शास्ती उपरोक्त विवेचनामध्ये दिलेल्या लेखा शिर्षाखाली सदर शास्तीच्या रक्कमेचा भरणा हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत जिल्हा कोषागारात भरावी.

४. वरील क्रमांक-३ च्या अनुपालनाचा अहवाल गटविकास अधिकारी पंचायत समिती, वडवणी यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ४५ दिवसाच्या आत आयोगास अहवाल सादर करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )
दिनांक ३०-१०-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. प्रेमचंद गुलाबचंद नहार, पंकज मोटार्स, स्टेडियम कॉम्प्लेक्स, जालना रोड, बीड

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, वडवणी, तालुका वडवणी, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वडवणी, तालुका वडवणी, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

**अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/६१४**

**निर्णय दिनांक ३०-१०-२००७**

श्री. प्रेमचंद गुलाबचंद नहार, : अपिलार्थी
पंकज मोटार्स, स्टेडियम कॉम्प्लेक्स,
जालना रोड, बीड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी :
तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, वडवणी, तालुका
वडवणी, जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,

वडवणी, तालुका वडवणी,

जिल्हा बीड

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-१०-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. प्रेमचंद गुलाबचंद नहार (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, वडवणी श्री. कालीनाथ ज्ञानदेव गोंदावले (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वडवणी श्री. विलास पुजारी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी सर्व प्रथम अपिलार्थीने त्यांच्याकडील दिनांक १७-०७-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे वडवणी ग्रामपंचायत हद्दीतील मिळकतीसंदर्भात एकूण ८ मुद्दयावरील खालीलप्रमाणे माहिती मागितली होती. सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांना दिनांक २४-०७-२००६ रोजी प्राप्त झाल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येत आहे.

५. “ आपल्या ग्रामपंचायत हद्दीत मिळकत / घर क्र. ८३५ हा सौ. सुलोचना केशवराव आंधळे यांच्या मालकीचा असल्याचे समजते. या घराचा पी. टी. आर. उतारा द्यावा,

६. त्यांचे नांव या पी. टी. आर. उता-यात लावण्यासाठी त्यांनी दिलेल्या अर्जाची व त्यासोबत जोडलेल्या सर्व कागदपत्रांची प्रत द्यावी. हे नांव लावतेवेळेस या ग्रामपंचायतमध्ये ग्रामसेवक म्हणून कोण कार्यरत होते व सरपंच कोण होते त्या दोघांचीही नावे व पत्ते द्यावीत. सदरील ग्रामसेवक सध्या कोठे कार्यरत आहेत तो पत्ता द्यावा,

७. यापुर्वी या जागेचे मालक कोण होते, यासंबंधी आपल्या कार्यालयात असलेली संपूर्ण माहिती देण्यात यावी, म्हणजेच ही जागा यापूर्वी आपल्या रेकॉर्डप्रमाणे किती लोकांच्या ताब्यात होती व कोण-कोण किती काळ या जागेचे मालक होते त्याची यादी द्यावी, त्यांची नावे बदलून नवीन मालकांची नावे कोण-कोणत्या आधारावर घेण्यात आली व तसे फेरफार करण्यात आले याबद्दलची सविस्तर माहिती सर्व कागदपत्रासह द्यावी,

८. संबंधीत सर्व नावे बदलतांना ग्रामपंचायतने ठराव घेतला असल्यास त्या ठरावाची प्रत द्यावी,

९. सौ. आंधळे यांचे नाव लावतांना ग्रामपंचायतने जाहीरनामा दिला होता काय, दिला असल्यास त्या जाहीरनाम्याची प्रत द्यावी व हा जाहीरनामा कोणत्या दैनिकात केव्हा छापून आला होता त्याची माहिती द्यावी,

१०. ही जागा यापूर्वी वडवणी येथील अस्तित्वात असलेल्या बालाजी मंदिरासाठीची होती. रामदास बैरागी हे या जागेचे मालक होते. त्यांचा पी. टी. आर. उतारा, ते कोणत्या आधारावर मालक झाले होते तो फेरफार उतारा द्यावा,

११. सदर सौ. सुलोचना आंधळे यांच्या जागेचा नजरी नकाशा द्यावा,

१२. बालाजी मंदिराच्या जागेचा पी. टी. आर. उतारा आणि नजरी नकाशा द्यावा."

अपिलार्थीने ही माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद दिला नसल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. आज सुनावणीच्या वेळी त्यांना अपिलार्थीच्या अर्जावर काय कारवाई केली याबाबत काहीही सांगता आले नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०८-२००६ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-०९-२००६ रोजी प्राप्त झाल्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या सुनावणी आदेशातील संदर्भावरुन स्पष्ट होते. या अपिलाची जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २१-०९-२००६ व १६-१०-२००६ रोजी सुनावणी घेऊन या प्रकरणात आपले अंतीम आदेश दिनांक १७-१०-२००६ रोजी पारीत केले.

या अपील निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिका-याने माहिती अर्जाच्या मुद्दा क्रमांक ३ ते ६ बाबतचे अभिलेखे पुर्वीच्या जन माहिती अधिका-या-कडून उपलब्ध करुन घेण्याचा काहीही प्रयत्न केले नसल्याने अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती पुरविण्यात आली नसल्याचे निर्देशीत करुन जन माहिती अधिकारी हे प्रतिदिन रुपये २५० प्रमाणे शास्ती लावण्यास पात्र आहेत असा निष्कर्ष काढला आहे. या आदेशामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (६) नुसार मोफत माहिती पुरविण्याचे आदेशीत केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४-११-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निकालामध्ये तत्कालीन ग्रामसेवक यांना दोषी धरल्याचे चूक असून संबंधीत ग्रामसेवकासह त्यांच्यानंतर त्या पदावर काम करणा-या सर्व ग्रामसेवकवर शास्ती लावणे आवश्यक होते, परंतु जन अपिलीय अधिकारी यांनी तसे केले नसल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणले आहे. याच बरोबर जन माहिती अधिका-याने जन अपिलीय

अधिकारी यांच्या निकालानंतरही अपिलार्थीस व्दितीय अपील करेपर्यतही त्यांना माहिती दिली नाही त्यामुळे त्यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) प्रमाणे विलंबाच्या प्रतिदिन रुपये २५० /- या दराने शास्ती लावण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तिवादामध्ये अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना अद्यापही जन माहिती अधिका-याकडून त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती मिळाली नाही, त्यामुळे संबंधीत जन माहिती अधिकारी यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) नुसार शास्ती लावण्यात यावी. सदर माहिती त्यांना उच्च न्यायालयात चालू असलेल्या एका प्रकरणाच्या सुनावणीसंदर्भात आवश्यक आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक १२-०९-२००६ रोजी त्यांना आवश्यक असलेली माहिती दिली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, अपिलार्थीस सर्वसाधारण परिस्थितीत ही संपूर्ण माहिती जन माहिती अधिका-यास त्यांचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर ३० दिवसाच्या आत म्हणजेच दिनांक २३-०८-२००६ रोजी अगर तत्पुर्वी मिळणे अपेक्षित होते तथापि त्यांनी मागितलेल्या एकूण ८ मुद्यावरील माहितीपैकी मुद्दा क्रमांक ३ ते ६ हे वगळता उर्वरीत मुद्दयावरील माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक १२-०९-२००६ रोजी पुरविली आहे. म्हणजेच त्यांनी अपिलार्थीस ही माहिती देण्यापोटी एकूण २० दिवसांचा विलंब लावल्याचे या प्रकरणी सिध्द होत आहे. मुद्दा क्रमांक ३ ते ६ ची माहिती त्यांनी पदभार घेतल्यानंतर त्यांना हस्तांतरीत झालेल्या पदभारामध्ये नाही ही माहिती त्यांच्या पुर्वी सेवेत कार्यरत असलेल्या ग्रामसेवकाकडून त्यांना मिळाली नसल्याने ही माहिती त्यांना अपिलार्थीस पुरविला आली नाही असे त्यांनी अपिलार्थीस पाठविलेल्या दिनांक १२-०९-२००६ रोजीच्या पत्रामध्ये कबूल केले आहे. अपिलार्थीस त्यांनी या पदाचा पदभार कधी धारण केला हे विचारले असता त्यांनी या पदाचा पदभार दिनांक १०-१२-२००६ रोजी

धारण केल्याचे आयोगास सांगितले. अपिलार्थीने उपरोक्त प्रकरणी प्रथम अर्ज केला त्यावेळी श्री. व्ही. एन. शिंदे नावाचे ग्रामसेवक कार्यरत होते ते सध्या वडवणी पंचायत समिती येथे कार्यरत आहेत. जन माहिती अधिकारी यांनी पदभार स्विकारुन दहा महिने ओलांडून गेले असतांना अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती मिळण्यासाठी त्यांनी काय प्रयत्न केले हे विचारले असता त्यावर त्यांनी कोणतेही उत्तर दिले नाही. यावरुन त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याकरिता कोणत्याही प्रकारे सकारात्मक कारवाई केली नसल्याचे स्पष्ट होते. तेव्हा अपिलार्थीस आवश्यक ती माहिती विहित मुदतीत न मिळण्यासाठी तत्कालीन जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस उर्वरीत माहिती मिळवून देण्यासाठी काहीही प्रयत्न न करणारे सध्याचे जन माहिती अधिकारी हे संपूर्णतः जबाबदार ठरतात असे दिसून येते.

जन अपिलीय अधिकारी यांना याबाबत खुलासा करण्याकरिता विचारले असता त्यांनी असा खुलासा केला की अपिलार्थीने प्रथम अर्ज केला त्यावेळी श्री. व्ही. एन. शिंदे हे ग्रामसेवक या पदावर कार्यरत होते त्यानंतर श्री. जी. बी. सोळंके व सध्या श्री. के. डी. गोंदवणे या पदावर काम करत आहेत. श्री. गोंदवणे यांनी पदभार स्विकृत करतांना त्यांना अर्धवट पदभार मिळाल्याचे त्यांच्या वरिष्ठांच्या निदर्शनास प्रथमतः त्यांच्याकडील दिनांक २२-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये आणले. या पत्रामध्ये त्यांनी या अर्जासंदर्भातील इतर स्पष्टीकरणाबरोबर अपिलार्थीस आवश्यक ती उर्वरीत माहिती गोळा करुन नंतर पुरविली जाईल असे त्यांच्या वरिष्ठांना आश्वासित केले होते.

वरील घटनाक्रम पाहता थोडक्यात असे म्हणता येईल की, अपिलार्थीस आवश्यक असलेली उर्वरीत माहिती न मिळण्याकरिता तत्कालीन ग्रामसेवक श्री. व्ही. एन. शिंदे, ग्रामसेवक वडवणी, श्री. जी. बी. सोळंके, ग्रामसेवक, पंचायत समिती वडवणी व श्री. के. डी. गोंदवणे हे जबाबदार ठरतात. त्यांनी अपिलार्थीस अधिनियमातील विहित मुदतीत माहिती न

देऊन अधिनियमाच्या कलम ७ (१) च्या तरतूदींचा भंग केला आहे व त्याव्दारे त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव व बेपर्वा वृत्ती देखिल स्पष्ट केली आहे.

आज सुनावणीच्या वेळी श्री. के. डी. गोंदवणे यांनी अपिलार्थीस उर्वरीत माहिती २ दिवसात विनामूल्य देण्याचे कबूल केले आहे. संबंधीत गट विकास अधिकारी यांनी श्री. गोंदवणे हे अपिलार्थीने मागितलेली व उर्वरीत माहिती अपिलार्थीस २ दिवसात देतील याची खात्री करुन घ्यावी व त्याचबरोबर जर अपिलार्थीने मागितलेल्या माहिती संदर्भातील अभिलेखे व नस्ती ग्रामसेवकाच्या कार्यालयामध्ये उपलब्ध नसतील तर त्या हरवल्या गेल्या किंवा चोरीला गेल्यासंदर्भात संबंधीतांवर आवश्यक वाटल्यास फौजदारी गुन्हा दाखल करणे योग्य राहील असे आयोगास वाटते.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर असे आदेशीत करण्यात येते की :

१. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली उर्वरीत माहिती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ दिवसाच्या आत विनामूल्य द्यावी.

२. उपनिर्देशित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी जो असमर्थनीय विलंब लावला आहे त्याबद्दल व त्यांनी दाखविलेल्या त्यांच्या कार्यशैली तील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी.

३. अपिलार्थीस जी माहिती दिनांक २३-०८-२००६ रोजी अगर तत्पुर्वी मिळणे अपेक्षित होते ती त्यांना दिनांक १२-०९-२००६ रोजीच्या पत्रान्वये कळवून जन माहिती अधिकारी यांनी २० दिवस इतका असमर्थनीय विलंब लावण्याचे दिसून येते तेव्हा संबंधीत जन माहिती अधिकारी यांना या विलंबाप्रीत्यर्थ प्रतिदिन रुपये २५० याप्रमाणे एकूण २० दिवसाकरिता रुपये ५००० (अक्षरी रुपये पाच हजार) इतकी शास्ती लावण्यात येत आहे.

सदर शास्तीची रक्कम त्यांनी शासकीय कोषागारात लेखा शिर्ष संकेतांक ००७० इतर प्रशा सेवा ६० इतर सेवा ८०० इतर जमा रकम १८ केंद्र शासन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ शुल्क व दंड या लेखाशीर्षाखाली जमा करावी. सदर शास्तीची रक्कम शासकीय कोषागारामध्ये जमा होईल याची मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी खात्री करावी.

४. शास्तीचे हप्ते व त्यांची मुदत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (बीड) यांनी ठरवावी. ही मुदत तीन महिन्याहून जास्त असणार नाही याची मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड यांनी दक्षता घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे, राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ दिवसात अपिलार्थीस विनामूल्य द्यावी.

३. तत्कालीन ग्रामसेवक, वडवणी श्री. व्ही. एन. शिंदे, श्री. जी. बी. सोळंके व श्री. के. डी. गोंदवणे ग्रामसेवक वडवणी या तिन्ही ग्रामसेवकावर त्यांनी आपल्या कार्यशैलीतील दाखविलेल्या कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी प्रचलीत सेवा नियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई करुन आपला अनुपालन अहवाल आयोगास हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ महिन्याच्या आत सादर करावा.

४. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विलंबाने माहिती दिल्याप्रीत्यर्थ त्यांचेवर प्रतिदिन रुपये २५० याप्रमाणे एकूण २० दिवसाकरिता रुपये ५००० (अक्षरी रुपये पाच हजार) इतकी शास्ती लावण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ३०-१०-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. प्रेमचंद गुलाबचंद नहार, पंकज मोटार्स, स्टेडियम कॉम्प्लेक्स, जालना रोड, बीड

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, वडवणी, तालुका वडवणी, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वडवणी, तालुका वडवणी, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेला अर्ज

**क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/०२**

**निर्णय ३१-१०-२००७**

**दिनांक**

1 ¸ÉÒ. ¤ÉÉ³ýEÞò¹hÉ ¤ÉÉ{ÉÖ®úÉ´É Ë¶Énäù, : +VÉÇnùÉ®ú
¨ÉÉiÉÉä¸ÉÒ, ¨½þÉb÷É +É®ú-28, BSÉ. +ÉªÉ. VÉÒ.
17/31, BxÉ-7, Ê°Éb÷EòÉä, +Éè®ÆúMÉÉ¤ÉÉnù

## विरुध्द

1 VÉxÉ ¨ÉÉÊ½þiÉÒ +ÊvÉEòÉ®úÒ : lÉÊiÉ´ÉÉnùÒ
iÉlÉÉ ÊVÉ±½þÉ ={ÉÊxÉ¤ÉÆvÉEò, °É½þEòÉ®úÒ
°ÉÆ°lÉÉ,
Ê´É¶Éä¹É ±ÉäJÉÉ {ÉÊ®úIÉEò ´ÉMÉÇ-2,
°É½þEòÉ®úÒ °ÉÆ°lÉÉ (Ê¡ò®úiÉä {ÉlÉEò),
+Éè®ÆúMÉÉ¤ÉÉnù
2 VÉxÉ +Ê{É±ÉÒªÉ +ÊvÉEòÉ®úÒ
iÉlÉÉ Ê´É¦ÉÉMÉÒªÉ °É½þ ÊxÉ¤ÉÆvÉEò,
°É½þEòÉ®úÒ °ÉÆ°lÉÉ, +Éè®ÆúMÉÉ¤ÉÉnù

## विवेचन

´É®úÒ±É lÉEò®úhÉÉSÉÒ °ÉÖxÉÉ´ÉhÉÒ +ÉVÉ ÊnùxÉÉÆEò 31-10-2007 ®úÉäVÉÒ +Éè®ÆúMÉÉ¤ÉÉnù ªÉälÉä PÉähªÉÉiÉ +É±ÉÒ. °ÉÖxÉÉ´ÉhÉÒSªÉÉ ´Éä³äý°É iÉGòÉ®úÉnùÉ®ú ¸ÉÒ. ¤ÉÉ³ýEÞò¹hÉ ¤ÉÉ{ÉÖ®úÉ´É Ë¶Énäù (ªÉÉ{ÉÖfäø iªÉÉÆxÉÉ +VÉÇnùÉ®ú +°Éä °ÉÆ¤ÉÉävÉhªÉÉiÉ ªÉä<Ç±É), VÉxÉ ¨ÉÉÊ½þiÉÒ +ÊvÉEòÉ®úÒ iÉlÉÉ ÊVÉ±½þÉ ={ÉÊxÉ¤ÉÆvÉEò, °É½þEòÉ®úÒ °ÉÆ°lÉÉ ¸ÉÒ. +ÊxÉ±ÉEÖò¨ÉÉ®ú ¨ÉÖÆVÉÉVÉÒ®úÉ´É nùÉ¤É¶Éåbä÷ (ªÉÉ{ÉÖfäø iªÉÉÆxÉÉ VÉxÉ ¨ÉÉÊ½þiÉÒ +ÊvÉEòÉ®úÒ +°Éä °ÉÆ¤ÉÉävÉhªÉÉiÉ ªÉä<Ç±É) ´É VÉxÉ +Ê{É±ÉÒªÉ +ÊvÉEòÉ®úÒ iÉlÉÉ Ê´É¦ÉÉMÉÒªÉ °É½þ ÊxÉ¤ÉÆvÉEò, °É½þEòÉ®úÒ °ÉÆ°lÉÉ ¸ÉÒ. °ÉÖ¦ÉÉ¹É vÉÉåÊb÷®úÉ¨É ¨ÉÉxÉä (ªÉÉ{ÉÖfäø iªÉÉÆxÉÉ VÉxÉ +Ê{É±ÉÒªÉ +ÊvÉEòÉ®úÒ +°Éä °ÉÆ¤ÉÉävÉhªÉÉiÉ ªÉä<Ç±É) ½äþ ½þVÉ®ú +É½äþiÉ.

या प्रकरणी तक्रारदाराने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०३-२००७ रोजी अर्ज केला असून आयोगाने दिलेल्या दिनांक १४-०२-२००७ रोजीच्या निर्णयानुसार जन माहिती अधिकारी यांना २० दिवसात माहिती देण्याचे निर्देशीत केले असतांना देखील तक्रारदारास अद्यापपर्यत माहिती न मिळाल्याचे त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले आहे.

आज रोजी सहकार विभागाच्या उपस्थितांबरोबर झालेल्या चर्चेमध्ये तक्रारदाराने मागितलेल्या माहितीच्या प्रती विशेष लेखा परिक्षक वर्ग-२, सहकारी संस्था (फिरते पथक) यांचेकडे झेरॉक्स प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले व त्या तक्रारदारास देण्याची तयारीही त्यांनी दर्शविली आहे.

तेव्हा असे आदेशीत करण्यात येते की :

जन माहिती अधिकारी यांनी, विशेष लेखा परिक्षक वर्ग-२, सहकारी संस्था (फिरते पथक) यांच्याकडून अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या माहितीच्या प्रती प्राप्त करुन घ्याव्यात व त्या तक्रारदारास हे आदेश निर्गमीत झाल्यानंतर ७ दिवसात विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर तक्रारदाराचा अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ३१-१०-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बाळकृष्ण बापुराव शिंदे, मातोश्री, म्हाडा आर-२८, एच. आय. जी. १७/३१, एन-७, सिडको, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, विशेष लेखा परिक्षक वर्ग-२, सहकारी संस्था (फिरते पथक), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

**अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/६१५**

**निर्णय दिनांक** ३१-१०-२००७

श्रीमती प. गं. कोदरकर, : अपिलार्थी

स्वा. सै. व्दारा - श्री. दे. म. अकोलकर,

३३ (अ) “रेणुका”, छत्रपतीनगर, गारखेडा

परिसर, औरंगाबाद — ४३१ ००५

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी :

तथा मुख्य लेखा परिक्षण, स्थानिक निधी

लेखा, नवी मुंबई

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा मुख्य लेखा परिक्षण, स्थानिक निधी

लेखा, मुंबई

| | | |
|---|---|---|
| प्रत्यक्षात : | जन माहिती अधिकारी : | उप मुख्य लेखा परिक्षक (प्रशासन), स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य, कोकण भवन, ६ वा माळा, नवी मुंबई |
| | जन अपिलीय अधिकारी : | मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य, कोकण भवन, ६ वा माळा, नवी मुंबई |

विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-१०-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्रीमती प. गं. कोदरकर या गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य लेखा परिक्षक (प्रशासन) मुख्य लेखा परिक्षक व जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा यांच्या वतीने त्यांचे प्रतिनिधी उप मुख्य लेखा परिक्षक (व.) स्थानिक लेखा निधी, औरंगाबाद हे हजर आहेत.

या प्रकरणी सर्व प्रथम अपिलार्थीने त्यांच्याकडील दिनांक २९-०५-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील आस्थापना व सेवाविषयक बाबी संदर्भात एकूण ६ मुद्दयावर खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

१. “ माझे पत्र क्र. १७१ दिनांक १२-०४-२००६ व्दारे स्वा. सै. अवलंबिता प्रकरणी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, खंडपीठ, औरंगाबादचा न्यायीक निर्देश माझा पाल्य चि. म. दे. अकोलकर यास लागू होतो वा कसे,

२. सा. प्र. वि. चे परिपत्रक दिनांक १८-०१-९३ नुसार स्वा. सै. अवलंबितांचे अर्जावर त्वरीत कार्यवाही करण्याचे सूचित केले आहे काय ?

३. माझ्या पाल्याचा दिनांक २०-०६-२००५ चा अर्ज आपण आपले पत्र दिनांक २८-०६-२००५ व्दारे परत केला तेव्हा ४६ उमेदवारांचे अर्ज केव्हा केव्हा प्राप्त झाले त्याचा तपशिल अ. क्र. अर्ज प्राप्तीचा दिनांक नाव,

४. उप मुख्य लेखा परिक्षक (वरिष्ठ) औरंगाबाद यांनी माझा दिनांक १०-०२-२००५ चा पाल्याचा अर्ज दिनांक ३१-०३-२००५ चे पत्राव्दारे फेटाळून लावला असता मी दिनांक ०७-०७-२००५ ला आपणास ही बाब सविस्तररित्या आपणास कळविली तेव्हा या अधिका-याविरुध्द काय कार्यवाही केली गेली - अथवा या अधिका-याने केलेली कार्यवाहीच योग्य होती ?

५. दिनांक १८-१२-२००५ रोजी लोकसेवा आयोगाची परिक्षा होती एकाच दिवशी दोन ठिकाणी उमेदवार परिक्षा देऊ शकणार नाहीत याची आपण काय तजवीज केली होती ती उमेदवारांना कळविली होती काय ?

६. वरील प्रकरणी झालेल्या अन्याय कसा आणि केव्हा दूर करण्यात येईल. ”

सदर माहिती अपिलार्थीस कशी मिळावी या संदर्भात व ते दारिद्र्य रेषेखालील आहेत किंवा कसे यासंदर्भात अपिलार्थीने या अर्जात कोणताही खुलासा केलेला नाही.

अपिलार्थीचा दिनांक २९-०५-२००६ रोजीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक ०८-०६-२००६ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थीने सादर केलेल्या अर्जानुसार त्यांना माहिती देण्यासाठी टपाल खर्चासह रुपये ३९ इतके शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याबाबत त्यांच्या कार्यालयाने दिनांक ३०-०६-२००६ रोजी कळविले.

जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांना माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी लागणारे शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात न भरता त्यांच्या कडील दिनांक १२-०७-२००६ रोजीच्या अपील अर्जाअन्वये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-०७-२००६ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक २४-०७-२००६ रोजी प्राप्त झाला. तथापि या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता त्यांच्याकडील दिनांक १९-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी मागितलेल्या शुल्काची रक्कम त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. अपिलार्थीस शुल्क भरण्यासाठी जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०३-०१-२००७ रोजीच्या स्मरणपत्राव्दारे कळविले. तथापि तदनंतरही अपिलार्थीने आवश्यक त्या रक्कमेचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणताच प्रतिसाद न मिळाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४-११-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. सदर अपील दाखल करण्याचे कारण म्हणून अपिलार्थीने जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांना माहिती अप्राप्त असल्याचे दर्शविले आहे.

अपिलार्थीने या अपील अर्जामध्ये आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत याची नोंद घेण्यात आली आहे. तथापि त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे व अपील अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना आवश्यक असल्याचे अनुमान सुनावणीमध्ये काढण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांच्या कार्यालयात अपिलार्थीचा अर्ज प्रत्यक्षात दिनांक ०८-०६-२००६ रोजी प्राप्त झाला. या अर्जावर त्यांनी विहित मुदतीत म्हणजेच दिनांक ३०-०६-२००६ रोजी अपिलार्थीस ही माहिती प्राप्त करुन घेण्यापोटीचे शुल्क रुपये ३९ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे त्यांच्याकडील दिनांक ३०-०६-२००६ रोजीच्या पत्रान्वये सूचित केले व त्याचबरोबर जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीस सदर शुल्काचा भरणा करण्याबाबत दिनांक १९-०८-२००६ रोजी व दिनांक ०३-०१-२००७ रोजी कळविले असतांना देखील अपिलार्थीने सदर रक्कमेचा भरणा त्यांच्या कार्यालयात आजतागायत केला नाही. अपिलार्थीने मागितलेली सर्व माहिती त्यांच्या कार्यालयात तयार असून अपिलार्थीस फीचा भरणा केल्यावर ते अपिलार्थीस ही माहिती देण्यास तयार आहेत.

या प्रकरणाची पार्श्वभूमी समजावून घेतली असता जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीकडून आयोगास अशी माहिती मिळाली की, अपिलार्थीच्या मुलाने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात व त्याचबरोबर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे वरिष्ठ लिपीक या पदासाठी अर्ज केला होता. या पदाकरिता जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने व महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने लेखी परिक्षा आयोजित केल्या होत्या. या दोन्ही कार्यालयाच्या परिक्षा एकाच दिवशी व एकाच वेळी आल्याने व अपिलार्थीचा पाल्य लोकसेवा आयोगाच्या परिक्षेस उपस्थित झाल्याने त्यांना साहजिकच जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील

वरिष्ठ लिपीक या पदाकरिता आयोजित केलेल्या लेखी परिक्षेस हजर राहता आले नाही त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे घेण्यात आलेल्या परिक्षा संदर्भात माहिती हवी असल्याचे दिसून येते.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता मुळात अपिलार्थीने जी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे ती एकूण ६ मुद्दया-वर मागितली असून त्यापैकी मुद्दा क्रमांक ३ वगळता उर्वरीत ५ मुद्दयावरील माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची व जन माहिती अधिकारी यांचे स्पष्टीकरण अपेक्षित असलेली आहे असे दिसून येते. मुळात अपिलार्थीने मागणी केलेली ही माहिती त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ३ वगळता माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये विहित केलेल्या कलम २ (च) च्या तरतुदीत बसत नाही. अधिनियमाचे कलम २ (च) मध्ये "माहिती" या शब्दाची व्याख्या पुरेशी स्पष्ट करण्यात आलेली आहे. यामध्ये अपिलार्थीस, जन माहिती अधिका-यास कारणे अथवा खुलासा वजा माहिती विचारता येऊ शकत नाही. त्याचबरोबर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (१) मध्ये नमूद केल्याप्रमाणे आवश्यक शुल्क देखील अपिलार्थीने आजपावेतो जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरलेले नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ३०-०६-२००६ रोजी विहित मुदतीमध्येच माहितीपोटी लागणारे आवश्यक शुल्क त्यांचे कार्यालयात भरण्याविषयी सूचित केले आहे ही वस्तुस्थिती पाहता अपिलार्थीचे अपील फेटाळणे योग्य आहे या निर्णयाप्रत आयोग आला आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे, राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

तथापि अपिलार्थीस ही माहिती आवश्यक असेल तर त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे आवश्यक शुल्काचा भरणा त्यांच्याकडे करुन, ही माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

## निर्णय

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ३१-१०-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्रीमती प. गं. कोदरकर, स्वा. सै. व्दारा - श्री. दे. म. अकोलकर, ३३ (अ) "रेणुका", छत्रपतीनगर, गारखेडा परिसर, औरंगाबाद – ४३१ ००५

२ जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य लेखा परिक्षक (प्रशासन), स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य, कोकण भवन, ६ वा माळा, नवी मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य, कोकण भवन, ६ वा माळा, नवी मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमाक २००७/रामाआ/अपील/सिआर/६१६

निर्णय दिनांक- ३१-१०-२००७.

श्रीमती. प.गं.कोदरकर, (स्वातंत्र्य सैनिक) : अपिलार्थी
३३(अ) ''रेणूका'', छत्रपतीनगर,
गारखेडा परिसर औरंगाबाद ४३१०५०

विरुध्द

१ अवर सचिव, : प्रतिवादी
सामान्य प्रशासन विभाग
(स्वातंत्र्य सैनिक कक्ष) मंत्रालय, मुंबई

२. जनअपिलीय अधिकारी तथा
उपसचिव,
सामान्य प्रशासन विभाग,
स्वातंत्र्य सैनिक कक्ष
मंत्रालय, मुंबई-३२

## विवेंचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनाक- ३१-१०-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्रीमती. प.गं.कोदरकर ( यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हया गैरहजर आहेत. तर जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव, (स्वातंत्र्य सैनिक कक्ष) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई, श्री.ज्ञानदेव लक्ष्मण सुळ (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय

अधिकारी तथा उपसचिव, सामान्य प्रशासन विभाग, स्वातंत्र्य सैनिक कक्ष, मंत्रालय, मुंबई, श्रीमती.स्मिता दत्तात्रय मंत्री (यापुढे त्यांना  जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हया हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- ०६-०५-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे स्वातंत्र्य सैनिकाच्या पाल्यांना नोकरी देण्यासंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

‘‘ शासनाने स्वातंत्र्य सैनिकांना अनेक सवलती दिल्या आहेत. त्यापैकी त्यांचे वतीने त्यांच्या पाल्यांना नोकरी देणे बाबतची एक सवलत आहे.

असे अनुभवास आले आहे की, स्वातंत्र्य सैनिक अवलंबितानाच नव्हे तर खुद्द स्वा.सै.ना विविध अधिकारी नोकरी बाबत केलेल्या अर्जाचे संदर्भात उडवा उडवीची उत्तरे प्रसंगी दुरुत्तरे, (लेखी स्वरुपात) देवून राज्याच्या या सन्माननिय जेष्ठ नागरीकांना अवमानस्पद वागणूक देतात.

याचे मुख्य कारण म्हणजे याबाबत शासनाचे / स्वा.सै. अवलंबिताचा अर्ज प्राप्त झाल्यावर कार्यालयीन प्रमूख ते विभाग प्रमूखांनी काय व कशी कार्यवाही करावी या बाबत सुस्पष्ट मार्गदर्शन नसल्याने प्रत्येकास आपआपल्या परिने स्वा.सै. अवलंबिताचे अर्जास वागणूक देत आहे. त्या मुळे अनावधानाने का होईना स्वा.सै.चा अवमान होईल याची कुणीही तमा बाळगत नाही.

शासनाच्या सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य क्रिडा व विशेष सहाय्य विभागाने दिनांक- १४-०६-२००४ रोजी राज्यातील जेष्ठ नागरीक धोरण २००४ (भाग-१) जाहीर केला आहे. त्याचप्रमाणे शासनाने राज्यातील ज्यांना सन्मान निवृत्ती

वेतन देवून गौरविले जाते अशा सन्माननिय जेष्ठ स्वा.सै. नागरीकासाठी धोरण निश्चीत केलेले आहे काय ?''

सदर माहिती अपिलार्थीस कशी हवी याचा व ते दारिद्र्यरेषेखालील आहेत किंवा कसे याचा अपिलार्थीने कोणताही उल्लेख केल्याचे दिसून येत नाही.

सदर अर्ज जनमाहिती अधिका-यास दिनांक- १६-०५-२००६ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या या अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक- १५-०६-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला आहे. या पत्राबरोबर त्यांनी सामान्य प्रशासन विभागाचे दिनांक २५ ऑक्टोंबर २००५ चे आदेश जोडले आहेत. या आदेशामध्ये शासकीय सेवेत गट- क व गट-ड पदावरील सेवाभरतीच्या संदर्भात मार्गदर्शन अद्यावत विहित केले असून त्यामध्ये स्वातंत्र्य सैनिकाच्या नामनिर्देशित व्यक्ती यांच्या संदर्भात नियुक्ती करतांना संबंधित अधिका-याने कशा प्रकारची कार्यवाही करावयाची आहे याचे मार्गदर्शन केले आहे.

जनमाहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) मधील तरतुदी अन्वये दिनांक- २६-०६-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपीलावर जनअपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. तथापि त्यांनी त्यांच्याकडील दिनांक- १९-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस आवश्यक तो खुलासा केल्याचे दिसून येते. जनअपिलीय अधिकारी यांची अपील ठरविण्याची ही कृती बरोबर नसून त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी अन्वये त्यांच्याकडे अपिलार्थीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर

अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी यांना सुनावणीची तारीख देवून एकत्र बोलावून व त्यांचे म्हणणे ऐकून घेवून आपला निर्णय पारीत करणे हे "अपिल ठरविणे" या प्रक्रियेमध्ये अभिप्रेत आहे. तथापि अशा प्रकारची कोणतीही कृती जनअपिलीय अधिकारी यांनी केल्याचे आयोगास आढळून येत नाही. त्यांनी या पुढे अपील ठरवितांना या ठिकाणी स्पष्ट केल्याप्रमाणे कार्यवाही करावी. असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या उत्तराने व्यथीत होवून अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- १४-११-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तीवादाच्या वेळी अपिलार्थी गैरहजर असल्याची नोंद घेण्यात आली. अपिलार्थी हया गैरहजर असल्याने त्यांच्या मूळ अर्जातील व अपीलअर्जातील त्यांची मागणी लक्षात घेवून सुनावणी घेण्यात येत आहे.

जनमाहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती दिनांक- १५ जून २००६ रोजी पुरविली आहे. अपिलार्थीने त्यांच्याकडे स्वातंत्र्य सैनिकासाठी शासनाने कोणते धोरण निश्चीत केले आहे काय? अशा स्वरुपाची माहिती विचारली होती. ही माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याने ते ती माहिती अपिलार्थीस देवू शकले नाहीत. त्यामुळे त्यांनी तसा उल्लेख दिनांक- १५-०६-२००६ रोजीच्या पत्रात केला नाही.

जनमाहिती अधिकारी यांनी पुढे असेही सांगितले की, अपिलार्थी हे स्वातंत्र्य सैनिक असून ते त्यांच्या पाल्यास शासन सेवेत नोकरी मिळविण्याकरिता प्रयत्नशिल आहेत. त्याकरिता ते त्यांच्या विभागाकडे वारंवार पत्रव्यवहार करीत असतात व त्यांना या विषयी

त्यांच्या विभागाने वेळोवेळी माहिती देखिल पुरविली आहे. आतापर्यंत अपिलार्थीने माहिती अधिकारात केलेले अर्ज व अपील याची संख्या १२ इतकी असून त्यांना वेळोवेळी, या सर्व संदर्भातील माहिती त्यांनी उपलब्ध करुन दिली आहे.

अपिलार्थीने त्यांचे दिनांक- ०६-०५-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिका-यास विचारलेल्या माहितीचे स्वरुप पाहता त्यांनी विचारलेली माहिती हा माहितीचा विषय होवू शकत नाही. किंबहूना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येमध्ये अपिलार्थीने विचारलेली माहिती बसू शकत नाही. अपिलार्थीने त्यांच्या अर्जामध्ये शासकीय कर्मचा-यांच्या कार्यपध्दती बद्दल आक्षेप घेवून त्यांना सन्मानाने वागणूक मिळत नसल्याबद्दल अप्रत्यक्षरित्या आयोगास निदर्शनास आणले आहे. त्यांनी आपल्या मूळ अर्जामध्ये सामाजिक न्याय विभागाने त्यांच्याकडील दिनांक- १४-०६-२००४ रोजीच्या आदेशामध्ये राज्यातील जेष्ठ नागरीक धोरण २००४ जाहिर केले आहे. त्याचप्रमाणे शासनाने राज्यातील स्वातंत्र्य सैनिका बाबत वरीलप्रमाणे काही धोरण निश्चीत केले आहे काय, असा प्रश्न अपिलार्थीने जनमाहिती अधिका-यास विचारला आहे. जनमाहिती अधिकारी यांच्या सांगण्यावरुन अशा प्रकारचे कोणतेही धोरण राज्य शासनाने अद्याप निश्चीत केले नसल्याचे समजून येते. स्वातंत्र्य सैनिका बाबतचे धोरण हे निश्चीतपणे मंत्रीमंडळाने मान्य करावयाचे असे धोरण आहे. अशा प्रकारचे कोणतेही धोरण विचाराधीन देखिल नसल्याने या विषयाच्या भविष्यातील धोरणाबाबत जनमाहिती अधिकारी या विषयावर सध्या काहीही माहिती देवू शकणार नाहीत, हे स्पष्ट आहे. जनमाहिती अधिका-याने अपिलार्थीस त्यांच्याकडे दिनांक- १५-०६-२००६ रोजीच्या पत्रान्वये थोडीबहूत माहिती देवून त्यांचे समाधान करण्याचा प्रयत्न केला आहे. अपिलार्थीने विचारलेली माहिती, "माहिती" या शब्दाच्या व्याख्येत बसत नसल्याने व अपिलार्थीने जनमाहिती अधिका-यास जो विषय त्यांच्याकडे विचाराधीन देखिल नाही त्या विषयाच्या

भविष्यातील धोरणासंबधी प्रश्न विचारल्याने जनमाहिती अधिका-यास अपिलार्थीस माहिती देता येणार नाही, हे पाहता, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले दिनाक- १४-११-२००६ रोजीचे व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## <u>निर्णय</u>

१८. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद.
दिनांक- ३१-१०-२००७

( वि.बा.बोरगे)
राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद.

प्रत,

३७. श्रीमती.प.गं.कोदरकर, स्वा.सै.३३, अ, रेणूका, छत्रपतीनगर, गारखेडा परिसर, औरंगाबाद.

३८. जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग (स्वातंत्र्य सैनिक कक्ष) मंत्रालय मुंबई,यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३९. जनअपिलीय अधिकारी तथा उपसचिव,सामान्य प्रशासन विभाग, स्वातंत्र्य सैनिक कक्ष,मंत्रालय मुंबई, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४०. सचिव, मुख्य माहिती आयुक्त कर्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

४१. निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

**अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/६१७**

**निर्णय दिनांक** ३१-१०-२००७

श्रीमती प. गं. कोदरकर, : अपिलार्थी
स्वा. सै. व्दारा - श्री. दे. म. अकोलकर,
३३ (अ) "रेणुका", छत्रपतीनगर, गारखेडा
परिसर, औरंगाबाद – ४३१ ००५

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी :
तथा सामान्य प्रशासन विभाग, स्वातंत्र्य
सैनिक कक्ष, मंत्रालय, मुंबई – ३२

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सामान्य प्रशासन विभाग, स्वातंत्र्य
सैनिक कक्ष, मंत्रालय, मुंबई – ३२

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई – ३२

जन अपिलीय अधिकारी : उपसचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई – ३२

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-१०-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्रीमती प. गं. कोदरकर या गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय श्री. ज्ञानदेव लक्ष्मण सुळ (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उपसचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय सौ. स्मिता दत्तात्रय मंत्री (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी सर्व प्रथम अपिलार्थीने त्यांच्याकडील दिनांक २७-०५-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे स्वातंत्र्य सैनिकांच्या अवलंबितास नोकरी मिळण्याबाबत एकूण ५ मुद्दयावर खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

७. “ शासनाने सा. प्र. वि. चे परिपत्रक दिनांक ०३-०९-२००१ व्दारे स्वा. सै. व नामनिर्देशित पाल्य यांना शासन सेवेत सामावुन घेण्याबाबत नियुक्ती अधिकारी व विभाग प्रमुखांना दिलेले अधिकार शासनाने रद्द केले आहेत काय ? असल्यास त्याबाबतचा शासन निर्णय,

८. शासनाने सा. प्र. वि. चा शासन निर्णय दिनांक २५-१०-२००५ अन्वये “क” व “ड” गटातील कर्मचा-यांच्या भरतीला एकत्रित मार्गदर्शक तत्वे तयार केलीत त्यामुळे शासनाचे सा. प्र. वि. चे दिनांक ०४-०३-९१ रोजी स्वा. सै. /

पाल्याबाबत काढलेले परिपत्रक रद्द करण्यात आले आहे काय ? (या शासन निर्णयाचा स्वा. सै. अवलंबिताबाबत सा. प्र. वि. च्या दिनांक २५-१०-०५ च्या शा. नि. मध्ये उल्लेख केलेला नाही),

९. शासनाच्या दिनांक २५-१०-०५ च्या शासन निर्णयातील तत्वे क्र ६ व ७ स्वा. सै. / अवलंबितांनाही लागु आहेत काय ?

१०. इतःपर स्वा. सै. अवलंबितानेही स्वतः सर्व सामान्य उमेदवार समजुनच शासकीय नोकरीसाठी प्रयत्न करावेत, त्यांच्या पूर्वजांच्या देशसेवेबाबत यापुर्वी शासनाने देऊ केलेले प्राधान्य आता त्यांना मिळणार नाही त्यांनी त्याची अपेक्षा ठेवू नये असे सा. प्र. वि. च्या दिनांक २५-१०-०५ च्या शासन निर्णयाधारे शासनास अपेक्षित आहे काय ?

११. शासनाने सा. प्र. वि. च्या दिनांक ३१-०५-९३ आणि दिनांक १९-०३-९८ मध्ये स्वा. सै. अवलंबितांना कोणत्या सवलती देऊ केल्या आहेत. ”

सदर माहिती अपिलार्थीने टपालाव्दारे अपेक्षिली होती.

सदर अर्ज जन माहिती अधिका-याकडे दिनांक ३१-०५-२००६ रोजी प्राप्त झाला असे त्यांनी आज सुनावणीमध्ये सांगितले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अर्जावर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद दिला नसल्याचे या प्रकरणी दिसून येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीमध्ये माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-०७-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

सदर अपील जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाले नसल्याचे आज त्यांनी सुनावणीमध्ये सांगितले व त्यापृष्ठ्यर्थ त्यांनी आयोगास शपथपत्र सादर केले आहे.

जन अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीच माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४-११-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या व्दितीय अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत याची नोंद घेण्यात आली आहे. तथापि अपिलार्थीने त्यांचे म्हणणे एका लेखी पत्राव्दारे आयोगाकडे सादर केले आहे. अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या या पत्रातील मजकूर हा त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या अर्जातील मजकूरासोबत जुळत नाही. तथापि अपिलार्थीने आयोगासमोर सादर केलेल्या पत्रावरुन असे दिसून येते की, त्यांनी मागितलेल्या माहिती संदर्भात संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून अशी माहिती पुरविली जाते की त्यांना परत माहिती मागण्याची वेळ येते व अशा प्रकारे वेळ आणि वित्त खर्च होऊन त्यांच्या हाती काहीच येत नाही. त्यांना शासनाच्या जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून विसंगत स्वरुपाची माहिती पुरविली जाते त्यामुळे स्वातंत्र्य मिळविण्याच्या संग्रामाचे वेळी स्वातंत्र्य सैनिक जेवढा संभ्रमीत नव्हता तेवढा आज स्वातंत्र्य मिळाल्यानंतर संभ्रमीत झाला असे त्यांनी या पत्रामध्ये नमूद केले आहे. त्याचबरोबर एकीकडे शासन स्वातंत्र्य सैनिक / प्रतिनिधींना बोलावून सत्कार करुन त्यांच्या व्यथेबाबत सहानुभूती दाखविते तर प्रत्यक्षात मात्र त्यांच्या प्रश्नांची नीटपणे उकल करत नाहीत असे त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने माहिती मागितली त्यावेळी ते या पदावर कार्यरत नव्हते. अपिलार्थी त्याच प्रश्नावर त्यांच्याकडे वेळोवेळी अपिले व अर्ज दाखल करत असल्यामुळे त्यांनी अपिलार्थीच्या या अर्जास उद्देशून एक उत्तर त्यांच्याकडील दिनांक १९-०८-२००६ च्या पत्रान्वये दिले आहे. जन माहिती अधिकारी यांनी पुढे असेही सांगितले की, या विषयासंदर्भात अर्जदाराने माहिती अधिकारात एकूण १२ वेळा अपिले व अर्ज दाखल केले होते. त्या अर्जासंदर्भात अपिलार्थीस स्वातंत्र्य सैनिकांना देण्यात येणा-या सवलती संदर्भातील सर्व शासकीय परिपत्रकांच्या प्रती देण्यात आल्या आहेत. अपिलार्थी यांना स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना शासन सेवेत सामावून घेण्यासंबंधी शासनाच्या नियमानुसार कशी कार्यपध्दती आहे याबाबत ज्ञान असतांनाही शासन निर्णयातील एखाद्या वाक्याचा विपर्यास करुन याबाबत ते वारंवार माहिती मागवित असल्याचे त्यांना दिसून आले आहे.

सदर पत्राचे अवलोकन करता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नासंदर्भात सर्वसाधारणपणे योग्य अशी माहिती दिल्याचे दिसून येते. अपिलार्थीने विचारलेल्या माहितीचे अवलोकन करता त्यांनी मुद्दा क्रमांक ५ वगळता विचारलेली सर्व माहिती प्रश्नार्थक स्वरुपातील अशी आहे व या प्रश्नांची उत्तरे त्यांनी जन माहिती अधिका-याकडून अपेक्षिली आहे. त्यांनी विचारलेले प्रश्न पाहता या प्रश्नाचे स्पष्टीकरण जरी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये अभिप्रेत नसले तरी जन माहिती अधिकारी यांना या पत्रावर अपिलार्थीस सर्वसाधारण स्वरुपाचे मार्गदर्शन करणे त्यांना सहज शक्य आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी वेळोवेळी शासनाच्या संबंधीत परिपत्रकाच्या प्रती पुरविल्या आहेत. अपिलार्थीने विचारलेल्या एकूण ५ मुद्दयावरील माहिती पैकी अपिलार्थीस त्यांनी अद्यापपर्यत दिनांक १९-०३-९८ च्या परिपत्रकाची प्रत दिली नसल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणले आहे. अपिलार्थीने मागितलेली माहिती, माहितीचा

अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये बसत नसल्याने जन माहिती अधिका-यास अपिलार्थीस ही माहिती देता आली नाही. तथापि त्यांनी त्याप्रमाणे अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ (१) अन्वये विहित मुदतीत निर्णय घेऊन तो त्यांना कळविणे अपेक्षित आहे. जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारची कृती न करुन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारे त्यांच्या कार्यशैलीतील स्पष्ट केलेल्या कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांना राज्य माहिती आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे. त्यांच्या या ताकीदीची नोंद त्यांच्या वरिष्ठांनी घ्यावी असे सूचित करण्यात येत आहे. त्याच बरोबर त्यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे विचारलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ५ मधील संदर्भिय दिनांक १९-०३-९८ च्या शासकीय निर्णयाची प्रत अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसात विनामूल्य पाठवावी असेही त्यांना पुढे आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे, राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## <u>निर्णय</u>

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे विचारलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ५ मधील मुद्दयाशी संदर्भात दिनांक १९-०३-९८ च्या शासकीय निर्णयाची प्रत अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसात विनामूल्य पाठवावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ३१-१०-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्रीमती प. गं. कोदरकर, स्वा. सै. व्दारा - श्री. दे. म. अकोलकर, ३३ (अ) ‘‘रेणुका’’, छत्रपतीनगर, गारखेडा परिसर, औरंगाबाद – ४३१ ००५

२ जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपसचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमाक २००७/रामाआ/अपील/सिआर/६१८

निर्णय दिनांक- ३१-१०-२००७.

श्री.शेख मेहबुब खाजामियाँ : अपिलार्थी
मनियार क्लॉथ सेंटर, झेंडा चौक, मुखेड
तालूका-मुखेड जिल्हा-नांदेड.

विरुध्द

१ माहिती अधिकारी, तहसील कार्यालय, मुखेड : प्रतिवादी
जिल्हा-नांदेड.

२. जनअपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, मुखेड, जिल्हा-नांदेड.

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनाक- ३१-१०-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री.शेख महेबुब खाजामियाँ ( यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जनमाहिती अधिकारी तथा माहिती अधिकारी तहसील कार्यालय, मुखेड, तत्कालीन नायब तहसीलदार,मुखेड श्री. मारुती माधवराव आनंदा (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, मुखेड श्री.रामचंद्र बाबाराव कदम (यापुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- २५-०८-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

> ‘‘ श्री.गोंधने तलाठी यांनी मुखेड तलाठी सज्जा मध्ये त्यांच्या कालावधीत किती फेरफार केले. त्याचे फेरफार क्रमांक मिळणे बाबत त्यांच्या नावासहित. ’’

सदर अर्ज अपिलार्थीने तहसीलदार मुखेड यांच्या नावाने केला होता. अपिलार्थीच्या उपरोक्त अर्जावर तहसीलदार, मुखेड यांनी त्यांच्याकडील दिनांक- २५-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देवून अपिलार्थीने मागणी केलेला फेरक्रमांक ८०४४ चे रजिष्टर त्यांच्या कार्यालयात जमा झाले नसल्याचे कळविले व त्याच बरोबर अपिलार्थीने तलाठी यांच्याशी संपर्क साधून वरील निकाल हस्तगत करण्याचे सूचित केले.

या प्रकरणी प्रत्यक्षतः संबंधीत तलाठी मुखेड सजा हे माहिती अधिकारी असून जनअपिलीय अधिकारी तहसीलदार मुखेड हे आहेत.

जनमाहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा कायदा २००५ मधील कलम १९ (१) मधील तरतुदी अन्वये तहसीलदार, मुखेड यांच्याकडे उपरोक्त माहितीच्या संदर्भात दिनांक- २७-०९-२००६ रोजी प्रथम अपील केले. सदर अपीलअर्ज जनअपिलीय अधिकारी याच्या कार्यालयात दिनांक- २८-०९-२००६ रोजी प्राप्त झाला. सदर अपील अर्जावर जनअपिलीय अधिकारी यांनी दिनांक- ०९-१०-२००६, दि. १८.१०.२००६ व दि. ०२.११.०६ या दिवशी सुनावणी ठेवली होती. तथापि या प्रकरणी प्रत्यक्ष सुनावणी झाली नसल्याचे व या संदर्भात तहसीलदार, मुखेड यांनी कोणतेही सुनावणीचे आदेश दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. तहसीलदार मुखेड यांनी या सुनावणीस नायब तहसीलदार, मुखेड यांना प्रत्येक वेळा बोलाविल्याचे दिसून येते व त्याची एक प्रत अपिलार्थीस दिल्याचे दिसून येते. तथापि सुनावणी ठेवलेल्या पत्राची प्रत तलाठी सजा मुखेड यांना दिली नसल्याचे दिसून येते. वास्तविकतः जनअपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतांना अपिलार्थी व संबंधित जनमाहिती अधिकारी यांना एकत्र बोलावून घेवून त्यांचे म्हणणे ऐकून घेवून आपला निर्णय देणे हे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अभिप्रेत आहे. तथापि जनअपिलीय

अधिकारी यांनी यापैकी कोणतीही कार्यवाही केलेली नाही. त्या या कार्यशैलीची नोंद जिल्हाधिकारी, नांदेड यांनी यथायोग्य रित्या घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणतीच माहिती प्राप्त न झाल्याने व्यथीत होवून अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये दिनांक- ०५-०१-२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून संबंधितांना योग्य ती शास्ती लावण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये अपिलार्थी यांच्या तर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी दिनांक २३-०८-२००६ रोजी माहितीचा अर्ज करुनही त्यांना दिनांक- ३०-१०-२००७ दुपारपर्यंत अपेक्षित असलेली माहिती संबंधित जनमाहिती अधिकारी यांच्याकडून मिळू शकली नाही. तथापि ही माहिती दिनांक- ३०-१०-२००७ रोजी दुपारी ४.०० वाजता तहसील कार्यालय, मुखेड यांच्या प्रतिनिधीने त्यांना दिली. सदर माहितीवर अपिलार्थी समाधानी नसून त्यांना ही माहिती साक्षांकित करुन हवी असल्याचे त्यांनी आयोगासमोर सांगितले.

आज सुनावणीस आपली बाजू मांडण्यासाठी तत्कालीन जनमाहिती अधिकारी तहसील कार्यालय, मुखेड हे उपस्थित आहेत. तथापि जनअपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद मांडला की, अपिलार्थीने मागितलेली माहिती तत्कालीन तलाठी श्री.गोंधने यांच्याकडे उपलब्ध होती. सदर तलाठी श्री.गोंधने आता मुखेड येथून बदलून घुंगराळा तालूका- नायगाव येथे कार्यरत आहेत. श्री.गोंधने यांची बदली झाल्यानंतर त्यांनी त्यांच्याकडील फेरफार

रजिष्टर, त्यांच्या नंतर त्या पदाचा कार्यभार घेणा-या तलाठयास हस्तांतरीत केले नाही. श्री.गोंधने यांची बदली दोन वर्षापासून झाली असून श्री.गोंधने यांच्याकडे सदर रजिष्टर गेल्या दोन वर्षापासून होते. श्री.गोंधने यांना वारंवार विनंती करुनही श्री.गोंधने यांनी सदर रजिष्टर त्यांच्या कार्यालयात सादर केले नाही. अंतिमतः त्यांनी श्री.गोंधने यांना दिनांक- ०८-१०-२००७ रोजी त्यांना महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम १७ (२) नुसार कार्यवाही करण्याचा इशारा दिल्यानंतर त्यांनी ते रजिष्टर तहसील कार्यालय, मुखेड यांच्या कार्यालयात दिनांक- ३०-१०-२००७ रोजी सादर केले व सदर माहिती प्राप्त होताच त्यांनी अपिलार्थीस दिनांक ३०-१०-२००७ रोजी दुपारी ४.०० वाजता माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम पाहता अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विहित मुदतीत न मिळण्यासाठी श्री.गोंधने, तत्कालीन तलाठी तथा जनमाहिती अधिकारी हे प्रामुख्याने जबाबदार असल्याचे दिसून येते. वास्तविकतः त्यांची तलाठी मुखेड या पदावरुन बदली झाल्यानंतर त्यांनी त्यांच्या नंतर त्यांच्या पदाचा पदभार स्विकारणा-या तलाठयास आपला सर्व कार्यभार व आपल्या कडील सर्व रजिस्टर्स हस्तांतरीत करणे हे शासकीय नियम व संकेता प्रमाणे जरुरीचे आहे. तथापि त्यांनी सदर रजिष्टर त्यांच्याकडे अंदाजे दोन वर्षे ठेवून आपल्या कार्यशैलीतील नुसता कर्तव्यपरायणतेचा अभाव व बेजबाबदारपणा स्पष्ट केला नसून त्यांच्या सचोटी बाबत संशयास्पद वर्तन केले आहे. राज्य माहिती आयोगाच्या सुनावणीची नोटीस गेल्यानंतर आयोगाकडील सुनावणीच्या आदल्या दिवशी अपिलार्थीस त्यांना अपेक्षित असलेली माहिती प्राप्त झालेली आहे. अर्थात या माहितीमूळेही अपिलार्थी यांचे समाधान झाले नाही. महसूल खात्याला अशा प्रकारची घटना निश्चीतपणे भुषणावह नाही. या आयोगाच्या विधानाशी जिल्हाधिकारी , नांदेड हेही सहमत होतील अशी अपेक्षा आहे. अशा

प्रकारची पुनरावृती भविष्यात टाळण्याच्या दृष्टीने त्यांनी त्यांच्या स्तरावर त्यांच्या अधिपत्याखालील सर्व पातळीवरील अधिका-यांना/कर्मचा-यांना बदली होताना कोणती कागदपत्रे बदलीनंतर येणा-या अधिका-यास / कर्मचा-यांस हस्तांतरित करावयाची या संदर्भात एक परिपत्रक तात्काळ पारित करावे, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. या प्रकरणी अपिलार्थीस माहिती विहित मुदतीत प्राप्त न होण्याकरिता तत्कालीन  जनमाहिती अधिकारी हेच जबाबदार ठरतात. संबंधित रजिस्टर बरोबर घेवून चुकीच्या पध्दतीने त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव व बेपर्वाइ स्पष्ट करुन आपल्या सचोटी बद्दल संशय निर्माण केला आहे व त्याचबरोबर अपिलार्थीस त्यांना हवी असलेली माहिती मिळण्यापासून  वंचीत ठेवल्याचे निश्चीतपणे सिध्द होत आहे. तेव्हा असे आदेशीत करण्यात येते की, संबंधित जनमाहिती अधिकारी श्री.गोंधने यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न दिल्याने त्यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) प्रमाणे प्रतिदिनी २५०/- या प्रमाणे एकूण २५,०००/-रुपये ( पंचवीस हजार रुपये ) इतकी शास्ती का लावण्यात येवू नये याचा खुलासा त्यांनी आयोगाकडे हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १५ दिवसाच्या आत सादर करावा व त्याचबरोबर त्यांनी दर्शविलेल्या कर्तव्यपराणतेच्या अभाव, बेपर्वाईबद्दल व संशयास्पद सचोटीबद्दल त्यांच्यावर उपविभागीय अधिकारी, देगलूर यांनी प्रचलित सेवा नियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करुन आपला अहवाल आयोगास हे आदेश निर्गमीत झाल्यापासून दोन महिन्याच्या आत पाठवावा.

तहसीलदार, मुखेड  यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतून यापूर्वी दिलेली माहिती वगळून उर्वरित संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीन दिवसाच्या आत त्यांना साक्षांकित करुन विनामुल्य पुरवावी. असेही पुढे आदेशीत करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपीलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

१९. अपीलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

२०. तहसीलदार मुखेड यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतून यापूर्वी दिलेली माहिती वगळून उर्वरित संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीन दिवसाच्या आत त्यांना साक्षांकित करुन विनामुल्य पुरवावी.

२१. संबंधित जनमाहिती अधिकारी तथा तत्कालीन तलाठी श्री.गोंधने यांच्यावर उपविभागीय अधिकारी, देगलूर यांनी, या प्रकरणी त्यांनी दाखविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव, बेपर्वाइ व संशयास्पद सचोटी बद्दल यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करावी व आपला अनुपालन अहवाल हे आदेश निर्गमीत झाल्यापासून दोन महिन्याच्या आत आयोगाकडे सादर करावा.

औरंगाबाद. ( वि.बा.बोरगे)
दिनांक- ३१-१०-२००७ राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद.

प्रत,

४२. श्री.शेख महेबुब खॉजामियॉ, मनियार क्लॉथ सेंटर, झेंडा चौक मुखेड जिल्हा-नांदेड.

४३. जनमाहिती अधिकारी तहसील कार्यालय, मुखेड, जिल्हा- नांदेड,यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४४. जनअपिलीय अधिकारी तथा तहसीलदार मुखेड जिल्हा- नांदेड, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४५. जिल्हाधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४६. सचिव, मुख्य माहिती आयुक्त कर्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

४७. निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

**अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/६२०**

**निर्णय** ३१-१०-

**दिनांक** २००७

श्री. लक्ष्मण दशरथराव पाटील, : अपिलार्थी
एन ९ एच १६४/०३, श्रीकृष्णनगर,
टि. व्हि. सेंटर चौकाजवळ, सिडको,
औरंगाबाद

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी :
तथा उप व्यवस्थापक (प्रशासन),
महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन
महासंघ मर्या. प्रधान कार्यालय, कॉटन
काम्प्लेक्स, अंजनी चौक, वर्धा रोड,
नागपूर – १५

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सरव्यवस्थापक (प्रशासन),
महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन
महासंघ मर्या. प्रधान कार्यालय, कॉटन
काम्प्लेक्स, अंजनी चौक, वर्धा रोड,
नागपूर – १५

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-१०-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. लक्ष्मण दशरथराव पाटील (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व जन माहिती अधिकारी तथा उप व्यवस्थापक (प्रशासन), महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ मर्या. श्री. कृष्णा डोमाजी घाटोळे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा सरव्यवस्थापक (प्रशासन), महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ मर्या. हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी सर्व प्रथम अपिलार्थीने त्यांच्याकडील दिनांक १७-०७-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील लेखापालाच्या आस्थापना व सेवाविषयक बाबीसंदर्भात व त्याचबरोबर त्यांच्या कार्यालयातील लेखाविषयक बाबीसंबंधी सन २००४-२००५ या कालावधीतील माहिती खालील प्रमाणे मागितली होती.

“ मे. व्यवस्थाप (पागार) महाराष्ट्र रा. सह. का. उत्पा. प. महा. मर्या. शिवडी, मुंबई-१५ यांच्या दिनांक २६-०८-२००३ च्या परिपत्रकांत उल्लेखीत मुंबई कार्यालयातील सहा लेखापालांची नांवे काय आहेत ? / त्यांची संस्थेतील रुजू तारीख / रुजू कोणत्या हुद्दयावर झाले ? / बढती झाली असल्यास बढतीच्या पदावरील रुजू दिनांक ? / त्यांना दिनांक ३१-०३-२००६ पर्यत त्यांच्या विनंतीनुसार पगार वाढीचा निर्णय झाला का ? झाला नसल्यास त्याची कारणे काय आहेत ? निर्णय झाला असल्यास त्यांना पगारवाढ किती मंजूर करण्यात आली ? व फरकाची रक्कम किती अदा केलेली आहे प्रत्येकी ? / या सहा लेखापालांचा दिनांक ३०-०४-२००२ रोजी बेसीक पगार काय होता ? यापैकी किती लेखापालांनी दिनांक ३१-०८-२००४ रोजी स्वेच्छा निवृत्ती स्विकारली आहे व याच तारखेला त्यांचा मुळ पगार काय होता ?

मुंबई व्यतिरिक्त ज्या ज्या विभागांमध्ये लेखापालांची स्टेपिंग अप ऑफ पे च्या वसुलीच्या बाबतीत आदेश पाठविण्यात आलेले होते त्या लेखापालांची संख्या व त्यांची नांवे, संस्थेतील रुजू तारीख, रुजू कोणत्या पदावर झाले, बढती मिळाली असल्यास लेखापाल या बढतीच्या पदावरील रुजू तारीख काय, त्यांचा दिनांक ३०-०४-२००२ वरील बेसीक पगार काय होता, यापैकी किती लेखापालांनी स्वेच्छा निवृत्ती स्विकारली आहे, स्वेच्छा निवृत्ती स्विकारलेल्या लेखापालाकडून वसूली केली आहे का, नसल्यास वसूली पात्र किती रक्कम होती ?

मुंबई कार्यालयातील सहा लेखापालांच्या स्टेपिंक अप ऑफ पे च्या संदर्भात मुंबई बाहेरील लेखापालंच्या वसूलीच्या झालेल्या निर्णयास स्थगती देण्याची सांगड घालण्याची कारणे काय होती, सांगड न घालता वसूली केली असती तर काय अडचण निर्माण होणार होती ? सदरील या वसूल न झालेल्या रक्कमेस कोणास जबाबदार धरण्यात आले आहे का, किंवा ही

रक्कम संस्थेची विनाकारणच सोडून देण्याचा निर्णय झाला आहे ? ही सर्व माहिती देण्यात यावी.

हंगाम २००४-०५ (औरंगाबाद झोनमध्ये) मध्ये किती लाख रुपयांचे जादा पेमेंट प्रक्रिया संस्थांना त्यांच्या देय रक्कमेपेक्षा जास्त करण्यात आलेले आहे ? / त्यापैकी वसूल किती रुपयांचे झाले आहे व ते व्याजासह झाले किंवा व्याजसहीत झाले त्या वापरलेल्या रक्कमेच्या व्याजाची वसूली संबंधीत प्रक्रीया संस्थेकडून केली जाणार आहे किंवा संबंधीत लेखापालाकडून ? जबाबदारी काय ठरली आहे ? / सदरील जादा पेमेंट ज्या विभागाच्या लेखापालाने केलेले आहे त्यात असे कृत्य करतांना त्यांनी त्यात फौजदारी स्वरुपाची काही कृती केल्याचे आढळून आले आहे का ? असे कृत्य केलेले आढळून आले असल्यास फौजदारी गुन्हा दाखल का केला गेला नाही ? ”

सदर माहिती अपिलार्थीने नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे अवलोकन करता अपिलार्थीने मागितलेल्या माहितीमध्ये काही मुद्दयावर त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून कारणे काय ? सांगड कशी घालता ? वसुली केली असती तर काय अडचण निर्माण होणार होती ? अशी कृती करतांना त्यांना त्यात फौजदारी स्वरुपाची कृती केल्याचे आढळून आले आहे का, असे आढळून आले असल्यास फौजदारी गुन्हा दाखल का केला नाही असा स्वरुपाची जन माहिती अधिकारी यांचा खुलासा विचारणारी माहिती मागितली आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) च्या तरतुदीमध्ये माहिती या शब्दाची व्याख्या पुरेशा प्रमाणात स्पष्ट करण्यात आली आहे. अपिलार्थीने विचारलेली प्रश्नार्थक खुलासे वजा अथवा कारणे विचारणारी माहिती या व्याख्येमध्ये बसत नाही त्यामुळे ही सुनावणी अपिलार्थीने विचारलेले खुलासे वजा मुद्दे वगळून घेण्यात येत आहे.

अपिलार्थीने केलेल्या सदर अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १६-०८-२००६ रोजी प्रथम प्रतिसाद दिला. त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी सहाय्यक जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे सादर केलेली माहिती अपिलार्थीस पाठविली असल्याचे म्हटले आहे. जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १६-०८-२००६ रोजी पाठविलेली माहिती अपिलार्थीस दिनांक २०-०८-२००६ रोजी प्राप्त झाली. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १६-०८-२००६ रोजी जी माहिती पाठविली तिचे अवलोकन करता त्यांनी अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी काही माहिती दिली असून उर्वरीत माहिती करिता अपिलार्थीस त्यांच्या मुंबईस्थित कार्यालयाशी संपर्क साधण्याचे सूचित केले व त्याचबरोबर काही माहिती परभणी येथे उपलब्ध असल्याने त्यांनी परभणी येथील कार्यालयाशी माहितीच्या विषयाशी संदर्भात केलेल्या पत्रव्यवहाराची माहिती दिली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०८-२००६ रोजी प्रथम अपील केले.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे अथवा अपिलार्थीशी कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार

केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपिलावर निर्णय देण्यास अशा प्रकारे टाळाटाळ केल्याचे सिध्द होते. व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ मर्यादित यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या कार्यशैलीची यथायोग्य नोंद घ्यावी असे त्यांना सुचविण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अर्धवट माहितीने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९

(३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-११-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद मांडण्यात आला की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीपैकी त्यांना उपलब्ध झालेल्या माहितीमध्ये, ६ लेखापालांचा दिनांक ३०-०४-२००२ रोजीचा बेसीक पगार व दिनांक ३१-०८-२००४ रोजी स्वेच्छानिवृत्ती स्विकारलेल्या लेखापालांचे त्या दिनांकाचे मूळ पगार ही माहिती अद्याप मिळाली नाही. त्यामुळे त्यांना प्रथम प्रतिसादाव्दारे जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेली माहिती अर्धवट प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगासमोर सांगितले.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक १६-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती दिली आहे. सदर माहिती अपिलार्थीस दिनांक २०-०८-२००६ रोजी प्राप्त झाली आहे. या माहितीमध्ये अपिलार्थीने मागितलेल्या ६ लेखापालांच्या दिनांक ३०-०४-२००२ व दिनांक ३१-०८-२००४ रोजी असलेल्या माहितीमध्ये बेसीक पगाराची माहिती नव्हती. सदर माहिती त्यांनी दिनांक ३०-१०-२००७ रोजी म्हणजे व्दितीय अपील सुनावणीच्या आदल्या दिवशी तयार ठेवली असून ही माहिती अपिलार्थीस देण्यास आज ते तयार आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद पाहता असे दिसून येते की, अपिलार्थीस बहुतांश माहिती जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत पुरविलेली आहे. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीमध्ये ब-याच ठिकाणी त्यांनी जन माहिती अधिकारी यांचे खुलासे अपेक्षित असलेली माहिती विचारल्याचे दिसून येते. अर्थात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या मुद्दयावरील माहिती दिली नाही ही त्यांची कृती बरोबर आहे असे आयोगाचे मत आहे. कारण माहितीचा अधिकार अधिनियम २००५

मधील माहिती या व्याख्येमध्ये अपिलार्थीने खुलासे वजा माहिती विचारली आहे ती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देणे अपेक्षित नाही.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील २ मुद्दयावरील माहिती जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस विनामूल्य देण्यास आज रोजी तयार आहेत. वास्तविक पाहता सदर माहिती, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम (४) (२) च्या तरतुदीनुसार स्वंयप्रेरणेने घोषित करावयाच्या माहितीच्या प्रकारामध्ये मोडते. तथापि त्यांनी अशा प्रकारची कृती संबंधीत प्राधिकरणाने केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रा वरुन दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, अपिलार्थीने याच विषयावर केलेल्या दुस-या एका अपिलासंदर्भात ही माहिती त्यांच्याकडील दिनांक ०८-०१-२००७ रोजीच्या पत्राने अपिलार्थीस पुरविली आहे. याप्रीत्यर्थ त्यांनी त्यांचे अपिलार्थीस उद्देशून लिहिलेले दिनांक ०८-०१-२००७ चे पत्र दाखविले. त्यामध्ये संबंधीत लेखापालाच्या पगाराबाबतचा आवश्यक तो उल्लेख आढळून येतो.

वरील घटनाक्रम पाहता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जरी विहित मुदतीत माहिती दिली असली तरी, ती अर्धवट स्वरुपात दिली असल्याचे दिसून येते. अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयातून शोधून ती अपिलार्थीस विहित मुदतीत पुरविणे सहज शक्य होते व त्याचबरोबर अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी काही माहिती जर त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत नव्हती तर, त्यांनी अपिलार्थीचा अर्ज त्यांच्या प्राधिकरणाच्या मुख्यालयाकडे (जेथे अपिलार्थीने मागितलेली माहिती उपलब्ध असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १६-०८-२००६ च्या पत्रात म्हटले आहे) पाठवून त्याची प्रत अपिलार्थीस द्यावयास हवी होती. तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती विहित मुदतीत केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. आता अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या संपूर्ण माहिती दिनांक ३१-१०-२००७

रोजी दिलेल्या माहिती सह मिळाली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस संपूर्ण माहिती विहित मुदतीत न देऊन फक्त अर्धवट माहिती अपिलार्थीस विहित मुदतीत दिली आहे. अशा प्रकारे त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव अप्रत्यक्षपणे सिध्द केला आहे. त्यांच्या कार्यशैलीमधील त्यांनी दाखविलेल्या अशा प्रकारच्या कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांना राज्य माहिती आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून त्यांनी यापुढे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या संदर्भात त्यांच्याकडे दाखल होणा-या अर्जाबाबत कारवाई करण्यास भविष्यात सतर्क राहावे असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे, राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

**निर्णय**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या अर्धवट माहितीबद्दल राज्य माहिती आयोगातर्फे त्यांना सक्त ताकीद देण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ३१-१०-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. लक्ष्मण दशरथराव पाटील, एन ९ एच १६४/०३, श्रीकृष्णनगर, टि. व्हि. सेंटर चौकाजवळ, सिडको, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा उप व्यवस्थापक (प्रशासन), महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ मर्या. प्रधान कार्यालय, कॉटन काम्प्लेक्स, अंजनी

चौक, वर्धा रोड, नागपूर – १५ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सरव्यवस्थापक (प्रशासन), महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ मर्या. प्रधान कार्यालय, कॉटन काम्प्लेक्स, अंजनी चौक, वर्धा रोड, नागपूर – १५ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ मर्यादित, खेतान भवन, ६ वा मजला, १९८ जे. टी. रोड, चर्चगेट रेल्वेस्टेशन जवळ, मुंबई – २० यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती